
# प्रबोधनकार ठाकरे
## समग्र वाङ्मय

खंड चौथा



# हिंदुत्व

अनुक्रमणिका

# प्रबोधनकार ठाकरे

# समग्र वाङ्मय

## खंड चौथा

## ‘हिंदुत्व’

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ
मुंबई

अनुक्रमणिका

प्रथमावृत्ती (पुनर्मुद्रण):
**नोव्हेंबर, २०००**

प्रकाशक:
**सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ**
१७२, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय मार्ग
नायगाव, दादर, मुंबई ४०० ०१४

©**प्रकाशकाधीन**

मुखपृष्ठ:
**प्रबोधचंद्र सावंत**

मुद्रक:
**व्यवस्थापक**
शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय,
मुंबई ४०० ००४

मूल्य : रुपये १०५

## अनुक्रमणिका

# प्रबोधनकार ठाकरे
# समग्र वाङ्‌मय

## खंड चौथा

# ‘हिंदुत्व’

**संपादक मंडळ**
**श्री. द. मा. मिरासदार,** अध्यक्ष
**श्रीमती नीला उपाध्ये,** उपाध्यक्ष
**श्री. पंढरीनाथ सावंत,** निमंत्रक
**प्रा. शेषराव मोरे**
**श्री. अर्जुन डांगळे**
**श्री. दि. र. भालेराव**
**डॉ. मा. गो. माळी**

अनुक्रमणिका

# अनुक्रमणिका

मंडळाच्या अध्यक्षांचे निवेदन ........ २१
हिंदुधर्माचे दिव्य आणि संस्कृतींचा संग्राम ........ २३
हिन्दु जनांचा ऱ्हास आणि अधःपात........ ७९
देवळांचा धर्म आणि धर्माचीं देवळें........ १५७

# निवेदन

प्रबोधनकार कै. केशव सीताराम ठाकरे यांचे समग्र साहित्य खंडरूपाने प्रसिद्ध करण्याचे महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने ठरविले होते. त्या योजनेनुसार पहिले तीन खंड यापूर्वीच प्रसिद्ध झाले. आज हा चौथा खंड "हिंदुत्व" या शीर्षकाने प्रसिद्ध करताना मंडळास आनंद होत आहे.

प्रबोधनकार ठाकरे हे हिंदू संस्कृती आणि हिंदू धर्म यांचे जाज्वल्य अभिमानी होते. पण त्यांचा हा अभिमान पूर्णपणे डोळस होता. हिंदू समाजातील अनेक दुष्ट रुढी, अंधश्रद्धा यांचे ते कडवे टीकाकार होते. समाजसुधारणा होऊन हा समाज पूर्ववत सामर्थ्यशाली आणि वैभवसंपन्न व्हावयाचा असेल तर आपल्या धार्मिक कल्पना आणि परंपरागत रुढी यात अगदी मूलभूत बदल झाले पाहिजेत असे त्यांचे स्पष्ट मत होते आणि ते त्यांनी निर्भीडपणे वेळोवेळी मांडले. ते भिक्षुकशाहीचे कडवे विरोधक होते आणि अत्यंत कठोर आणि रोखठोक शब्दात या भिक्षुकशाहीवर त्यांनी वेळोवेळी कोरडे ओढले.

प्रस्तुतच्या या चौथ्या खंडात एकूण तीन भाग आहेत. पहिल्या भागात **(हिंदु धर्माचे दिव्य आणि संस्कृतीचा संग्राम)** आजच्या हिंदू धर्माची अवगत अवस्था आणि त्याची कारणे यांचा त्यांनी ऊहापोह केला आहे. तसेच मुसलमानी आक्रमणानंतरची या देशाची हीनदीन, पौरुषहीन अवस्था कशी प्रकट झाली याचेही विश्लेषण त्यांनी मोठ्या पोटतिडकीने केले आहे. ज्या भाषेत हा दुःखदायक इतिहास त्यांनी सांगितला आहे ती भाषा अनेक ठिकाणी उपहासगर्भ तर आहेच, पण त्याचबरोबर तेजस्वी आणि हिंदू समाजाच्या पौरुषाला आवाहन करणारी आहे. त्यातून आजच्या या दुःस्थितीचे शल्य त्यांना अंतःकर खोलवर कसे बोचत होते, याचेही दर्शन घडते.

दुसरा भाग **"हिंदुजनांचा ऱ्हास आणि अधःपात"**या शीर्षकाने प्रसिद्ध झाला आहे. बॅरिस्टर एस. सी. मुखर्जी या विद्वान ग्रंथकाराने मूळ इंग्रजीत लिहिलेला **"The Decline and Fall of The Hindoos"**हा प्रबंध १९१९ मध्ये प्रथम प्रसिद्ध झाला. या प्रबंधाचा खुपच गाजावाजा झाला. भारतमहर्षी डॉ.सर पी. सी. रॉय यांनी हा प्रबंध म्हणजे "भरतखंडाच्या पुनरुज्जीवनाचा विशेष संदेश" या शब्दात त्याचा गौरव केला. सुधारणावादी प्रबोधनकारांच्या तो वाचनात आल्यावर त्यांना तो इतका आवडला की त्याचा मराठीत अनुवाद झालाच पाहिजे असे त्यांना वाटले आणि १९२६ मध्ये त्यांनी हा अनुवाद प्रसिद्ध केला. बॅ. मुखर्जींनी वेदपूर्व काळापासून तो थेट मुसलमानांच्या स्वाऱ्यापर्यंत भारतीय इतिहासाची चिकित्सक छाननी करून हिंदुजनांच्या ऱ्हासाची आणि अधःपाताची मीमांसा केली आहे. "जातीभेदाचा पुरस्कार करणारी सामाजिक क्षेत्रातली भिक्षुकशाही म्हणजे हिंदुस्थानला जडलेली व्याधीच होय" हा प्रफुलचंद रॉय यांचा रोखठोक अभिप्रायच या ग्रंथाच्या वाचनाने सर्वत्र प्रत्ययास येत आहे असे प्रबोधनकारांना वाटते. अशा या परिस्थितीत या हिंदू भारताच्या आत्मोद्धाराचा मार्ग कसा चोखाळावा हे या प्रबंधाच्या वाचन-मनन-निदिध्यासाने सर्वांना कळावे, ही प्रबोधनकारांची तळमळ आहे.

"देवळांचा धर्म आणि धर्मांची देवळें" हे छोटेसे पुस्तक याच काळात प्रसिद्ध झाले. आपल्या समाजात "देऊळ" या संस्थेची निर्मिती कशी झाली याचा इतिहास तर प्रबोधनकारांनी संक्षेपाने सांगितला आहेच, पण हळूहळू ही देवळे म्हणजे भिक्षुकशाहीच्या लोभी, स्वार्थी वृत्तीची, संपत्तीच्या संग्रहाचीच केवळ आणि समाजपराङमुख दृष्टीची केंद्रेच कशी बनली याचाही वृत्तान्त कथन केला आहे. ज्या सात्विक संतापाने

अनुक्रमणिका

त्यांनी भिक्षुकशाहीवर कठोर कोरडे ओढले आहेत. त्यातील रोखठोक भाषा आजही वाचकाना अंतर्मुख करणारी आहे.

(आठ)

कालदृष्ट्या प्रबोधनकारांचे हे लेखन आता जुने झाले आहे. सत्यशोधकी चळवळीच्या काळातील हे लेखन असल्यामुळे ते फार कठोर भाषेत आणि संतप्त वृत्तीने लिहिलेले आहे असे क्वचित कोणाला वाटेल पण जेव्हा साध्या मलमपट्टीपेक्षा शस्त्रक्रियेनेच एखादा रोग बरा होण्याचा संभव असतो, तेथे शस्त्रक्रिया केलीच पाहिजे, हे कोणीही सूज्ञ मनुष्य मान्य करीलच. पण या संतापामागे आणि कठोर टीकेमागे या हिंदू समाजातील दोष नाहीसे व्हावेत आणि पुन्हा त्यास गौरवाचे स्थान प्राप्त व्हावे हीच तळमळ आहे हे नाकारता येणार नाही. म्हणून सर्व दृष्टींनी या ऐतिहासिक लेखनाचे स्वागत करणे आवश्यक आहे.

पहिल्या तीन खंडांप्रमाणेच याही खंडाच्या संपादन समितीतील श्री. पंढरीनाथ सावंत (निमंत्रक), श्रीमती नीला उपाध्ये, अर्जुन डांगळे, डॉ. मा. गो. माळी, प्रा. शेषराव मोरे, दि. र. भालेराव यांनी खंडाच्या संपादन कार्यार्थ घेतलेल्या परिश्रमाबद्दल मंडळ त्यांचे आभारी आहे.

मंडळाचे सचिव, श्री. चंद्रकांत वडे यांनी वेळोवेळी वैयक्तिक लक्ष घालून हा खंड लवकर प्रसिद्ध व्हावा म्हणून प्रयत्न केले. तसेच मुंबईतील शासकीय मध्यवर्ती मुद्रणालयाने या खंडाची छपाई उत्तमरीत्या करून दिल्याबद्दल मंडळ त्यांचेही आभारी आहे.

**द. मा. मिरासदार**

अध्यक्ष,

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ.

बलिप्रतिपदा

दिवाळी : १९९९.

९ नोव्हेंबर १९९९.

अनुक्रमणिका

# प्रबोधनकार ठाकरे
# समग्र वाङ्मय

## खंड चौथा

## हिंदुधर्माचे दिव्य
## आणि
## संस्कृतींचा संग्राम

अनुक्रमणिका

॥ जय जय रघुवीर समर्थ॥
हिन्दु तितुका मेळवावा । आपुला हिन्दुधर्म वाढवावा ॥
सर्वत्र विजयी करावा । सनातन हिन्दुधर्म ॥

# हिंदु धर्माचें दिव्य.
# आणि
# संस्कृतीचा संग्राम.

“Without the missionary spirit there can be no continued vitality and growth of any Religion

—*Monier Williams*

(आवृत्ती २ री)

—लेखक—

**केशव सीताराम ठाकरे-**
संपादक, प्रबोधन-

—

प्रकाशक,

**पुरुषोत्तम महादेव जुवळे**
**नरेंद्र पुस्तकालय, दादर-मुंबई.**

[किंमत फक्त एक रुपया]

अनुक्रमणिका

प्रकाशक

**रा. रा. पुरुषोत्तम महादेव जुवळे**
**नरेंद्र पुस्तकालय, दादर-मुंबई**

मुद्रक
**रा. रा. लक्ष्मण भाऊराव कोकाटे**
**यानी पुणे पेठ सदाशिव, घ. नं. ३०० येथे आपल्या 'हनुमान' छापखान्यात छापले**

*All right reserved by the Author*

अनुक्रमणिका

# आद्य हिन्दुमिशनरी

प. वा. गजानन भास्कर वैद्य

यांच्या दिव्यात्म्यास
अर्पण
असो

के. सी. ठाकरे

अनुक्रमणिका

# प्रकाशकांची विज्ञप्ति

श्री. ठाकरे यांचे हें बहुमोल पुस्तक जनीजनार्दनाच्या सेवेला सादर करण्याचा सुमसंग, अत्यंत दीर्घ कालानेंच कां होईना, लाभत आहे. याबद्दल आम्हांला आनंद वाटतो.

वास्तविक, हें पुस्तक दिसेंबर १९२२ मध्येंच प्रसिद्ध व्हावयाचें; परंतु मुद्रणालयाच्या अपरिहार्य अडचणीमुळें व लेखकाचें कार्यबाहुल्यांमुळें आम्हांला आमचें आश्वासन पुरें करतां आलें नाहीं. तथापि, जनतारूपी जनार्दन या सकारण कालावधीकडे सहानुभूतीनेंच पाहील, अशी आम्हाला उमेद आहे.

त्याचप्रमाणे, सध्यांच्या धामधुमीच्या काळांत विचारजागृति करून पुढील काळाकडे समतोल पाहण्याची दृष्टि देणाऱ्या असल्या उत्कृष्ट ग्रंथाचा तो प्रेमाने आदर करील अशीहि आम्हाला आशा आहे.

श्री. ठाकरे यांची प्रकृति अलिकडे कित्येक महिने बरी नसते. शिवाय त्यांची कार्यव्याप्तीहि अधिक. अशा स्थितींतहि त्यांनी आमच्या विनंतीला मान देऊन हें पुस्तक अत्यंत परिश्रमपूर्वक लिहून दिलें; व त्यामुळें आम्हाला जनसेवेची संधि मिळाली. श्री. ठाकरे यांचे आम्ही याबद्दल अत्यंत ऋणी आहों.

अनुक्रमणिका

## ग्रंथ आणि ग्रंथकार यांची ओळख

ग्रंथ आणि ग्रंथकार यांची ओळख करून देण्याकरितां चार शब्द लिहिण्याच्या विचारानें लेखणी हातात घेतली; परन्तु ग्रंथाची ओळख करून द्यावयाची म्हणजे इतकेंच म्हणावयाचें कीं, हा ग्रंथ वाचकांनीं मनोभावानें वाचावा. तो मला जसा मनोवेधक वाटला तसा तो वाचकांनाही वाटेल. ग्रंथाकाराची ओळख करून द्यावयाची म्हणजे ते अभयानें लिहिणारे व बोलणारे सत्त्वशील इतिहासभक्त आहेत, इतकेंच सांगून त्यांचा अन्तरात्मा ग्रंथांतच पहावा, असे म्हणावयाचे. ग्रंथ वाचीत असतां वाचकांना असें आढळेल कीं, अनेक भावनामय असा कोणी जीव आपल्याशीं बोलत आहे. तोच खरा तेजस्वी ग्रंथाकार ग्रंथकाराचें नाव किंवा ग्रंथकाराचें छायाचित्र हें ग्रंथकाराचें खरें स्वरुप नव्हे.

रा. केशवराव ठाकरे ह्यांची तपश्चर्या मोठी दिसते. त्यांच्या भाषेसारखी जिवन्त भाषा वाचण्याचे प्रसंग थोडेच येतात. प्रस्तुतचा ओजस्वी लेख वाचून माझ्याप्रमाणेच वाचकांसही वाटेल. मुलांनीं व मुलींनीं वाचावयाचे इतिहासग्रंथ जर अशा भाषेत लिहिले जातील तर इतिहासविषयाचें शिक्षण मनोरम व परिणामकारक होईल!

हिन्दुधर्माला इतिहास आहे हें फार थोड्यांच्याच लक्षांत येतें. पुराणमतवाद असा आहे कीं, आम्ही अनादि कालापासून आहों तसेच आहों. प्रस्तुतचा लेख वाचीत असतां वाचकाना नवी दृष्टी येईल व ते नव्या दृष्टीने हिन्दुधर्माकडे पहावयास सिद्ध होतील. ग्रंथ, सिद्धान्त, आणि लोकसंग्रह असे तीन ओघ हिन्दुधर्माच्या इतिहासांत आहेत. ग्रन्थ अनेक, ते एकाच दिवशीं प्रगट झाले नाहींत; सिद्धान्त हे एकाचीं अनेक रुपें, पण तीं प्रगट झालीं भिन्न भिन्न काळीं. हिन्दुलोक हे अनेक शतकांच्या संग्रहाने झाले आहेत हे तीनही ओघ अनेक शतकें वहात आले आहेत.

### हिंदु धर्माचें दिव्य

पण तिसऱ्या ओघाला उच्चनीचता इतिहासांत फार आलेली दिसते. हिन्दुजन ग्रंथांना जपतात; ते कांहींसे सिद्धांन्ताना जपतात; पण ते लोक संग्रहाचा विचार करीत नाहींत. लोकसंग्रहाच्या बाजूचाओघ जर सुकून वाळून गेला तर दुसरे दोन असून नसून सारखेच. हा जो नवा मिशनरी भाव शिकावयाचा आहे त्याचे चार चांगले धडे केशवरावजींचा हा ग्रंथ शिकवील.

'अनेक प्राणघातक दिव्यातून आज हिन्दुधर्म पार पडलेला आहे' (पृष्ठ ६). आतांचा प्रसंग कठीण आहे. हा ग्रंथ वाचून हिन्दुजनांच्या चित्ताला कांहींसा सावधपणा येईल, असामला भरवंसा आहे. हिंदुस्थानांतील मुसलमान म्हणविणाऱ्या आमच्या देशबांधवांच्या संस्कृतीचा आत्मा आर्य आहे (पृष्ठे १८-१९) तसा आज असंख्य कृस्तीजनांच्यासंस्कृतीचा आत्माही आर्य आहे. आम्ही हिन्दुजनांनी दोंघानाही 'या' म्हणावें अशी भावना या ग्रंथाच्या वाचनाने जागृत होईल. समर्थांचें--

**पतित करावे पावन ।**

हे वचन वाचून हिंदुजन लोकसंग्रहाचा विचार करूं लागले तर त्याचें पुण्य केशवरावजींना लागेल. हिंदुधर्माची दशा अशी कां, तो सोनें असून मातीसारखा कां झाला आहे, 'यांचेंउत्तर इतिहास देईल' (पृष्ठ

३०) हा भाग वाचीत असतां माझ्याप्रमाणेंच वाचकांना थोडें थांबून विचार करावासा वाटेल. किती हिंदु मुसलमान होऊन मोठे राज्यकर्ते झाले तो इतिहास पृष्ठ ५० यावर वाचून लोकसंग्रहाच्या बाजूने विचार करण्याची बुद्धि हिन्दुजनांना होईल व केशवरावजींची लेखणी यशस्वी होईल.

प्रस्तुत ग्रंथाची भाषा जशी ओजस्वी तशी ती कलात्मक व भावोद्दीपक आहे, हें वाचकांनीं पृष्ठे ६० ते ६५ वाचून स्वतःच्याच अनुभवानें पहावें.

शिवबा!
जी.
शिवबा, यांत तूं इतका गोंधळून कां गेलास?

**हिंदु धर्माचें दिव्य**

आई काय करूं?
निंबाळकरांना प्रायश्चित देऊन हिंदु करून घे.

असे विचार अनेक आयांनीं अनेक मातांनीं, अनेक जिजाबाईनी बोलून दाखवावे, व अनेक निंबाळकरांना पावन करून हिंदुधर्मात घ्यावें. असे त्यांनी आपल्या पुत्रांना सांगावे. इतकी विचार क्रांति प्रस्तुतच्या लेखासारखे लेख घडवून आणतील. हे पुण्यकार्य करण्यास रा. केशवराव ठाकरे पुष्कळ वर्षे जगोत श्रीकृष्णांचा आशीर्वाद असो. हा ग्रंथ वाचून लोकजागृति होवो.

मुंबई,
ऑक्टोबर २०, १९१९.

**गजानन भास्कर वैद्य**

अनुक्रमणिका

॥जयजय रघुवीर समर्थ॥

# हिंदु धर्माचें दिव्य

**न**वीन मन्वंतराचा उदय झाला आहे. जगांतील सर्व राष्ट्रांप्रमाणेंच आमच्या प्याऱ्या भरतखंडात नवजीवनाचें राष्ट्रीय तेज आसेतु हिमाचल नवीन पिढीच्या अंतःकरणांत उसाळ्या मारूं लागलें आहे. गेलीं दोन हजार वर्षे मेंढराप्रमाणें एकमार्गी संकुचित पुराणप्रियतेच्याच अभिमानांत गर्क असलेली हिंदी जनता इंग्रजी विद्या–वाघिणीचें दूध पिऊन पिऊन आज केवळ वाघाचीच डुरकणी नव्हे, तर हिंदुस्थानच्या भवितव्यतेच्या आकाशांत दणदणाट उडविणाऱ्या प्रतिरोधाच्या मेघांच्या गर्जनांना आपल्या

### सिंहवत गर्जनांची उलट सलामी

देण्यास तयार झाली आहे. नवजीवनाच्या बॉयलरमध्यें प्राचीन संस्कृतीच्या धगधगीत आंचेनें कढून कढून तयार झालेली अभिनव महत्त्वाकांक्षेची वाफ, पूर्वीचे स्वार्थी व संकुचित मनोवृत्तीचे आत्मघातकी सांखळदंड खडाखड तोडून, त्रिकोनी हिन्दी द्वीपकल्पाच्याच नव्हे, तर अखिल मानवजातीच्या सुखवर्धनार्थ आज चैतन्याच्या एंजिनांत प्रविष्ट झाली आहे. प्रांतिक ऐक्याच्या कल्पनांचा भोंवरा वाढत वाढत आज साऱ्या भरतखंडाला वेढूं पहात आहे आणि या चैतन्याचें एंजीन मुत्सद्देगिरीच्या धोरणी रूळांवरून असेंच पुढेंपुढें दामटीत नेल्यास, ही भारतीय ऐक्याची विद्युल्लता सर्व भूगोलालाहि आपल्या बाहुपाशांत घट्ट कवळून,

### विश्वात्मैक भावाचा आर्य प्रसाद

साऱ्या जगाच्या तोंडांत कोंबून, आमच्या हिंदुस्थानांतील प्राचीनतम आर्यसंस्कृतीच्या सनातन मुरंब्याची लज्जत त्याला लावल्याशिवाय खास राहणार नाहीं. नवजीवनाची शक्ति फार अचाट. हिमनगासारखे गगनचुंबीत पर्वताधिपति तिच्या प्रवाहाला प्रतिरोध करूं शकणार नाहींत. अटलांटिक पॅसिफिकसारखे महोदधि नवजीवनाच्या चैतन्याला भिजवूं शकणार नाहींत. तुफानी वावटळाचे वारे या दिव्य चैतन्याचा शेंडा बुडखासुद्धां कंपित करूं शकणार नाहींत. त्रैलोक्याचाहि निमिषार्धांत चक्काचूर करणाऱ्या आकाशगामी मेघकन्या आपला ज्वलज्जहाल नेत्र या चैतन्याकडे फिरवूं शकणार नाहींत. हें नवजीवनाचें चैतन्य म्हणजे

### पारमेश्वरी अगम्य लीलेचा अवतार

आहे. हें चैतन्य पारमेश्वरी शक्तीनें रसरसलेलें आहे. नराचे नारायण याच हंगामांत उदयास येणार. याच पर्वणींत मुक्याला वाचा फुटून पांगळेहि पर्वतांना ठेंगणे करणार. पूर्व पश्चिमेकडेतोंड फिरवून बसलेल्या लक्ष्मी सरस्वती या सवती सवती एकमेकींच्या हातांत हात घालायला याच अमृतसिद्धि योगाची संधि पकडणार. कवींच्या प्रेमळ काव्य-ललकारीच्या आव्हानाला मान देऊन, हिंदुस्थानची व हिंदुधर्माची रात्रंदिवस काळजी वहाणारे अगम्यस्थलनिवासी संत याच वेळीं उघडपणें प्रगट होऊन, आपल्या लाडक्या देशाचा व सनातन धर्माचा शीणभाग उतरण्याची खटपट करतील. या महात्म्या संतांच्या निःसीम निष्कामी कर्मयोगाच्या तपश्चर्येवरच आम्हां दीन दुबळ्या मानवांचा सामाजिक आणि राष्ट्रीय संसार चालावयचा असतो. आमच्या ऐहिक व पारलौकिक उन्नतीच्या नौकेचें सुकाणूं जरी आमच्या हातीं असलें, तरी ती नौका

अनुक्रमणिका

अज्ञानपंकांत रूतूं न देण्यासाठीं हे दिव्य महात्मे आपल्या तपश्चर्येचीं सर्व फळें आम्हां मानवांच्या कल्याणासाठीं आज युगानुयुगें समर्पण करीत आले आहेत, असा आम्हां

## वेदानुयायी हिन्दुंचा विश्वास

आहे. आज भरतखंडांत जी जागृति झाली आहे; आत्मोद्धाराचा आणि आत्मोद्धाराबरोबरच जगदुद्धाराचा जो प्रश्न आज रात्रंदिवस हिंदी जनतेच्या अन्तःकरण-कपाटावर सारख्या धक्क्या देत आहे; आमची वाट चुकली आहे, आम्ही आत्मस्वरूपाला पारखे झालों आहोत, दिसतें हें स्वरूप, भासते ही संस्कृति आणि करतों हें कर्म आमच्या पूर्वपरंपरेला अनुसरून नाहीं, अशी जी जागृति आज साऱ्या भरतखंडांत उत्पन्न झाली आहे, तिच्या पाठीशीं या संतांचीच इच्छाशक्ति आहे, हें विसरतां कामा नये. अर्थात् सामाजिक आणि राष्ट्रीय चळवळीच्या जोडीनेंच

## हिंदु धर्म आणि सुधारणा

हा प्रश्न तितक्याच नेटानें आमच्या विचारक्षेत्रांत संचार करूं लागावा, यात आश्चर्य तें कसलें? सध्यां विचार सुरू झाले आहेत. आणि आचारालाहि थोडा प्रारंभ झाला आहे. निरनिराळे विद्वान् धर्मसुधारणा कशी करावी किंवा करतां येणें शक्य आहे, याबद्दलचे आपापले प्रमाणिक विचार बोलून दाखवूं लागले आहेत. हिन्दु धार्माचें प्राचीन व्यापक व उदात्त रूप पार बदलून जाऊन त्याला सांप्रतचें अति संकुचित, क्षुद्र आणि हीनदीन स्वरूप कां प्राप्त झालें, याचीं प्रमेयें सोडविण्यांत कोणी गुंग झाले आहेत. हिन्दु धर्मानें आपली प्रचलित प्रतिगामी वृत्ति साफ झुगारून देऊन, चालू मन्वंतराच्या ओघाशीं केवळ अनुगामीच नव्हे, पण समगामी कसें बनावें याचाहि मंत्र सांगत आज कित्येक महात्मे आपल्या कानाशीं लागत आहेत.

## हिन्दु मिशनरी सोसायटी

सारखी संस्था अत्यंत व्यापक धोरणावर धर्माचें शुद्ध स्वरूप जनतेपुढें मांडून ‘देवा जगीं वाढवि हिन्दु धर्म’ अशी उच्च महत्त्वाकांक्षेची तुतारी फुंकीत पुढें सरसावली आहे. या संस्थेचा प्रारंभ नदीच्या उगमाप्रमाणें अगदीं लहान आणि क्षुल्लक दिसत असला, तरी तिचें बीज फार सकस आहे; इतकेंच नव्हे तर जे हिन्दुधर्माचे धोरणी प्रतिस्पर्धी आहेत, ज्यांच्या डांवपेंचावर या संस्थेनेंउघड उघड स्वारी करण्याचें आपलें धोरण न डगमगता जाहीर केलें आहे, त्यांनीं मात्र या संस्थेच्या भावीं कार्यव्याप्तृत्वाचा आडाखा आगाऊच आजमावून ठेवून, त्याप्रमाणें

## डिफेन्सिवची तयारी

आतांपासूनच मोठ्या काळजीनें चालविली आहे. हिन्दु मिशनरी सोसायटी हा काळाच्या उदरांतून बाहेर पडलेला एक अद्‌भुत चमत्कार आहे. नवचैतन्याची ही एक धगधगीत ठिणगी आहे. हिन्दुधर्माचा कासावीस झालेला प्राण वांचवून त्याचें पुनरुज्जीवन करणारी अमृतसंजीवनी आहे. हिचा प्रताप आज कळणार नाहीं. शिवाजी महाराजांच्या प्राथमिक प्रयत्नपरंपरेला नाक डोळे मुरडून त्यांचा धिक्कार करणाऱ्या बड्याबड्या मराठे सरदारांप्रमाणे आज आमचे नामधारी आचार्य व शास्त्रीपुरोहित या अल्पवयी कोमल बालिकेकडे पाहुन खुशाल हांसोत किंवा तिची मनमुराद निंदा करोत, सरतेशेवटीं शिवप्रभावापुढें जसें त्याच्या गर्विष्ठ

अनुक्रमणिका

प्रतिस्पर्ध्यांनीं बिनशर्त माना वांकविल्या, त्याचप्रमाणें या हिन्दु मिशनरी सोसायटीला हेच आचार्य आणि हेच शास्त्री पंडित

## चिरायु भव

असा आशीर्वाद सग्ददीत अंतःकरणानें दिल्याशिवाय खास रहाणार नाहींत. हिन्दु मिशनरी सोसायटी ज्या कालोदरांतून यदृच्छेनें बाहेर पडली, त्याच काळाच्या उदरांत तिचा भावी पराक्रम सांठविलेला आहे. या सोसायटीचा पराक्रम वर्तमान काळाच्या इतिहासांत सांपडायचा नाहीं, तो भविष्य काळाच्या इतिहासांत रेडियमच्या अक्षरांनीं लिहून ठेवलेला आहे. शेंकडों मैल लांबवर पसरणाऱ्या आपल्या विशाल भुजगणांनीं रत्नाकरास भेटण्यासाठी फोंफावत जाणाऱ्या प्रचंड सिंधु गंगा महानदांच्या उगमाजवळील सूक्ष्म झिरपणाऱ्या झऱ्याप्रमाणें सध्या या उदयोन्मुख संस्थेची स्थिति आहे. संस्थेचें सांप्रतचें स्वरूप व अवसान तिच्या कार्याच्या आणि ध्येयाच्या मानानें कितीहि अल्पतम भासलें किंवा खरोखरीच असलें तरी तिनें जें आपल्या

## ध्येयाचें निशाण उंच फडकविलें

आहे. त्या तिच्या उदात्त हेतूंनींच तिच्या स्मारकाचा पाया कायमचा बसविला आहे, ही गोष्ट नाकबूल करून चालायचें नाहीं. हिन्दु मिशनरी सोसायटीच्या कर्तबगारीचा प्रश्न तिच्यांतल्या कार्यकर्त्या मंडळीवरून न सोडवितां, तिच्या ध्येयांच्या उच्चतम भरारीवरूनच सोडविण्याचा कोणी प्रयत्न केल्यास, या संस्थेचा भरतखंडाच्या कार्यभूमिकेवर जो अवचित अवतार झाला आहे, त्यांत हिन्दुधर्माच्या भवितव्यतेचीं बरींचशीं कठीण कठीण गणितें अगदीं सुलभ व सोप्या रीतीनें सोडविण्याची गुरुकिल्ली खास सांपडेल. आजला हिन्दुधर्म कोणच्या स्थितींत आहे? क्रिस्ती धर्माचा उदय होण्यापूर्वी किमानपक्ष चार हजार वर्षांवर ऋग्वेदादि चतुर्वेद आणि सांप्रतच्या मनूंतहि मोठमोठ्या पट्टीच्या तत्त्ववेत्त्यांच्या अकला गुंग करणारीं आमचीं तीं दिव्य उपनिषदें निर्माण करणारा

## आमचा हिंन्दुधर्म जिवंत आहे काय?

मेल्या माणसाला जिवंत आणि नपुंसकाला मर्द बनविणारा भगवग्दगीतेचा कोहीनूर ज्याच्या मस्तकावर अविच्छिन्न सनातन वैभवतेजाचा अभिषेक अझूनहि करीत आहे, त्या आमच्या हिन्दुधर्माला जगांत कांहीं मान आहे काय? ‘मी हिन्दु आहें’ असें मोठ्या हर्षानें आणि अभिमानानें सांगण्यांत वाटणारी एकप्रकारची धन्यता तरी आज हिन्दु म्हणविणाऱ्यांत राहिली आहे काय? साऱ्या जगतीतलावर सांप्रत रूढ असलेल्या अनेक धर्मांत प्रमाणभूत असलेला ‘एकमेवाद्वितीयम्’ चा दिव्य मंत्र अत्यंत प्राचीन काळीं ज्या उदार हिन्दुधर्मानें त्यांना घ्या घ्या म्हणुन आग्रह करुन शिकविला; अध्यात्म विद्येच्या गूढ तत्त्वांच्या सोपपत्तिक उलगड्यांचें भांडार उघडें ठेवून जगांतील सर्व मानवजातीला ज्यानें सर्वात्मैक्य भावाचा पहिला ‘श्रीगणेशा’ शिकविला; आणि ज्याच्या मुक्त ज्ञानभांडारांतील रत्नें सर्व भूगोलावर उधळलीं असतां, त्यांतल्या एकेका रत्नाच्या भांडवलावरच एकेक नवीन धर्म ठिकठिकाणीं निर्माण झाला, त्या हिन्दुधर्माची आजच्या मन्वंतरांत कांहीं मान्यता आहे काय? याचें उत्तर हेंच कीं

## नाहीं, नाहीं, मुळींच नाहीं!!।

हरहर! आज हिंदुस्थानांत कोट्यवधि हिंदु असून, त्यांना हे शब्द बोलवतात आणि लिहवतात तरी कसे? हिंदुधर्माला आज वाटेल त्या झोटिंगानें वाटेल तशा शिव्या द्याव्या, त्याची वाटेल तशी व्याख्या करून त्याची नालस्ती करावी, आणि त्यांतील उदात्त तत्त्वांना वाटेल तसा बाष्कळ पेहराव चढवून त्यांची भर चव्हाट्यावर हेळणा करावी, ही परिस्थिति निमूटपणें सहन करणारे हिंदु प्राचीन आर्यांचे वंशजच असावे काय? ज्या हिन्दुधर्माच्या सर्वव्यापी उदरांतूनच जगांतील प्राचीन अर्वाचीन राष्ट्रांना निंरनिराळ्या धर्ममतांचा पुरवठा झाला, त्याच्याच अवशिष्ट अनुयायांना आज

## हिन्दुधर्म मरो, क्रिस्ती धर्म तरो

ही कृतघ्न शापवाणी ऐकत स्वस्थ बसण्याची पाळी यावी काय? हिंदु बांधवहो, प्रसंग येऊं नये, आला. आता तरी डोळे नीट उघडा, आणि प्राचीन आर्यांचे रक्त जर खरोखर तुमच्या धमन्यांतून अजिबात नष्ट झालें नसेल, तर हिन्दुधर्माच्या नरड्याला लागलेल्या कुकल्पनांच्या आणि संकुचित वृत्तीच्या ताती तडातड तोडून त्याला प्रथम मुक्त करा. त्याचे पूर्वीचे स्वातंत्र्य त्याला द्या. म्हणजे मग हिंदुधर्माचें साम्राज्य साऱ्या जगावर पुनश्च कसें भरारतें तें पहा. अनेक प्राणघातक दिव्यांतून आज हिंदुधर्म पार पडलेला आहे. हिन्दुधर्माचे टोलेजंग बुरुज आज जरी प्रतिस्पर्ध्यांच्या तोफांच्या माऱ्यानें जमीनदोस्त झालेले असले, तरी त्याचा सनातन पाया आजलाहि अभंग राहिलेला आहे, ही गोष्ट विसरूं नका. याच पायावर सनातन हिंदुधर्मांची पुनर्घटना करून त्याचें वैभव वृद्धिंगत करण्याचा यत्न आपण केला पाहिजे. ज्या हिंदुधर्मानें अगदीं सढळ हातानें साऱ्या जगाला आग्रह करकरून उत्तमोत्तम तत्त्वज्ञानाच्या मेजवान्यांवर मेजवान्या दिल्या, त्यालाच आज सात्त्विक पोषणाची मोताद पाडावी, त्याला

## कन्झम्पशन् आणि हार्टडिसीझ

लागावा, त्यानें एकदां कायमचा राम म्हणावा म्हणुन आगाऊच तिरडी मडक्याची व्यवस्था करून त्याच्या प्रतिस्पर्ध्यांनीं वाट पहावी, ही काळीज चरचर चिरणारी स्थिति अंतःपर कधीहि सहन न होणारी अशी नव्हे काय? याला उपाय काय? हिंदु म्हणविणाऱ्या प्रत्येक लहान थोर व्यक्तीनें या कामीं कशी मेहनत घेतली पाहिजे? याची पद्धति ऐतिहासिक पुराव्यांनींच शोधून काढली पाहिजे. हिंदुधर्माचा ऱ्हास कां झाला आणि तो कसा सुधारतां येईल याची खरीखुरी विश्वसनीय माहिती इतिहास सांगेल. वर्तमानकाळाच्या बऱ्या वाईट परिस्थितीचे धागेदोरे भूतकाळांत सांपडतांत आणि त्यांच्याच अनुरोधानें भावी काळ स्वर्गतुल्य किंवा नरकप्राय करण्याची कर्तबगारी आपल्या मनगटांत सांठविलेली आहे. हिंदुधर्माला क्लैब्य कां आलें आणि हिंदुच्या जगविख्यात संस्कृतीला इतर संस्कृतीच्या पुढें मान कां वांकवावी लागली, याचें उत्तर भूतकाळचा इतिहास स्पष्ट स्पष्ट देईल. हिंदुधर्मावर आजपर्यंत जीं जीं गंडातरें आलीं आणि ज्यांच्या दिव्यांतून त्याला 'येन केन प्रकारेण' निसटून जेमतेम जीव बचवावा लागला, त्यांत

## इस्लाम धर्माची मोहीम

ही मुख्य होय. अर्थात् या मोहिमेच्या दिव्यांतून पार पडतांना हिंदुधर्मप्रचारकांची आणि खुद्द हिंदुधर्माची स्थिति कशी होती, याचा ऐतिहासिक दृष्ट्या आपण नीट छेडा लावल्याशिवाय हिंदुधर्माच्या भावी

अनुक्रमणिका

पराक्रमाचा नकाशा रेखाटतो येणार नाहीं. अर्थात् ऐतिहासिक संशोधनासाठी अवश्य लागणारी निस्पृहता आणि निर्भेळ सत्यनिर्णयार्थ लागणारी मनोवृत्तीची समता आणि निःपक्षपणा या गोष्टींचा बिनमुर्वत ब्रेक आमच्या विचारसरणीस लाऊन आम्ही आतां अधिक पाल्हाळ न लावतां

## पुण्यश्लोक महंमद पैगंबर

आणि त्यानें स्थापन केलेला इस्लाम धर्म यांच्या इतिहासांचें त्रोटक परंतु सूक्ष्म विवेचन करण्याकडे वळतों. साधारणतः पाहिलें तर सुमारें ९०० वर्षांपूर्वी सिंधुनदाच्या अलीकडे एकहि मुसलमान नव्हता. खरे मुसलमान म्हटले म्हणजे आरब. ते हिंदुस्थानांत फारसे आलेच नाहींत. हिंदुस्थानांत सध्यां मुसलमान म्हणविणारे लोक अजमासें पांच कोटी आहेत. इराण व तुर्कस्थान या इस्लामी राष्ट्रांतील मुसलमानांची लोकसंख्या फक्त अडीच कोटी आहे. म्हणजे सम्राट पंचम जार्ज बादशहा यांच्या हिंदी साम्राज्यांत इस्लामी साम्राज्यापेक्षां मुसलमानांची वस्ती दुप्पट आहे. ही गोष्ट विशेष लक्षांत ठेवण्यासारखी आहे. हें असें का? हिंदुस्थानांतच मुसलमानांची इतकी जास्त वस्ती कां? खरें पाहिलें तर प्रथम इकडे फार मुसलमान आलेच नाहीत; बरें जे कांहीं आले त्यांनीं बरोबर बायकाहि आणिल्या नव्हत्या. परंतु राज्यलोभानें आणि धर्मप्रसाराच्या महत्त्वाकांक्षेनें त्यांनीं हिंदुस्थानांत आपला संसार थाटतांच

## हिन्दु स्त्रियांशीं लग्नें लावलीं

आणि त्यांच्या वंशाचा येथे वेलविस्तार वाढला. शिवाय इस्लाम धर्माचा चांदतारा तलवारीच्या जोरावर हिन्दुस्थान आक्रमण करूं लागतांच, बळजबरीनें किंवा आपखुषीनें बाटून मुसलमान झालेल्या लाखों हिन्दुंची त्यांतच भर पडली आणि अशा रीतीनें हिंदूंच्या हिन्दुस्थानांत मुसल्मानांची लोकसंख्या भराभर वाढत गेली. यावरून हें अगदीं स्पष्ट होत आहे कीं, आजचे हिंदुस्थांनांतील मुसल्मान म्हणविणारे आमचे देशबांधव हे पूर्वाश्रमींचे आमचे हिंदुबंधूच होत. साष्टी प्रांतांतल्या क्रिस्ती बांधवांप्रमाणेंच हे आमचे सारे

## हिन्दी मुसलल्मान पूर्वीचे अस्सल हिंदूच

असल्यामुळें हिंदुस्तान आपला मायदेश आहे, हा अभिमान बाळगिण्याचा त्यांना हिंदूइतकाच अधिकार आहे, हें अधिक विशद करून सांगणे नको. इस्लाम धर्माचा मुख्य उत्पादक महंमद पैगंबर याचा अवतार, त्याची धोरणी कर्तबगारी आणि अल्पावकाशांत त्याच्या धर्मानुयायांची झालेली भरभराट इत्यादि गोष्टी इतक्या चमत्कारपूर्ण आहेत कीं मानवी अंतःकरणाला आश्चर्यानें थक्क करून सोडणारी यासारखी दुसरी हकीकत जगाच्या उपलब्ध इतिहासांत दुसरी मिळणें शक्य नाहीं. एकट्या महंमदाच्या कर्तबगारीशिवाय बाहेरची कोणत्याहि प्रकारची चेतना किंवा कसलीहि मदत नसतांना, केवळ ८० वर्षांच्या अवधींत सिंधूनदापासून पोर्तुगालपर्यंत अणि आरबी समुद्रापासून व्होल्गानदीपर्यंत एका आरबी दरिद्री कुटुंबांतील मनुष्यानें आपल्या नवीन धर्ममताचा प्रसार एकजात करण्यास समर्थ व्हावें, हा 'न भूतो न भविष्यति' असा चमत्कार कोणाच्या अंतःकरणांत कौतुकाच्या ऊर्मी उठविणार नाहीं? स्वधर्माभिमानाच्या आवेशांत महंमदानुयायी खुशाल वाटेल तर म्हणोत कीं इस्लाम धर्माच्या या तीव्रतम प्रसाराच्या मुळाशीं महंमदानें आत्मचिंतनांतून निर्माण केलेल्या 'एको देवः' या मुख्य तत्त्वाची प्रेरणा होती; परंतु धार्मिक भावनेच्या क्षेत्राबाहेर किंचित् येऊन ऐतिहासिक आधाराच्या दुर्बिणींतून पाहूं लागतांच हा निर्णय मूलतः चूक आहे, असेंच दृष्टीस पडेल. 'देव एक

["….The creed of the man who is said to possess the true Veda is singularly simple. He believes in the unity of all beings. In other words, that there is but one real Being in the universe, which Being also constitutes the universe… This one Being is thought of as

अनुक्रमणिका

the Great Universal Spirit."—*Indian Wisdom. —p. 36.*]आहे' या सनातन तत्त्वाचा कर्णा ख्रिस्ती शकाच्या पूर्वी कमींतकमी आठ हजार वर्षे सनातन वैदिक धर्मानेच फुंकलेला आहे.

अनुक्रमणिका

# मंडळाच्या अध्यक्षांचे निवेदन

**सदेव सोम्येदमग्र आसीदेकमेवाद्वितीयम्।**
**तद्वैक आहुरसदेवमग्र आसीदेकमेवाद्वितीयम्**
**तस्मात्सतः सज्ञायत ॥१॥** छान्दोग्योपनिषद् अ. ६ खं. २.

'एकमेवाद्वितीयम्' चे सनातन तत्त्व प्रथम ज्या उपनिषदांनीं प्रगट केलें त्यांचा काळ पाहिला (क्रि. श. पू. ५०० वर्षे) कीं यहुदी इस्लाम ख्रिस्ती इत्यादि धर्मांच्या प्रचारकांनी अगदीं अलीकडे त्याची मोठ्या चाणाक्षपणानें नक्कल करून आपापल्या धर्ममतांच्या द्वारें त्याची महती वाढविण्याचाचस्तुत्य उपक्रम केला असें म्हणणें प्राप्त होतें. शहाजहान बादशहाचा पुत्र दाराशेखो यांनीं जेव्हां उपनिषदांचीं पर्शियन भाषेंत भाषांतरें करविलीं तेव्हांहि याच मताचा त्यानें पुरस्कार केल्याचें इतिहासांत नमूद आहे. हिंदूंच्या ज्या सनातन वैदिक धर्मानें अत्यंत प्राचीन काळापासून मानवी सृष्टीच्या उच्च नीच प्रवृत्तीला पोषक अशा निररिाळ्या

### सोईस्कर तत्त्वांचा मुबलक भरणा

करून, क्रमाक्रमानें—आत्मसंस्कृतीच्या परिणतीच्या पायरीपायरीनें—अखेर निर्गुण निराकार 'एको देवः' च्या सनातन सत्य तत्त्वाची खरीखुरी बिनचुक ओळख पटविण्याइतकी धोरणी उदारमनस्कता प्रगट केली; ज्या हिंदुधर्मानें 'नेचर वर्शिप' —निसर्गपूजनापासून तों तहत 'एकमेवाद्वितीयमा्।' पर्यंतच्या ईश्वरप्राप्तीच्या सर्व साधनांचा आपल्या तत्त्वपरिषदेंत बिनतोड संग्रह केला. तोच हिंदुधर्म त्यांतल्या अवघ्या एकाच तत्त्वाचा पुरस्कार करणाऱ्या एखाद्या कालच्या नवीन धर्मपंथापुढें हां हां म्हणतां चिरडून हतबल होईल, हें विधान सर्वसाधारण बुद्धीलासुद्धां कधीं पटावयाचें नाहीं. इस्लाम धर्माचा अत्यंत अल्पावकाशांत इतका जबरदस्त फैलाव होण्यास निव्वळ धर्मतत्त्वापेक्षां महंमदाची आडाखेबाज

### धोरणी व्यावाहारीक दृष्टी

किंवा ज्याला आपण अलीकडच्या मनूंत 'डिप्लोमसी' असें म्हणतों, तीच विशेषतः कारणीभूत कशी झाली व ही डिप्लोमसी ६ व्या शतकांतील हिंदुधर्माच्या संकुचित मनोवृत्तीच्या प्रवर्तकांत अज्ञीबात ऱ्हास पावलेली आढळल्यामुळेंच महंमदाच्या चांदताऱ्याचा सर्वग्रासी शह हिंदूंच्या स्वस्तिकाला बिनचूकमर्मी कसा लागला, हें पाहाण्यासाठीं इस्लाम धर्माच्या उत्पत्तिप्रसाराचा इतिहास आपणांस प्रथम थोडक्यांत पाहिला पाहिजे. महंमद ज्या आरबसमाजांत अवतीर्ण झाला, ते आरब लोक पूर्वी कट्टे मूर्तिपूजक होते. मक्का येथील सुप्रसिद्ध काबाच्या मंदिरांतील ३६० निरनिराळ्या मूर्तीची ते भक्तिभावानें पूजा अर्चा करीत असत. आरबस्तानच्या सर्व भागांतून येथें मोठी यात्रा भरत असें. या आरबी लोकांशिवाय मूर्तिपूजकाचे अनेक दुसरे पंथ आरबस्तानांत होतेंच. कित्येक आरब तिबेटांतील लामांच्या बौद्ध धर्माचे अनुयायी होते, तर पुष्कळांनीं क्रिस्ती धर्माची दीक्षा घेऊन त्याचाहि थोडाबहुत प्रसार आपल्या देशबांधवांत केलेला होता. फार काय पण ज्या एकेश्वरी मताचा पुरस्कार व प्रसार करण्याकरितां महंमदाचा अवतार झाला असें त्याचेअनुयायी मानतात; तें एकेश्वरी मत, रोमन लोकांच्या छळांमुळें उत्तर सीरियांतून दक्षिण आरबस्तानांत पळून आलेल्या यहुदी लोकांनी या आरबांत बरेंच प्रचलित केलें होतें. यावरूनच इस्लामी धर्म म्हणजे यहुदी आणि क्रिस्ती धर्मांची

अनुक्रमणिका

## नवीन सुधारलेली आवृत्ती

असे म्हणतात ते काही खोटे नाही. महंमद पैगंबर या लोकोतार महापुरुषाचें कूळ किंवा मूळ साधूंच्या आणि नदीच्या कुळामुळाप्रमाणें शोधीत बसण्यांत हांशील नाहीं. त्याची वृत्ति पहिल्यापासूनच चिंतनमग्न आणि शंधक असे. वयाच्या २५ व्या वर्षी सिरीया प्रांतांत त्याला येशू क्रिस्ताच्या धर्माची काही माहिती झाली. परंतु त्यांतील

## पिता, पुत्र आणि पवित्र आत्मा

या त्रयीचा घोटाळा काहीं त्याला मानवला नाहीं. आणि अखेरीस 'देव एकच आहे' हें तत्त्व त्याने आपलें निश्चित ध्येय ठरवून एका नवीन धर्माचा प्रसार करण्याचा उपक्रम केला. नवीन मतप्रतिपादकांचा छळ न झाल्याचा दाखला जगाच्या इतिहासांत नाहीं; मग महंमदच या नियमाला अपवाद कसा होईल? मक्केतील काबाच्या मंदिराचे धार्मिक रखवालदार खुरेश लोक यांनी त्याचा अत्यंत छळ केला; म्हणून त्याने इ. स. ६२२ मध्ये मदिनेस प्रयाण केले.तेथे त्याच्या अनुयायांची संख्या वाढली. तेथे त्यानें एकेश्वर मताचा पुरस्कार करण्यासाठी 'मशीद उल्नबी, बांधली; परंतु जसजसे त्याला अधिकअधिक अनुयायी मिळू लागले तसतसा त्यांचा व खुद्द महंमदांचा खुरेश लोक अधिकअधिक छळ करू लागले. त्यावेळी महंमदाने जी युक्ति लढविली तीवरून त्याचा आत्यांतिक धोरणीपणा व्यक्त होतो. या युक्तीतच त्याच्या साऱ्या चरित्राचें बीज आणि डिप्लोमसीचें वर्म सांपडतें. एरवी, नुसत्या मुक्तीच्या किंवा पारलौकीक ऐश्वर्याच्या काल्पनिक गप्पावजा आश्वासनांवर एखाद्या नव्या किंवा जुन्या धर्माचा इतका अल्पावकाशांत एवढा अतिविस्तृत प्रसार होणें कधींहि शक्य नाही. नुसत्या प्रषितांच्या किंवा पैगंबरांच्या व्याख्यानांनी पारलौकिक सुखाच्या आशेनें चैतन्यपूर्ण होऊन जाण्याइतकी जर ही मानवी दुनिया ग्रहणक्षम (susceptible)बनलेली असती, तर प्रेषितांना आणि पैगंबरांना जन्मश्रेणींच्या चक्रावर फिरवून व्याख्यानें देवविण्याची देवालाहि जरूर पडली नसती. मानव प्राणी कितीही विचारक्षम आणि सुक्षिशित झाले असले तरी त्याची मनें जशीं ऐहीक लभ्यांशाच्या गड्ड्याकडे चटकन वळतील. तशीं तीं पारलौकीक पारमेश्वरी ऐश्वर्याच्या नुसत्या कोरड्या गप्पांनी एकदम हुरळून जाऊन कांही अद्वितीय क्रांति किंवा अद्‌भुत पराक्रम करावयास उद्युक्त होतील, हें शक्यच दिसत नाहीं. मग आरबलोक तर उघड उघड रानटीच होते. महंमदाच्या

अनुक्रमणिका

# हिंदुधर्माचे दिव्य आणि संस्कृतींचा संग्राम

## इस्लाम धर्माची मोहनी

त्यांच्यावर पडली, त्यांना ईश्वरप्राप्तीचा खरा मार्ग सांपडल्यामुळे ते आनंदाने बेहोष झाले आणि म्हणून इस्लाम धर्माचा प्रसार वावटळीच्या वाऱ्याप्रमाणे सर्व आशियाखंडभर करण्याचें त्यांना सामर्थ्य आलें, या विधानाची सयुक्तिकता केव्हांही कोणाला पटणार नाहीं. आतांपर्यंत महंमद नुसता शांतमार्गी नवधर्मप्रसारक होता. त्याच्या प्रयत्नांच्या मानानें त्याला मिळालेले अनुयायी फारसे नव्हते आणि त्याचा छळही बराच होत होता. म्हणून त्यानें आपली शुद्ध धार्मिक अशी प्रेषित-वृत्ति चटकन बाजूला ठेवली आणि एखाद्या साध्या प्रपंची महत्वाकांक्षी मनुष्याप्रमाणे एक

## ईश्वरी हुकुमाचा जाहीरनामा

जाहीर केला त्यात त्यानें असा स्पष्ट खुलासा केला कीं, **"यापुढे मी सांगतो हा धर्म जे ऐकणार नाहींत, त्यांस तरवारीने जिंकावें. लढाईत यश आल्यास शत्रूंची धनदौलत आपणांस मिळेल. बरें, मृत्यूच आला तर महत्पुण्य लागून स्वर्गाचा दरवाजा आपणांस खुला होईल."**या जाहीरनाम्यामुळें महंमदाचा आजपर्यंतचा शांततेचा धार्मिक बाणा जाऊन त्याचें पर्यवसान खाडकन शुद्ध लौकिकी अशा लष्करी बाण्यांत झालें. कालचा मोक्षदाता महंमद आज राज्ये कमविणारा शूर योद्धा बनला. लष्करी बाण्याचा अशा रीतीनें पुकारा होतांच रानटी आरबांना आयताच चेव आला. राज्यपदप्राप्तीची आशा, लुटीचा लोभ, कीर्तीची आकांक्षा आणि एवढें सगळे केल्यावर अखेर

## स्वर्गीय सौख्याची गॅरन्टी

यामुळें हां हां म्हणतां महंमदाभोंवती त्याच्या इस्लामी धर्माची दीक्षा घेतलेले लष्करी बाण्याचे हजारों लोक आपआपल्या शस्त्रास्त्रांसह भराभर जमा झाले. लष्करी सामर्थ्य प्राप्त होतांच नवधर्मप्रसाराकरितां तुंबल युद्धें होऊं लागलीं आणि महंमद विजयी होत गेला. लढाईत मिळालेली लूट सर्वांनी सारखी वाटून घ्यावी असा आणखी एक इश्वरी जाहीरनामा प्रसिद्ध करून त्यानें आपल्या अनुयायांची भक्ति संपादन केली. नंतर मदिनेंतून शेजारच्या प्रांतावर हल्ले करण्यास महंमदाच्या फौजा भडाभड रवाना होऊं लागल्या. लुटीचा मुबलक पैसा मिळू लागल्यामुळें त्यांच्या अनुयायांची संख्या कल्पनातीत वाढून त्यांच्यांत नवधर्माचे वारें बेफाम शिरलें आणि धर्माच्या नावावर एक प्रकारचें नवीन राज्य स्थापन होऊन अखेर

## धर्मोपदेशक महंमद राजा बनला

आतांपर्यंत कोणत्याहि धर्माच्या कोणत्याहि प्रवर्तकाला जें कार्य-अर्थात् विस्तृत धर्मप्रसाराचें कार्य-निवळ जिभेच्या टकळीनें साध्य करतां आलें नाहीं, तेंच कार्य महंमदाने तलवारीच्या पात्याच्या धमकीवर तेव्हांच घडवून आणलें. परंतु नुसत्या तलवारीनें इस्लाम धर्माची वृद्धि झाली असें नव्हें, तर इस्लामाच्या शिकवणीनें मुसलमानांस तलवार गाजविण्याचें सामर्थ्य आलें त्यांचीबुद्धिमत्ता विलक्षण तीव्र केली, हेंहि विशेष लक्षांत ढेवलें पाहिजे. ज्या मक्केनें त्याला इ. स. ६२२ मध्ये हद्दपार केलें, त्याच मक्का शहरावर इ. स. ६३० साली महंमद आपल्या दहा हजार लष्करी अनुयायांसह चढाई करुन आला. शहराचा पाडाव करून काबाच्या

मंदिरांतील मूर्तीचा विध्वंस करुन आपल्या इस्लाम धर्माचा तेथे प्रचार चालूं केला. अशा रीतीने लोकोत्तर पराक्रम गाजवून धर्म आणि राजकारण यांच्या संयोगाने रानटी आरबांचे एक मोठे सुविघ व बलाढ्य राष्ट्र बनविणारा पैगंबर महंमद आपल्या

## इस्लाम धर्माचें अमर स्मारक

मागें ठेवून सन ६३२ त शांत झाला. त्याच्या मृत्यूनंतर केवळ ८० वर्षांच्या अवधींत त्याच्या आरब अनुयायांनी नुसतें आरबस्तानच नव्हे, तर इराण, सिरिया, पश्चिम तुर्कस्तान, सिंध, इजिप्त आणि स्पेनचा दशिण भाग काबीज करून त्यावर आपली इस्लामी सत्ता प्रस्थापित केली. ते जेथें जेथें मुलूख काबीज करीत गेले, तेथल्या लोकांना तलवारीच्या पात्याच्या जोरावर आपल्या धर्मात खेंचून घेतलें, किंवा जेथें तलवारीची सक्ति आणि उपदेशाची युक्ति फोल ठरली तेथे जबरदस्त खंडणीच्या ठणठणीत दंडवसुलीवर त्या त्या लोकांची मृत्यूपासून मुक्ति केली. हिंदुस्थानांत इस्लाम धर्माचा प्रसार कसा झाला आणि त्याच्या प्रवर्तकांच्या हालचालीचा हिन्दुधर्मावर आणि हिंदु राज्यांवर काय परिणाम झाला, हें पहाण्यापूर्वी महंमदांच्या

## इस्लामी धर्माचा व्यावहारिकपणा

आपण पृथक्करणासाठीं घेतला पाहिजे. महंमदाने आपल्या धर्मप्रसाराच्या मिशनमध्ये जो एक प्रकारचा व्यावहारिकपणा (business tactics)बेमालूम रीतीने मिश्र केला; त्यावरुनच त्याच्या अचाट बुद्धिमत्तेची आणि तीक्ष्ण धोरणीपणाची खरीखुरी साक्ष पटते. महंमदाचा मुख्य हेतू हा होता की, जगांतील निरनिराळ्या धर्मपंथाना अजीबात नष्ट करुन त्याना एक धर्म द्यावा आणि आपल्या स्वदेशबांधवांस एक नीति आणि कायदा यांनी सुबुद्ध करून त्यांच्या भाग्योदयाची गुरूकिल्ली त्यांच्या हाती द्यावी. सर्वत्र ऐक्य, एका भगवंताचे भजन आणि अनेक धार्मिक बंडांची सोंगे ढोंगे यांचा नायनाट अशा त्रिदळी ध्येयाचा महंमदाचा हेतू होता. इतर धर्मप्रचारकांप्रमाणे तो जर नुसता उच्चतम धर्मरहस्याचे पोवाडे विश्वबंधुत्वाच्या ढोलकीवर गात बसला असता. तर हा त्याचा हेतु इतका सफल होता ना परंतु महंमदाच्या संबंधाने विशेष कुतूहल उत्पन्न करणारी गोष्ट म्हणजे त्याचा व्यवहारिकपणा हा होय. या व्यावहारीकपणानेंच त्याच्या हातून शुद्ध धर्मोपदेशाचें तुणतुणें हिसकावून घेऊन त्याला तरवार दिली. या व्यावहारीकपणानेंच त्याच्या नवधर्माला असंख्य अनुयायी मिळून, त्या सर्वांना आपल्या आत्मोद्धाराचा मार्ग सांपडला. महंमदाच्या अवतारापूर्वी रूमच्या बादशहानें क्रिस्ती धर्म स्वीकारला होता. त्यांतहि पुनः अनेक पंथांची खिचडी आणि त्या खिचडीमुळें तंट्याभांडणांची गचडी हरहमेश चालूच होती. जुन्या यहुदी धर्मांतहि अनेक घोटाळे होतेच. या सर्व भानगडी मिटवून एका धर्माच्या छत्राखालीं सर्वांचे ऐक्य घडवून आणण्याचें पुण्यकार्य करणारा एकटा महंमदच होय. ईश्वराच्या कार्यासाठीं युद्धात जय मिळवावे, नाहीं तर त्याची थोरवी स्थापन करण्यासाठीं आपले प्राण खर्ची घालावे, या उदात्त उपदेशाने महंमदाच्या अनुयायांत एक प्रकारच्या

## मर्दुमकीचा संचार झाला.

आरबस्तानांतील लोकांची सामाजिक, राजकीय, औद्योगिक, शैक्षणिक आणि धार्मिक परिस्थिती अत्यंत निराशाजनक व भिकार असल्यामुळे, इस्लामी धर्माची दीक्षा घेतांच पूर्वीच्या रानटी, बेशिस्त आणि अक्कलमंद आरब वीरांस, महंमदाच्या व्यावहारिकपणाच्या प्रत्यक्ष शिक्षणाने, आपले सर्व ऐहिक मनोरथ सहज त्याला प्राप्त करुन घेतां आलें. आपखुशीने किंवा बळजबरीनें वाटेल त्याला मुसलमानी धर्मांत

येण्याचा राजमार्ग[मुसलमानी धर्म स्वीकारताना कांहीं मोठा अवाढव्य विधि करावा लागत असे, असें मुळींच नाहीं. इस्लाम धर्माचीं तत्त्वे ज्याला मान्य झालीं तो मुसलमान झाला; म्हणजे 'जो स्वतःला मुसलमान म्हणवितो तो मुसलमान' एवढाच काय तो विधि. पण अशा रीतीने आपद्धर्म म्हणून इस्लामी गोटांत शिरलेल्या कोट्यवधि हिंदूना 'जो स्वतःला हिन्दु म्हणवितो तो हिन्दु' असला उलट उतारा देऊन हिन्दु धर्माच्या माहेरघरी परत आणण्याची अक्कल आमच्या हिन्दुधर्मप्रवर्तकांत असूं नये, या आत्मघातकी परिस्थितीचे वर्णन कोणत्या शब्दानीं करावें?] खुला झाल्यामुळे इस्लाम धर्माच्या प्रसाराबरोबरच मुसलमानांची लोकसंख्या भराभर वाढली आणि त्याचे राष्ट्रीय महत्व वृद्धिंगत होऊन, त्याच्या अचाट कर्तबगारीचा महिमा कालपटावर अक्षयींचा खोदला गेला. अंदाधुंदीच्या विसकळीत लोकस्थितींत सर्व प्रकारच्या ऐक्याचा एवढा जबरदस्त जोम केवळ एका व्यक्तीच्या व्यावहारीक धोरणानें अत्यंत अल्पावकाशांत निर्माण झाल्याचें उदाहरण जगाच्या इतिहासांत इस्लाम धर्माशिवाय दुसरें नाहीं. मुसलमानांच्या कर्तबगारीची कशीहि उलटसुलट छाननी करा, त्यांत एक मुख्य गोष्ट विशेष आढळून येते ती हीच कीं धर्म आणि राज्य या दोन अन्योन्यपोषक गोष्टी त्यांच्या कर्तृत्वांत बेमालूम एकवटल्यामुळे

**धर्माच्या सबबीवर राज्य वाढलें,**

आणि राज्याच्या सबबीवर धर्माचा प्रसार होऊन, अनुयायांच्या वाढत्या लोकसंख्येनें जगतीतलांवर मुसलमानांची एक नवीन महापराक्रमी राष्ट्रीय सत्ता चालूं झाली. इस्लाम धर्माभिमानी आरब धर्मप्रसाराकरितां स्वदेशाबाहेर जेव्हा हिंडू लागले, तेव्हां त्यांना जे जे भिन्न वर्णाचे व भिन्न धर्माचे लोक भेटत त्या सर्वांस केव्हां जुलमानें, केव्हा लालुचीनें तर केल्हां युक्तीजुक्तीनें त्यांनीं ग्रासून आपल्या जुटींत आणलें. अशा रीतीनें इराणांतले इराणी, तुराणांतले तुराणी, मोंगोलियांतले मोंगल, हिंदुस्थानांतले आर्य, आफ्रिकेंतले शिद्दी वगैरे झाडून सारे या नवीन धर्मात शिरल्याबरोबर एक झाले. त्यांना भाग्योदयाचा अभिनव राजमार्ग खुला झाला. वैयक्तिक पराक्रम गाजवून स्वतःच्या बऱ्यावाईट बुद्धीचा विकास करण्याची संधि मिळाली. एकजुटीनें एकाच ध्येयाकरितां कस्सून उद्योग करण्याची नवीन उत्तेजक शिस्त लागली. जगाच्या पाठीवर वाटेल तिकडे मनमुराद भटकून पराक्रम गाजविण्याचें त्यांच्या अंगी सामर्थ्य आल्यामुळें, निरनिराळ्या राष्ट्रांतील निरनिराळ्या संस्कृतीचा आणि विद्येचा त्यांना पूर्ण परिचय होऊन, ते अत्यंत बहुश्रुत बनले.ते आपला मूळस्वभाव विसरले आणि एकजुटीनें नवीन नवीन उद्योग करून खऱ्या खुऱ्या

**लोकसंग्रहाच्या जोरावर स्वराष्ट्राची स्थापना**

करण्यास समर्थ झाले. नुसता त्यांचा धर्म एक झाला, एवढेंच नव्हेतर, कोणत्याही ठिकाणी त्यांना उच्च संस्कृति आढळली तर तेथच्या लोकांना ते आपल्या इस्लाम धर्माच्या गोटांत खेचून आणून त्यांची ती संस्कृतीहि आपलीशी करून टाकीत. वाटेल त्या परिस्थितींतहि देशकालवर्तमानाचा विचार न करतां हिंदूंप्रमाणे जुन्यांसच चिकटून राहण्याची आत्मघातकी आणि राष्ट्रघातकी प्रवृत्ति इस्लामानुयायांनीं साफ झुगारून दिली. दुसऱ्यांतील चांगलें असेल तें घ्यावें, त्यात नवीन सुधारणा करून त्याचा आपल्या राष्ट्रोद्धाराच्या कामीं उपयोग करावा, हा खरा लोकसंग्रहात्मक गुरूमंत्र इस्लामांनी पाळला म्हणूनच त्यांचा भाग्योदय झाला. 'आधीं प्रपंच करावा नेटका मग पहावें परमार्थविवेका' या धोरणी तत्वाची खरी अंमलबजावणी मुसल्मानानींच केली. 'मराठा तितुका मेळवावा, आपला महाराष्ट्र-धर्म वाढवावा'ही समर्थांची शिकवण मराठ्यांनी दासबोधांतच गुंडाळून ठेवली. मुसल्मानानी मात्र 'सापडेल त्यास मुसलमान करावा, आपला इस्लामधर्म वाढवावा' ही महंमदाची आज्ञा अक्षरशः अंमलात आणली.

अनुक्रमणिका

## खरा लोकसंग्रह इस्लामानेंच केला.

आम्ही हिंदु मात्र लोकसंग्रहाच्या, एकराष्ट्रीयत्वाच्या, वेदाभिमानाच्या आणि भगवद्गीतेच्या कोरड्या गप्पाच अझून मारीत आहोत. वास्तविक पाहिले तर मुसलमानांनी या जगतीतलावर जो पराक्रम गाजविला तो क्रिस्त्यांनाहि साधला नाहीं. राष्ट्रबंधनांस धर्माची आवश्यकता किती आहे, देश काल वर्तमानाप्रमाणे वर्तन करण्यास धर्मानें प्रत्येक व्यक्तीस किती व कसें पूर्ण स्वतंत्र देण्याइतकी तत्वांची उदारमनस्कता ठेवली पाहिजे आणि बदलणाऱ्या कालाप्रमाणें बदलण्याची चिवट प्रवृत्ति लोकांत प्रसुत करून त्यांना आपला राष्ट्रप्रपंच प्रथम नीटनेटका थाटण्याची संधि कां दिली पाहिजे, हें इस्लाम धर्मावरून शिकण्यासारखे आहें. भिन्न जातीच्या, भिन्न संस्कृतीच्या, भिन्न परंपरेच्या, भिन्न भिन्न मनोवृत्तींच्या सर्वराष्ट्रीय लोकांना इस्लाम धर्मानें एकत्र करून त्यांच्याकडून 'न भूतो न भविष्यति' असा पराक्रम कसा गाजविला, यांचे रहस्य आत्मोद्धारासाठीं धडपडणाऱ्या प्रत्येक राष्ट्राला आदर्शभूत असेंच आहे. मुसलमानी धर्मात सर्व वर्णाचे, सर्व जातींतले आणि सर्वराष्ट्रांतले लोक आहेत. त्यांना स्वधर्माचा मोठा योग्य अभिमान आहे. रानोमाळ भटकणाऱ्या रानटी धनगरांना इस्लामाने राज्यपदास कसें चढविलें, हजारों वर्षाच्या अंधःकारांतून त्याना बाहेर कसें आणलें आणि धर्म व राजकारण यांच्या जोडगोळीनें त्यांना सारें जग पादाक्रांत करण्याचें सामर्थ्य कसें दिलें, याचा इतिहास नीट पाहिला कीं समर्थ रामदासानी कंठशोष करकरुन

## आपला महाराष्ट्रधर्म वाढवावा

असा हा टाहो महाराष्ट्राच्या कानींकपाळीं फोडला, त्याचा रहस्यार्थ अधिक विशद करून सांगण्याची आवश्यकता रहाणार नाही. इस्लामी धर्मात अनेक दोष असूनसुद्धां त्याची एवढीमोठी भरभराट कशी झाली, याचें उत्तर त्या धर्माचा व्यावहारिक बाबींकडे असणारा धोरणी कल देऊं शकतो. वाटेल तिकडे भटकावें, वाटेल तें खावें प्यावें, त्यांस आपल्या धर्मात ओढून आणावें, परजातीच्या व परधर्मियांच्या स्त्रियांचा स्वीकार करून स्वधर्मी लोकांची संख्या वाढवावी, इत्यादी व्यावहारिक महत्वाचे अनेक प्रकार इस्लामी धर्माच्या इतिहासांत जागोजाग आढळतात. आजला हिंदुस्थानांतील मुसल्मान समाजाचा पूर्वेतिहास पाहिला तर त्यांची सारी लोकसंख्या येथीलच लोकांनी धर्मांतर केल्यामुळें व बीजसंकरानें झालेली आहे. अर्थात् हिंदुस्थानांतील मुसल्मान म्हणविणाऱ्या आमच्या देशबांधवांच्या

## संस्कृतीचा आत्मा आर्य आहे,

तुराणी नव्हे. या एकाच गोष्टीवरून मुसल्मानी धर्माच्या सर्वव्यापक क्षेत्राचा विशाळपणा उत्कृष्टपणें सिद्ध होतो. सर्व प्रकारच्या लोकांस आपल्या धर्मात ओढून घेऊन, धर्माच्या नांवाखाली त्या सर्वाची एक जात किंवा संघ तयार करण्याचा अद्‌भुत गुण इस्लाम धर्मानेंच शिकवावा.

'आपला महाराष्ट्र धर्म वाढवावा' ही शब्दयोजना समर्थांनीं कां केली, याचें खरे रहस्य हिन्दुधर्माचा इतर धर्मांशीं आलेला संबंधाचा तुलनात्मक अभ्यास केल्यानें खचित उमगण्यासारखें आहे. 'महाराष्ट्र धर्म राखावा' अशी भाषा न वापरतां 'महाराष्ट्र धर्म वाढवावा' अशी शब्दयोजना ज्याअर्थी ठासून केलेली आहे, त्याअर्थी धर्मांतरामुळें हिंदूंच्या राष्ट्रीय संघसत्तीवर झालेला, होत असलेला आणि होणारा भयंकर आघात त्या महापुरुषाच्या उदार आणि धोरणी काळजाचे पाणी पाणी करीत असेल!

**एक जाती दोन जाती पावला । तो कैसा ह्मणावा भला ॥**
**तुम्हां सकळांस कोप आला । तरी क्षमा केली पाहिजे ॥**

खुषीनें किंवा नाखुषीनें, सद्धर्म किंवा आपद्धर्म म्हणून, लोभानें किंवा शुद्ध मूर्खपणानें धर्मांतर केलेल्या व्यक्तींना परधर्मांत मोक्षाचा खरा वा खोटा मार्ग सांपडो वा न सांपडो, मूळधर्मापेक्षां एकाच गोलांटी उडींत जगदीश्वराचें सगुण किंवा निर्गुण सिंहासन पटकवितां येणें शक्य असो वा नसो, त्यामुळे

## हिंदु धर्मीयांच्या संघशक्तीचा ऱ्हास

होऊन, त्यांच्या राष्ट्रीय प्रपंचावरहि असहनीय वज्राघात होत आहे, हा हृदयभेदी देखावा पाहून समर्थासारख्या महा राष्ट्रपुरुषाचें अंतःकरण कळवळल्यामुळेंच त्यांनी आपल्या अंतस्थ वेदनांच्या संवेदना साऱ्या दासबोधात ठिकठिकाणीं मोठ्या उमाळ्यानें व्यक्त करून ठेवल्या आहेत. **'देवमात्र उच्छेदिला। जित्यापरिस मृत्यू भला। आपुला स्वधर्म बुडविला। ऐंसे समजावें ॥'**काय, यापेक्षां समर्थानीं आणखी काय हांका आरोळ्या माराव्या? त्यांनीयापेक्षा अधिक स्पष्टोक्ति ती काय वापरावी?अरे मूर्खांनो, आहांत कोठे?करतां काय?तुमचे भाऊ तुमच्या बहिणी, तुमच्यांतील कर्तबगार लोक, तुमचे कारागीर, तुमचे पंडित, तुमचे मुत्सद्दी, तुमचे शेतकरी, तुमचे सर्वस्व आज धर्मांतर करून भराभर बाहेर चालले; तुमच्या संघशक्तीला कीड लागली. तुमच्या धर्मांच्या घशाशीं बेपवाईचा कफ दाटून तो घाबरा झाला आहे; भक्तांचा राजरोस क्षय झाल्यामुळें

## हिंदुधर्माने डोळे पांढरे केले

आहेत; आणि कशाच्या मारता नुसत्या स्वराज्याच्या गप्पा?तुमच्या स्वधर्मांतून तुमच्याच देशबांधवांचा एकेक इसम परधर्मांत जाऊन आज तुमचा हिन्दुसमाज वाळवीनें पोखरलेल्या बड्या वाशाप्रमाणें कमकुवत आणि कुचका नासका होऊन राहिला असता, तुमची संघशक्ती लंजुर झाली असतां, तुम्ही कशाच्या धमकीवर स्वराज्याची अपेक्षा करतां?तुमचेच देशबांधव, तुमचेच धर्मबांधव परक्या धर्माचे अनुयायी बनून, त्या दत्तक धर्माच्या अभिमानाने प्रेरीत होऊन तुमच्या घरातील सारीं बरींवाईट कर्मे त्या परक्यांना समजावून देत आहेत, आणि परकी धर्माचे भाडोत्री विरळ कवच वर पांघरून तुमच्याच विरुद्ध प्रत्यक्ष युद्ध करण्यास अगर आंतून कारस्थानी सूत्रे चालविण्यास हजारोंनी तयार असतांना, मूर्ख महाराष्ट्रीयांनो, कशाची करतां स्वराज्याची अपेक्षा?तो एकटा शिवबा कोठकोठें पाहणार आणि करणार तरी काय काय?

**रायांनीं करावे राजधर्म। क्षत्री करावे क्षात्रधर्म॥**
**ब्राम्हणीं करावे स्वधर्म। नानाप्रकारें॥**

त्याची शिकस्त तो करीतच आहे. पण तुम्ही तरी आपापली कर्तव्ये कराल कीं नाहीं?

**राज्य नेलें म्लेंच्छक्षेत्री । गुरुत्व नेलें कुपात्रीं॥**
**आपण अरत्रीं ना परत्रीं । कांहीच नाहीं॥**

अनुक्रमणिका

रामराम!! अरे ही दुःस्थिति, हा तुमच्या धर्माचा ऱ्हास, प्रत्यक्ष तुमच्या राष्ट्रीय संघशक्तीचा ऱ्हास, तुमच्या सामाजिक सामर्थ्याला लागलेला वणवा तुम्हांला पहावतो तरी कसा?हे प्रतापगडचे श्रीभवानी आंबिके, धर्मांतर करून भडाभड लाखों हिन्दु परधर्मांत जात आहेत, तरी या मूढ हिन्दुधर्मीयांचे डोळे उघडत नाहीत. अतां तूं तरी या रामदासाच्या आंतड्याला पडणारे पीळ पहा आणि

**देवांचीं राहिलीं सत्त्वें । तूंसत्त्व पाहसी किती॥**
**भक्तांसी वाढवीं वेगीं । इच्छा पूर्णचि ते करी॥**

महाराष्ट्रीयांनो, तुम्हांला जर खरोखर आत्मोद्धाराची कांहीं चाड असेल, "राजकारण जरी उदंड तटलें" असलें तरी बाबांनो "सर्वज्ञ मंडळी धर्ममूर्ती । सांगणे काय तुम्हांप्रति । संभाळली पाहिजे॥" म्हणून

**मराठा तितुका मेळवावा । आपुला महाराष्ट्र धर्म वाढवावा॥**
**ये विषयी न करितां तकवा । पूर्वज हासती॥**
**शहाणे करावे जन । पतित करावे पावन॥**
**सृष्टीमध्यें भगवद्भजन । वाढवावें॥**

अहाहा! यापेक्षां अधिक स्पष्टोक्ती समर्थांनीं काय करावी?त्यांच्या उद्धारांवरून इस्लाम धर्माच्या धार्मिक आगापेक्षां त्याच्या व्यावहारिक बाजूनें हिंदु धर्मांची केवढी नासाडी केली, याचें अंतःकरण थरथरविणारे चित्र १७ व्या शतकांतल्या समर्थांना जसें स्पष्ट स्पष्ट समजत होतें, तसें २० व्या शतकांतल्या निवळ विचक्षण चिकित्सामन्यांना उमजणें शक्य नाही. शिवाय, महंमदाच्या अत्यंत धोरणीपणामुळें त्यानें अल्पावकाशांतच रानटी आरबांना एका धर्मदिक्षेच्या सबबीवर केवढ्या राष्ट्रीय महतीला आणून ठेवलें, हें समर्थ जाणत नव्हते असें गृहीत धरणे, म्हणजे समर्थासारख्या अक्षरशः समर्थ लोकोत्तर विभूतीला महंमदापेक्षाहि खालच्या पायरावर बसवून आमच्या मूर्खपणाचें व

**कृतघ्नपणाचें प्रदर्शन**

करण्यांसारखेच होय. 'शक्तीने मिळती राज्यें । युक्तीनें यत्न होतसे । शक्तीयुक्ती जये ठायीं । तेथे श्रीमंत धांवती' हा सिद्धांत कंठशोष करून सांगणारे १७ व्या शतकांतले रामदास किंवा १४ व्या शतकांतले विजयनगर साम्राज्याचे संस्थापक श्रीविद्यारण्य माधवाचार्य यांना इस्लामधर्माच्या भरभराटीची खरी मख्खी पूर्णपणें अवगत होती, म्हणूनच त्यांनी आपापल्या अनुयायांना मोठ्या कळवळ्यानें कलियुगात

**संघशक्ति हाच आत्मोद्धार**

हा दिव्य मंत्र सांगितला. पतित बांधवांना पावन करून घ्या, मराठ्यांची संख्या वाढवून त्यांची संघशक्ती वाढवा, आणि महाराष्ट्र धर्माचा-हिंदु धर्माचा सर्वत्र प्रसार करा. हें महत्कार्य साधण्यासाठीं नुसत्या महाराष्ट्रांतच किंवा हिंदुस्थानांतच हा धर्मप्रसार करून स्वस्थ बसूं नका, तर

**महंतें महंत करावे । युक्ति बुद्धीनें भरावे॥**
**जाणते करोनि विखरावे । नाना देशीं॥**

अनुक्रमणिका

हिंदधर्माचे साम्राज्य जगभर वाढवा, हिन्दुधर्माचीं सनातन सर्वव्यापी तत्त्वें जगाला शिकवा, पतित असतील त्यांना पावन करून घ्या आणि ज्या हिंदुस्थानानें पूर्वी एकदां साऱ्या जगावर जगद्‌गुरूपणाची सत्ता गाजविली त्याच हिंदुस्थानाच्या

## हिंन्दुधर्माला साऱ्या जगाचा गुरू करा

ही समर्थांची समर्थ वाणी उर्मट महाराष्ट्रानें धिक्कारली, त्याचीं विषारी फळे तो आज आपल्या आसवांनी चिंब भिजवून हुंदके देत देत खात आहे. उलटपक्षी महंमद पैगंबराच्या इस्लाम धर्मानें रानटी आरबांचे काय स्थित्यंतर केले ते पहा. या धर्माच्या अनुयायांना धार्मिक, सामाजिक, राजकीय वगैरे बाबतींत कसलाही प्रतिबंध नसल्यामुळे, प्रत्येक व्यक्तीच्या कर्तबगारीचा विकास होऊ देण्यास कोणतीही अडचण नसल्यामुळे आणि धर्मप्रसाराच्या सबबीवर अनेक पंरपरेच्या आणि अनेक भिन्नभिन्न, संस्कृतींच्या सर्वराष्ट्रीय मंडळींचा एक जबरदस्त

## बिरादरकीचा संघ

आस्तित्वांत आल्यामुळे, शास्त्र तत्वज्ञान वाङ्मय इत्यादी बाबतींत आरब पंडितांनी खलीफांच्या पदरीं राहून अलौकिक कीर्ति संपादन केली. या बाबतींतला त्यांच्या अचाट उद्योगाचा इतिहास पाहिला कीं त्यापुढे तत्कालीन क्रिस्ती राष्ट्रे हीनदीन व रानटी दिसतात. इ. स. ७०५ च्या सुमारास अल्जबर ऊर्फ बीजगणित आरबानींच प्रथम स्पेन देशांत नेले. गणितशास्त्र भूगोल खगोल वैद्यक इत्यादि विषयांतले आरबांचे प्रयत्न आजलाहि सर्वत्र मान्य आहेत. ग्रीक संस्कृत खाल्डी फारशी भाषेतील उत्तमोत्तम ग्रंथ मिळवून त्यांची त्यांनी फारशी भाषांतरे केली. कादंबऱ्याचे रचनाचातुर्य इराणी लोकांपासून घेऊन, ॲरेबियन नाइट्स् ग्रंथानें त्यांनीं कादंबऱ्यांच्या बाबतींत केवळ इराणलाच नव्हे तर साऱ्या जगाला अगदीं चकित करून सोडले. होकायंत्राचा उपयोग प्रथम आरबांनीच प्रचारात आणला. वैद्यक विषयास शास्त्रीय स्वरुप त्यांनींच दिलें आणि गणितांतली दशांशपध्दति मूळ आरबी मुसलमानांनीच शोधून काढली. हे त्यांचे विविध प्रयत्न युरोपच्या अर्वाचीन प्रगतीस बऱ्याच अशीं कारणीभूत झाले, ही विशेष महत्वाची गोष्ट लक्षांत घेतली पाहिजे, युरोपांतील क्रिस्ती राष्ट्रें निद्रावस्थेत ढणढणा घोरत पडलीं असतां, बगदाद कायरो व कोर्डोव्हा येथील विद्यालयें सर्व जातींच्या व सर्व धर्मांच्या लोकांस ज्ञानामृत पाजून ज्ञानवृध्दि करीत होतीं. याची साक्ष द्यायला कायरो येथील आरबांचें प्राचीन विश्वविद्यालय अजून हयात आहे. शिल्पशास्त्रांतहि मुसलमानांनीं इतकें अद्वितीय कौशल्य दाखविलें कीं, त्यांनीं बांधलेल्या इमारती, थडगीं, मशिदी व मनोरे यांची सर सुधारणेचा जागताजोग टेंभा मिरवणाऱ्या पाश्चात्य क्रिस्त्यांनाहि अजून साधतां येत नाहीं. खुद्द हिंदुस्थानांतील मुसलमानांची शिल्पी कामगिरी पाहिली तरीसुद्धां ताजमहल, कुत्बमिनार, फत्तेपुरी मशिद, अहमदाबादचा झुलता मनोरा, विजापुरचा बोलघुमट, इब्राहीम रोझा इ. अनेक इमारती युरोपियन विंजणेरांच्या अकला कुंठीत करीत आहेत. पूर्वीच्या खलीफांच्या अमदानींत

## बगदाद म्हणजे विलायत

होती. ठिकठिकाणचे विद्यामुमुक्षु बगदाद येथें ज्ञानार्जनार्थ जात असत. हिन्दुस्थानाचेहि बरेच विद्वान तेथें जाऊन रहात असत. चरक व सुश्रुत या दोन आर्यवैद्यक ग्रंथांचे आरबी तर्जुमे दोघां ब्राह्मणांनीं मुसलमानांस करून दिले. थोडक्यांत समारोप करावयाचा म्हणजे “जगाच्या संस्कृतींत मुसलमानांनी मोठीच भर घातली

आहे. प्राचीन काळच्या प्राच्यसुधारणेंत जेवढें म्हणून चांगले होतें, तेवढे सर्व ग्रहण करून आणि त्यांत स्वतःची पुष्कळ भर घालून, त्यांनी तो भाग क्रिस्ती युरोपास दिला; आणि त्याच्यावरच अर्वाचीन युरोपियन सुधारणेचा पाया रचलेला आहे." असा जो सर्व निःपक्ष आणि निर्विवाद विद्वान् इतिहासकारांचा शेरा पडलेला आहे, तो किती वाजवी आहे, हें सुज्ञांस सांगायला नको. आता आपण आपल्या हिंदुस्थानाकडे आणि हिंदुधर्माकडे किंचित वळूं. प्राचीन इतिहासाचीं आणि हिंदुधर्माच्या सर्व मुख्यमुख्य वेदोपनिषदादि ग्रंथांचीं पारायणें करणारें सुप्रसिद्ध पाश्चात्य पंडित मॉन्यर विल्यम यांनी हिंदु लोकांच्या संस्कृतीबद्दल असें उद्गगार काढले आहेत कीं "आमच्या पूर्वेकडील साम्राज्यांत आम्हाला अगदीं साध्याभोळ्या आणि लेच्यापेच्या लोकांशीं वागावयाचें आहे, असें मात्र कोणींहि समजूं नये. युरोपांतल्या उत्कृष्ट सुधारणेपुढें आणि उच्च बुद्धीमत्तेपुढें तेव्हांच वितळून जाणाऱ्या रानटी असंस्कृत लोकांशी येथें आमची गांठ पडली आहे. असेंही कोणी समजूं नये. ज्या मूळ मानवी कुळींतून त्यांची उत्पत्ती झालेली आहे, तिच्याच एका शाखेचा धागा आमच्या उत्पत्तीशीं बिनतोड लागूं करणाऱ्या अशा अत्यंत प्राचीन, अत्यंत थोर आणि कुशाग्र बुद्धीच्या लोकसमुहाशीं आमची गांठ पडलेली आहे. ज्यावेळीं

**आमचे बापजादे रानटी होते,**

संस्कृति आणि सुधारणा कशांशीं खातात याची त्यांना दख्खलसुद्धां नव्हती, त्यावेळी हे हिंदुलोक सुधारणेच्या अत्युच्य शिखरावर आरूढ झालेले होते. इंग्लिश हें नांवसुद्धां अस्तित्वांत येण्याच्या पूर्वी शेकडों शतकें यांची भाषा उत्कृष्ट कमावलेली व वाङ्मयपूर्ण परिणतावस्थेला पोहोचलेली होती आणि त्यांचें तत्वज्ञानहि अत्यंत गूढावस्थेपर्यंत प्रभुद्ध झालेलें होतें. "हिंदुच्या हिंदु धर्माचा अभिमान हिंदूंना साहजिकच विषेश; तेव्हां त्याच्या सर्वव्यापी उत्कृष्टपणाबद्दल हिंदु पंडितांचे दाखले देण्यांत अर्थ नाहीं. परंतु अनेक महाभयंकर दिव्यांतून पार पडून आजलाहि आपल्या अभंग सात्विक तेजाने ताठ उभा राहणारा आणि अनेक क्रिस्ती धर्मानुयायी पाश्चात्यांच्याहि हृदयांस हालवून सोडणारा.

**आमचा प्यारा हिंदुधर्म**

यानें आपल्या दिव्य तेजानें पाश्चात्यांच्या तोंडून काय काय उद्गगार वदविले आहेत, त्यांतील निवडक एकादोनच उतरे मात्र येथें नमूद करूं. जगप्रसिद्ध ॲनी बेझंटबाई "Sanatan Dharma, Advanced Text Book"ची सुरवात करतांना म्हणतात. "श्रीगणेशायनमः**सनातन धर्म ऊर्फ वैदिक धर्म याचा पाया वेदावर आहे. हा सर्व धर्मांत अत्यंत पुरातन असा धर्म असून याच्या तत्त्वज्ञानाच्या गांभिर्याची आणि ऐश्वर्याची सर कोणत्याही धर्माला येत नाहीं. शिवाय त्यांतील नीतिशास्त्राची सात्विक शुद्धता आणि निरनिराळ्या संस्कारपूर्ण क्रियाकर्मादि विधींचा सोईस्करपणा आणि लवचिकपणा यांत तर तो दुसऱ्या कोणत्याही धर्माला हार जाणार नाहीं. हा धर्म नदीच्या पात्राप्रमाणे आहे. कित्येक ठिकाणी इतका उथळपणा आढळतो कीं, लहान लहान मुलांनीं सुद्धां त्यांत खुशाल डुंबत रहावें आणि त्यांतील कित्येक ठिकाणें इतकी खोल आणि अगम्य आहेत कीं मोठ्य मोठ्या पट्टीच्या पाणबुड्यांनाहि त्याचा अंत लागणार नाहीं. मानवी प्राण्यांच्या मुमुक्ष वृत्तीच्या निरनिराळ्या भावनांना रुचेल आणि पचेल अशांत त्याची सोईस्कर ठेवण आहे. बरें या या वैदिक धर्माची पूर्णावस्थाहि इतक्या उच्च संस्कृतीला जाऊन भिडली आहे कीं, त्याला इतर कोणत्याहि धर्मांतून काहिंहि मिळवण्यासाठीं आवश्यकताच उरलेली नाहीं; तसा त्यानें कधीं यत्नहि केला नाहीं आणि हिन्दु धर्माच्या सर्वांग सौंदर्यांत आम्हीं आणखी कांहीं भर घालूं; अशी कोती घमेंड इतर**

**कोणत्याही धर्माला न शोभणारहि नाहीं. जसें या धर्माचें परिशीलन करावें तसतसा मनुष्याच्या बुद्धीवर अधिकाधिक प्रकाश पडत जातो आणि त्यांतील तत्वार्थबोधानें**

**अंतःकरण गारीगार होऊन जातें.**

**या वैदिक सनातन धर्माचें प्रत्येक तरुणानें नीट अध्ययन करावें. सुखाच्या समृद्धीचा हाच एक खरा राज मार्ग आहे. आणि आपत्प्रसंगी आत्मबळ वृद्धिंगत करून आमरण आपलें संरक्षण करणारा हाच एक धर्म होय, हें त्यांच्या निदर्शनास आल्यावाचून खास रहाणार नाही."** ज्या हिंदुधर्मानें अर्वाचीन अनेक उपऱ्या प्रतिबंधनाच्या शृंखला तडातड तोडून, हजारों मैलावर, पृथ्वीच्या दुसऱ्या गोलार्धावर राहणाऱ्या मॅडम् ब्लॉवट्स्की, कर्नल ऑल्कॉट, मिसेस ॲनी बेझंट, लेडबीटर इत्यादि शेंकडों पाश्चात्यांच्याहि अंतःकरणाला आपल्या सात्विक मोहिनीच्या शरसंधानानें अचूक विद्ध करून या पुण्यवान् भरतभूमीच्या दर्शनाकरितां खेंचून आणले; ज्या हिंदुधर्माच्या वेदोपनिषदांच्या अखंड पारायणांनीं मॅक्स मुल्लरसारख्या क्रिस्तानुयायाला अखेर अखेर

**पूर्ण संन्यासी बनविलें**

आणि ज्या हिंदुधर्माची सनातन तत्त्वे महाभाग स्वामी विवेकानंदाच्या ओजस्वी वाग्गंगेंतून भराभर कोसळू लागतांच क्रिस्ती अमेरिकनांनीं ती झटपट आपल्या कानांच्या ओंझळीनें गोळा करून स्वानंद साम्राज्याच्या सुखानुभवाने ते तर्र झाले-नव्हे, उपनयन (Initaiation)विधीचीहि पर्वा न करतां ते अंतर्बाह्य हिंदु बनले; हिंदुधर्माची महती अधिक वर्णन करणें म्हणजे पाश्चात्यांच्या लाडक्या शेक्सपियरच्या

TO PAINT THE LILY IN GOLD

या वाक्याची कोणाला आठवण होणार नाहीं?हिंदुधर्म अत्यंत प्राचीन काळापासून ज्या ब्रम्हज्ञानप्राप्तीच्या अनेक मार्गाचा डंका गाजवीत आहे, तें

**ब्रह्मज्ञान नव्हे लेकुराच्या गोष्टी**

कीं वाटेल त्या टारगटाने चार चटोर पोरा चव्हाट्यावर आणवून त्यांच्याकडून साऱ्या जगाला मोक्ष देण्याची बाष्फळ बडबड करावी! अहो, नुसती एखादी नोकरी मागायला जातानासुद्धा एखाद्या अधिकाऱ्यापुढे किती विनयानें आणि दक्षतेनें जावें लागतें; तर मग अत्यंत प्राचीन असा जो जगांतील सर्व धर्माचा राजा, सर्व धर्मांचें मूळ सर्व धर्माचें माहेरघर जो सनातन वैदिक हिंदुधर्म त्याच्या राजवाड्यांत जाऊन

**ब्रम्हज्ञानाच्या स्वराज्याची सनद**

मागतांना तुम्ही किती तीव्र मुमुक्ष वृत्तीने गेलें पाहिजे बरें?हिंदुधर्म हा अगिणित धर्मरत्नांनीं खच्चून भरलेली खाण आहे आणि जगांतील प्रचलित सर्व धर्म हे याच खाणींतले तेजस्वी हिरे आहेत. बादशहाच्या किरीटावर जाऊन बसला म्हणून साऱ्या जगांत मीच काय तो एक तेजस्वी हिरा, मीच साऱ्या जगाला प्रकाशित करतों, माझ्या तेजाची सर कोणालाहि येणार नाहीं, अशी जर बाष्कळ वल्गना कोहीनूर हिरा करूं लागला, तर

अनुक्रमणिका

त्याला आम्ही एवढेंच सांगू की बाबा कोहीनूर बांधवा, स्थानमहात्म्यानें असा एकदम हुरळून जाऊ नकोस.ज्या गोवळकोड्याच्या खाणीतून तुझा जन्म झाला, त्याच समृद्ध आणि श्रीमंत मातेच्या उदरांत तुझ्यासारखे अनंत कोहिनूर निर्माण करण्याची धमक आहे. तिनें आजपर्यंत तुझ्यासारखे अनेक कोहीनूर या जगावर पशाशानें उपसून उधळलेले आहेत आणि अझूनही लागतील तितकें, वाटेल त्या आकाराचे, वाटेल त्या घडणीचे आणि वाटेल त्या वजनाचे अनेक सवाई कोहीनूर निर्माण करण्यास

## तुझी गोवळकोंड्याची आई

समर्थ आहे बरं!! हिंदुंच्या दिव्य धार्मिक ग्रंथांचा तुलनात्मक अभ्यास करून करून अंतर्यामी पूर्ण हिंदु बनलेले, परंतु लोकलज्जेस्तव किस्ती राहिलेले सुप्रसिद्ध विद्वान क्रिस्ती पंडित मॉन्यर विल्यम्सने तर अशी चोख जबानी दिलेली आहे (पहा **Introduction, pxxvii, Indian Wisdom**)कीं 'या हिंदु धर्माचें स्वरूप अनंतवेषी आहे आणि यांतील तत्त्वाची व्यापकता तर अद्वितीय आहे. **(Multiform character and singular expansibility of the Hindu religious creed.)**या वैदिक धर्मात इतर सर्व धर्मातली तत्त्वे खच्चून भरलेलीं असून, तीं मानवजातींतील हरएक प्रकारच्या मनोवृत्तीला रूचतील आणि पचतील अशींच आहेत. यात अद्वैतवाद, द्वैतवाद, एकेश्वरी, अनेकेश्वरी, फार काय नास्तिक मतसुद्धा झाडून साऱ्या मताचा बेमालूम पुरस्कार करण्यांत आलेला आहे.' असाहा सर्वव्यापी हिंदुधर्म एकेश्वरी इस्लाम दिव्यांतून पार पडतांना इतका बेजार कां झाला?आणि पिता पुत्र पवित्र आत्माच्या त्रिदळी तत्त्वाचा पुकारा करणाऱ्या क्रिस्ती धर्मापुढें हात कां टेंकू म्हणतो?[मागे एकदां मुंबई सुप्रसिद्ध नागरीक पुढारी सर मंगळदास नथुभाई K.S.I.यांना ख्रिस्ति होण्याचा एका पाद्री दलालानें यत्न चालविला असता शेटजी म्हणाले. "अरे, आम्हा हिंदु लोकांना ख्रिस्ति होण्याची काहीं जरूर नाहीं आम्ही स्वभावताच ख्रिश्चन आहोंत. तुमच्या बाप्तिस्म्यानें अधिक काय होणार? पण बाबा ईश्वरानें मोठी खैर केली कीं, तुम्हा इंग्रजांवर ख्रिस्ति धर्माच्या दीक्षेच्या चाप पाडला; नाहीं तर हा वेळ पावेतों तुम्ही साऱ्या जगाचीं हाडेंहाडें कीं रे काढलीं असतीत. "(But I thank god that you English were converted to Christianity, or you would by this time have eaten up the world to the bone.)]हा कोहीनूर काय गोवळकोंड्यांच्या आईच्या श्रीमंतीची अब्रु घेणार?झाडावरच्या फळाच्या आघाताने काय बूळ झाडच कोसळून पडणार?नाहीं. असे, कधी पूर्वी झालें नाहीं. आणि पुढें होणेंहि शक्य नाही, अशी

## इतिहास ठांसून ग्वाही देतो,

मग हिंदुंचे आणि त्यांच्या सनातन हिंदुधर्माचें आज नाक खालीं कां?पूर्वी साऱ्या जगाला भारी झालेले हिंदु आज कोठें आहेत?कां, हिंदुधर्मानें आपल्या सर्वस्वाचें साम्रज्य पारलौकिक तत्त्वज्ञानांतच कोंदणांतल्या हिऱ्याप्रमाणें मर्यादित केल्यामुळे तो आणि त्याचे अनुयायी ऐहिक बाबतींत नामर्द ठरले?काय, झालें तरी काय कीं इस्लामाची छातीठोक मुसंडी आणि क्रिस्त्यांची कावेबाज खुरमुंडी येतांच हिंदुधर्मीयांना 'दे माय धरणी ठाय' होऊन जावें, त्यांचा राष्ट्रीय दर्जा वितळून जावा, त्यांना मानवी समाजात शेवटच्या नंबरावर बसणें प्राप्त व्हावें आणि गुलामगिरी पलीकडे त्यांना तरणोपायहि उरू नये?ही अशी क्रांति कशानें झाली?

## याचें उत्तरहि इतिहास देईल.

आमचा सनातन हिंदुधर्म आणि त्या धर्माचे प्रचारक यांचा पूर्वीपासून आतांपर्यंततचा इतिहास पाहिला, तर आमच्या हातांत चिंतामणि असून आंम्हीं त्याचा नीट उपयोग केला नाहीं, असें म्हणणें प्राप्त होतें. हिंदुधर्म हा सर्व आर्य मानवकुळाचा अत्यंत प्राचीन मूळधर्म असून, पूर्वी याच धर्माचे अनुयायी असलेले आर्यलोक अज साऱ्या जगभर परसलेले आहेत. हे आर्यलोक इराणांत गेले, तेथें त्यांनीं झोरास्टरी धर्मशाखेला वाठविली.

अनुक्रमणिका

भूमध्य समुद्राच्या किनाऱ्यावरील प्रदेशांत त्यांनीं वस्ती केली, तेव्हां तेथेहि ग्रीस आणि रोम या राष्ट्रांच्या प्राणप्रतिष्ठेबरोबरच हिंदु धर्माच्या नवीन आवृत्तीचे राष्ट्रीय धर्मपंथ स्थापन करून, लॅटिन भाषा बोलणाऱ्या मानवांचा उद्धार केला, याच आर्यकुळीच्या वंशजांनीं आपला विस्तार साऱ्या युरोपभर करून, जेथें जेथें ते गेले तेथेंतेथें त्यांनीं आपल्या प्राचीन हिंदुधर्मातील स्वातंत्र्याची कधीहि न मरणारी आवड आणि

## परिणत स्वराज्यवादाचीं तत्त्वें

यांचा प्रसार केला. स्वीडन—नार्वे, इंग्लड, जर्मनी आणि स्लाव लोकांचे प्रदेश येथेंहि याच आर्यलोकांमधील खेडवळांनीं आपापल्या सर्व आर्यसंस्कृतीचा प्रसार केला. परंतु येथें एक गोष्ट मुख्यत्वेंकरून लक्षांत ठेवली पाहिजे कीं, अत्यंत प्राचीन काळीं एकाच सनातन वैदिक धर्माचे अनुयायी असणाऱ्या या आर्यकुळीच्या लेकरांनीं साऱ्या जगभर जरी आर्यसंस्कृतीचा जबरदस्त फैलावा केला, तथापि त्यांनीं प्रत्यक्ष आर्यधर्माला मात्र तिकडे नेलें नाहीं. प्रत्यक्ष आर्यधर्म किंवा सनातन वैदिक धर्म जरी त्यांनी पुढें आपल्या आचरणांत आणला नाहीं, तरी त्यांनीं वसाहतीच्या देशकालवर्तमानाप्रमाणें जो जो धर्मपंथ अस्तित्वांत आणला त्याचा पाया मूळ वैदिक धर्मांतील सनातन तत्त्वांतवरच त्यांना उभारणें भाग पडलें. अर्थात् त्यांच्या नवीन धर्मांनीं जरी नामरूपाचें नवीन लेणें पांघरलें तरी त्यांचा आत्मा वैदिक धर्मांतील सनातन तत्त्वांच्या किरणांनींच प्रकाशमान झाला, ही गोष्ट मत्सरी हट्टवाद्यांशिवाय वाटेल त्या विवेकी व विचारी मनुष्याला इतिहास सप्रमाण पटवून देतो.

## मानवांच्या उत्क्रान्तीचा इतिहास

पाहिला, कीं ज्या वेळीं सुधारणेच्या नव्या मन्वंतराचा उषःकालीन प्रकाश पडतो आणि नवीन प्रगतीच्या नवीन भावनांनीं समाजांत एक प्रकारची चेतना उत्पन्न होते, तेव्हां तिच्या पाठीशीं धर्माची एक अभिनव कल्पना उभी असते. अशा वेळीं कोणी लोकोत्तर महापुरूष प्रगट होऊन, देश काल जनता आणि तिच्या रसरसणाऱ्या आकांक्षा यांना पटेल अशा नवीन सांच्यांत मूळच्याच धर्मांतील तत्त्वांचा तो मोठ्या चतुराईनें पुकारा करतो. या इतिहाससिद्ध परंपरेचा किंचित् समतोल भावनेनें विचार केला म्हणजे 'क्रिस्ती इस्लामी झरतुष्टी यहुदी किंवा जगांतील कोणत्याहि लहान मोठ्या धर्मपंथांतील सर्व तत्त्वें हीं हिन्दुधर्म आणि हिन्दूंचें प्राचीन सनातन तत्त्वभंडार यांतीलच पिल्ले होत' असा जो खणखणीत शेरा अनेक विद्वान् विचारवंतांनीं दिलेला आहे. त्यांतील मर्म आमच्या वाचकांच्या ध्यानीं येईल. आर्यांच्या मूळ वसतिस्थानांपासूनच्या त्यांच्या चळवळीचें आणि हालचालींचे सिंहावलोकन या छोटेखानी पुस्तकांत करणें शक्य नाहीं.तथापि इतकें मात्र सांगितलें पाहिजे कीं, आर्यांच्या अनेक शाखा जरी सर्व युरोपखंडभर वसाहत करून पसरल्या, तरी त्यांचा मूळसंघ मात्र हिंदुस्थानांतच उतरला. या दोन संघांचा इतिहास अगदीं वरवर पाहिला तरी एवढें चटकन् ध्यानीं येईल कीं, पश्चिमेकडे गेलेल्या संघांनीं

## पुनर्घटनेच्या तत्त्वाचा पूर्ण स्वीकार

करून ग्रीससारखीं लोकसत्तात्मक राज्यें स्थापन केलीं आणि पूर्वेकडे म्हणजे हिंदुस्थानांत उतरलेल्या मूळसंघानें मात्र कधीं अमिरी राज्यपद्धतीचा (Aristocracy)तर कधीं अनियंत्रित राज्यपद्धतीचा (Autocracy)अवलंब केला. पाश्चिमात्य आर्यांनीं देशकालवर्तमानानुसार पुनर्घटनेच्या तत्त्वाचा पूर्ण अंगीकार केला आणि पौर्वात्य आर्यांनीं क्रान्तिचक्राचा तडाखा आतांबसणार इतकें समजून उमजून सुद्धा

अनुक्रमणिका

परंपरेच्या कोत्या अभिमानामुळें पुनर्घटनेला अगदीं अखेर अखेरपर्यंतहि संमति दिली नाही. आर्यांचा वैदिक सनातन धर्म उदारमतवादी आणि सर्वव्यापी खरा, परंतु जसजसा काळ लोटला तसतसा त्यात

### संकुचित भावनेचा प्रवेश

होऊं लागला. चतुर्वर्णव्यवस्था कशामुळें कां निर्माण होईना; परंतु तिच्या शुद्ध व्यावहारिक सवलतीचें पर्यवसान वर्णावरून वर्गावर व वर्गावरून अखेर असंख्य जातींत झालें. ब्राह्मण क्षत्रिय वैश्य व शुद्र या वर्गाची वसाहत-प्रवृत्ती जसजशी वाढली, तसतसें त्यांचे लक्ष सहाजिकच ऐहिक उन्नतीकडे लागलें आणि वैदिक धर्माचें सगळें गाठोडें त्यांनी ब्राह्मण वर्गाच्या हवाली करून आंपण मोकळे झाले. क्षत्रियांचें सारें लक्ष धनुर्विद्येकडे आणि वैश्यांचे तागडीयोगाकडे लागल्यामुळें, ब्राह्मणांना अर्थातच धर्माच्या संरक्षणाकडे विशेष लक्ष देणें भाग पडलें आणि धर्मसंरक्षणाच्या बाबतींत जर त्यांनीं घेतली ती मेहनत घेतली नसती तर क्रिस्तीशकाचा उदय होण्यापर्वीच शेंकडों वर्षे या सनातन वैदिक धर्माचें पृथ्वीतलावरुन सफाई उच्चाटन झाले असते. परंतु धर्माचा सारा मामला एकट्या ब्राह्मणांवर पडल्यामुळे त्यावरील

### डिमॉक्रॅटीक नियमनाचें दडपण

नाहींसे झाले आणि वैदिक धर्म म्हणजे ब्राह्मणांच्या हातचा मेणाचा गोळा बनला. यज्ञयागादि कर्मकांडाच्या कांडणात धर्मच्या शुद्ध अध्यात्मिक भागाचा भूस निघाला. सर्व वर्णांना धर्म शिकविणारे एकटे कायते आपण या भावनेमुळें ब्राह्मणांच्या आचारविचारांतही एक प्रकारचा एकलकोंडेपणा व अनियंत्रितपणा डोकावू लागला. येईल त्याला आपल्या संघात सामिल करून घेऊन त्याला वैदिक धर्माचा अनुयायी बनविण्याची प्राचीन आर्यांची पद्धति ब्राह्मणांनीं बंद पाडली. आणि आचारविचारांच्या नियमनांचे कडकडीत नियम करून धर्माच्या सर्वव्यापी आणि सर्वग्राही पराक्रमाच्या नाड्या आंखडून टांकल्या. निरनिराळ्या उपास्थ देवदेवतांचीं महात्मे व पुराणें लिहून धर्माचे रहस्य संस्कृत भाषेच्या लोखंडी पिंजऱ्यात मोठ्या बंदोंबस्तानें अडकवून ठेवलें. स्त्रियांनी व शूद्रांनीं वेदाक्षर ऐकूंसुद्धां नये वगैरे कोत्या बुद्धीचे आणि मनाच्या क्षुद्रतेचे द्योतक असे नवीन नियम तयार करण्यांत आले. ब्राह्मणांनीं रचलेले ‘ब्राह्मण’ ग्रंथ पाहिले कीं, त्यांतील धर्माचें स्वरूप शुद्ध यांत्रिक, बेजीव आणि अनेक लडथडीच्या अगडबंब व्रतें-वैकल्यांनीं गजबजलेले दिसतें. क्षत्रियांचा आणि वैश्यांचा दिवसेंदिवस भाग्योदय होऊं लागल्यामुळें, निदान धर्माचें साम्राज्य तरी कायमचे आपल्या एकट्याच्याच हातांत राहावें म्हणून ब्राह्मणांनीं धर्मप्रसाराच्या आणि धर्मोपदेशाच्या

### पात्रापात्रतेचा लटका प्रश्न

नवीन उपस्थित करून, धर्माची व्याप्ति शक्य तितकी संकुचित, मर्यादित आणि सोंवळी करून ठेवली. ऋग्वेदांत जातींच्या बंडाचा कांहींही मागमूस लागत नाहीं. क्रिस्ती शकापूर्वी ३०० वर्षांपासून मात्र जातींचा वास येंऊ लागतो. पुढें निरनिराळ्या कर्मविधिबंधनांच्या नवीन उपस्थित केलेल्या भानगडीमुळें चतुर्वर्णांत अनेक जाती निर्माण झाल्या. त्यांच्यांत सवत्या सुभ्याची, एकलकोंडेंपणाची आणि परस्पर मत्सराची संघशक्तीस विघातक अशी कल्पना रूढ झाली. पुढें जातिसंस्थेसारख्या शुद्ध

अनुक्रमणिका

### सामाजिक संस्थेचें धार्मिक स्वरूपांत पर्यवसान

झाल्यामुळें 'एकम् सत्' तत्त्वाच्या आद्यप्रतिपादक सनातन धर्मानुयांयीत फूट पडत गेली, मत्सर वाढला आणि पपरस्परांविषयी बेपर्वा वर्तन वाढल्यामुळें धर्माच्या शुद्ध स्वरूपाचा विचका होऊन, हिंदुधर्म निर्जीव आणि बेकर्तबगार ठरला.

**अन्ये कृतयुगे धर्मास्त्रेतायां द्वापरेऽपरे । अन्ये कलियुगे नृणां युगऱ्हासानुरूपतः॥**

--म. भा. शांति.

धर्मांचीं सनातन तत्वें कायम ठेवून 'युगऱ्हासानुरूपतः' सामाजिक जीवनांत उदार धोरण ठेवण्याची प्राचीन वृत्ति ब्राह्मणी धर्माच्या मगरुरपणामुळें ठार मेली. नवजीवनाचे नवीन विचार समाजांत उत्पन्न झाले तरी त्यांचा स्वीकार करुन त्याचा समाजहितवर्धनार्थ उदारपणानें उपयोग करून घेण्याची व्यापक बुद्धि लंजूर झाल्यामुळे मूळधर्मातून अनेक नवीन धर्मपंथ निघाले आणि त्यामुळे हिंदुंच्या संघशक्तिचा ऱ्हास होऊं लागला. धर्मप्रचारकांनीं किंवा समाजनेत्यांनीं धार्मिक किंवा सामाजिक आचारविचारांत देशकालवर्तमानाप्रमाणें जर उदारपणा धारण केला नाहीं, तर नवजीवनाची तयार झालेली वाफ

### संकुचित वृत्तीचे बॉयलर

पार फोडून टाकून धर्माच्या आणि समाजाच्याहि ठिकऱ्या टिकऱ्या कशा उडविते, याचा कटु अनुभव हिंदुधर्माला क्रि. श. पू. ६ व्या शतकांतच आला. या वेळी लोकमतांत **धर्म आणि मोक्ष** यांविषयी मोठी चिकित्सापूर्ण खळबळ उडाली होती. पशुहत्या आणि यज्ञयाग यांतच धर्माचें स्वारस्य मानणाऱ्या प्रचलित ब्राह्मणी धर्माच्या आचरणानें खरा मोक्ष मिळणें शक्य आहे काय?या प्रश्नानें तत्कालीन लोकमतांत बरीच

### क्षुब्ध चर्चेची वावटळ

सुरू झाली. मगध देश आणि त्याच्या आसपासच्या प्रदेशावर हिंदुधर्माचा बसावा तितका पगडा बसला नव्हता. पूर्व वहिवाटीप्रमाणे हिंदुधर्मप्रचारकांनी या प्रदेशांतील लोक हिंदु केलेले नव्हते; म्हणून तेथील रहिवाशांत एकजिनसीपणा आलेला नव्हता. अर्थात या वावटळीचा मुख्य जोर याच प्रांतात विशेष चालूं झाला. ब्राह्मणांच्या मगरूरीमुळें आंणि आत्मस्तोमामुळें चिडून गेलेला सुशिक्षित राज्यकर्ता क्षत्रियवर्ग विद्वत्तेच्या आणि कर्तबगारीच्या जोरावर स्वतःला ब्राह्मणांपेक्षां अधिक ज्ञानी समजून त्यांचा धार्मिक अधिकार जुमानिनासा झाला. ब्राह्मण आणि क्षत्रिय यांच्यामधील या स्पर्धेने तत्वज्ञानाच्या आणि धर्माच्या बाबतींत द्विधामतांचा प्रादुर्भाव झाला. ब्राह्मणवर्ग सवतःस मोक्षाचा अधिकारी समजून धार्मिक बाबतींत कोणीहि हात घालूं नये, यज्ञयागादि क्रिया आणि त्यांत होणारी अखंड पशुहत्या हाच एक खरा मोक्षाचा मार्ग आहे, असा हट्ट धरून बसला. नवविचारांच्या उसळूं पहाणाऱ्या लाटांची त्याने पर्वा केली नाही. समाजात नवजीवनाचें चैतन्य उद्भूत झालें, त्यालाहि त्यानें जुमानले नाहीं. उलटपक्षी क्षत्रिय वर्गांतील सुशिक्षित विचारी मंडळीना ब्राह्मणांचा हा परंपरेच्या अभिमानाचा हट्ट मुळींच मानवेना आणि आमच्या

## मोक्षाचा किल्ल्या ब्राम्हणांच्या हातीं

काय म्हणून आणि पारमार्थिक उच्च ज्ञानाचा खजिना यांचयाच हातीं कसा?आमच्या उद्धाराच्या वाटेवर हे अडत्ये कां असावे?आमचा उद्धार आम्हीच करणार. अशा नवविचारी क्षत्रियांनी ब्राह्मणांच्या अत्याचारी यज्ञयागादि प्रघाताविरूद्ध उघडउघड बंड करण्याची तयारी केली. ईश्वर आत्मा, ईश्वराचा मनुष्याशीं संबंध आणि मुक्तीचा खरा मार्ग, यांबद्दल सर्वत्र कडाक्याचे वादविवाद सुरु झाले आणि जिकडेतिकडे

## परस्पर—विरोधी मतांचा सुळसुळाट

झाला. ब्राह्मणी धर्मातील फाजील कर्मठपणा लोकांना अमान्य झाला आणि यज्ञाच्या निमित्ताने होणाऱ्या पशुहत्त्येच्या अमानुष रक्तस्त्रावानें जनतेला चिळस उत्पन्न झाली. याज्ञिक अत्याचारानें मनुष्याला मोक्ष मिळतो, या ब्राह्मणी धर्मकल्पनेच्या परंपरेवर लोकांनीं विश्वास ठेवण्याचें साफ नाकारलें. मोक्षाचा खरा मार्ग शोधून काढण्याची जनतेची मुमुक्षु वृत्ति तीव्रतम झाली. नाना मतांचा गलबला सुरू झाला. कोणी वैदिकधर्माच्या मूळ सनातन तत्त्वज्ञानाच्या अगम्य डोहांत बुडी मारून त्याचा ठाव पहाण्यासाठी कासा कसल्या; कोणी 'नेति नेति' ह्मणूं लागले; तर कोणी देहदमन करून योगसाधनानें आत्म्याची मुक्ति करून दाखवितों म्हणून शंख फुंकले.या वेळीं भूतदया, आत्मसंशोधन आणि

**एको देवः सर्वभूतेषु गूढ**
**सर्वव्यापी सर्व भूतांतरात्मा॥**

या सनातन तत्त्वाच्या जाणिवेवर नवीन विचाराचा ओघ वहात होता. अखेर अनेक मतमतांरांतून

**अहिंसा परमो धर्मः**

या नवीन तत्त्वाचा पुकारा करीत बौद्ध आणि जैन धर्मपंथ पुढें सरसावले आणि ब्राह्मणी धर्माच्या हट्टवादी संकुचितपणाचा पुरा फायदा घेऊन त्यांनीं वैदिक सनातन धर्मावर जबरदस्त शह लावला. तरीसुद्धां ब्राह्मणवर्गानें माघार घेऊन, हें तुमचें अहिंसेचं तत्त्व नवीन नाहीं, त्याचीही या वैदिक सनातन धर्मांत मान्यता आहे, तुम्हांला याज्ञिकी कर्म हा अत्याचार वाटत असेल तर आम्हीं तो सोडून देतों, उपनिषदे आणि आठशें [कौरवपांडवांचें भारती युद्ध इ. स. पू. १४०० व्या वर्षी झाले असें विद्वानांनी आतां ठरवीलें आहे. अर्थात् श्रीकृष्णानीं भागवतधर्म क्रिस्तापूर्वी निदान १४०० वर्षे म्हणजे बुद्धापूर्वी ८०० वर्षे प्रवृत्त केला असावा हें उघडच आहे.

येथे एक कटुतम ऐतिहासिक सत्य नमूद करण्याचा आमच्यावर प्रसंग आला आहे. वास्तविक पाहिलें तर मनाचा उदारपणा ब्राह्मणांनी आजपर्यंत कोठेंहि कधीहि दाखविलेला आढळत नाही. संकुचित वृत्ति हेंच त्यांचे ब्रीद. उदार वृत्ति आणि मनाचा मोकळेपणा हा क्षत्रियांचाच मनोधर्म, उपनिषदें गीता वगैरे क्षत्रियांनी केलेले ग्रंथ पहा, किंवा त्यांनीं स्थापन केलेले ग्रंथ पहा, त्यांत ब्राह्मणी संकुचित वृत्तीचा लवलेशहि सांपडायचा नाहीं. म्हणूनच त्यांच्या ग्रथांनी व पंथांनीं साऱ्या भूगोलाला विंळखा घातला. या मुद्यावर सप्रमाण पुरावे देऊन पुष्कळ लिहितां येईल; परंतु एवढे म्हणणे सध्यां पुरें कीं ज्या ज्या कार्यांत सोवळा संकुचितपणा दृष्टीस पडतो, त्या कार्याच्या मुळांशी ब्राह्मणी मनोवृत्ति असलीच पाहिजे, असा ठोकळ सिद्धांत करायला कांहीं हरकत नाहीं; मग त्या कार्याचा कर्ता सध्यांच्या जातींच्या प्रदर्शनांत क्षत्रिय, वैश्य किंवा शूद्र यांपैकीं कोणत्याही लेबलाचा हक्कदार असो. अत्यंत व्यापक आणि साऱ्या विश्वालाहि कंवटाळणारी अशी जी 'ब्रह्मविद्या' जी आमच्या हिन्दु धर्माचा मूळ पाया,**ती ब्रह्मविद्या मूळची क्षत्रियांची.** त्यांनीच ती शोधून काढली आणि त्यांनीं ती मागाहून ब्राह्मणांस शिकविली. (सध्यांचे क्षत्रिय व ब्राह्मण हे याच क्षत्रिय ब्राह्मणांचे वंशज असोत वा नसोत. तो प्रश्न अलाहिदा आहे.) बृहदारण्यकोपनिषद अ. ६ ब्रा. २ क्रं. ८ मध्यें क्षत्रिय नृपति श्वेतकेतू ब्राह्मण गौतमास म्हणतो "यथेंयं विद्यात्वया प्रार्थितेतस्त्वत्सप्रदानापूर्व प्राङ्न कस्मिन्नपि" ब्राह्मण उवासोषितवती तथा त्वमपि जानीषे सर्वदा क्षत्रियपरंपरेयं विद्यागता" 'तूं मागितलेली ही विद्या (ब्रह्मविद्या) तुला देण्यापूर्वी कोणत्याहि ब्राह्मणांमध्ये राहात नव्हती, कोणत्याहि ब्राह्मणांपाशी ही नव्हती, हें तुलाहि माहीत आहे. **'ही विद्या सर्वदा क्षत्रियपरंपरेनें आलेली आहे.' छान्दोग्योपनिषद् अ. ५**]वर्षांपूर्वी भगवान् श्रीकृष्णानें प्रतिपादलेली गीता

अनुक्रमणिका

यात परमेश्वराच्या शुद्ध स्वरूपावहनाचा सांगितलेला मार्ग चला तुम्ही आम्ही आतांपासून चालू लागूं पण निराळाच आणखी एक धर्मपंथ काढून तुम्ही वैदिक धर्मानुयायांच्या संघांतून कां फुटून जातां?असें या नवमतवाद्यांना सांगण्याइतका मनोवृत्तीचा उदारपणा [**खं. ३-७** मध्ये जैवली राजानें गौतमाला पुन्हां हेंच सांगितले आहे. “यथा मा त्वं गौतमावदो यथेयं न प्राक् परा विद्या ब्राह्मणान् गच्छति तस्मादु सर्वेषु लोकेषु क्षत्रस्यैव प्रशासनमभूदिति” ज्या प्रकाराने ही विद्या तुझ्यापूर्वी ब्राह्मणांकडे गेलेली नाहीं, ब्राह्मणांनीं या विद्येनें अनुशासन केलें नाहीं, तो प्रकार प्रसिद्ध आहे. ही विद्या ज्या अर्थी पूर्वी ब्राह्मण संप्रदायांत नव्हती हें प्रसिद्ध आहे. त्याअर्थी पूर्वी **सर्व लोकांमध्ये क्षत्रिय जातीचेंच या विद्येनें प्रशासन होत होतें.** शिष्यांना ही ब्रह्मविद्या क्षत्रियच शिकवित असत. ही विद्या या वेळेपर्यंत क्षत्रियपरंपरेनेंच आलेली आहें. यावरून ब्रम्हविद्या सर्व जगताला शिकविण्याच्या अधिकार उदारधी क्षत्रियांचाच होय, संकुचित वृत्तीच्या ब्राह्मणांचा नव्हे, हें स्पष्ट होत आहे. गौतमबुद्ध, अशोक, महावीर, महंमद पैगंबर, येशूक्रिस्त, सॉक्रेटीस, तुकाराम, बंगालचा चैतन्य, नानक, गुरुगोविंदसिंग, दयानंद सरस्वती, स्वामी विवेकानंद यांची उदात्त आणि विश्वव्यापी धर्मप्रसाराची कामगिरी पहा आणि इतर दशग्रंथी शतग्रंथी वेदोनारायणांची कूपमंडुकवृत्ति पहा, म्हणजे आमच्या विधानांची सत्यता पटेल.फार दूर कशाला?सध्यांहि हिंदुधर्म सुधारणेचा-पुनर्घटनेचा-प्रश्न निघाला आहे ना?पटेल बील पास झालें तर मी अन्नपाणी वर्ज करून प्राण देईन म्हणून आमचे एक पदच्युत शंकराचार्य कुर्तकोटी बरळत आहेत. ते निःसंशय ब्राह्मणवर्णाचे असले पाहिजेत. त्याशिवाय असली अनुदार कल्पना त्यांच्या अंतःकरणांतून प्रसवलीच नसती. ज्यांना ‘जगद्गुरु’ पदवीच्या व्यापक अर्थाची व भावनेची जाणीवच नाहीं, त्यांनी उद्या प्रत्यक्ष ब्रम्हपुत्रा नदीवर जरी ‘विश्वधर्मपीठ’ स्थापन करून स्वतःस ‘विश्वधर्मगुरू’ म्हणविलें, तरी कूपमंकडूक ते कूपमंडूक! ‘विश्वची माझें घर’ ही कल्पना त्यांना भासमान होणेंच आधीं कठीण!]ब्राम्हणांनीं दाखविला नाहीं. त्याचा परिणाम काय झाला तो इतिहासांत नमूद आहेच. बुद्ध धर्माने सर्वभरतखंड व्यापून सनातन वैदिक धर्माचा पाडाव केला आणि त्याची संघशक्ती खिळखिळी केली. हा प्रकार होण्यापूर्वी सुमारें एक शतक वर्गभेदाच्या तीव्रतेच्या आणि ब्राह्मणांच्या याज्ञिकी अत्याचाराचा तिटकारा येऊन, मानवी भेदाभेदाचा नायनाट करणारा व

**भरणी आली मुक्त पेठा, करा लाटा व्यापार;**
**उधार व्यारे उधार घ्यारे, अवघे यारे जातीचे;**
**येथें पंक्तिभेद नाहीं, मोठे कांहीं लहान;**
**तुका म्हणे लाभ घ्यावा, मुद्दल भावा जतन.**

या विश्वबंधुत्त्वाच्या तत्त्वाचा सक्रीय पुकारा करणारा भक्तिपंथ अस्तित्त्वांत आलाच होता. इतकें ताजें उदाहरण डोळ्यांपुढें असूनसुद्धां ब्राह्मणांनीं आपल्या परंपरेच्या कोत्या अभिमानानें नवजीवनाच्या आकांक्षांना कस्सून विरोध केला. भक्तिपंथाचा प्रसार जारीनें झाला, त्यानें यवनादिकांनासुदां आपल्या संघांत घेतले आणि ‘रिता नाहीं कोणी ठाव, सर्वां भूतीं वासुदेव’ या व्यापक सिद्धांताच्या अनुयायांचा एक निराळाच मोठा संघ बनविला. अशा रीतीनें अनेक पंथ व अनेक संघ निर्माण झाल्यामुळें एकदेशीयत्त्व व एकधर्मीयत्व यांचा ऱ्हास होत गेला. दाही दिशांकडून येणाऱ्या अनेक निरनिराळ्या मानववंशांतल्या लोकांना.

## सनातन वैदिक धर्माची दीक्षा

घेऊन त्यांना आपल्या संघांत घेऊन आपली सामाजिक शक्ती बळकट करण्याची प्राचींन धोरणी दृष्टी ब्राह्मणी धर्माच्या संकुचित वृत्तीनें फुटली आणि अखेर यामुळें हिन्दु राष्ट्राचा राष्ट्रीय जोम दिवसेंदिवस अधिकाधिक खच्ची होत गेला. समाजांत उत्पन्न होणाऱ्या नवजीवनाला जुन्यापुराण्या परंपरेच्या फाजील अभिमानाच्या टोपलीखालीं दडपून ठार मारण्याच्या कोत्या अदूर दृष्टीचे पर्यवसान उत्क्रान्ती (Evolution)च्या ऐवजी क्रान्ती (Revolution)मध्यें कसें होतें, याचें स्पष्ट चित्र ब्राह्मणी धर्माच्या इतिहासांतच सांपडेल. प्रत्येक युगालाच नव्हे; तर प्रत्येक दहादहा वर्षांच्या दशकाला आचार व विचार-क्रांति होत असते. सामाजिक जिवंतपणाचें हेंच खरें लक्षण आहे. रूढीच्या गंजलेल्या जुनाट फुटक्या कढईंत संकुचित वृत्तीच्या घाणेरड्या तेलांत, प्रतिगामी परंपरेचा मीठमसाला घालून,

अनुक्रमणिका

## पुनर्घटनेचीं भजीं कडबोळीं

तळून नवजीवनाची भूक शमविण्याचा वृथा यत्न करणें किती हास्यास्पद होतें, हें आचाऱ्यांनीं किंवा आचार्यांनीं नीट लक्षांत घ्यावें. नवजीवनाचा उद्देश, आकांक्षा व व्याप्ति याचा तिळमात्रहि विचार न करतां, जुन्या मतांचीच दमधाटीनें समाजावर जबरदस्ती करणाऱ्यांच्या अखेर चिंधड्या उडविल्याशिवाय समाज राहत नाहीं; मग हे प्राणी जगद्‌गुरु असोत, नाहीतर प्रत्यक्ष राष्ट्राच्या असोत, त्यांची पर्वा नवजीवनशक्ति कधींच करीत नाहीं. उलट समाजाच्या किंवा राष्ट्राच्या नवजीवनशक्तिचा आगाऊच आखाडा बांधून, तिला उत्तेजक व सहायभूत अशा नवीन तडजोडीची व्यवस्था करण्यासाठी तयार व्हा, म्हणून जो कोणी आधींच सूचना देतो, नवशक्तिच्या स्वागतासाठी जनतेची मनोभूमि तयार करण्याचा प्रत्यक्ष प्रयत्न करतो, आणि येणाऱ्या नवशक्तिच्या तीव्र सोंसाट्यानें 'रेव्होल्यूशन' होऊ न देता, त्या सोंसाट्याला मोठ्या चतुराईच्या मार्गानें 'एव्होल्यूशन' कडे शांतपणे बिनतक्रार वाहूं देतो, तोच खरा ज्ञाता आणि तोच खरा जगद्‌गुरु!बाकीचे सारे ज्ञाते म्हणजे घटपटादि खटपटीचा उकीरडा फुंकणारे नामधारी पंडित आणि जगद्‌गुरु म्हमजे काषायवस्त्र परिधान करून मन मुंडण्याऐवजीं नुसते मस्तक मुंडण करणारे ऐदी संन्याशी!! लो. टिळकांनीं

## गीतारहस्य कां लिहिलें?

त्यांनी संन्यासयोगाचा धिक्कार करून कर्मयोगाचीच तुतारी अत्यंत आवेशाने कां फुंकली?असें करण्यांत त्यांना नवजीवनाच्या आगमनाची कांहीं प्रेरणा झालेली असेल काय?नव्या मन्वंतराच्या नवीन आकांक्षांच्या स्वागताचा त्यात काही नवीन संदेश सांगितला आहे काय?या गोष्टींचा तिळमात्र विचार न करीतां रहस्याचें पुस्तक बाहेर पडतें न पडतें तों केवळ एका आठवड्याच्या आंतच टिळकांच्या खुषमसकऱ्या अंधभक्तांचा, वावदूक एडीटर चित्रगुप्तांचा आणि गोमूत्रा इतकीच आपली विद्वत्ता पवित्र समजणाऱ्या सांप्रदायी वेदोनारायणांचा जो

## जोडाजोडीचा बीभत्स शिमगा

उडाला, तो पाहिला.म्हणजे परंपरेच्या संकुचित भावनेपुढें कसल्याही नवविचाराची दिक्कत न बाळगिण्या इतक्या अदूरदर्शी क्षुद्र विचारांचे शुद्र असूनही आमच्यांत आहेत, एवढेंच सिद्धहोतें. ज्ञानोत्तर संन्यांस कीं कर्म या वादाचा निर्णय कांहींहि असो. एक मात्र मुद्दा वाचकांनीं नीट ध्यानांत धरल पाहिजे कीं, संन्यासयोग सांगणारे श्रीशंकराचार्य प्रत्यक्ष संन्याशी होते आणि कर्मयोग सांगणारे टिळक प्रत्यक्ष कर्मयोगी होते; पण हे मधल्यामधीं शुष्का-शुष्क वाद घालीत बसणारे गलबते ना संन्याशी ना कर्मयोगी! श्रीशंकराचार्यांनीं ज्या काळीं संन्यासयोग पुकारला त्या कालची देशपरिस्थितीच तशी असली पाहिजे; पण त्यानीं तो पुकांरला म्हणून यावच्चंद्रदिवाकरौ अक्षरशः जसाच्या तसा तो आजलाहि विसाव्या शतकांतील नवमन्वंतराच्या नवजीवनास उपयोगीं पडेल, असें मानणें हें बुद्धिदौर्बल्याचें लक्षण नव्हे तर कशाचें?गौतमबुद्धाचा धर्म मूलतः निवृत्तीपर संन्यासमार्गाचा होता. त्याच्या अनुज्ञेप्रमाणें सर्वसंगपरित्याग करून त्याचे अनुयायी भिक्षू जंगलांत गेंड्याप्रमाणें भटकत होतेच; पण बुद्धाच्या निर्णयानंतर लवकरच (इ. स. पू. २०० वर्षें) खुद्द त्याच्याच अनुयायांत विचारक्रांती झाली. भिक्षु होऊन अरण्यांत एकलकोंड्या गेंड्याप्रमाणें उदासीन कालक्रमण करण्यापेक्षां धर्मप्रसारार्थ लोकहिताचीं व परोपकाराचीं कामे निष्काम 'निरिस्सित' बुद्धीनें करण्यांतच बौद्धभिक्षूंच्या खऱ्या कर्तव्याची सार्थकता आहे, या नवीन

अनुक्रमणिका

## प्रवृत्तीमार्गाचा मिशनरीपणा

महायान पंथानें पुकारला. परंपरेच्या सांठवणीच्या गुळाच्या ठेवणीपलीकडे न पाहणारे जीर्णमतवादी 'हीनयान' लोकांना तसेच निराळे कोकटत ठेवून या नवमतवादी महायान पंथाने मूळच्या बुद्धधर्मीय मूलतत्वास धक्का न लावतां, त्याच्या निवृत्तिपर स्वरूपावर कर्मप्रधान भक्तिमार्गाचें मिशनरी झबलें चढविलें आणि संघशक्तिच्या वृद्धीबरोबरच धर्माच्या प्रसारानें सारें जग व्यापून टाकले. नवजीवनाच्या चैतन्याच्या पराक्रम हा असा असतो. शंकराचार्याच्या वेळीं जनता ऐहिक संपत्तीनें मदोन्मत बनलेली होती. कनक कांता आणि मदिरा, ऊर्फ

## WEATH, WOMAN AND WINE

या 'थ्री डब्ल्यू' मध्यें लोळण्यापलीकडे तिची प्रवृत्ती जाईच ना. अशा प्रसंगी समाजसुस्थितीची जबाबदारी ओळखणाऱ्या शंकराचार्यासारख्या लोकोत्तर महापुरूषानें संन्यासयोगाचें महत्त्व पुकारूं नये तर काय नाटकयोगाचे पडदे उघडावे?त्यावेळी, देशकालनाप्रमाणें संन्यासपर निवृत्तिमार्गाचा वळसा जनतेच्या कल्याणासाठीं पाहिजे होता, तो शंकराचार्यानीं दिला, त्याचा योग्य तो परिणामही झाला. पण त्या वळशाचा या विसाव्या शतकांत काय उपयोग?व्यवहाराच्या हातांत हात घालून धर्म चालेल तरच त्याची खरी किंमत. नव्या मन्वंतराच्या प्रत्येक नव्या दर्शनाबरोबर धर्मानेंही आपल्या पावलांची गति कमी अधिक केली पाहिजे. आजलाहिंदुस्थानची स्थिती कशी आहे?शंकराचार्यांच्या वेळीं ती जशी होती तशीच आज आहे काय?नाहीं. तर मग शंकराचार्यांच्या संन्यासयोग आजलाही अक्षरशः पाळण्याबद्दलचां हट्ट म्हणजे

## सांप्रदायीक आग्रहीपणा

नव्हे तर काय?शिवाजीची भवानी तलवार १७ व्या शतकांत महापराक्रमी असेल, नव्हे होती, नाहीं. कोण म्हणतो?पण या २०व्या शतकांतील टॉर्पेडो ड्रेडनॉटच्या धडाक्यांत तिला पुसतो कोण?आणि उद्यां एखाद्या शहाणा त्याच भवानीच्या सांप्रदायिक अभिमानाने तसलीच एक तलवार घेऊन रणांगणांत मिशांवर पीळ देत गेला, तर त्याची तेथे काय संभावणार होईल?पूर्वी संन्यासयोगाशिवाय हिंदूंचा व हिंदूधर्माचा तरणोपायच नव्हता त्यावेळीं नवजीवनानें संन्यासयोगांचा कर्णा फुंकला. आज नामशेष होऊं पहात असलेल्या हिंदूंच्या आणि त्यांच्या हिंदूधर्माच्या तोंडांत

## कर्मयोगाचा हेमगर्भच

घातला पाहिजे. नव्या मन्वंतराचा 'कर्म करा, कर्तव्य करा, कर्तबगार व्हा' हाच संदेश आहे.स्वामी विवेकानंदांनीं अमेरिकेस असा स्पष्ट जबाब दिला कीं "बाई अमेरिके, तूं मोठी दयाळू आहेस, मायाळू आहेस, सर्व कांहीं आहेस, पण हिंदुस्थानांत तुझे क्रिस्ती मिशनरी पाठवून, तेथें दर माणसागणित एकेक चर्च उभारण्याचा तुझा मतलब कांहीं माझ्या ध्यानांत नीटसा येत नाहीं. तूं काय हिन्दुस्थानाला धर्मदान कां करीत आहेस?आणि त्याच्याकरितां कां बये येवढे बोटी भरभरून मिशनरी आणि क्रोडो रुपये पाठवीत आहेस?हरहर! अग मेरू पर्वताला तोळाभर सोन्याची कां कधीं कोणी मदत करतात?हिंदुस्थानाला धर्म?आणि तो तूं पाठविणार?बये अमेरिके, हिंदुस्थानचा तुला खरोखर कांहीं कळवळा येत असेल, त्याच्या

अनुक्रमणिका

बद्दल तुझ्या शुभ्रांतःकरणांत जर सहानुभूतीचे खरेखुरे पीळ पडत असतील, तर हिंदुस्थानाला धर्म देण्याचा 'अव्यापारेषु व्यापार'न करितां त्याच्या ओरडून ओरडून कोरड पडलेल्या

## तोंडांत भाकरीचा तुकडा घाल

सर्व धर्मांचें माहेरघर अशा हिंदुस्थानाला धर्म देण्याचा उपक्रम करणें ह्मणजे त्याचा अपमान करण्यासारखें आहे. "आज हिंदुस्थानाला भाकर पाहिजे आहे. आज हिंदुधर्माला उपासमारीनें उभेंसुद्धां राहवत नाहीं, त्याला प्रसारस्वातंत्र्याची कुबडी पाहिजें. हिन्दु लोकांच्या संघशक्तीच्या खजिन्यांत आज टिपुसभरसुद्धां पाणी राहिलेलें नाहीं, त्या संघशक्तीचें प्रमाण वाढविलें पाहिजे. काठीला सोनें बांधून काशीपासून रामेश्वराला खुशाल जा, असें पुष्कळ म्हणतात; पण आजला हिन्दूंजवळ काठी किंवा सोनें दोन्हींहि उरलेली नाहींत. हिंन्दुची श्रीमंती आज त्यांच्या कोरड्या बढायांत उरलेलीं आहे. असल्या कंगाल लोकांनीं कसल्या लढाया मारणें शक्य आहे?आजला हिंन्दू लोक हे शब्दशः खरेखुरे संन्याशीच बनलेले आहेत, त्यांना आणखी संन्यासयोगाची काय जरूर?अन्नासाठीं मोताद झालेल्या, ढुंगण झाकण्यातुरत्या चिंध्यासाठींही पश्चिमेच्या सूर्याला विनंतीचे अर्ध्य देत बसलेल्या आणि भिक्षांदेहीशिवाय दुसऱ्या कसल्याही ईश्वराची भक्ति नकरणाऱ्या हिंदुस्थानाला अधिक संन्याशीपणा कोणता शंकराचार्य देऊ शकेल?भणंग भिकाऱ्याला तूं संन्याशी हो, असें आग्रहानें सांगणाऱ्या शहाण्याची काय तारीफ करावी! आजला हिंदुलोक आणि त्यांचा हिंदुधर्म यांची स्थिती ही अशी पूर्ण संन्याशी आहे. परंतु ती कशी प्राप्त झाली हें पाहण्याचें आपलें मुख्य काम आहे. म्हणून आपण आतां

## इस्लाम आणि हिन्दु धर्माची टक्कर

कशी लागली तें पाहूं. हिंन्दू धर्मप्रवर्तकांनीं सनातन हिन्दू धर्माचीं उदार आणि व्यापक तत्त्वें संकुचित केल्यामुळें मूळधर्मातून अनेक संघ व पंथ फुटून वेगळे कसे निघाले हें वर सांगितलेंच. शुद्ध व्यावहारीक वर्णव्यवस्थेचें असंख्य जातींत पर्यवसान होऊन एकीची बेकी झाली. प्रांतवारीनें अलग राहण्याची प्रवृत्ती वाढली. दक्षिण हिंदुस्थान व उत्तर हिंदुस्थान असा आत्मघातकी मायावी देशभेद उत्पन्न करून मध्यें नर्मदा नदीची कांटेरी कुंपण जाहीर केली. क्षत्रिय व ब्राह्मण एकमेकांचे हाडवैरी बनल्यामुळे, वैश्यांनींहि आपल्या तागडी पलीकडे पाहण्याचें नाकारलें. शुद्रांची कोणी पर्वा न केल्यामुळें त्यांच्यांत उत्पन्न झालेलें आत्मोन्नतीचें नवीन जीवन हिंन्दू धर्माच्या कांटेरी पिंजऱ्यांतून मोकळे होण्यासाठीं धडपडूं लागले. थोडक्यांत सांगायचें म्हणजे हिन्दुधर्मानें जगातील सर्व मानव वंशांतील लोकांना 'या हो या' अशी प्रेमाची हांक मारून आपल्यांत समाविष्ट करून घेण्याची प्राचीन उदार परंपरा सोडून दिली आणि 'गेलास तर जा, पुनः तोंड दाखवूं नकोस,' अशी उर्मट बेपर्वाई सुरू केली. अर्थात् अशा विस्कळीत फाटाफुटीचा फायदा घेऊन परकीयांनीं आमच्या सर्वस्वाच्या पायांत

## गुलामगिरीच्या अभेद्य शृंखळा

ठोकल्या, त्यांत आश्चर्य तें काय?मुसलमानी रियासतीच्या पूर्वार्धाचा नीट अभ्यास केला आणि एका हातांत तलवार व दुसऱ्या हातांत कुराण घेऊन मुसलमानांनीं आपल्या धर्मप्रसारार्थ जीं जीं साहसी व दूरदृष्टीचीं धोरणे लढविलीं त्याचा विचार केला, म्हणजे त्यांनी हिन्दुस्थान, हिन्दुलोक आणि त्यांचा हिन्दुधर्म हीं पादाक्रांत केलीं नसतीं तरच मोठें आश्चर्य झाले असते खरें! कोणत्याहि महत्कार्याची-विशेषतः धर्मप्रसार

आणि राष्ट्रप्रसार यांची-सिद्धि अनुयायाच्या संख्येवर अवलंबून असते. ही संघशक्ति वाढवून अगदी नवख्या व परक्या देशांत जाऊन छातिठोकपणाने साम्राज्य स्थापन कसें करावें, या बाबतींत जगद्‌गुरू म्हणून

## इस्लामाच्याच पायांवर डोकें

ठेवणे वाजवी होईल. हिंदुस्थानांत आलेल्या मूठभर इस्लाम धर्मप्रसारक मंडळींनीं अत्यंत अल्पावकाशांत सारें हिंदुस्थान आपल्या अनुयायांनीं गजबजून कसें सोडिलें, याचा इतिहास म्हणजे तत्कालीन हिन्दूंचा धार्मिक, सामाजिक आणि राजकीय खिळखिळा इतिहासच होय. हिन्दुधर्माच्या अनुदार आचारविचारांना कंटाळलेल्या आणि शुद्रत्वाच्या काल्पनिक मायावी बंधनात शेकडों वर्षे खंगत कुझत पडलेल्या लोकांना मुसलमानीं धर्मानें आपले दरवाजे खडाखड उघडून आंत घेतले आणि आपल्या अनुयायांची संख्या वाढविली. अर्थात् हिन्दुधर्मानुयायांची तितकी संख्या कमी होऊन त्यांच्या संघशक्तिचा ऱ्हास हाच इस्लाम धर्माचा उदय होण्यास मुख्यत्वेंकरून कारण झाला, हें निराळे सांगण्याची आवश्यकता नाहीं. महंमद गजनीनें हिन्दुस्थानवर ज्या जगविख्यात बारा स्वाऱ्या केल्या, त्या करण्यापूर्वी रजपुतांच्या भीमपराक्रमाच्या आख्यायिकांनीं तो दबकला नाही. त्यानें हिन्दुस्थानाबद्दल जी माहिती मिळविली, त्यांतील ‘आपसांतील फूट’ या कलमावर त्यानें आपल्या भावी सिद्धीची खूणगांठ बांधली. रजपूत लोक महापराक्रमी खरे, परंतु त्यांच्यांत

## व्यावहारीक चातुर्याचा अभाव

फार होता. जशास तसे वर्तन करून आलेल्या संकटाचा फडशा पाडण्यांत लागणारे व्यवहारचातुर्य रजपुतांत मुळींच नव्हतें. भोळसर आणि शुद्र धार्मिक (?) कल्पनांचे ते गुलाम बनलेले होते. एकीच्या महत्त्वाला ते अज्ञीबात पारखे झालेले होते. स्त्रियांच्या अब्रूसाठींच काय तीं युद्धें करायचीं, यापलीकडे दृष्टी न गेल्यामुळें जोहारासारखे अमानुष आणि नामर्दपणाचे प्रकार करण्यांत ते धन्यता मानूं लागले. अविचार, विलासमग्नता आणि उन्मतपणा या दुर्गुणांमुळें आपापसांतहि युद्धे करण्यास ते मागेंपुढें पहात नसत. अर्थात् त्यांच्या सर्व इतिहासप्रसिद्ध शौर्यधैयादी सद्‌गुणांची माती होऊन, क्षुद्र लोकांच्या कपटांचा त्यांच्यावर बिनतोड शह लागला आणि ते आपल्या सर्वस्वाला मुकले. अशा विस्कळीत परिस्थितींत इस्लामधर्माचा चांद तारा राज्यप्रसाराबरोबरच धर्मप्रसार आणि धर्मप्रसाराबरोबरच राज्यप्रसार करण्यासाठीं हातात नागवी तरवार घेऊन जेव्हां हिन्दुस्थानांत येऊन धडकला, तेव्हां त्यांच्या लढाईच्या शिस्तीपुढें बेशिस्त रजपूतादि क्षत्रिय फिके पडले. पैशाच्या लोभानें मुसलमान शत्रूंस अंतस्थ बातमी पोहचविणाऱ्या राष्ट्रद्रोही लोंकांचा सुळसुळाट उडाला. जातिभेदाच्या तीव्रतेमुळें लढाईला तोंड देण्याची जबाबदारी एकट्या क्षत्रियांवर पडली. ‘देशाचें कांहीं कां होईना, आपला बचाव झाला म्हणजे पुरे’ या क्षुद्र आणि नीच भावनेनें ब्राम्हणांनीं

## दोन्ही कानांवर हात

ठेवले. वैश्यांनी द्रव्यार्जनाची कास सोडली नाहीं हें खरें, पण त्या धनसंचयाचा अल्पांशसुद्धां त्यांनीं राष्ट्रकार्यास दिला नाहीं. बिचारा शेतकरी आणि कामगार वर्ग तर इतक्या निकृष्टावस्थेला पोंचला होता कीं तो ब्राह्मणांस आणि क्षत्रियांस वैऱ्यासमान मानीत असे आणि त्यांच्या जाचणुकींतून आपली सुटका कधीं होईल याची वाटच पहात बसला होता. शूद्रांस तर मुसलमानांच्या आगमनानें अत्यानंद झाला आणि ते भराभर मुसलमान धर्माची दीक्षा घेऊन मुसलमान बनले. इस्लामी आरबानीं सिंध प्रांतांत हिंदूंवर केलेल्या

अमानुष अत्याचाराची जाणीव हिंदु जनतेला किंवा हिंदुराज्यकर्त्यांना मुळीच नव्हती, अशांतला प्रश्न नाहीं, पण त्यांची सर्वच स्थिति इतकी विस्कळीत आणि बेजबाबदार झालेली होती कीं, हिंदु विराटपुरुषाच्या अंतःकरणाला

## भावी विनाशकाळाचें भेसूर चित्र

जरी पीळ पाडीत होतें, तरी पोट आणि अवयवांच्या अत्मघातकी तंट्याप्रमाणें त्याचे हातपायादि अवयव मुळींच हालचाल करूं शकले नाहींत. याचा परिणाम हिन्दुस्थानांतील ठिकठिकाणच्या निरनिराळ्या हिन्दुराज्यांवर कसकसा झाला याचें चित्र रेंखाटण्यास येथे अवकाश नाहीं; कारण त्यामुळें सारा इतिहासच्या इतिहासच येथें पुनर्मुद्रित करण्यासारखें तें होईल. इस्लामानें तलवारीच्या तामसी जोरावर सात्विक हिन्दुधर्माचा पाडाव करतांना हिन्दुधर्मीयांची स्थिति कशी झाली आणि या भयंकर आपत्तीच्या दिव्यांतून हिंदुधर्म कसा पार पडला, एवढेंच आपणाला पहावयाचें आहे. मुसलमानांनी एतद्देशीय लोक बाटवून आपल्या इस्लाम धर्मांत समाविष्ट करण्याचा जो धूमधडाका सुरू केला त्याचा परिणाम हिंन्दुतील खालच्या जातींवरच विशेष घडला; वरच्या वर्गातील लोक फारसे बाटले नाहींत. परंतु हजारों वर्षें वरच्यांचें दास्य करकरून उठवणीस आलेल्या या खालच्या लोकांना मुसलमानी धर्म स्वीकारल्यामुळें आपल्या स्थितींत एकदम महदंतर पडल्याचें दिसून येतांच, हिन्दुधर्माचें प्रेम त्यांनीं झुगारून दिलें आणि त्याचा मोठा प्रचंड ओघ हिन्दुधर्माच्या छावणीला अखेरचा रामराम ठोंकून इस्लाम धर्माच्या संघशक्तीला अधिक समर्थ आणि पराक्रमी करण्याकरितां निघून गेला. स्वकीयांच्या दास्यांतून त्यांनीं अशा प्रकारें आपली मुक्तता करून घेतांच, इस्लाम धर्मानें त्यांना एकदम मुसल्मान

## राज्यकर्त्यांच्या बरोबरीचे जातभाई

बनविले. त्यांस ऐहिक ऐश्वर्याचा लाभ झाला. हजारों वर्षांचें त्यांचे नष्टचर्य संपले. त्यांच्या आंगच्या गुणांचा व पराक्रमाचा विकास होण्याची वाट त्यांना मोकळी झाली आणि त्यांचा नावलौकिक व मानमरातबही कल्पनातीत वाढला. एका वर्गास दुसऱ्या वर्गानें गुलामाप्रमाणें वागविल्यास राष्ट्रास केवढी भयंकर आपत्ति भोगावी लागते, याचा आमच्या आधुनिक स्पृश्याऽस्पृश्यत्वाचें सोंवळें ढोलेकें बडविणाऱ्या धार्मिक डोंबाऱ्यांनी नीट विचार करावा. जोंपर्यंत हिन्दुधर्माच्या मानेला परचक्राचा फांस लागला नव्हता, तोंपर्यंत नव्या जुन्या व्रतें उद्यापनांवर घृतकुल्या मधुकुल्या करणारे धर्मरक्षक ब्राह्मण यावेळी पोबारा करून पसार झाले. हिन्दुधर्मसंरक्षणांविषयीं आपलें कांहीं कर्तव्या आहे, याची त्यांना जाणीवच उरली नाहीं, किंवा ती जाणीव ज्यांना होती त्यांना मदत करण्याचीहि त्यांना वासना होऊं नये, याला

## उपाध्यायांचा राष्ट्रद्रोह

याशिवाय दुसरें कोणतें अन्वर्थक नांव देतां येईल?इराण देश मुसलमानांच्या ताब्यांत सहजासहजीं कां गेला, याचें निदान ठरवितांना इतिहासकारांनीं हाच सिद्धांत काढला आहे. तेथें धंदेवाईक उपाध्यायवर्गाचें माहात्म्य फाजील वाढून खालचे सर्व लोक त्यांचे दास बनले होते. परमेश्वरी कृपेच्या, पारलौकिक मोक्षाच्या आणि ऐहिक सुखोपभोगाच्या किल्ल्यांचा जुडगा या वेदोनारायणांच्या हातांत आणि इतर लोकांच्या हातांत सत्तेची फुटकी कवडी. अशा स्थितींतइस्लाम धर्माचें इराणवर परचक्र येतांच, या परान्नपुष्ट उपाध्याय वर्गानें खालच्या लोकांस नशिबाच्या हवालीं करून आपण सूंबाल्या केला. परंतु देशासाठीं व धर्मासाठीं परचक्राशीं

तोंड देणाऱ्या लोकांस मदत करून या आणीबाणीच्या प्रसंगीं राष्ट्रसेवा करण्याचा उदात्त विचार त्यांना सुचलाहि नाहीं आणि मानवलाहि नाहीं.अर्थात् दीन व निराश्रित झालेले कनिष्ठ वर्गाचे इराणी मुसल्मानांच्या तावडींत आयतेच सांपडले आणि स्वदेश व स्वधर्म संरक्षण करण्याचा कांहींच तरणोपाय न उरल्यामुळें इराणी लोकांनीं मुसलमानी धर्म स्वीकारून आपला फायदा करून घेतला. हिन्दुस्थानांतहि थेट असाच प्रकार घडला. ज्या ज्या वेळीं ज्या ज्या राष्टांत उपाध्यायांच्या धार्मिक कर्तव्याला धंद्याचें स्वरूप आलें, त्या त्या वेळीं त्या त्या राष्ट्राचा घातच झालेला आहे, हे विशेष लक्षांत ठेविलें पाहिजे. यावरून उपाध्याय आणि सुशिक्षित जनता यांच्यावर राष्ट्रसंरक्षणाची केवढी जबाबदारी असते याचा वाचकांनींच विचार करावा. आतां

## बाटलेल्या हिन्दूनीं काय केलें?

हे आपण पाहूं. हिंदुस्थानातील बरेचसे मुसलमान पूर्वीचें हिंदूच होतें हें मागें सांगितलेंच आहे. अफगाण अंमलाच्या दोनतीनशें वर्षांत कांही मुसल्मान बाहेरून इकडे आले, ते बहुतेक तुर्क पठाण हे होत. त्यांनीं बहुतेक हिन्दु बायकांशींच लग्नें लावलीं, त्याजपासून जी संतति झाली, तिचा हिंदुधर्मानें अव्हेर केल्यामुळें, त्यांची आयतीच मुसलमानांत भर पडली. याशिवाय जुलमानें बाटविलेल्या हिन्दूंची संख्या वेगळीच. अस्सल मुसलमानांपेक्षां हे बाटलेले मुसलमानच—मग ते जुलमानें वा आपखुषीनें बाटलेलें असो—हिन्दुस्थानास आणि हिन्दुधर्मास जास्त जाचक झाले. एकदां परधर्मांत गेल्यावर पूर्वधर्माचा पाडाव करण्यास लोकांस विशेष स्फुरण येत असतें. त्यास स्वकीयाचीं व्यंगें, त्यांची राहणी आणि त्यांच्या सर्वसाधारण बऱ्यावाईट समजुती या पूर्ण माहीत असल्यामुळें, त्या माहीतींचा लाभ साहजीकच त्यानीं आपल्या नवीन इस्लाम जातभाईस करून दिला. देवालयाचा नाश करून तेथील अपार संपत्तीचा अपहार करण्याच्या कामीं मुसलमानांस या बाटलेल्या हिन्दूंचाच जास्त उपयोग झाला. कोणती युक्ती केली असतां लढाईत हिन्दूंचा पराभव होईल, हें या बाट्यांकडूनच मुसलमानांस कळत असे, लढाई चालूं असतां एकदम मध्येंच गाई आणून उभ्या करणें, गाईचें रक्त व मांस टाकून हिन्दूचे तलाव व विहिरी भ्रष्ट करणें, या युक्त्या या बाट्यांनींच मुसल्मानांस शिकविल्या. या बाट्यांत अनेक मोठमोठे लौकिकवान् पुरुष निघाले, ते इतिहासांत प्रसिद्धच आहेत. (१) अल्लाउद्दीन खिलजीचा ‘कलिजा’ मलिक काफूर हा मूळचा रजपूत; अल्लाउद्दीनांच्या राज्यवृद्धीची अर्धीअधिक कामगिरी यानेंच केली. (२) मुबारीक खिलजीचा हस्तक हसन, हा मूळचा गुजराथी, यानें आपल्या वीस हजार गुजराथी जातभाईंना मुसल्मानी धर्मांत खेंचून आणलें, इतिहासप्रसिद्ध मलीक खुस्रू म्हणतात तो हाच. (३) फिरोज तघलकचा वजीर मक्बुलखान हा मूळ तैलंगणांतल्या एका उच्च कुळांतला हिंदू. (४) गुजराथेंत मुसलमानी राज्याचा पाया घालणारा मुजफरखान हा मूळचा हिंदु, पण हिन्दुधर्माचा पक्का द्वेष्टा. त्यानें सोमनाथाच्या देवळाचे दगडमशिदीला लावले. (५) लोदी घराण्यांतील सुलतान शिकंदर मूळचा हिंदु. (६) अहंमदनगरची निजामशाही स्थापन करणारा निजामुल्मुल्क बहिरी व त्याचा मुलगा अहंमद निजामशहा हे दोघे बाप-लेक मूळचे अस्सल ब्राह्मण. यांचीं मूळीं नावें अनुक्रमें भैरव भटजी व तिमाप्पा भैरजी अशीं होतीं. (७) इमादशाहीचा संस्थापक फत्तेउल्ला इमादशहा हा मूळचा विजयनगरचा तैलंगी ब्राह्मण. (८) जहांगीरचा प्रख्यात सेनापति महाबतखान मूळचा हिंदू रजपूत; संगराजिताचा मुलगा. अशीं अनेक नांवें सांगतां येतील. याशिवाय हिन्दु स्त्रियांच्या पोटीं जन्माला आलेल्या अनेक थोर पुरुषांचीं नावें इतिहासात सापडतात. फार काय, पण दिल्लीच्या तक्तावर बसलेल्या बहुतेक बादशहांच्या माता मूळच्या अस्सल हिन्दूच होत्या. ग्यासुद्दीन तघ्लक, फिरोज तघ्लक, जहांगिर, शहाजहान, इस्माईल अदीलशहा या सर्व

अनुक्रमणिका

## लोकोत्तर पुरुषांच्या माता हिन्दूच

होत्या. हा सर्व इतिहास पाहिला म्हणजे असें म्हणणें भाग पडतें कीं हिन्दुस्थान मुसलमानांनीं पादाक्रांत केलें नसून, व्यवहारचतुर इस्लाम धर्माच्या चांद ताऱ्यानें हिंदूंकडूनच हिन्दूंना जिंकून आपलें साम्राज्य-वैभव वाढविलें. परधर्मी किंवा परधर्मांत गेलेल्या लोकांस शुद्ध करून परत हिन्दुधर्मांत आणण्याची योजना हिन्दुधर्मानें अशा प्रसंगी पुनरुज्जीवित न केल्यामुळे हिन्दु राष्ट्राचे किती अनिर्वचनीय नुकसान झालेलें आहे, याचा विचारी सज्ञनांनीं मुद्दाम विचार करावा, त्याप्रमाणें हे वरील लोक हिन्दु धर्मांत असतांना पराक्रमशून्य अशा अपसिद्ध स्थितींत कां पडले होते आणि ते नवीन इस्लाम धर्मांत जातांच त्यांना एवढा चेव येऊन त्यांनीं लोकोत्तर पराक्रम गाजवून मोठमोठ्या शाह्या कशा स्थापन केल्या?असें कां व्हावे?याचाहि आमचा सज्ञन वाचकांनी शांतपणे विचार करावा; म्हणजे हिंदुधर्माचीं अर्वाचीन व्यंगें काय काय आहेत आणि त्याचें मूळचें सर्वव्यापी, सर्वग्राही आणि उदार स्वरूप सध्यां कसें नष्ट झालें आहे, याचीं प्रमेयें त्यांचीं त्यांनाच उलगडलीं जातील मुसलमानांच्या राज्यवृद्धीचें काम बऱ्याच प्रमाणावर बाटलेल्या हिंदुनींच केले, याचा आतां पुनरुच्चार करायला नको. तथापि मुसलमानांना येथें भराभर जय मिळत गेला, त्यांच्या धर्माचा प्रसार उत्तरोत्तर अधिकाधिक होत गेला, याचा एतद्देशीय

## जनतेच्या मनावर चमत्कारीक परिणाम

झाला. पुष्कळ कर्तबगार हिंदूंस असें वाटूं लागलें कीं, मुसलमानी धर्मांतच अशी कांहींतरी विशेष अद्‌भूत जादू आहे, त्याशिवाय कालचा पाट्या वहाणारा शूद्र हिंदू आज एकदम तलवारबहाद्दर मुसलमान सुभेदार होईल कसा?आपला हिंदुधर्म हीन, कमजोर, नपुंसक म्हणूनच त्यातील लोकांच्या हातून मुसलमानांइतका पराक्रम होत नाहीं. या विलक्षण अज्ञानजन्य गैरसमजुतीचा परिणाम फार भयंकर झाला. हजारों हिंदुलोक आपण होऊन मुसलमानी धर्माच्या गोटांत गेले. नुसते आलतुफालतु लोक नव्हे, तर (१) बंगालचा राजा जितमल; (२) कालीकोटचा सामुरी;(३) केरळदेशचा राजा; (४) सिंधचे सुमेरवंशी जाम रजपूत; (५) बराणचा राजा हरदत्त आणि त्याचे दहाहजार अनुयायी; (६) काश्मीरच्या सेनदेव राजाची राणी (हिनें नवऱ्याचा खून करून सुलतान शम्सुद्दिनाशीं लग्न लावलें.) असलीं चांगलीं चांगलीं कर्तबगार मंडळीसुद्धा हिंदुधर्म सोडून गेली. हाय हाय! केवढा हा हिंदूंच्या संघशक्तीचा ऱ्हास!! खरोखरच का आमचा हिंदुधर्म इतका दुबळा आहे?ज्या धर्मानें श्रीकृष्णासारखा जगद्विख्यात मुत्सद्दी आणि धर्मप्रचारक सूर्य निर्माण केला, ज्या धर्मानें भीष्मासारखा अद्वितीय आणि अजिंक्य धर्मन्यायज्ञाता योद्धा इतिहासांत अजरामर केला; ज्या धर्मानें अभिमन्यूसारखे अनामिकेला सार्थवति करणारे तरुण जवानमर्द प्रसवून या भारतभूचें ऋण फेडलें; ज्या धर्मात कर्णासारख्या अकुलीन वीरानींहि कुलीनपणाची घमेंड मारणाऱ्यांना आपल्या पायावर डोकीं घासावयास लावलें; ज्या धर्मात धर्म, चंद्रगुप्त, अशोक यांसारखे महान् पराक्रमी सम्राट निर्माण झाले; ज्या हिंदुधर्माच्या नुसत्या अभिमानाच्या ठिणगीनें माधवाचार्यासारख्या विरक्ताच्या हातूनहि विजयनगरासारख्या अनुपमेय साम्राज्याची स्थापना झाली; ज्या हिंदुधर्मानें शिवाजी महाराज निर्माण करून आपला शिणभार उतरला आणि

## प्राण गेला तरी मुसलमान होणार नाहीं,

ह्मणून ठणठणीत रोकडा जबाब सत्ताधाऱ्यांच्या तोंडावर देणारा छत्रपति संभाजी ज्या हिन्दुधर्मानें इतिहासाला दाखविला; तो हिन्दुधर्म खरोखरच काय हो नपुंसक म्हणावा?नाहीं. हिन्दुधर्म नपुंसक नाहीं.

हिन्दुधर्म दुबळा नाहीं. हिन्दुधर्म तुसडा नाहीं. हिंदुधर्म[गीतेवर पुराणें सांगणारे व हल्लीं विलायतेस इंग्रजी तरुणींना नाच शिकवीत असलेले कान्हेरेशास्त्री एकदां ठाकुरद्वारीं पुराण सांगतांना मोठ्या घमेंडीनें म्हणाले, "आमचा हिन्दु धर्म किनैमोठ्ठा उर्मट! तो कोणाची पर्वा करीत नाहीं. तो आधीं कोणा परक्याला अपल्यांत येऊं देत नाहीं. पण कोणीं मूर्खपणानें उठून बाहेर गेला तर त्यालासुद्धां पुन्हा आंत घेत नाहीं!" वा:! गीतेची पारायणें करून करून शास्त्रीबुवांनी केवढें पण हें रहस्य शोधून काढले?अतां हिन्दुधर्म उर्मट कीं सास्त्रीबुवा उर्मट?कोणीं तरी एक उर्मट असला पाहिजे खास.]उर्मट नाहीं. पण त्याच्या कमनशिबानें तो ज्यांच्या हातीं सांपडला, त्यांच्या तुसडेपणानें उर्मटपणानें आणि कर्तव्यशून्यतेमुळेच तो गंजलेल्या शस्त्राप्रमाणें हतबल आणि बेकर्तबगार झाला. भलभलत्या सामाजिक गोष्टींचाहि धर्माच्या शुद्ध साम्राज्यात बळजबरीचा प्रवेश झाल्यामुळें, खोट्यानाट्या भोळसर धर्मकल्पनांनीं जनता अगदी बद्ध होऊन गेली. नानाप्रकारच्या कादंबरीवजा देवदेवतांचे महात्म्य वाढलें. शकुनापशकुनांचें स्तोम माजलें आणि असंख्य जातींच्या संकुचित कुंपणांत स्वतःचा सवता सुभा करून राहणें ह्मणजेच धर्म, असल्या राष्ट्रविनाशक भावनेमुळें हिन्दूंचा, त्यांच्या राष्ट्राचा आणि धर्माचा घात झाला. अल्पसंख्य मुसल्मानांनीं एवढ्या अवाढव्य हिन्दूंचीसंघशक्ती कशी जमीनदोस्त केली, याबद्दल स्टॅन्ले लेन्पूल म्हणतात, "हिंदूंच्या[व्हिन्सेन्ट ए. स्मिथ म्हणतात:– "Caste, which looked at broadly, unites all Hindus by differentiating them from the rest of mankind, disintegrates them by breaking them up into thousands of mutually exclusive and often hostile sections. It renders combined political or social action difficult, and in many cases impossible; while it shuts off all Hindus in large measure from sympathy with the numerous non Hindu population."]

*[Oxford—India, Intro.xi.]*

जातिभेदामुळें त्यांचा पाडाव झाला. मुसल्मानांकडे पाहिलें तर सर्वांचा उद्देश एक, आचार एक, यथेच्छ आचाराची पूर्ण मुभा, निरर्थक सामाजिक बंधनांची अडचण नाही, सर्वजण बंधुत्वाच्या भावनेनें 'मारीन किंवा मरेन' अशा दृढ निश्चयानें बाहेर पडलेले. अशा एकजुटीच्या लोकांपुढें आपसांत झगडणाऱ्या बेबंद लोकांचा निभाव कसा लागावा?रजपूत राजे व क्षत्रिय सरदार पिढीजात हाडवैरांनीं जखडलेले. मानापमानांच्या वेडगळ कल्पनांनीं, मागचा पुढचा विचार न पाहतां व ऐहिक स्वार्थावर नजर न देतां, वाटेल तसें वागणारे होते, त्यांच्या धर्माचा पाया जातीवर ह्मणजे जन्मावर व कुलावर रचलेला होता. **परकीयांस ते आपल्या धर्मांत घेत नाहींत, ह्मणून दुसऱ्यांस आपल्या धर्मांत ओढून आणतांना उत्पन्न होणारें तीव्र वारें हिंदूंच्या ठिकाणीं येणें शक्य नव्हतें**... क्षात्रधर्माच्या व इभ्रतीच्या बड्याबड्या गप्पांचा व कल्पनांचा निभाव प्रत्यक्ष व्यवहारांत लागत नसतो. जातिभेदानें कामाची वांटणी झाल्यामुळें क्षत्रिय आपल्या कामात कचरू लागले, तर त्यांच्या मदतीस इतर जाती येत नसत. राज्याच्या भानगडी करण्याचें काम केवळ क्षत्रियांचें आहे, असें ह्मणून ब्राह्मणादि इतर वर्ग स्वस्थ बसले.... मुसल्मानांचें ऐक्य, त्यांचा उत्साह व **प्रसंगानुसार वर्तन** या बाबतीत हिंदु लोकांहून ते श्रेष्ठ होते; आणि व्यक्तिविषयक शौर्य जरी हिंदूंच्या ठिकाणीं कमी नसलें, तरी हिंदूंचे जातिभेद, एकमेकांशीं झगडणाऱ्या निरनिराळ्या सरदारांचे अंतःकलह,**फूट पाडणाऱ्या वेडगळ धर्मसमजुती, परधर्मी लोकांस आपल्या धर्मात ओढून आणण्याची मनाई,**ह्या कारणांनीं हिंदुस्थानांत राष्ट्रीय अभिमान कसा तो उत्पन्न झालाच नाहीं. मुसल्मानाचे साहस, लष्करी पेशा, धर्मत्वेष व राज्यलोभ यामुळें हिंदूंस ते वरचढ झाले; आणि योग्य पुढारी मिळाल्याबरोबर त्यांचा उत्कर्ष होत गेला."[सरदेसाई, मु. रियांसत ३८८-८९.] राष्ट्रीय वैभव वाढविण्यासाठीं

## लोकसंग्रहाची आवश्यकता

किती असते, याचें प्रतिपादन—किंबहुना प्रत्यक्ष आचरण—हिंदुधर्मानें कधींकाळीं केलें असेल, नाहीं असें नाहीं; तथापि आमची श्रीमद् भगवग्दीता आज लोकसंग्रहाचा मंत्र गेलीं अडीच हजार वर्षे आमच्या कानीं कपाळीं ओरडून सांगत आहे, एवढें खास.परंतु गीतेच्या काळानंतर हा मंत्र हिन्दुधर्मानें प्रत्यक्ष आचरणांत आणल्याचें मात्र इतिहासांत नमूद नाहीं. लोकसंग्रह केला बुद्धधर्मीयांनीं व इस्लाम धर्मीयांनी. हिंदूंनीं मात्र नुसता त्याचा मंत्र जपण्यापलीकडे कांहीं एक केलें नाही. "**India offers unity in diversity**" भेदांतच

अनुक्रमणिका

अभेद, हा इतिहासकारांचाशेरा तत्वतः खोटा नाहीं खरा. तथापि ब्राम्हणी वर्चस्वामुळें धर्माला जें एक प्रकारचें द्वाड संकुचित वळण लागलें आणि व्यावहारिक तत्वावर उभारलेल्या वर्णव्यवस्थेचा असंख्य जातींत जो विचका झाला. त्यामुळें व्यवहारचातुर्य व लोकसंग्रह या दोन गोष्टींत हिन्दु लोक

**कायमचे नालायक ठरले.**

**अल्बेरुनी** नांवाच्या एका अत्यंन्त विद्वान् व निःपक्षपाती फिरस्त्यानें सन १०४० च्या सुमारास हिंदु लोकांबद्दल जें कांहीं लिहून ठेविले आहे तें आजला फार विचार करण्यासारखें आहे. अल्बेरुनी म्हणतो,"हिंदूंच्या स्वभावातील कित्येक ठळक गोष्टी उघडउघड दिसून येतात. मूर्खपणाला औषध नाहीं हेंच खरें. हिंदु लोकांना वाटतें, आपल्या राष्ट्रासारखें राष्ट्र नाहीं; आपल्या राजासारखे राजे नाहींत; आपल्या देशासारखा देश नाहीं; आपल्या धर्मासारखा धर्म नाहीं आणि आपल्या विद्येसारखी विद्या नाहीं. ते उद्दाम, गर्विष्ठ आणि मंद आहेत. आपली विद्या दुसऱ्यांस देण्यास ते अतिशय नाखुष असतात. परक्यांस तर काय, पण आपसांत सुद्दां एका जातीचा गृहस्थ आपली विद्या दुसऱ्या जातीस देत नाहीं. त्यांना वाटतें, सगळ्या पृथ्वीवर देश काय तो आपला एकच आहे, दुसरे देशच नाहींत; आणि आपल्या विद्या दुसऱ्या कोणास यावयाच्याहि नाहींत. मुसलमानांच्या देशांत एकादी विद्या आहे किंवा तिकडे कोणी विद्वान गृहस्थ आहेत असें सांगितलें तर, तें त्यांस खरें सुद्धां वाटत नाहीं. ते जर प्रवास वगैरे करून दुसऱ्या लोकांशीं मिसळतील तर त्यांचे अनेक मिथ्या ग्रह आपोआप दूर होतील. **त्यांचे पूर्वज कसेहि असले तरी दुराग्रही व संकुचित मनाचे नव्हते.** हिंदुस्थानात येऊन तेथील विद्या शिकून घेण्यास मला किती प्रयास पडले ते माझे मलाच ठाऊक! हिन्दूंच्या सर्व विद्यांचा आज भयंकर गोंधळ झालेला आहे. कशास कांहीं ठिकाण नाहीं. उत्कृष्ट विद्या अज्ञानी व मूर्ख लोकांच्या हातीं पडून त्यांचें मातेरें झाल्यामुळें चांगलें कोणतें व वाईट कोणतें याचा उलगडाच करतां येत नाहीं. उत्कृष्ठ रत्नें उकिरड्यात मिसळून जावीं, तशांतला प्रकार झालेला आहे." [सरदेसाई मु. रि. ३९७] हा सर्व प्रकार पूर्वी कोणाला जाणवला नव्हता, किंवा तो नाहींसा करण्याकरितां कांहीं प्रयत्नच झाले नाहींत, असें मुळींच नाहीं. हिन्दु धर्माचे कर्तबगार अभिमानी संत निष्काम वृत्तीनें लोकसंग्रहाच्या द्वारें धर्मसंरक्षणाचें थोडेफार काम हिन्दुस्थानांत ठिकठिकाणी करीतच होते; आणि आजला जर हिन्दुधर्म कांहीं बऱ्यावाईट स्थितींत जगला असेल तर त्यांचें सारें श्रेय या संतांना दिलें पाहिजे. या संतांनी परिस्थित्यनुरूप आपापल्या प्रांतांत निरनिराळे धर्मपंथ स्थापून भूतदया, विश्वबंधुत्व व धर्मप्रेम या गोष्टी आपल्या प्रत्यक्ष वर्तनानें जिवंत ठेवण्याची मोठी स्पृहणीय कामगिरी बजाविली आहे. विशेषतः आमच्या महाराष्ट्रांतील पंढरपूरच्या विठ्ठल बादशाहीच्या साम्राज्य छत्राखालीं नानाविध जातींच्या संतांनीं

**वैष्णव धर्माचा झेंडा**

उभारून जगाला हिन्दुधर्माचें शुद्ध उदार स्वरूप पुनश्च झगझगित दाखविण्याची जी अनिर्वचनीय अशी बिनमोल कामगिरी केली आहे, तिचें वर्णन केवळ शाब्दिकांनीं करण्याचा डौल मिरविणें हास्यास्पद आहे. या संतसंघाचे अध्वर्यू तुकाराम महाराज यांचा खालील जाहीरनामाच या संतांच्या कामगिरीची साक्ष पटवील.

**कांस घालोनी बळकट । झालों कळिकाळासी नीट । केली पायवाट । भवसिंधू वरुनी ॥ यारे यारे लहान थोर । याति भलते नारिनर । करावा विचार । नलगे चिंता कोणासां । .... एकंदर शिका । पाठविला**

अनुक्रमणिका

**इहलोका । आलों म्हणे तुका । मी नामाचा धारक ॥** तथापि या संतांची ही कामगिरी सुद्धां जवळजवळ एकदेशीच झाली, असें म्हणायला हरकत नाहीं. परधर्मीयांनीं लाथांखालीं तुडविलेला हिन्दुधर्माचा पलीता या सज्जनांनीं झटदिशीं उचलून, त्यावर आपल्या भक्तीच्या स्नेहाचा पूर ओतून, त्याला पुनश्च प्रज्वलित कलें ही गोष्ट खरी; परंतु नसत्या धर्मप्रेमानें कांहीं जगाचा संसार चालत नाहीं. ज्या व्यावहारीक ज्ञानाच्या अभावामुळेच हिन्दुंना आपलें हिन्दुत्व व सर्वस्व गमाविण्याचा प्रसंग आला, तो डाग धुवून टाकून

## हिन्दुधर्माची व्यावहारीक कर्तबगारी

ठसठशीत सिद्ध करून दाखविण्याकरिता, धर्म आणि व्यवहार यांची बिनतोड सांगड घालून देणारे कट्टे कर्मयोगी समर्थ रामदास हे पुढें सरसावले. यांच्या उपदेशाची व विचारांची दिशा अर्थातच इतर संतांहून भिन्न होती. सर्व समाजांस एकीच्या बंधनांनी निगडीत करून, त्यांजकडून धर्मप्रसाराबरोबरच राष्ट्रकार्य करावें, हा समर्थांच्या उद्योगाचा मूळ पाया होय. सर्व कृत्ये श्रीरामाच्या नावांने करावी, राम सर्वांचे कल्याण करील, रामनामात विलक्षण शक्ति आहे, आणि

## दृढनिश्चय हाच परमेश्वर

या समर्थांच्या शिकवणीचा आमचे तरुण 'एज्यूकेटेड' महत्वाकांक्षी देशबांधव गूढार्थ उकलण्याचा यत्न करोत! कै. जस्टिस रानडे म्हणतात, "जसे गीता-रहस्य एका श्लोकांत सांगीतले आहे, तसाच समर्थांचा उपदेश अर्ध्या ओवीत सांठविलेला आहे. ती अर्धी ओवी ही—

**मराठा तितुका मेळवावा । महाराष्ट्र धर्म वाढवावा!!"**

दहाव्या शतकापासून तों सतराव्या शतकापर्यंत झालेली हिन्दुधर्माची पायमल्ली व हिन्दूंच्या संघशक्तिचा ऱ्हास समर्थांना स्पष्ट दिसत होता. ब्राह्मणी मनोवृत्तीने धर्माच्या नाड्या कशा आखडून टाकल्या, हेंही त्यांना कळलेंले होतें, आणित्यांनी ब्राह्मणांचे कान उपटायलाही कमी केले नाही.

**राज्य नेलें म्लेंच्छक्षेत्रीं । गुरुत्व नेलें कुपात्रीं॥**
**आपण अरत्रीं ना परत्रीं । कांहीच नाही॥**
**ब्राह्मणांस ग्रामण्याने बुडविलें । विष्णूने श्रीवत्स मिरविलें॥**
**त्याच विष्णूने शापिलें । परशुरामा॥**
**आह्मींहि तेचि ब्राह्मण । दुःखे बोलिलों हें वचन॥**
**वडील गेलें ग्रामणी करून । आम्हां भोवतें॥**
**आतांच्या ब्राह्मणी काय केलें । अन्न मिळेल ऐसे खाल्लें॥**
**तुम्हा बहुतांचे प्रचीतीस आलें । किंवा नाही॥**

महाराष्ट्र धर्म वाढवा, महाराष्ट्र धर्माचा घेरा साऱ्या हिंदुस्थानात पाडा, महाराष्ट्र धर्म महाराष्ट्रातच डांबून ठेवतां त्याचा सर्वत्र प्रसार करा, असा नुसता कोरडा उपदेश करूनच समर्थ स्वस्थ बसले नाहींत, तर भगवंताचें भक्तीसाठी थोर आटाआटी करण्यासाठी त्यांनी आपले एक

## रामदासी सांप्रदायिक मिशन

प्रत्यक्ष काम करण्यासाठी निर्माण केले. या 'मिशनचा मेसेज' आसेतु हिमाचल वातावरणांत थरथराट करू लागतांच श्रीमच्छत्रपति शिवाजी महाराज ही पुण्यश्लोक मूर्ति'धर्म संस्थापनेची कीर्ती' संभाळण्यासाठी आपली भवानी परजीत पुढें आली आणि समर्थ व शिवाजी या त्रैलोक्यवंद्य गुरुशिष्यांच्या जोडीने 'कित्येक दुष्ट संहारिले, कित्येकांस धाक सुटले, कित्येकांस आश्रय झांले'. इतकेच नव्हे, तर त्यांनी 'देव मस्तकी' धरून अवघा हल्लकल्लोळ केला, आणि 'धर्मसंस्थापनेसाठी मुलूख बडवा' अतोनात वाढविला. समर्थांचे पट्टशिष्य श्रीशिवाजी महाराज यांच्या हिन्दुधर्माबद्दलच्या कल्पना किती उदात्त आणि व्यापक होत्या, याचें प्रत्यंतर

## बजाजी निंबाळकरांची शुद्धि

या एकच इतिहासप्रसिद्ध प्रसंगाने दाखविलें. सन १६४४ त शिरवळच्या लढाईत बजाजी निंबाळकर यांस विजापूरकरांनी कैद करून नेले. बजाजी म्हणजे त्या काळच्या मराठ्यांतील एक जाडें प्रस्थ होतें. असला मोहरा ठार मारण्याचा अदीलशहाचा हेतू माने, घाटगे वगैरे सरदारांनी मोठ्या शिकस्तीनें टाळला.तेव्हा शहानें [या ठिकाणीं वाचकांना स्मरतच असेल कीं हा अदीलशहा खुद्द मूळचा हिन्दूच होता. तेव्हां धर्मांतर करून गेलेल्या बाट्यांना आपल्या पूर्वाश्रमींच्या जातभाईंना आपल्याचप्रमाणे बटवून घेण्यांत किती चेव येतो, हे यावरून नीट समजेल.]अट घातली कीं, 'बजाजी मुसलमान होईल तर त्यास सोडून देऊन शिवाय मोठी जहागीरहि देतों. 'बजाजीच्या अस्सल हिन्दू रक्तानें आतल्या आंत निषेधाचा मोठा चरफडाट केला; पण उपयोग काय?गेलीं चारशे वर्षे वाडवडिलांनी भोगलेली जहागीर जप्त झाली आणि निंबाळकर घराण्याचाही उच्छेद होण्याचा प्रसंग आला. शेवटी देशकालाकडें लक्ष देऊन आपद्धर्म म्हणून

## जीवावरचें शेंपटावर

घालविण्यासाठींच बजाजीनें मुसल्मानी धर्म स्वीकारला. शहाने आपली मुलगी देऊन त्याला जांवई केलें आणि पूर्वीची वाडवडिलार्जित व आणखी नवीन जहागीर देऊन बजाजीखानाचा इतमाम वाढविला. निंबाळकरादि मराठे सरदार हें त्या वेळी अदिलशाहीचें आधारस्तंभच होतें. भोसल्यांच्या घराण्याशी निंबाळकरांचा ऋणानुबंध विशेष.तेव्हां निंबाळकराला मराठेसंबंधातून फोडून नातेवाईक मुसल्मान बनविल्यास आपली शक्ति वाढेल आणि शिवाजीला निंबाळकरांचीमदत न झाल्यामुळे त्याची साहसें अर्थातच लंगडी पडतील, हा धोरणी विचार अदीलशहाने केला. एकादा मनुष्य मग तो कितीहि महत्त्वाचा असो-परधर्मांत गेला तर त्यांत काय झालें?काय आंजपर्यंत हजारों लाखों हिन्दूलोक मुसलमान किंवा क्रिस्ती झाले नाहीत?हें असें व्हायचेंच. मग एकटा बजाजी निंबाळकर मुसल्मान बनला तर त्यांत हिंदूंना इतकें ऊर बडविण्याचें कारण काय?दररोज हजारों आपद्ग्रस्त अज्ञानी हिन्दुबांधव व भगिनी क्रिस्ती धर्मांत जात असलेल्या पाहूनहि जर सध्यांच्या विसाव्या शतकांतल्या बृहस्पतींच्या अंतःकरणास किंचितसुद्धां तिडीक येत नाहीं, तर 'मुसल्मान होणें हींच भाग्योदयाचीं लक्षणें' अशी प्रवृत्ति बोकाळलेल्या सत्राव्या शतकांतल्या हिन्दूंनी काय म्हणून हळहळावे?गेलास तर जा, काळें तोंड कर, असा धिक्कार करण्याची हिन्दुधर्माची उर्मट प्रवृत्ति सर्वत्र प्रचलित होती. आजलाहि तीच स्थिति आहे. परंतु मराठा बजाजी निंबाळकर मुसलमान बजाजीखान झालेला पाहून

अनुक्रमणिका

## शिवाजीच्या हृदयाला पीळ पडले

सत्राव्या शतकांत स्वराज्यस्थापनेचा उपक्रम करणाऱ्या शिवाजीला लोकसंग्रहाची जाणीव जितकी भासत होती, तितकी विसाव्या शतकांत स्वराज्याच्या टिमक्या पिटणाऱ्या आणि लोकशिक्षणाची घमेंड मारणाऱ्या बोलघेवड्या नामधारी दे. भ. स. भासत असलेली खास दिसत नाहीं. निंबाळकरांचा आणि भोसल्यांचा पिढीजात संबंध. निंबाळकरामुळेंच भोसले उदयास आले. शिवाय बजाजीसारखे कर्तृत्ववान् तलवारबहाद्दर 'वैरियाकडे मिळोन जाती' या परिस्थितीच्या वेदना शिवाजीसारख्या लोकसंग्रही धोरणी पुरुषास कशा जाचीत असतील, याची जाणीव

## जावें त्याच्या वंशा तेव्हां कळे!

एवढा मोठा बलिष्ठ सरदार मराठामंडळांतून फुटून आपल्या वैऱ्याच्या संघांत जाऊन पडल्यामुळे शिवाजीच्या नूतन साहसांत मोठेच विघ्न उपस्थित झालें. खुद्द बजाजीलाहि तें धर्मांतर वाटेना; आणि आपद्धर्म म्हणून केलेले धर्मांतर कोणाला पश्चात्तापाच्या होळींत होरपळून काढल्याशिवाय रहात असेल? आजलाहि असे तळमळणारे असंख्य जीव साऱ्या हिंदुस्थानभर पसरलेले आहेत; परंतु त्यांच्या अंतःकरणाच्या किंकाळ्या ऐकणारा शिवाजी आणि दुःखाचें मूळ नाहीशी करणारी जिजाबाई आज कोठें आहे?सन १६५७ त बजाजी विजापुराहून स्वदेशीं परत आला, आणि त्यानें जिजाबाईची भेट घेऊन सर्व वृत्त निवेदन केले. हिन्दुधर्मप्रतिपालक शिवाजी सचिंत मुद्रेने उभा आहे. शेजारींच पश्चात्तापाने होरपळलेला बजाजी खाली मान घालून खिन्न उभा आहे आणि समोरच हिन्दूधर्माच्या भवितव्यतेचा अखेरचा निर्णय देणारी

## न्यायदेवता माता जिजाबाई

आपल्या प्रेमळ नेत्रांनी त्या दोघांकडे पहात स्वस्थ बसल्या आहेत. आजपर्यंत या मायलेकांनी हिन्दुधर्मसंरक्षणाचे निश्चय ठरविले; आज हिंदुधर्माच्या भवितव्यतेचा कायमचा निर्णयलावण्याचा प्रसंग आला. मोठी कसोटीची वेळ आली. आज न्यायदेवतेच्या तोंडून लागणारा निकाल गेल्या शेकडों वर्षांच्या रुढीचा उलटसुलट कांहींतरी सोक्षमोक्ष लावणार. हिन्दुधर्म

## जगावा कीं मरावा?

या बिकट प्रश्नाचा निर्णय आज माता जिजाई लावणार. आज या न्यायदेवतेचा न्याय हिन्दुधर्माला एकदम फासांवर तरी लटकावणार किंवा मोठ्या सन्मानाने त्याला जगांतील अत्युच्च सिंहासनावर तरी बसविणार! आज गेली शेंकडों वर्षे ज्या गोष्टीचा निर्णय लावण्याची बुद्धी स्वतःस धर्मसंरक्षक समजणाऱ्या ब्राह्मणांना झाली नाहीं, त्याच गोष्टीचा अखेर-निकाल आज ही क्षत्रिय न्यायदेवता लावणार!! हिन्दुधर्माच्या जीवन चरित्रांत आजच्यासारखा प्रसंग आजच आला. न्यायदेवतेचा न्याय ऐकण्यासाठी आंज. चराचरांनींहि मौन धारण केलें. वातावरणांतल्या लहरी मंदमंद लपतछपत वाहूं लागल्या. सारें हिन्दुस्थान आपला श्वास थांबवून न्याय ऐकण्यासाठी क्षणभर हातचे उद्योग खाली ठेऊन उत्सुक होऊन बसले. अगम्यस्थलनिवासी हिन्दुधर्माभिमानी महात्मे आपापल्या गिरिकंदरांतील गुहांचा त्याग करून सूक्ष्मरूपाने न्यायमंदिरांत येऊन

दाखल झाले. उपनिषत्कार ऋषि महामुनी, भारतकार व्यास, जगद्‌गुरु श्रीकृष्ण भगवान् हेहि या हिंदुधर्माच्या

**डे ऑफ जजमेंट–**

चा ऐतिहासिक प्रसंग पहाण्याकरितां गुपचुप तेथें येऊन बसले. न्यायदानाच्या गंभीर व शांत कार्यात व्यत्यय येईल म्हणून देहूस तुकोबा आपल्या अखंड भजनाचा टाळ बंद ठेवून हरिनामसंकीर्तनाचा अभंग छंदसुद्धा भंग करून क्षणभर स्वस्थ बसले. माझ्या महाराष्ट्रधर्माच्या भवितव्यतेच्या आजच्या निकालावरच माझ्या भवितव्येयाचा सोक्षमोक्ष होणार. म्हणून व्यग्रांतःकरणानें समर्थ रामदासस्वामी, कल्याण शिष्यास दासबोधाची पोथी गुंडाळून ठेवण्यास सांगून, आपण चाफळाच्या एका अज्ञात खोऱ्यांत कुबडीला टेंकून स्वस्थ बसले. नित्याप्रमाणें भरजरी बादशाही पोषाख करून घोड्यावरचा फेरफटका करणारे रंगनाथ स्वामीसुद्धा आज निकालाची वाट पहात स्वस्थ बसले. माहुलीचे नारायणबुवा, वडगांवचे जयरामस्वामी, चिंचवडचे मोरयादेव, झाडून साऱ्या संतांनीं आज हरिनामसंकीर्तनास फांटा दिला आणि सर्वभूतमात्र जिजाई न्यायदेवतेचा न्याय ऐकण्यास उत्सुक झाले. केवढा हा जिजाबाईचा अधिकार आणि केवढें त्याचे हें महात्म्य! हिंदवी स्वराज्याच्या संस्थापकाची माता म्हणून जिजाबाईची त्रैलोक्यात होणारी पूजा अर्चा, त्या हिन्दुधर्माच्या भवितव्यतेचा अखेर–निकाल देणाऱ्या न्यायदेवता म्हणून होणाऱ्या त्यांच्या महात्म्याच्या तेजापुढें काय होय?प्रत्यक्ष प्राणाची तमा न धरता किंवा विजापूरकरांच्या दांडग्या लष्करी बंदोबस्ताचीहि क्षिती न बाळगितां भराभर गडकोटकिल्ले काबीज करण्यात निरढावलेल्या शिवाजीची स्थिति या वेळीं

**इकडे आड तिकडे विहीर**

अशी झालेली होती. आतांपर्यंत लोकरंजनाच्या बळावरच लोकसंग्रह करण्यांत यशस्वा ठरलेल्या शिवाजीला, लोकमताच्या विरोधाला न डगमगतां ध्येयाच्या सात्विक शुद्ध तेजावरच लोकसंग्रहाचें कार्य पुढे चालविण्याचा मार्ग उमगेना. ‘आधी केलें आणि मग सांगितलें’ या समर्थोपदेशाचें तेज शिवाजीला रात्रंदिवस जाणवत होतें. सांप्रतच्या मनूंतील बोलघेवड्या राष्ट्राळू, पुढाऱ्यांप्रमाणें नुसत्या उदात्त तत्वांच्या लेक्चरें पुराणांनीं शिवाजीचें कर्तव्य पूर्ण होणारें नव्हतें. न्यायदेवतेचा न्याय प्रथम आपल्या प्रत्यक्ष आचरणांत आणण्याची जाणीव त्याला होतीं; म्हणून तोहि किंचित् व्यग्र मनःस्थितीचा अनुभव घेत होता. इतक्यांत ‘शिवबा!’ म्हणून मातेनें हांक मारली. ‘जी’ म्हणून हात जोडून शिवाजी पुढें होणार, तोंच जिजाबाई म्हणाल्या “शिवबा, यात तूं इतका गोंधळून कां गेलास?बजाजी निंबाळकरांनीं आपद्धर्म म्हणून परधर्माचा स्वीकार केला, यांत त्याचा दोष काय?आज त्यांना पश्चाताप होऊन ते परत आले आहेत. पश्चात्तापासारखी दुसरी शुद्ध नाहीं व प्रायश्चित्तहि[मनाची उपरति हाच खरा प्रायश्चित्तविधी होय, जोधपूरच्या राणा अजितसिंगाची मुलगी फर्रुखसेयर बादशहास दिली होती. त्याचा खून झाल्यावर ती बापाच्या घरीं परत आली बापाने तिला विचारले कीं, “मुली, तुला बादशहानें कसें मुसलमान करून घेतलें?” ती म्हणाली “मला जनानखान्यांत नेऊन मुसलमानी बायकांचे कपडे नेसण्यास दिले व बादशहानें कुराणांतील एक वाक्य मजकडून बोलवून घेतलें.” राणा म्हणाला “एवढेंच ना: ठीक तर. हा घे आपला रजपुती पेहराव आणि मी गीतेतले एक वाक्य सांगतो ते तूं म्हण; म्हणजे तूं पुन्हा हिंदु होशील.” त्याप्रमाणे त्यानें करून तिला परत रजपूत करून घेतलें.] नाहीं. आपल्या सिंगणापूरच्या श्री. शंभू महादेवापुढें बाजाजींना लौकिकी प्रायश्चित्त देऊन खुशाल

अनुक्रमणिका

**हिन्दुधर्मांत परत घेण्याची व्यवस्था**

करा." न्यायदेवतेचा हा निकाल ऐकतांच साऱ्या हिंदुस्थानानें एकच टाळी पिटली. श्रीकृष्ण भगवंतानीं आपला दिव्य पाचजन्य फुंकला. रामदास स्वामी 'जयजय रघुवीर समर्थ' अशी भीमगर्जना करीत चाफळच्या दरींतून बाहेर पडले. देहूस तुकोबारायांनीं 'पुंडलीकवरदा हऽऽरी विठ्ठल' हा जयघोष केला व ते खांद्यावर वीणा घेऊन टाळांच्या गजरात

**येग येग विठाबाई**
**माझे पंढरीचे आई**

या अभंगाच्या रंगांत मोठ्या आवेशानें नाचूं उडूं लागले. सर्व मंडळींनीं हरिनामसंकीर्तनाचा एकच हलकल्लोळ केला आणि

**हिन्दुधर्मांची विजयध्वजा**

उच्च फडकली. सर्व मराठामंडळानें बजाजीला विधिपूर्वक परत गोतांत घेतलें. तिकेंच नव्हे तर लोकमताला प्रत्यक्ष उदाहरण घालून देण्यासाठीं व वाणीप्रमाणेंच करणी करण्यात शिवाजीपाठीमागें पुढें पाहणारा नाहीं हें सिद्ध करण्यासाठीं, शिवाजीनें आपली मुलगी सखूबाई बजाजीचा मुलगा महादेव निंबाळकर यांस दिली; आणि लग्नविधीच्या सोहोळ्यांत मोठ्या थाटामाटानें बजाजी व शिवाजी हे

**व्याही व्याही एका ताटात जेवले.**

यावरून अडीचसें वर्षांपूर्वी आमचा हिंदुसमाज आजच्या इतका अनुदार खास नव्हता हें दिसून येतें. धर्मांतर केल्यानें राष्ट्राचें नुकसान होतें, त्याची संघशक्ति लंजूर होते. आपत्प्रसंगीं परधर्मस्वीकार करणारास स्वधर्मांत परत घेण्यास हरकत नाहीं, हें सतराव्या शतकातल्या जिजाबाईला चांगलें कळत होते; पण २० व्या शतकांतल्या गिरजाबाईला पटेल बिल पाहतांच भडाभड वांत्या होतात, हें आश्चर्य नव्हे काय?शिवाजीनंतर हिन्दुधर्माचें भाग्य पुनः उतरणीला लागलें. छत्रपतींचा कारभार पाहणाऱ्या पेशव्याच्या अंमदानींत हिंदूधर्माच्या कांहींहि आकांक्षा पूर्ण झाल्या नाहींत. उलट प्राचीन ब्राह्मणी मताची तात मात्र त्याच्या नरड्याला पुनः लागली, चिमाजी आप्पानें वसई सर करून साष्टी प्रांतातल्या पोर्च्यूगीज क्रिस्त्याच्या राक्षसी अत्याचाराला कांहीं आळा घातल्याचा प्रसंग बाद केला, तर हिन्दुधर्मासाठीं पेशव्यानीं काडीचीहि तसदी घेतली नाहीं, असें फार फार दुःखानें नमूद करणे भाग पडतें.उलट, पूर्वी मुसल्मानांनीं हिन्दूंचा जसा छळ केला, त्याचीच पुनरावृत्ति हिन्दु पेशव्यानीं आपल्याच धर्मबाधवांवर करून आपल्या नावाला अक्षय काळोखी लावून ठेवली.

**पेशवाई झाली हीच मोठी घोडचूक**

झाली, असें जे मुमुक्षुकर्ते पांगारकर व इतर निःस्पृह इतिहासकार म्हणतात तें सर्व दृष्टींनीं विचार केल्यास वाजवी नाहीं असे कोण म्हणेल?इस्लाम धर्माच्या गंडांतरापूर्वी कित्येक वर्षे क्रिस्ती धर्माचा विंचू हिन्दुधर्माच्या पायाला डसलेला आहे.त्याचें साग्र विवेचन करायला आणि क्रिस्ती मिशनऱ्यांच्या अमानुष

अत्याचाराचा परिस्फोट करायला आणखी एक स्वतंत्र पुस्तक लिहिणेंच भाग आहे. भगवान श्रीकृष्णानें हात धरला तर ही गोष्ट आमच्यासारख्या दुबळ्याच्या हातून पार पडेल. सध्या हिन्दूंच्या पुढें एवढाच प्रश्न आहे कीं तुम्ही

**हिन्दुधर्म तारणार कीं मारणार?**

हिन्दुधर्माला जगायचें असेल तर त्याला आतां मिशनरी बनल्याशिवाय तरणोपायच नाहीं आज हिन्दूंच्या उपनिषदांचा सर्व जगभर प्रसार झाला आहे. तुमची भगवद्‌गीता आज फ्रेंच, जर्मन, इटालीयन, रशियन वगैरे सर्व भाषांत भाषांतर होऊन, भगवान् श्रीकृष्णाच्या अध्यात्म-मुरलीच्या हृदयवेधी मंजुळ ध्वनीनें जगांतील सर्व राष्ट्रांतल्या प्राचीन आर्यांच्या अर्वाचीन वंशजांना मनानें हिन्दु बनवीत आहे. अशा प्रसंगीं कोणीं नको म्हटले तरी

**हिन्दुधर्म हा जगाचा धर्म**

झाल्याशिवाय रहात नाहीं.संकराची फुसकी भीती संकरोत्पन्न खुशाल घालोत. भ्रष्टाचाराची काळजी भ्रष्ट खुशाल वाहोत. आत्महत्येच्या धमक्या देणारे शंकराचार्य खुशाल एखाद्या नदीनाल्यांत जलसमाधी घेवोत. सवंग लोकप्रियतेसाठी धडधडणारे पत्रकार खुशाल या बोटावरली थुंकी त्या बोटांवर नाचवीत बसोत. हिन्दुधर्म साऱ्या जगाचा धर्म होणार, ही

**नवविचाराची ठिणगी**

आपला पराक्रम गाजविल्याशिवाय राहणार नाहीं. नव्या मन्वंतराचा हा संदेश कालेंकरून पृथ्वीच्या दक्षिणोत्तर ध्रुवांतून सर्वत्र दणदणाट करील. आज हिन्दुधर्म आपल्या तारणासाठीं सर्व हिन्दूंची मोठ्या काकुळतीनें करूणा भाकीत आहे. त्याच्या नवीन मिशनरी अवतारांत त्याला अनेक विरोधांस तोंड द्यावे लागेल, याची सर्व हिन्दुधर्माभिमान्यांनीं जाणीव ठेवावी. अनेक दिव्यांतून पार पडत पडत आज हिन्दुधर्म नवीन धोरणावर जगण्याचा यत्न करीत आहे. अशा आणीबाणीच्या प्रसंगी, हिन्दुदेशबांधवांनो,

**उत्तिष्ठत जाग्रत प्राप्य वरान्निबोधत**

इतकी कळकळीची विनंति करून आणि विवेचनाच्या भरांत उणाअधिक शब्द गेला असल्यास त्याबद्दल सर्व प्रकारच्या सर्व धर्माच्या वाचकांची अत्यंत नम्रतापूर्वक क्षमा मागून, आम्ही आतां दिवाळीच्या मंगलस्नानाच्या व्यवस्थेला लागतों.

**ईश्वर करो आणि हिन्दुधर्माचें साम्राज्य**
**साऱ्या जगभर पसरून हिन्दु**
**दिवाळीचा दीपोत्सव**
**एकसमयावच्छेदें करून**
**सर्व राष्ट्रांत साजरा होण्याचा**
**मंगल दिवस लवकर येवो!!!**

अनुक्रमणिका

या पुस्तकाच्या द्वितीयावृत्तीला पुरवणी
म्हणून नवीन लिहिलेला

# संस्कृतीचा संग्राम.

लेखक
**केशव सीताराम ठाकरे.**

अनुक्रमणिका

# संस्कृतीचा संग्राम.

**हिं**दु आणि मुसलमान! हिन्दु धर्माच्या दिव्याचें चित्र देशबांधवांपुढें ठेवितांना या प्रश्नाला जितकें महत्व होतें त्यापेक्षां सहस्रपट महत्व आज त्याला आलेलें आहे. हिंदु कोण आणि मुसलमान कोण, याची स्पष्ट परिस्फुटता मूळ ग्रंथांत केलेलीच आहे. आज या दोन भिन्न भिन्न दिसणाऱ्या समाजांत विरोधाची जी तीव्रता दिसत आहे, तिची उत्पत्ति हिंदूंच्या नादानपणांतून झालेली आहे. अभेदांतून भेद निर्माण झाला आणि अखेर तो दोनहि भेदांच्या समूळ ऱ्हासाला कारण होऊन बसला, असा हा चालू घडीचा मामला आहे. महायुद्धामुळें सर्व जगांत उत्पन्न झालेल्या नवचैतन्यानें हिंदूंशिवाय जगांतील सर्व समाजांच्या मनगटांतल्या नसा टरारून तट्ट फुरफुरल्या आहेत. तत्त्ववेत्तेपणाची सुकी घमेंड मारणारा बोलभांड हिंदु तोंडाची नुसती टकळी करीत बसला आहे, तर व्यवहारदक्ष इतर सर्व राष्ट्रे व समाज मनगटाच्या जोरावर आपापल्या सर्वांगीण भाग्योदयाचा मार्ग निष्कंटक चोंखाळण्यासाठीं शक्तियुक्तीची पराकाष्ठा करीत आहेत. सारांश, काव्यकल्पनांत मग्न राहून, वेदांताचा फाजील गर्व वहाणारा हिंदु समाज एकीकडे आणि लाथ मारूं तेथें पाणी काढूं अशा आत्मविश्वासानें फुरफुरलेली व्यवहारकुशल सारी दुनिया एकीकडे, असा आजचा प्रसंग आहे. पूर्वी हिंदूंनीं राज्यें केलीं, जगाच्या बऱ्याचशा उपलब्ध भागांवर साम्राज्यसत्ता आणि धर्मसत्ता गाजविली, आणि वातावरणाच्या अणुरेणूंतून अझूनहि पडसाद देणाऱ्या मोठमोठ्या लढाया मारल्या. परंतु त्या सर्व हिदुस्थान द्वीपकल्पाच्या सरहद्दीच्या आंतच. आंत घुसलेल्या गनिमांशीं प्राणान्तीची टक्कर देण्यांत हिंदु वीरांनीं आपल्या वीरश्रीची न भूतो न भविष्यति अशी कमाल केली खरी; पण डच, फ्रेंच, इंग्रजाप्रमाणें परदेशांत बळेंच घुसून, टांचेखालीं सांपडणारा जमिनीचा प्रत्येक तुकडा आमचा, अशी जेतृत्वाची धमक मात्र हिंदूंनीं ऋग्वेदोत्तर काळीं कधींच दाखविली नाहीं. वेदान्ती हिंदु या शेळपटपणाचें मंडन कसेंहि करो; सर्व दोषांवर पांघरूण घालण्याची कला हिन्दूंच्या वेदान्तशास्त्राला चांगली अवगत आहे. एखाद्या जबरदस्तानें दोन सणसणीत श्रीमुखांत भडकवाव्या आणि या कमकुवत वेदान्त्यानें त्या निमूटपणें सहन करुन, 'हा सत्याचा जय झाला!' म्हणून फिदिफिदी दांत काढून हंसावें, ही तर आमच्या तत्त्वज्ञानाची हिंदु कसोटी! अर्थात् जगांतल्या धकाधकीच्या मामल्यांत असला स्थितप्रज्ञ समाज साऱ्या जबरदस्त जगाच्या प्रत्येक सुस्काऱ्याला लेंड्या गाळूं लागला, तर त्यांत काय नवल?जगज्जेतृत्वाची धमक म्हणजे महत्वाकांक्षी राष्ट्राची प्राणज्योत. ही प्राणज्योत ऋग्वेदकालीन आर्यांच्या हृदयांत महत्तेजानें तेवत होती, म्हणूनच ते हिंदुस्थानालापादाक्रांत करूं शकले. ही ज्योत पुढें मिणमिण करतां करतां बुद्धोत्तरकालीं साफ विझली. आणि आजच्याआर्यवंशज हिंदूंच्या हृदयांत महत्त्वाकांक्षेची फुटकी पणतीहि आढळत नसल्यामुळें, सर्वत्र अमावास्येचा थैथयाट बोकाळला आहे. जगज्जेतृत्त्वाच्या धमकीचा पलिता विझतांच, लोकसंग्रहाचा बाणा आंधळा झाला. सर्वत्र अंधार पडल्यामुळें कर्तबगारीची दौड स्वार्थाच्या टीचभर कुंपणांतच गिरक्या मारूं लागली. सरहद्दी पलीकडच्या अफाट जगावर हरदिन हरघडी टौकारून पाहाणाऱ्या गरुडनेत्राची उघडझांप पिलपिल करूं लागतांच, राजकीय आकांक्षेनें आकुंचितपणाची बुरख्याची ओढणी घेतली; आणि राजकारणी वचकाची मांड ढिली पडतांच हिंदूंच्या अस्तित्वाच्या नरड्याला नख देण्यासाठीं साऱ्या जगानें आपापलीं नखें पाजळून सज्ज केलीं. हिंदुस्थानाचें चहूंबाजूंनीं संरक्षण करण्याची निसर्गानें आपल्याकडून शक्य तितकी मजबूत तटबंदी केलेली असतांहि, उत्तर सरहद्दीवरच्या एका बारीकशा खैबर बिळांतून परदेशी उंदरांच्या टोळ्यांनीं भराभर आंत घुसून, स्थानिक हिन्दु मांजरांच्या गळ्यांत घंटा बांधाव्या, हा विलक्षण चमत्कार विचार करण्यासारखा आहे. हिंदुस्थानच्या नैसर्गिक सरहद्दीपेक्षांहि, पुराणोक्त चातुर्वर्ण्यानें हिंदु समाजाची घडी परीटघडीपेक्षांहि फार सुरेख इस्तरींत चापून चोंपून बसविली, असलीं वाचाळ-पंचविशीचीं पुराणें झोडणाऱ्या भोंदू पंडितांनीं तर हिंदूंचा प्रचलीत अधःपात आणि त्यांची सर्वांगीण गुलामगिरी अवश्य विचारांत घेतली पाहिजे.

हिंदु आणि मुसलमान या बिकट प्रश्नाची उत्पत्ति हिंदूंच्या मूर्खपणांतून कशी झालेली आहे, याचें विस्तृत सोपपत्तिक विवेचन मूळ ग्रंथांत आलेलेंच आहे. प्राचीन लोकसंग्रही बाण्याला हिंदु जर बेमान झाले नसते, तर आज हा प्रश्नच उद्भवला नसतां, हें त्यावरून स्पष्ट ध्यानीं येईल. इंग्रजांचे नोकरशाही राज्य या देशांत होईपर्यंत हिंदु मुसलमानांच्या बाह्य चुरशीचें स्वरूप शुद्ध राजकीय दिसत होतें; त्याच्या पाळ्यामुळ्या हिंदूंच्या थेट अस्तित्वाच्या जिवाग्रीं जाऊन बसल्या असतील, अशी मात्र कोणाचीच कल्पना नव्हती. महाराष्ट्राचा भगवा झेंडा खालीं उतरून त्याच्या जागीं बनिया कंपनीचा युनियन जॅक बावटा फडफडेपर्यंत, इंग्रजी सत्ता हिंदुस्थानांत दृढमूल झाल्याची कोणाचीच खात्री पटणें शक्य नव्हते. अखेर इंग्रजांच्या सवाईसोट्या राज्यपद्धतीच्या दडपणाखालीं हिंदु आणि मुसलमान सामनेवाले सारखेच चीत होऊन, दोघांच्याहि दामटीचे आकार एकाच वळणाचे दिसूं लागले. इंग्रजी राज्यकारभाराच्या सणसणीत तापलेल्या तव्यावर दोघांची भाकर सारखीच अभेद भावानें भाजली जात असतांना उगाच कधिंमधिं चुरचुर फुरफूर होत असे. नाहीं असें नाहीं. पण ती अगदींच क्षुल्लक. १८५७ च्या बंडांत तर हिंदु आणि मुसलमान अगदीं एकजीव व एकजिव्ह होऊन, त्यांनीं इंग्रजी सत्तेला पायबंद लावण्याचा अखेरचा निर्वाणीचा थैमान केला. पण इंग्रजांची सद्दी जबरदस्त! काडतुसाला लावलेल्या डुकराच्या चरबीनें हिंदु मुसलमानांची बुद्धि राष्ट्रीय स्वातंत्र्यासाठीं कितीहि भडकली, तरी अखेर त्या चरबीचें वंगण इंग्रजांच्या जोरावर सद्दीलाच पडावें, हा अनादि अनंत काळाच्या पटांतला एक रहस्यमय चित्रपट होय,यांत मुळींच शंका नाहीं. सत्तावनच्या बंडाने हिंदु आणि मुसलमान या दोन प्रमुख हिंदी समाजांच्या राजकीय महत्वाकांक्षाचें वस्त्रगाळ पीठ झाल्यामुळें, अखिल हिंदुस्थान देशाच्या राष्ट्रीय चैतन्याला पूर्ण बधिरता आली. त्याची हालचाल नष्ट झाली. वर्तमानकाळाच्या धमधमणाऱ्या वर्मावरच मर्मी घाय पडल्यामुळें, भूतकाळचा पराक्रम त्याला दिसेनासा झाला व भविष्यकाळाच्या दिशेला काळाकुट्ट भयाण अंधःकार पसरला. सुमारें दोन अडीच शतकें राजकारणाच्या क्षेत्रांत हमरीतुमरीचे संग्राम करून, यशापयशाच्या भरतीओहटीनें साऱ्या जगाच्या भवितव्यतेला उलथी पालथी करणारे हिंदु आणि मुसलमान, १८५७ सालीं इंग्रजी सत्तेची खास अखेरची ठोकर खाऊन जमीनदोस्त होतांच, आसेतुहिमाचल हिंदुस्थानांतच नव्हे, तर साऱ्या उपलब्ध दुनियेंत मसणवटींतील घोर शांतता नांदू लागली. शांततेच्या याच हंगामांत इंग्रजी सत्तेचा पाया येथें कायमचा बसला गेला. तागडीबहाद्दर बनिया कुंफणीनें आपल्या राजकीय सत्तेची कटकट महाराणी व्हिक्टोरियाच्या ओटींत घातली आणि सर्वत्र

**व्हिक्टोरीया निशाणीं धरुनि चहुंकडे चालती शुद्ध नाणीं**

या सोज्वळ गाण्याचे घाणे हिंदुस्थानांत घरोघर सुरूं झाले. हिंदु मुसलमानांच्या राजकारणी महत्वाकांक्षा आतां ठार झाला. बापजाद्यांचे पराक्रम आठवून त्यांचे पोवाडे गाण्यापलीकडे, आणि कधिंमधीं दिल्लीदरबारासारख्या प्रसंगी दोघांनीं मिळून इंग्रेजी सत्तेची मनमुराद खुषामत करण्यापलीकडे, त्यांना कांहीं धंदाच उरला नाहीं. मोंगल बादशाही आणि हिंदु स्वराज्यशाही यांच्या झगड्यांत हिंदु आणि मुसलमान असे दोन युध्यमान भिन्न तट इतिहासांत आपल्याला दिसतात खरे, पण वास्तविक पाहिलें तर हिंदूंशीं झगडणारें मुसलमान हे खरेखुरे तुर्की मुसलमान नसून, अस्सल हिंदु संस्कृतीचे व हिंदु रक्ताचे इस्लामी पेहराव केलेले अस्सल हिंदूच होते. म्हणूनच एकरंगी एकशिंगी इंग्रजी सत्तेच्या एकाच तडाख्यानें या एकजिनसी संस्कृतीच्या एकदेशी प्रतिस्पर्ध्यांना चुटकीसरसें चीत करून, त्यांच्या राजकारणी आकांक्षेला बेरोजगार केलें.

अनुक्रमणिका

मनुष्याचें मन हें जात्यासारखें आहे. त्याला एकसारखें कांहीं ना कांहींतरी दळायला दळण लागतें. दळणाची कांहींच सामुग्री त्यात पडली नाहीं, तर तें स्वतःलाच दळून भरडूं लागतें. हिंदु मुसलमानांच्या मनाची निष्क्रीयता बंडोत्तरकाळीं इतकी वाढली कीं ते मेल्यापेक्षांहि मेले बनले. राजकारणी बुद्धिबळाचा पटच त्यांच्या हातून हिसकावून नेल्यामुळें, त्यांचें रिकामटेंकडें मन सैरावरा भडकूं लागलें. आपण होऊन आंगावर आलेलें देशाच्या राज्यकारभाराचें किचकट ओझें परोपकारी दयाळू माबाप इंग्रेजी सरकारनें स्वतःच्या शिंगांवर घेतल्यामुळें, हिंदु मुसलमानांना ऐदीपणाशिवाय दुसरा कांहीं व्यवसायच उरला नाहीं. त्यांच्या मनाच्या जात्यांतलें दळण कमी झालें, आणि तें स्वतःलाच भरडण्याच्या एकेरीवर आलें, अशा स्थितींत दोघांहि समाजांना सामाजिक आणि धार्मिक बाबतीची वाळू भरडण्यास सांपडली. वाळूच्या या दळणांत मतभेदांचे गारगोटीचे कांहीं कणखर फत्तर लागतांच, त्यांच्या स्फोटाची पहिली सलामी १८९३सालीं काठेवाडांत प्रभासपट्टण शहरीं हिंदु मुसलमानांच्या दंग्यानें दिली. स्फोट होऊन ठिणगी पडण्याचाच काय तो अवकाश असतो. ती एकदां पडली कीं गवताची गंज किंवा एखादा वाडाचसा काय, साऱ्या विश्वाचें क्षणार्धात होळकुकडें करणें तिच्या हातचा केवळ मळ होय! प्रभासपट्टणची ठिणगी धुमसतां घुमसतां अखेर तारीख ११ ऑगष्ट सन १८९३ शुक्रवार रोजीं मुंबईच्या जुम्मा मशिदींत आगीचा भयंकर स्फोट उडाला आणि सतत एक पंधरवडा चाललेल्या त्या हिंदु मुसलमानांच्या दंग्यानें सारें हिंदुस्थान गदगदा हादरलें गेलें. मुंबांपुरी रक्तांत न्हाऊन निघाली. रस्तोरस्तीं हिंदु मुसलमानांचीं प्रेतें पडलीं. बेसुमार अत्याचार घडले. कित्येक देवळे व मशिदी उध्वस्त झाल्या. हिंदु स्त्रियांवर बलात्कार झाले. शहरांत शांतता राखतां राखतां मुंबई सरकारच्या लष्करी आणि आरमारी सैन्याच्या नाकीं नळ वाहूं लागले. अखेर २५ ऑगष्ट १८९३ रोजीं दंगेखोर लोक काबूंत येऊन, शहरांत शांततेचीं चिन्हें दिसूं लागलीं. हिंदु मुसलमानांत भयंकर रक्तपात, आतोनात प्राणहानी आणि मनस्वी अत्याचार घडविणाऱ्या या कुप्रसिद्ध मुंबईच्या दंग्यानें हिंदु आणि मुसलमान लढ्याचा प्रश्न अलीकडच्या काळांत विशेष महत्त्वानें पुढें आणला. अभेदांतच भेद उत्पन्न झाला. भेदांत विपर्यासाची कीड पडली. रिकाम्या मनांत या किडीनें पोंखरण घातली. पोंखरणींत नसत्या द्वैताचा विषबिंदु पडला. विषानें रक्त दूषित झालें आणि आपपर भेद विसरून हिंदु आणि मुसलमान या नकली बाह्यांगावरच झगडण्याची राष्ट्रविघातक कुबुद्धि सैतानी खेळ खेळूं लागला. रिकाम्या मनाचा दुष्परिणाम, दुसरे काय?सतत तीन शतकें राजकीय वर्चस्वासाठीं प्रामाणिक चुरशीनें एकमेकांशी झगडणारी हिंदु मुसलमानांची मनोवृत्ति, राजकारणाचा आटारेटा किंचित हातावेगळा होतांच, सामाजिक व धार्मिक स्वरूपाच्या क्षुद्र भेदांत रममाण होऊन वर्दळीवर यावी, आणि गेल्या महायुद्धानें निर्माण झालेल्या नवचैतन्याच्या प्रसादाला पात्र होणाऱ्या हिंदी राष्ट्राच्या आकांक्षेच्या मार्गांत त्या भेदाची पर्वतप्राय धोंड पडावी. हें खरोखर देशाचें दुर्दैव होय.

मुंबईच्या दंग्यामुळें हिंदु आणि मुसलमानांतील तेढ किती विकोपास गेलेली होती, हें अलीकडच्या काळांत जगाला प्रथमच दिसलें. या तेढीच्या तपशीलाचें पृथःकरण केलें तर स्वराज्यसत्ता गमाऊन एका त्रयस्थ वरचढ सत्तेचे गुलाम बनलेल्या गुलामांच्या मनोवृत्तीला साजेशोभेसाच त्याचा मसाला होता. स्वराज्य-स्वातंत्र्याच्या बाळ्याबुगड्या गमाऊन वाडवडिलांच्या गतवैभवाच्या सुक्या ओल्या गप्पांचीं भोकें कुरवाळीत बसणाऱ्या गुलाम हिंदु मुसलमानांच्या सडक्या मनोवृत्तीचा तो यथाप्रमाण धांगडधिंगा होता. त्या वेळेच्या शहाण्यासुत्या वर्तमानपत्रकर्त्यांचे उद्‌गार पाहिले, तर असें स्पष्ट दिसून येतें कीं हिंदू आपल्या मुत्सद्देगिरीच्या गुर्मीत होते आणि मुसलमान आपल्या आडदांडपणाच्या मिजासींत होते. बळी तो कान पिळी हा सनातन कायदा मुसलमानांनीं हातीं घेतला होता आणि नेभळे हिंदु इंग्रेज अधिकाऱ्यांवर पक्षपाताचा आरोप करून, बुद्धिमत्तेच्या जोरावर त्यांना गतेतिहासाचे दाखले दाखवून, सुक्या शाब्दिक धमक्या देत होते, त्या वेळीं कै. टिळकांनीं प्रस्तुत दंग्यांची चिकित्सा करणारे केसरींत लिहिलेलेलेख पाहिले तरी त्यांत

हीच संकुचित वृत्ति व्यक्त झालेली आढळते. हिंदु मुसलमान प्रश्नाकडे खऱ्या राष्ट्रीय दृष्टीनें पहाण्याची जी व्यापक वृत्ति आज प्रचलीत झाली आहे, तिचा लवलेशहि टिळकांच्या अंतःकरणाला शिवलेला नव्हता. उठल्या सुटल्या भल्याबुऱ्या पातकाचें खापर इंग्रेजांच्या माथ्यावर फोडून, आपल्या नेभळ्या तोंडपाटिलकीचें मंडण करण्याचा केसरीनें महाराष्ट्रांत रुढ केलेल्या परिपाठाचा उगम याच लेखांत पहावा. या दोन समाजांच्या एकीकरणानेंच भावी हिन्दी राष्ट्राचें दृढीकरण केल्याशिवाय गत्यंतर नाहीं, अशी जागृति तत्कालीन इतर अनेक विचारवंत हिंदु-मुसलमान पुढाऱ्यांना झाली नव्हती, असें नव्हे. परंतु अखिल हिंदुस्थानांत व्यापक धोरणाच्या व अभेदभावाच्या राष्ट्रीय जागृतीची पुण्याई कै. टिळकांच्या पदरीं बांधण्याचा उपद्व्यापी अट्टहास करणाऱ्या शहाण्यांना इतकेंच सप्रमाण बजावणें अवश्य आहे कीं हिंदूंचा-विशेषतः महाराष्ट्रांतल्या हिंदूंचा-स्वाभिमान जागृत करण्याचा कै. टिळकांनीं यत्न केला, असें सामान्य विधान केल्यास कांहीं हरकत नाहीं; पण सध्यां विकसित झालेल्या हिंदु मुसलमानांच्या ऐक्याच्या व्यापक कल्पनेचा धागा सुद्धां कै. टिळकांच्या पादुकांना किंवा पगडीला गुंडाळतांना मात्र जरा दहा अंक मोजा. टिळकांनीं मुसलमानांचा प्रश्न जर त्यावेळीं खऱ्याखुऱ्या व्यापक उदारबुद्धीनें, सोडविण्याचा यत्न केला असता, तर आज महाराष्ट्रांत तरी निदान चित्पावन चित्पावनेतर वादाइतकें हिंदु मुसलमान वादाला तीव्र स्वरूप खास आलें नसते!"इंग्रजांनीं हिंदुस्थानांत पाऊल ठेवण्यापूर्वीच मुसलमानांची सत्ता मोडत चालली होती, व इंग्लिशांनीं हिंदुस्थानचें राज्य कमावलें ते मुसलमानांपासून नव्हे, तर मराठे व शीख लोकांपासून होय." हा ऐतिहासिक पुरावा युरपियन टिकाकारांच्या मुस्कटावर झुगारतांना, मुसलमानांविषयीं तुंकार दर्शवीत कै. टिळक मुसलमानांना व त्यांच्या पाठिराख्या इंग्रज अधिकाऱ्यांना बजावून लिहितात कीं, "इंग्रज सरकारचा जर या देशांत रिघाव झाला नसता तर आज जी एक दोन मुसलमान संस्थानें राहिली आहेत, तीहि केव्हांच नामशेष होऊन गेलीं असतीं." [टिळकांचे लेख, पृ. २०६.] हिंदु मुसलमान प्रश्नाचा परीघ केवढा विस्तृत आहे, त्याच्या विरोधी तपशीलाचा दूरवर धोरणानें समन्वय कसा करतां येईल आणि हिंदी राष्ट्राच्या भावी पुनर्घटनेसाठीं दोघांनींहि कांही ठळक क्षेत्रांत समरस निदान समगामी कसें व्हावें, याची रुपरेषा आंखण्याऐवजी कै. टिळकांनीं हिंदु मुसलमानांत यदृच्छेनें उत्पन्न झालेल्या गुलामगिरीच्या क्षुद्र भावनांची तेढ अधिकाधिक तीव्र करण्याची कामगिरी मात्र बरीच बजाविली, यांत मुळींच संशय नाहीं. इतकेंच नव्हे, तर मुंबईस दंग्याचा धडाका उडाल्यानंतर त्याचा तितकाच जोराचा व भयंकर पडसाद येवलें, बेळगांव, मालेगांव, राजापूर वगैरे ठिकाणीं उमटतांच, ही दंग्याची साथ अधिक पसरूं नये म्हणून हिंदुमुसलमानांच्या जबाबदार प्रतिनिधींची एक सभा भरविण्याचा कै. जस्टिस रानडे यांनीं प्रयत्न केला. त्यावेळींसुद्धां टिळकांच्या केसरीनें या संयुक्त सभेची हेटाळणी करून, 'फक्त हिंदूंची' सभा बोलवावी असा हट्ट धरला आणि कै. रानडे व त्यांच्या अनुयायांची आपल्या कुप्रसिद्ध 'राष्ट्रीय' भाषेंत संभावना केली. कै. टिळकांची खुमखुम येथेंच थांबली नाहीं.

हिंदु मुसलमानांची तेढ मुंबईच्या दंग्यानें व्यक्त करतांच आणि येवलें मालेगांवच्या प्रतिध्वनीनें ती विशेष स्पष्ट सिद्ध होतांच, देशांतले हिंदु मुसलमान पुढारी त्यांच्या ऐक्याचा प्रश्न यथामति यथाशक्ति सोडविण्याचा यत्न करूं लागले. या प्रयत्नांची दिशा व पद्धत वेळोंवेळीं कार्यकर्त्यांच्या आंगभूत गुणावगुणांप्रमाणें कधिं बरी, कधिं वाईट, कधिं ऐक्यवर्धक तर कधिं बेकीचें भगदाड अधिकच दुणावणारी, अशी होत गेली. त्यांतच कै. टिळकांनीं गणपतीच्या मेळ्याची नवीन टूम काढली व शिवाजीउत्सव सुरूं केला. या दोनहि गोष्टी जर उदार व्यापक धोरणावर चालविल्या असत्या, आणि त्यांचें राष्ट्रीय महत्व सर्वस्पर्शी मुत्सद्देगिरीनें महाराष्ट्रीय जनतेवर बिंबविण्याचा त्यांनी यत्न केला असता, तर हिंदु संस्कृतीला व हिंदु रक्ताला फारसा पारखा न झालेला अखिल महाराष्ट्रीय मुसलमान समाज त्यांना खात्रीनें आपलासा करतां आला असता! पऽऽण!! जात्याच अत्यंत महत्वाकांक्षी व वरचढ प्रवृत्तीच्या टिळकांना स्वदेशी

मुसलमानांच्या संस्कृतिसाम्याचें भान राहिलें नाहीं, आणि गणपतीचे मेळे व शिवाजी उत्सव या दोन दुधारी पात्याच्या तलवारीच्या हातवाऱ्यानें त्यांनीं हिंदु मुसलमानांच्या भावना अधिकच क्षुब्ध व छिन्नभिन्न केल्या. मेळ्यांतून व शिवाजीउत्सवांतून मुसलमानांची यथास्थित निर्भत्सना होऊं लागतांच, महाराष्ट्रांतले बरेचसे उनाड कवि व नाटककार एकामागून एक भराभर उदयास येऊं लागले, आणि त्यांच्या इस्लामद्रोही कवितांचा व 'ऐतिहासिक' (?) गद्यपद्य नाटकांचा केसरीकडून जाहीर सन्मान होऊं लागला. महाराष्ट्रांत असा एक काळ होता कीं मुसलमानांची निर्भसना केल्याशिवाय आह्मा हिंदूंचा एकहि 'राष्ट्रीय' उत्सव यथासांग पार पडत नसे. एकहि 'सार्वजनिक' सभा घसघशीत व ठसठशीत वठत नसे, आणि केसरी सांप्रदायिक एकाहि नियतकालिकाला आपलें कर्तव्य नीटपणें बजावल्याची कंडु शमत नसे. त्या वेळीं **गिलचांचा सूड** या सारखीं मुसलमानांच्या आईमाईचा उद्धार करणारी हलकट नाटकें सुद्धां कै. टिळकांच्या अध्यक्षतेखालीं त्यांच्या खास आशीर्वादामुळें यशस्वी होत असत. शिवाजीउत्सवाचा तर या कामीं अनेक बोलघेवड्या दे. भ. नीं खुद्द टिळकांच्या नाकासमोर मनमुराद खेळखंडोबा केला. **सन्मित्र समाज** नांवाच्या एका पुणेरी मेळ्यानें तर पुणें शहरच्या चव्हाट्या तिवाट्यावर ऐतिहासिक हिंदु मुसलमान पात्रें प्रत्यक्ष नाचवून, आपल्या केसरी प्रासादिक देशभक्तीचा शिमगा वृत्तपत्री धुळवड शेणवडीपेक्षां रेंसभर सुद्धां कमी इरसाल नसल्याचें सिद्ध केलें. या फाजील मेळ्याचा फाजीलपणा अझूनहि कमी झाला नसून, मुसलमानांवर भुंकण्यास सवकलेलें हें 'राष्ट्रीय' कुतरडें कैं. नामदार गोखले प्रभृति उदारमतवादी स्वकीयांचे लचके तोडतां तोडतां, आता तर कुलीन स्त्रियांची इज्ज़त जाहीर रीतीनें घेत असतें. सारांश, टिळकांच्या प्रोत्साहनानें भरंवसाट भडकणाऱ्या तत्कालीन राजकारणी वातावरणाचें निःपक्षपणें समालोचन केलें तर असें स्पष्ट विधान करणें भाग पडले कीं त्या वेळच्या महाराष्ट्रीय हिंदूंच्या राजकीय मोक्षप्राप्तीच्या कल्पनांचे भांडवल मुसलमानांच्या बीभत्स निर्भत्सनेंतूनच काढलें जात असें. याचा परिणाम फार वाईट झाला आणि त्याचीं कडुजहर फळें महाराष्ट्राला अझूनभोगावयाचीं आहेत. महाराष्ट्रांतलें मुसलमान न हिंदुर्नयवन: असे असून, बाह्यांगावरील कपड्यांशिवाय त्यांच्यांत व हिंदूंत कसलाहि भेद नाहीं. त्यांची राहणी, आचारविचार, उदरंभरणाचे व्यवहार, संसाराचीं सुखदुःखें सर्वस्वीं हिंदुप्रमाणेंच एकजिनशी आहेत. कारण ते जात्या मुळचे हिंदूच. पूर्वजांवर झालेल्या धर्मांतराच्या बळजबरीमुळेंच ते— आमच्याच रक्तामासाचे आप्तसंबंधी असून सुद्धां आज निव्वळ नांवाला आमच्यापासून पारखे झाल्यासारखे दिसतात इतकेंच. अशा रीतींनें धर्माचरणाच्या बळजबरीच्या बाबीशिवाय इतर सर्व व्यवहारांत महाराष्ट्रांतले मुसलमानभाई हिंदूंशीं एकजीव असतां, टिळकांच्या गणपति—मेळ्यांनीं व शिवाजी उत्सवांनीं त्यांची मनें हकनाहक दुखविलीं गेलीं आणि नाइलाज म्हणून ते फटकून वागूं लागले, तर त्यांत दोष कोणाचा?कै. टिळक लोकसंग्रहाचे अर्वाचीन प्रणेते असें त्यांचे भक्तजन कंठरवानें वेळीं अवेळीं प्रतिपादन करीत असतात. पण त्यांच्या लोकसंग्रहाला मुसलमानांचा आत्र कधींहि विटाळ झाला नाहीं. मुसलमान हे लोकच नाहींत कीं काय?आणि ज्या राष्ट्रोद्धारासाठीं टिळकांनीं आपला 'राष्ट्रीय' संप्रदाय निर्माण केला, त्याला या लोकांच्या संग्रहाची आवश्यकता नाहींच कीं काय?मुसलमानांत जातिभेद नसला, तरी प्रांतपरत्वें उच्च नीच संस्कृतीची भिन्नता पुष्कळच आहे. सगळ्या ठिकाणचे सगळे मुसलमान एकजात शौकतअल्ली टैपाचे किंवा मोपले सांच्याचे नाहींत. महाराष्ट्रांत तर सर्रास शुद्ध हिंदु मुशीचा मुसलमानच आढळून येतो. संस्कृतिसाम्याचा फायदा घेऊन व्यापक मिशनरी धोरणानें येथल्या मुसलमानांना कै. टिळकांनी जर आपल्याकडे ओढण्याची खटपट केली असती, तर आज निदान महाराष्ट्रापुरता तरी हा प्रश्न पुष्कळच सुटला असता खास. पण ज्यांचें सर्व राजकारणच मुळीं जातिभेदाच्या आणि स्वजातिवर्चस्वाच्या मसाल्याचें, तेथें मुसलमानाला पुसतो कोण?

खरें पाहिलें तर बंगालच्या फाळणीची चळवळनिर्माण होईपर्यंत महाराष्ट्रीय हिंदूची राजकीय दृष्टी अत्यंत संकुचित आणि एकलकोंडेपणाचीच होती. कै. टिळकांच्या केसरी संप्रदयाची स्वराज्याची दृष्टी सुद्धा

अनुक्रमणिका

गायकवाड वाड्याच्या कुंपणापलीकडे फारशी जात नसे. राष्ट्रीय सभेच्या वार्षिक लळितांत देवपार्टी व राक्षसपार्टी एक दोन दिवस कांही तरी अललल डुर्रर करून राष्ट्रैक्याचीं पुराणें झोडीत; परंतु नेहमीं पुराणांतली वांगी पुराणांत ठेवण्यापलीकडे त्यांचाहि कांहीं इलाज नसे. बंगालच्या चळवळीच्या दणक्यानें महाराष्ट्रीय हिन्दूंची राजकीय स्वार्थाची दृष्टी उदारपणाकडे जरी बरीच कलंडली, तरी हिंदु मुसलमानांच्या ऐक्याच्या बाबतींत त्यांचा सुतकी बाणा टिळकांच्या हयातीपर्यंत तरी निदान फारसा कमी झाला नाहीं. नुसता शाब्दिक चोंबडेपणा मात्र रगड होता खरा! ज्या राष्ट्रयैक्याच्या विकासासाठीं आजची कार्यक्षम राष्ट्रीय सभा कसोशीनें झटत आहे, त्याचा पाया जें प्रांतिक ऐक्य, त्याचीहि पर्वा आमच्या हृदयाला फारशी स्पर्श करीत नसे. हिंदुस्थानच्या राजकीय क्षेत्रांत कल्पनातीत चापल्यानें भराभर पालटणाऱ्या राजकारणी उलथापालथीचे चित्रपटपाहून सुद्धा मुसलमानांच्या मनधरणीचा किंवा एकीकरणाचा प्रश्न आम्हांला फारसा बोंचतच नसें, मात्र राजकीय अधःपाताची जाणीव होऊन, मुसलमान संघ कावेबाज नोकरशाहीच्या बगलेंत घुसण्याचा यत्न करीत असतां, महाराष्ट्रधुरीण केसरीनें त्याची 'प्यारी रंडी' संज्ञेनें मनमुराद निंदा करायला मात्र मुळींच कमी केलें नाहीं. सारांश, हिंदुस्थानच्या राष्ट्रीय उद्धारांत हिंदूंना मुसलमानांच्याहि एकीची आवश्यकता आहे, ही गोष्ट राजकीय क्षितिजावर महात्मा गांधींचा उदय होईपर्यंत कोणीच लक्षांत घेतल्याचें दिसत नाहीं. हिंदुस्थानच्या सुदैवानें सत्याग्रही महात्मा गांधींचा उदय होऊन, त्यांच्या तपःसामर्थ्याच्या दिव्य तेजानें सर्वत्र अननुभूत प्रबोधनाची दांडगी खळबळ उडाली आणि दुटप्पी टिळक संप्रदायाचा अस्त झाला. वार्षिक हरदासी कीर्तनें करणाऱ्या राष्ट्रीय सभेंत नवचैतन्याचा विलक्षण संचार होऊन तिनें मुस्लीम लीगचे सवता सुभा आमूलाग्र पचनी पाडला आणि स्वराज्यप्राप्तीच्या कार्यक्रमांत अस्पृश्योद्धाराच्या जोडीनेंच, मुसलमान बांधवाच्या ऐक्याला विशेष प्राधान्य देण्यांत आलें. खुद्द महात्मा गांधीनींच हा प्रश्न हातीं घेतल्यामुळें, त्यांत कांहीं थातरमातर किंवा हस्तिदंती कावेबाजपणा घुसणें शक्यच नाहीं, अशी सर्व राष्ट्राची तेव्हांच खात्री पटली. हिंदु मुसलमानांच्या दिलजमाईचे अनेक अकल्पनीय प्रकार आतांपर्यंत घडून आले, येत आहेत व पुढें येतील. तथापि या दिलजमाईची धडपड सुरू असतांच, जणुं काय तिचा आरपार फोलपणा सिद्ध करण्यासाठीं मलबारांत मोपलें मुसलमानांची बंडाची भयंकर गडबड उडाली. मोपल्यांच्या बंडाने व परवांच्या मुलतानच्या दंग्यानें हिंदु मुसलमानांच्या दिलजमाईचा प्रश्न इतका बिकट होऊन बसला आहे कीं तो सोडविण्यासाठीं महात्मा गांधीची सत्याग्रही पुण्याई सुद्धां अंतःपर हतबल ठरून पराभूत झाल्याशिवाय राहणार नाहीं, मग इतरांची कथा काय?विशिष्ट राजकीय हेतू साधण्यासाठीं किंवा महात्माजींच्या उत्कट तपस्सामर्थ्यानें उडालेली गाळण छपविण्यासाठीं, एखादा शहाणा 'राष्ट्रीय' या प्रश्नाची शाब्दिक कसरतीनें टोलवाटोलव करूं म्हणेल तर ते दिवस आतां उरलेले नाहींत. हिंदु मुसलमानांची एकी झालीच पाहिजे, त्याशिवाय स्वराज्य प्राप्त होणार नाहीं व यदाकदाचित् झालेंच तर तें टिकणारहि नाहीं; हा महात्मा गांधीचा सिद्धांत बाह्यतः कितीहि खरा असला, तरी ती एकी कशी घडवून आणतां येईल याचें स्पष्टीकरण किंवा बिनचूक निधान मात्र त्यांना मुळीच करतां आलें नाहीं. हिंदुंनी मशिदींत जाणें आणि मुसलमानांनीं देवळांच्या आवारांत किंवा गरूडमंडपांत येऊन व्याख्यानें देणें, इत्यादि प्रकार बाह्यांगाचे आहेत व ते नेहमीं टिकाऊच रहातील असा भरंवसा कोणी देऊंहि शकणार नाहीं.

म. गांधीनीं हिंदु मुसलमानांच्या एक्याविषयीं ज्या खटपटी केल्या व आपल्या 'यंग इंडिया' पत्राद्वारें जे विचार व्यक्त केले. त्यांचें आज जो कोणी काळजीपूर्वक पर्यालोचन करील, त्याला हेंच कबूल करावें लागेल कीं गांधी हे कितीहि महात्मा असले, तरी प्रस्तुत वादांत पौराणिक बडबडी पलीकडे त्यांच्या महात्म्याची फारशी मजलगेलीच नाहीं. हाच सिद्धांत किंचित निराळ्या भाषेंत मांडावयाचा तर तो असा मांडतां येईल कीं म. गांधीच्या सत्यगुणप्रधान पुराणांचा आसुरी मायेनें चिंब भिजून निघालेल्या त्यांच्या मुसलमान शागीर्दांवर कांहीच परिणाम झाला नाहीं. इतकेंच नव्हे, तर हिंदूंच्या विवेकबुद्धीला पटतील अशा

कांहिंहि सूचना त्यांना केव्हांहि करतां आल्या नाहींत. त्यांच्या 'यंग इंडिया' च्या पुराणांवर भाळून जाऊन बेताल नाचणारे हिंदू वेताळ त्यावेळीं जरी मुबलक बोकाळले होते, तरी तीं पुराणें किती फोल होतीं व ते सिद्धांत किती लेचेपेचे होते, याचा पुरावा मोपल्यांच्या दुष्ट बंडानें जेव्हांच्या तेव्हांच दिला. विशेषतः मोपल्यांच्या बंडाचा भयंकर धुमाकूळ माजल्याच्या बातम्यांनीं सारें हिंदुस्थान दणदणूं लागल्यावर सुद्धां, त्यांचा फोलपणा व मोपल्यांचा 'मर्दपणा' सिद्ध करण्यासाठीं गांधीनीं दाखविलेला कानाडोळ्याचा उदासपणा व असहकारितावाद्यांनी बंडाच्या खऱ्या हकिकती खोट्या ठरविण्यासाठीं केलेल्या धडपडी कोणाच्याहि स्मरणांतून जाणें शक्य नाहीं. मोपल्यांच्या अमानुष अत्याचारांचे भरभक्कम पुरावे भराभर सर्वत्र प्रसिद्ध होतांच, नाईलाज म्हणून तारीख २८ जुलै १९२१ च्या यंग इंडियांत म. गांधीनीं जें प्रवचन झोडलें आहे, त्यांतलीं विधानें कोणाला कधिं काळीं पटतील तीं पटोत! त्यांत वस्तुस्थितीचें जितकें अज्ञान भरलें आहे, तितकाच हिंदूंचा तेजोभंग आहे. जितका मनाचा नामर्दपणा आहे, तितकाच विचारसरणीचा कमकुवतपणा आहे. म. गांधी म्हणतात:—

(१) **जर इस्लामाचा पाया जुलूम जबरदस्तीवर असेल तर आमचा खिलाफतीचा पुरस्कार चुकीचा होईल.** इस्लाम धर्मप्रसाराचा इतिहास मानवी रक्तांत बुचकळलेल्या तलवारीच्या लेखणीनेंच आजपर्यंत लिहिला गेलेला आहे, हें महात्मा गांधीना मुळींच अवगत नसेल काय?जबरदस्तीनें मुसलमान धर्माची दीक्षा देण्याचें फर्मान कुराणांत असो वा नसो; इतिहासाचा पुरावा डोळ्याआड करणें, याला दांभिकपणा असें ह्मणतात.

(२) **बळजबरीनें इस्लामधर्मदीक्षा देण्याच्या पातकाबद्दल, ऐतिहासिक दृष्ट्या सर्रास सर्व मुसलमान समाजाला दोषी ठरवितां येणार नाहीं. अशा कृत्याचा जबाबदार (?) मुसलमानांनीं निषेधच केलेला आहे.** म. गांधीचें ऐतिहासिक ज्ञान केवढें आहे, त्याचा वाद घालीत बसण्यांत अर्थ नाहीं. परंतु जबाबदार मुसलमानांचा 'निषेध' म्हणजे बाटलेल्या हिंदूंचा 'धर्मपरावर्तन विधि' नव्हे खास. मोपल्यांच्या धार्मिक अत्याचारांवर मलमपट्टी लावणारे डॉ. मुंजे यांना म. गांधीचे कल्याणशिष्य शौकत अल्ली यांनीं दिलेलें सणसणीत उत्तर विचार करण्यासारखें आहे. अल्लीसाहेब आपल्या मुलाखतींत म्हणाले "मोपल्यांच्या अत्याचारांबद्दल मी शक्य तितक्या तीव्रतेनें निषेध करीन, परंतु बाटलेले हिंदु परत हिंदु धर्मात घेण्याच्या खटपटीला माझ्याकडून कसलीहि मदत मिळणें शक्य नाहीं, तशी आम्हांला धर्माज्ञाच नाहीं, याबद्दल फार दिलगीरी वाटते." 'अल्ला हो अकबर' च्या आरोळ्या किंचाळणारी लहान पोरें गल्लोगल्लीं फिरविणाऱ्या शहाण्या देशभक्तांच्या डोक्यांत या कानपिचकीचा कांहींच उजेड पडूं नये, हें कशाचें लक्षण?

(३) **मोपल्यांना खिलाफतीची अस्पष्ट माहिती झाली होती, पण अनत्याचाराच्या तत्त्वांचा त्यांना गंधहि नव्हता. खिलाफत व काँग्रेसच्या कामगारांना मलबारांत जाण्याचा सरकारकडून प्रतिबंध झाला नसता, तर या बंडाचा अंकूर गर्भांतल्या गर्भांत ठेचला गेला असता.** आतां पुढें येत असलेल्या पुराव्यांवरून (अ) खिलाफतवाल्यांची चिडखोर व माथीं भडकवणारी शिकवणूक व (ब) ब्रिटीश राज्य आतां भुसभुशीत झालें आहे, त्याच्या जागीं खिलाफतराज्य आणून स्थापन करावयाचें आहे, अशा गप्पा मलबाराबाहेरच्या इस्लामी चळवळ्यांनीं मलबारांत जाऊन मोपल्यांच्या डोक्यांत भिनविल्या, अशीं दोन मुख्य कारणें मोपले बंडाला कारण झाल्याचें सिद्ध होत आहे. त्यावरून म. गांधीच्या विधानांना काय किंमत द्यावयाची ती वाचकांनींच ठरविलेलें बरें.

(४) **मोपल्यांचा माथेफिरूपणा म्हणजे हिंदु मुसलमानांच्या एकीचा भक्कमपणा असेंच मला वाटतें, कारण एवढें बंड झालें तरी आम्हीं (हिंदु) अगदीं शांत बसलों.** नामर्दपणावर पसरलेली इतकी छानदार विणीची खादी इतरत्र पहावयास मिळणार नाहीं.

(५) **जबरदस्तीचें धर्मांतर किंवा त्याहिपेक्षां वाईट गोष्टी यापेक्षां सध्यांचें (इंग्रजी सत्तेचें) जूं अधिक वाईट नव्हे काय**?विचारी वाचकांनींच उत्तर द्यावें.

(६) ४ ऑगष्ट १९२० च्या यंग इंडियांत गांधी म्हणतात, **इस्लाम हा मोठ्ठा उदार धर्म आहे. त्यावर आणि त्याच्या अनुयायांवर विश्वास ठेवा. जोंपर्यंत खिलापतीचा तंटा चालला आहे, तोंपर्यंत गोरक्षण किंवा इतर धार्मिक प्रश्नांत मुसलमानांशीं आपण नुसतें बोलणें लावणें, हें सुद्धां महापातक आहे.... आपण जर खिलाफत वाचविण्याचा झटून प्रयत्न केला तर मुसलमानहि गोरक्षणास मदत करतील, अशी मी ग्वाही देतो.** असल्या पोंकळ विचारसरणींनें हिंदु मुसलमानांत ऐक्य घडून येणें शक्य नाहीं, हें आतां खुद्द गांधीभक्तांच्याहि अनुभवास आलें आहे. मग गांधींना एखाद्याने 'मॅडमुल्ला' म्हटलें तर त्यांनी कां खवळावें?

यंग इंडियांत म. गांधीनीं हिंदु-मुसलमान ऐक्यावर जेवढे लेख लिहिले आहेत. त्या सर्वांचा मासला वरील धर्तीचाच आहे. अशा लेच्यापेच्या विचारसरणीच्या मुळांशीं कितीहि उच्च कळकळीचा सात्विक हेतू असला, तरी तिचा परिणाम विचारावर मुळींच न होतां तात्पुरत्या लोकप्रसिद्धीच्या हळदीसाठीं धाधावलेल्या अल्लड तरूणांच्या विकारांवर मात्र होतो; आणि तो तसा झालाहि. प्रस्तुतचें द्वैत केवळ शब्दलालित्याच्या किंवा शांतिरस्तु, पुष्टीरस्तु आशीर्वादाच्या बळावर शमणारें नव्हे, ही जाणीव म. गांधीना होऊं नये हें आश्चर्य आहे. पण आश्चर्य तरी कसलें?सत्वगुणी माणसानें या फंदांत आधीं पडूंच नये. तें त्याचें कामच नव्हे. या त्रिगुणात्मक सृष्टींत सत्व, रज किंवा तम यांपैकीं कोणत्याहि एकेका गुणाचा उच्च परिपोष अखेर अपजयीच होत असतो.त्रिगुणांचा समतोल समन्वय झालेल्या सत्तेला किंवा व्यक्तीलाच ही तिरंगी नाठाळ दुनिया वठणीवर आणून आपल्या काबूंत ठेवतां येतें. रेड्याला आणि वाघाला एकाच बालदींतले पाणी एकत्र प्यावयास भाग पाडणाऱ्या सर्कसवाल्याला सुद्धां तात्पुरत्या या त्रिगुण-समन्वयाची हुबेहूब नक्कल करावी लागते.

अभेदाचा भेद होऊं नये, पण झाला. हिंदूंचे मुसलमान होऊन, धर्म-भेदाच्या विरळ भेदानें एकाच रक्तमांसाच्या भावंडांत द्वैत उत्पन्न होऊं नये, पण झालें. त्याला कारणें कांहींहि असोत, [तीं मूळग्रंथांत दिलेलीं आहेत.] त्यांची शाब्दिक मीमांसा द्वैत निर्मूलनास फारशीं उपयोगीं पडणार नाहींत. हिंदु आणि मुसलमान हा भेद नाहींसा झाला पाहिजे, एवढा हेतू ठाम ठरल्यावर, तो कसा साध्य करतां येईल?सगळ्याच क्षेत्रांत शक्य नसेल, तर कोणत्या?याचें निर्दय निस्पृहतेनें विवेचन करणें आतां प्राप्त आहे. धर्म, सामाजिक जीवन, नैतिक विकास, राजकीय महत्वाकांक्षा आणि संस्कृति अशीं अनेक क्षेत्रें आहेत. यांपैकीं कोणत्या क्षेत्रांत ही शेंडी-दाढीची गांठ बेमालूम मारतां येईल, हें पहाणें आहे. खरें पाहिलें तर **खटाशीं भिडवावा खट, उद्धटाशीं व्हावें उद्धट** या समर्थोक्तीचाच अखेर अवलंब केल्याशिवाय गत्यंतर नाहीं, हें जरी स्पष्ट आहे, तरी निर्वाणीची ही वेळ येण्यापूर्वी त्वयार्धं मयार्धंच्या कांहीं पायऱ्या ओलांडल्या तर दोनहि पक्षांच्या माणुसकीला तें विशेष शोभून दिसेल खास. अनेक क्षेत्रांपैकीं राजकीय क्षेत्रांत हिंदु-मुसलमनांची एकी नसणेंच शक्य नाहीं. दोघांचेहि बापजादे पूर्वी चक्रवर्ति असले, तरी आज दोनहि समाज ब्रिटिश सत्तेच्या गुलामगिरीच्या उकळत्या हंड्यांत बटाट्याप्रमाणें शिजविले जात आहेत. तात्पुरत्या राजकारणी डांवपेंचांच्या सिद्धीसाठीं कांहीं विशिष्ट हक्कांच्या सवलतीची एखादी ओंझळ मुसलमानांच्या

अनुक्रमणिका

झोळींत पडली काय, किंवा हिंदूंच्या चौपदरींत पडली काय, सुपांत असणाऱ्यांनीं हासायला नको व आधणांत पडलेल्यांनीं रडायला नको, अशी वास्तविक स्थिति आहे. सुपांतल्यांनाहीं अखेर आधणाचीच वाट धरावयाची असते, हें विसरतां येत नाहीं. विशेषतः, मुसलमान समाज आंगमस्तीच्या कामांत कितीहि दांडगा असला, तरी राजकारणी क्षेत्रांत ज्या बुद्धिमत्तेची आवश्यकता विशेष, त्या बुद्धिसामर्थ्यासाठीं तरी निदान त्यांना हिंदूंच्या गळ्याला मिठ्या मारणें भाग आहे.

आतां, धार्मिकदृष्ट्या हिंदु-मुसलमानांची एकी होणें शक्य आहे काय? या प्रश्नाचा विचार करूं, धर्माविषयीं बोलतांना त्यांतल्या गूढ उदात्त तत्त्वांकडे पहा, त्यांतलें मूलभूत तत्त्व एकच आहे. 'राम रहिम सब एकहि है' इत्यादि मुद्दे बरेच लोक एकीच्या मंडनार्थ पुढें आणतात. देव एक आहे, हा सिद्धांत सर्व धर्मपंथांत सामान्यत्वें सारखाच मान्य आहे. परंतु तेवढ्यावरून त्या सर्वांची सर्वच बाबतींत एकवाक्यता अझूनपर्यंत तरी घडून आलेली नाहीं. याला अपवादच हुडकून काढावयाचे असतील तर ते तत्वज्ञानाच्या परमोच्च स्थितीला पोहचलेल्या हिंदु-मुसलमान संतांत मात्र आढळतात; इतरत्र नाहीं. पण तत्त्वज्ञानाच्या या परमोच्च वातावरणांत हिंदु हा मुसलमान बनत नसून, मुसलमानमात्र अंतर्बाह्य पक्का हिंदु बनत असतो, हें अवश्य लक्षांत घेतलें पाहिजे. सर्वसामान्य जनतेच्या धर्मकल्पना अगदींच अस्पष्ट व भ्रष्ट असतात. शिवाय, विशिष्ट धर्मपंथानुकरण त्या त्या धर्मांतल्या मूलभूत तत्त्वप्रत्ययापेक्षां, ऐहिक लाभांची आशा, कांहीं तरी सुटसुटीत सवलती, किंवा शुद्ध बळजबरी यांवरच आजपर्यंत घडून आलेलें आहे. ज्या इस्लाम धर्माचा प्रसारच मुळीं रक्तबंबाळ नागव्या तलवारीच्या जोरावर खुद्द धर्मोत्पादक महंमदानेंच करण्याचा पाया घातला, त्या धर्माची तात्विकदृष्ट्या हिंदुधर्माशीं एकवाक्यता घालण्याचा यत्न करणें म्हणजे विळ्या भोपळ्याचें गांठोडें बांधण्यासारखेंच आहे. तत्त्वज्ञानापेक्षां तलवारीच्या जोरावरच ज्या धर्माचा मिशनरी बाणा सर्व हिंदुस्थानभर बेसुमार बोकाळला; त्या धर्माच्या आसुरी स्वरूपावर तात्विक एकवाक्यतेचा सफेदा कितीहि चोपडला तरी व्यर्थ होणार यांत संशय नाहीं. नुसत्या तत्वज्ञानावरच जर महंमदानें भिस्त ठेवली असती, तर त्याला हिंदुधर्मानें आमूलाग्र गिळून पचनीं पाडलें असतें. बौद्ध धर्माच्या ऱ्हासानंतर हिंदु धर्मीयांनीं आपला जन्मजात मिशनरी बाणा टाकल्यामुळें, त्यांना इस्लाम व क्रिस्ती धर्मपंथांपुढें बाह्यतः जरी हतवीर्य व्हावें लाभलें, तरी त्यांच्या सर्वस्पर्शी तत्वज्ञानानें, नकळतच कां होईना, अखेर या दोनहि प्रतिस्पर्ध्यांवर मात केल्याशिवाय सोडली नाहीं. असें झालें नसतें तर आज पृथ्वीच्या पाठीवर एकहि हिंदु शिल्लक राहिला नसता. हिंदूंच्या टिकावाचें मर्म येथेंच आहे. मात्र तें मर्म आतां अत्यंत जीर्ण व हतबल स्थितीला येऊन पोंहचलें आहे. तत्वज्ञान कितीहि मिशनरी स्पिरिटचें असलें, तरी अनुयायांमध्यें जर त्या स्पिरिटचा लवलेश नसेल, तर त्या तत्वज्ञानाचें आयुष्य संपलेंच म्हणून समजावें. हिंदूंनीं आपल्या तत्वज्ञानाच्या मिशनरी स्पिरिटवर निष्क्रीय विश्वास टाकून, व्यवहारदाक्षिण्याला भडाग्नि दिल्यामुळेंच त्यांचा राष्ट्रीय अधःपात झाला आणि आतां तर त्या सुप्रसिद्ध मिशनरी स्पिरिटचाहि खडखडाट उडाल्यामुळें त्यांच्या प्रत्यक्ष अस्तित्वाचीहि जबरदस्त शंका उत्पन्न झाली आहे. अशा अवस्थेंत जुलूमजबरदस्तीची ख्याति असलेला मिशनरी इस्लाम धर्म आणि बेअक्कल भिक्षुकशाहीनें लेचापेचा केलेला शेंदाड हिंदु धर्म, यांच्या एकीचा स्पष्ट दिसणारा मार्ग म्हटला म्हणजे एकजात सर्व हिंदूंनीं मुसलमानी धर्माचा स्वीकार करून आपल्या नामर्दाइवर चतुरस्रतेचें प्रसंगावधानी पांघरूण घालावें, नाहींतर तत्वज्ञानाच्या पुण्याईवर किंवा शिल्लक असलेल्या मनगटाच्या जोरावर सर्व मुसलमानांना हिन्दु करून घ्यावें; यापेक्षां तिसरा मार्ग नाहीं.

हिंदुधर्माचा मूळचा मिशनरी बाणा आणि हिंदूसंस्कृतीचा सर्वसंग्रही याचकपणा आज जर कायम राहिला असता, तर हिंदु आणि मुसलमान या भेदाला इतकें तीव्र स्वरूप खास आलें नसतें. आजचा मामला अर्थात् चमत्कारिक होऊन बसला आहे. इस्लामधर्म कट्टा सर्वसंग्रही आणि प्रचलित हिंदु धर्म ऊर्फ

भिक्षुकशाही अधर्म कट्टा दुराग्रही, तुसडा, एकलकोंड्या आणि नामर्द. सर्वसंग्रही इस्लाम लोक मर्द, तर तुसडे अदूरदृष्टि हिंदु लोक नामर्द. कोठल्याहि क्षेत्रांतला कसलाहि विषय असो; राजकीय असो, सामाजिकअसो, नैतिक असो, त्याला धार्मिक फतव्याच्या आणि खुतब्याच्या सबबीवर वाटेल तसें धोरणी वळण देणें मुसलमानांच्या हातचा मळ आहे. हिंदूंना इहलोकींच्या व्यवहारांपेक्षां परलोकच्या झाडसारवणाची छातिफोड झुरणी लागलेली; त्यांना भिक्षुकशाही धर्माच्या क्षुद्र सोंवळ्याओंवळ्यापलीकडे, राजकारणाच्या किंवा समाजकारणाच्या क्षेत्रांत नजर टाकण्याची अक्कलच उरलेली नाहीं! एकाची धर्माची कल्पना व्यवहारचतुर व विश्वव्यापी, तर दुसऱ्याची व्यवहारशून्य व संकुचित; एक धिंगामस्तीच्या कामांत वाकबगार, तर दुसरा एक चफराक लगावली तर दुसरा गाल पुढें करणारा येशूचा अवतार. इहलोकींच स्वर्गसुख भोगण्याची मुसलमानांची प्रतिज्ञा, तर स्वर्गसुखासाठीं परलोकी झटपट मरून जाण्याची हिंदू धर्माची भिक्षुकी आज्ञा. असे हे दक्षिणोत्तर प्रवृत्तीचे दोन समाज धार्मिक क्षेत्रांत परमोच्च तात्त्विक भावनेनें समरस होणें कितपत शक्य आहे. याचा वाचकांनीं विचारच करावा. सारांश, सध्यां ज्या फंद फिसाटांवर हिंदी मुसलमानबांधव, स्वतःच्या नसांत नित्य खेळणाऱ्या रक्ताची ओळख विसरून, खिलाफतीसारख्या भाडोत्री धर्मकल्पनांनीं स्वतःस हिंदू समाजापासून अलग मानण्याचा आत्मघात करीत आहेत, त्याचा योग्य विचार केल्यास, हिंदू समाजालाहि तुल्यबली बनल्याशिवाय हा कृत्रिम भेदाचा भयंकर भरकटलेला वाद ताळ्यावर येणें शक्य नाहीं.

बाहेर दिसणाऱ्या भेदाचें स्वरूप हेंच काय तें खरें स्वरूप अशा कल्पनेची मनावर छाप बसूं दिली, तर प्रस्तुत वादाची चिकित्सा नीट होणार नाहीं आणि त्याचें निराकरणहि करतां येणार नाहीं. त्यासाठीं आपल्याला अंतरंगांतच प्रवेश केला पाहिजे. अखिल हिंदुस्थानांतल्या भिन्न भिन्न संस्कृतींच्या मुसलमान समाजांना वगळून, आपण खुद्द महाराष्ट्रांतल्याच मुसलमान बांधवांच्या सामाजिक, धार्मिक व सर्वसामान्य समजुतींचें परीक्षण केल्यास नामभेदाशिवाय व बाह्यांग-भेदाशिवाय हिंदुब्रुवांत आणि मुसलमान-ब्रुवांत वास्तवीक कसलाच भेद दिसून येणार नाहीं. राजकीय सत्तेच्या बळानें पूर्वीच्या अस्सल हिंदूंवर झालेल्या इस्लामी जुलूम जबरदस्तीच्या धर्मांतरांतूनच हिंदुस्थानांतला अखिल मुसलमान समाज निर्माण झालेला आहे. जबरदस्ती किंवा लांचलुचपतींनें धर्मांतर झालें म्हणजे माणसाची संस्कृती, प्रकृती, भावना किंवा हजारों वर्षे वंशपरंपरेनें रक्तांतून उत्क्रांत किंवा अपक्रांत होत आलेली ईश्वरविषयक बरीवाईट कल्पना तात्काळ समूळ नष्ट होत नाहीं. याचें प्रत्यक्ष उदाहरण म्हणजे आमचा महाराष्ट्रांतला मुसलमान समाज. त्यांतील व्यक्तिमात्रांचीं नांवें व पेहराव बदलले तर अस्सल हिंदूंत आणि त्यांच्यांत कसलाहि भेद दिसून येणार नाहीं. एवढा मोठा कडवा एकेश्वरी इस्लाम धर्म, पण आज दोन अडीज शतकांच्या अवधींत सुद्धां त्याला आमच्या या धर्मांतरित मुसलमान बांधवांच्या धार्मिक समजुतींत बाह्य सोंगाच्या बतावणीपेक्षां मुळींच कांहीं फरक घडवून आणतां आलेला नाहीं, ही गोष्ट विचार करण्यासारखीच आहे. धर्माच्या सबबीवर महाराष्ट्रांत कांहीं तुरळक ठिकाणीं जे हिंदू मुसलमानांचे दंगेअलीकडे झाले आहेत, त्यांच्या चिथावणीचीं मूळ कारणें किंवा मुसलमानांनीं वादार्थ पुढें केलेलीं कारणें, यांचे पृथःक्करण केलें, तर कोणत्याहि विवेकी व विचारी हिंदू मुसलमानाला असें प्रांजलपणें कबूल करावें लागेल कीं हीं कारणें प्राणघातक दंग्याशिवाय सुद्धां आपापसांत मिटवतां येणें शक्य होतें. हिंदूंच्या धर्माचा प्राण भजनी टाळांत किंवा वाजंत्र्याच्या सणईंत अडकलेला नाहीं, किंवा 'न तस्य प्रतिमा अस्ति' अशा निराकार, निर्गुण व स्थिरचरव्यापी अल्लाच्या प्रार्थनेचा व्याप विशिष्ट मशिदीच्या चार भिंतींत कोंबलेला नाहीं, हें तत्त्व प्रत्येक विचारवंत धार्मिकाला कबूल केल्याशिवाय सुटका नाहीं, गोवधाच्या बाबतींत, प्रत्यक्ष कुराणाचीच आज्ञा, हिंदूंच्या पौराणिक निषेधापेक्षां, मुसलमानांची कानउघाडणी करण्याइतकी सर्वसमर्थ आहे खास. अर्थात् आजपर्यंतच्या दंग्यांत 'दंगा केलाच पाहिजे' या माथेफिरू हुल्लडीपेक्षां दुसरें विशेष आदरणीय 'धार्मिक' तत्त्व सांपडणें कठीण आहे.

इतकेंच नव्हे तर दंग्यांत सामील झालेल्या शेंकडों अविचारी उनाडटप्पूंना आपण दंग्यांत सामील कां झालों याचें कारण ‘सब लोग बहार निकले, मैभी बहार पडा’ याशिवाय अधिक देतां आलें नाहीं. आधींच मुसलमानसमाज मनस्वी अशिक्षित, त्यांत विकृत धर्मकल्पनेचा मनावर पगडा बसल्यामुळें, आधींच उल्हास त्यांत फाल्गुनमास या न्यायानें, त्यांच्या आडदांडपणाला वारंवार उकळी फुटतें. बरें, आजला मुसलमान समाजांत जे कांहीं थोडे विद्यालंकृत विवेकी लोक स्पृहणीय कर्तबगारीनें पुढें आले आहेत, त्यांचा आपल्या धर्मबांधवांवर असावा तितका वचक किंवा आदर नाहीं. अल्लीबंधूंसारखें जे कोणी विद्यासंपन्न व प्रतिभासंपन्न कांहीं तुरळक विद्वान आहेत, ते आपल्या विवेकहीन धर्मवेड्या समाजबांधवांत व्यापक विचारांचा फैलाव करण्याऐवजीं, स्वतःच शिंगें मोडून वासरांत घुसतात आणि स्वतःची मानमान्यता कायम राखण्यासाठीं कुराणप्रियतेचे थेर माजवितात. सारांश, ज्या उन्नत विचारांनीं चिकित्सापूर्ण विवेकवादाचा आज सर्व जगभर फैलावा केला आहे व ज्यामुळें निरनिराळ्या धर्मपंथांतील सर्वसामान्य तत्वांचें एकीकरण करण्याची प्रवृत्ति आज उत्पन्न झालेली आहे, त्या विचारांचा लवलेशहि या विद्यालंकृत इस्लामी पंडितांना मानवूं नये, यांत अज्ञानापेक्षां कांहीं तरी विशेष गूढ डांवपेचांचें पाणी मुरत आहे, असें उघडच होतें. प्रत्येक कृतीला धर्माची मान्यता शोधण्यांत मौलवी लोक मोठे हुषार. धर्माज्ञा सांपडली नाहीं कीं ते सत्यालाहि पाठमोरे व्हायला दिक्कत बाळगीत नाहींत. २० व्या शतकांत एखादी गोष्ट मनाला पटली, पण त्याचा पुरस्कार करणारी धर्माज्ञा जर ७ व्या शतकांतल्या कुराणांत नसली, तर चांगले शहाणे-सुर्ते विद्वान् मौलवी व पुढारी त्या गोष्टीचा धिःकार करण्यांत महापुण्य समजतात. उदाहरणार्थ, स्त्रियांच्या उन्नतीचा प्रश्न आज सर्वत्र प्रामुख्यानें पुढें आला आहे. खुद्द हिंदुस्थानांत कांहीं विवेकसंपन्न मुसलमान भगिनी विद्यालंकृत होऊन देशसेवेसाठीं पुढें आलेल्या आहेत. अल्लीबंधूंच्या पूज्य व वृद्ध मातोश्रींची देशाभिमानाची उत्कट तळमळ आज त्रिलोकविश्रुत झाली आहे, त्यांची लक्षावधि मुसलमानांपुढें उदात्त विचारांची अनेक व्याख्यानें झालीं. परंतु ७ व्या शतकाच्या सांच्यांत २० व्या शतकाची दुनिया कोंबण्यांतच धर्मरहस्य पहाणाऱ्या मौलवींनीं नुकताच एक ‘फतवा’ जाहीर केला आहे कीं स्त्रियांचीं व्याख्यानें ऐकूं नयेत अशी महंमद पैगंबराची धर्माज्ञा आहे! अर्थात् यापुढें धर्मशील अल्लीबंधूंच्या देशाभिमानी मातोश्रीचीं व्याख्यानें बंदच पडलीं पाहिजेत, हें सांगणें नकोच. तेराशें वर्षांपूर्वी एखाद्या विशिष्ट धर्मप्रवर्तकानें प्रोक्त केलेल्या अनुशासनाची तेराशें वर्षांनंतर आजसुद्धां अक्षरशः अंमलबजावणी करण्याचा आग्रह म्हणजे गतानुगतिक जीर्णमतवादाचा कळस होय.

क्षेत्र सामाजिक असो, राजकीय असो, किंवा कसलेंहि असो, त्याला धार्मिक स्वरूप देण्याची वहिवाट खुद्द महंमद पैगंबरानेंच पाडलेली, मग मोपल्यांचे अत्याचार, मालेगांवचे खून, मुलतानचा निर्लज्ज धुमाकूळ किंवा गांधींच्या नॉन्कोऑपरेशनची खिलाफतशाही यांचा जो खेळखंडोबा मातला, त्यालाहि धर्माचा भरभक्कम पाया कां असूं नये?मुसलमानांनीं अशा प्रकारे सगळ्याच बाबतींत धर्माची फोडणी घालण्याचा परिपाठ ठेवला, म्हणून त्या फोडणीचें वर्म आतां कोणास उमजत नाहीं, असें थोडेंच आहे?असा हा धर्म जरी विश्वव्यापी विशाळ असला, तरी त्याचा प्रसार जुलूमजबरदस्तीच्या ‘सोज्वळ व सात्विक’ साधनांनींच अव्वल अखेर होत असल्यामुळें, त्या धर्माचें वारें अनुयायांच्या आंगच्या कातडीच्या आंत घुसलेंच नाहीं, तर त्यांत कोणी चकित व्हायला नको.हिंदुस्थानांतले ५ कोटी मुसलमान हिंदूंचे मुसलमान बनलेले आहेत, ही इतिहाससिद्ध गोष्ट धर्माचें कितीही जरतारी पांघरूण घातलें, तरी लपणें शक्य नाहीं. महाराष्ट्रांतल्या मुसलमानांची दिनचर्या पाहिली तर त्यांचा भाडोत्री किंवा बळजबरीचा धर्म अझून वरवरच तरंगत असलेला दिसतो. कातडीच्या आंत तो घुसलाच नाहीं तर अंतःकरणांत कसला भिनतो?त्यांचे हिंदू देवदेवतांचे नवस अझून सुटत नाहींत. आंगावर देवी आल्या कीं शितळादेवीची प्रार्थना सुरू होते. गांवच्या देवाचा आणि शिवेवरच्या म्हसोबाचा वर्षासनाचा वचक अझून आहे तसाच आहे. कित्येकांच्या घरचे पूर्वापार कुळस्वामींचे टांक अझूनहि भक्तिभावानें पूजले जात आहेत. साधारणतः पुरुषवर्ग धार्मिक बाबतींत सडक सीताराम

तेव्हांच बनतो; पण स्त्रियांच्या मनावर बिंबलेले बरेवाईट धर्मसंस्कार निघणें फार कठीण असतें. वेळीं बापलेकांची पुरुषी परंपरा, ते दोघे पुरुषच असल्यामुळें, कोणत्याहि संस्काराचा सोक्षमोक्ष तेव्हांच करूं शकतात; पण मायलेकींची व सूनसासवेची कल्पना-परंपरा गोषांतल्या गोषांत गुप्त रहात असल्यामुळें, बाह्य प्रदेशीं निर्गुण निराकार अल्लाचा पैगंबरी गाजावाजा केवढाहि दुमदुमला, तरी त्यांच्या जुन्या हिंदू धर्मसमजुती जशाच्या तशाच शिल्लक चालू आहेत. नुसता लग्नविधि पाहिला तरी त्यांत देखील रूखवताच्या आणि उष्ट्या हळदीच्या मिरवणुकी चालूच आहेत. बरेचसे विधि हिंदु, नांवाला एकदोन इस्लामी, असा प्रकार. या विषयावर एका उत्साही महाराष्ट्रीय मुसलमान बंधूशीं एकदां आमचें संभाषण झालें. हे चांगले इंटरपर्यंत शिकलेले आहेत. मराठी भाषा उत्तम लिहितात व बोलतात. पण ते एका खिलाफत कमिटीचे सेक्रेटरी बनले होते. गांवांतलग्नसराईची धामधूम व मुसलमान भगिनी (करवल्या) वाद्यांच्या थाटांत रूखवताचीं व आहेरांचीं शिफ्तरें घेऊन मिरवत होत्या, आम्ही म्हटलें "काय हो, *** साहेब, या सर्व तर आमच्या हिंदू लग्नाच्या पद्धति. तुम्हाला अझून कशा परवडतात?" यावर आमच्या मित्रानें दिलेलें उत्तर विचार करण्यासारखें आहे. "एकवेळ पुरुष पत्करले, पण या बायका परवडत नाहींत. हेंच प्रकार काय, आणखीं शेंकडों हिंदू रीतीरिवाज आमच्यांत उघडमाथ्यानें चालू आहेत. ठिकठिकाणच्या पंचायतींकडून ते बंद पाडण्याची आम्ही शिकस्त करीत आहोंत, पण बंद होतीलसे दिसत नाहीं. **What is bred in the bones, cannot go out of the flesh**! (हाडांतवाजलेलें कातडींतून काय कपाळ जाणार!) "सध्यां बोकाळलेला खिलाफतीचा आणि तुर्कस्थानाच्या भवितव्यतेचा प्रेमा आसेतुहिमाचल कितीहि भराऱ्या मारीत असला, तरी महाराष्ट्रीय मुसलमानांना खिलाफत ही चीज काय आहे आणि आमचे पुढारी कशाकरितां या उलट्या गोलांट्या मारण्यास आम्हांस सांगत आहेत, याचा नीटसा उलगडाच होत नाहीं. होईल कसा?तेथें जातीचें लागतें! आम्हीं तर असेंहि म्हणतों कीं महात्मा गांधींनीं खिलाफतीची तळी जर उचलली नसती, तर इस्लाम पुढाऱ्यांच्या नुसत्या फतव्या खुतब्यांनीं तुर्कस्थानाविषयींचा बळजबरीचा 'एळकोट' ओरडायला महाराष्ट्रीय मुसलमानसमाज मुळींच तयार झाला नसता. आज वास्तविक ज्यांची स्थिति 'न हिंदुर्नयवनः' अशी आहे, शिक्षणाचाहि ज्याना फारसा गंध नाहीं, शिल्लक राहिलेल्या हिंदू संस्कारांशिवाय पूर्वाश्रमींची ओळख पटविणारें विशेष कांहीं साधन ज्यांजवळ उरलें नाहीं, ज्यांना आपल्या नियुक्त पोटापाण्याच्या प्रश्नाबाहेर खुद्द महाराष्ट्राचीहि कांहीं ठळक कल्पना नाहीं, त्यांना तुर्कस्थान आणि खिलाफतीचें अवचित अलोट प्रेम फुटणें कितपत सहजसिद्ध आहे, याचा त्यांनींच विचार करावा. पण धर्माच्या नांवाखालीं वाटेल तें घडवून आणण्याची कला मुसलमानांच्या हातचा मळ होय. हिंदुलोक तत्वज्ञानापारंगत असल्यामुळें ते नेहमीं आकाशांत डोकें ठेऊन अंतराळीं चालत असतात. त्यांचें डोकें जरी फोडलें तरी धर्म वरच्यावर कायम राहतो. मोठी अजब गोष्ट! खालीं पायाखालीं कांहीहि पेटलें तरी त्यांना त्याची परवा नाहीं. मोठी अजब गोष्ट!! चिपळूण लत्त्याचीं शाळेंत जाणारीं मुलें पाहिलीं तर हिंदू कोण आणि मुसलमान कोण, हें ओळखण्याची पंचाईत पडते. आडनांवें सुद्धा अझून जोशी, साठे, चितळे आणि बापटच! पण त्यांना हिंदुधर्मात परत घेण्याची बुद्धि होत आहे का कोणाला?पहिल्या शाहूछत्रपतीबरोबर त्यांच्या तैनातींतली शेंकडों मराठे मंडळी दिल्लीहून साताऱ्यास परत आली. शाहूमहाराज राजकारणाच्या जोरावर छत्रपति बनले; पण या मराठे मंडळींना कसल्या तरी कांहीं तरी लौकिकी प्रायश्चितानें पावन करून घेण्याची खटपट कोणीच न केल्यामुळें त्यांची एक निराळीच मुसलमानवजा जात आज खुद्द साताऱ्यास आढळते. अशा रीतीनें शुद्ध हिंदू संस्कृतीच्या एका विस्तृत समाजाला हकनाहक एका परकी भिन्न संस्कृतीच्या भाडोत्री प्रेमासाठीं धर्माभिमानाचें लटकें नाटक नटविणें भाग पडत आहे, याची हिंदू धर्मियांना लाज वाटली पाहिजे. आत्मा आपल्या आवडिनें धर्माचा स्वीकार करीत असतो. राजकीय उद्देश साधण्यासाठीं धर्मांची बळजबरी बिनीला रवाना करण्यांत कितीहि धोरणी मुत्सद्देगिरी असली, तरी त्यामुळें तो बळजबरीचा धर्मविधि आत्म्याची तृष्णा भागवूं शकत नाहीं; किंवा त्यावर वंशपरंपरेनें बसत आलेले नाना प्रकारचे संस्कार नष्ट करूं शकत नाहीं.

अनुक्रमणिका

अर्थात् अशा बळजबरीचें तात्काळ निराकरण झालें नाहीं, तर त्या व्यक्तीच्या वा समाजाच्या हृदयांत परस्पर विरूद्ध संस्कृतीचा संग्राम माजून रहातो, हे निराळें सांगणें नकोच.

एतद्देशीय मुसलमान बांधवांची संस्कृती हिंदू आहे. आज चार पांचशें वर्षांत ती संस्कृती लेशमात्र पुसली गेलेली नाहीं. संस्कृतीचा संस्कार म्हणजे अंगावरील धूळ नव्हे कीं ओला चिखल नव्हे, कीं तो रुमालानें पुसता येईल! बाह्य प्रदेशीं विसंस्कृत धर्माभिमानाचें केवढेंहि प्रचंड तुफान भडकलें, तरी अंतःकरणावर उमटलेले मूळ संस्काराचे रंग त्यामुळें फिके पडत नाहींत किंवा धुतलेहि जात नाहींत. पूर्वपरंपरेला अनुसरूनच अयाचित व अनवश्यक तुर्की राजकारणाला महत्त्व देण्यासाठीं खिलाफतीची जंगी चळवळ हिंदुस्थानांत झाली. तिच्या पाणीदार टोंकाला म. गांधींच्या अनत्याचारित्वाचें बोलघेवडें टोंपडें अडकवलें; तरीसुद्धां त्या चळवळीनें आपल्या राक्षसी रुधिरप्रियतेची व अमानुष्य अत्याचाराची भूक यथास्थित भागवून घेतली ती घेतलीच! या रुधिरप्रिय खुनशी चळवळीचा आणखी दूरवर विचार केला पाहिजे. हा शुद्ध भिन्न संस्कृतींचा संग्राम आहे. बाह्यात्कारीं धर्मानुयायी बनलेल्या परंतु संस्कृतिदृष्ट्या हिंदूच राहिलेल्या हिंदी मुसलमानांच्या अंतःकरणाचे रंग धुवून पुसून काढण्याचा हा राजकारणी डावपेंच आहे. आधींच मनस्वी अशिक्षित असलेल्या हिंदी मुसलमानांच्या मनांत परकी तुर्की संस्कृतीच्या प्रेमाचा पाझर फोडून रक्तापेक्षां पाणी घट्ट असतें हें सिद्ध करण्याचा अनाठायीं उपद्व्याप आहे. याची सिद्धी कितपत होते हें आज स्पष्ट दिसत असलें तरी भविष्य काळ त्याचा पुरावा देण्यास खंबीर आहे. म. गांधींचें सात्विक महात्म्य महंमदापेक्षां किंवा येशू क्रिस्तापेक्षां कितीहि बरोबरीचें किंवा वरचढ असलें, तरी हिंदी मुसलमानांचा राजकीय उद्धार तुर्कस्थानच्या भवितव्यतेच्या कपाळाला कपाळ घासून होणार नाहीं, हें तत्व त्यांना जितकें लवकर पटेल तितकें बरें. हिंदी मुसलमान आणि तुर्की मुसलमान संस्कृतीनें तर पूर्वपश्चिमेइतके परस्परविरुद्ध आहेतच. पण राष्ट्रीय दृष्टीनेंसुद्धां एकमेकांचा सुहेर सुतकाचा संबंध नीटसा जुळून येणारा नव्हे एकधर्मीपणाच्या सरधोपट दोरीवर वाटेल त्या चळवळीच्या वावड्या आकाशांत कितीहि उंच भिरकवल्या तरी प्रत्यक्ष हिताचा प्रश्न आला कीं तुर्की तो तुर्की आणि हिंदी तो हिंदी या भेदाच्या कागदी भिंगऱ्या दोरीला चोपडलेल्या राजकारणी मांज्यानें फटाफट फाटल्या जातात, याची जाणीव हिंदी खिलाफतीष्टांना होईल तो सुदीन! एकधर्मीपणाच्या सबबीवर किंवा खिलाफतीच्या भिक्षुकशाहीवर हिंदी मुसलमानांच्या तिजोऱ्या कुंस्तुंतुनियाच्या अवाढव्य तिजोरींत मोहरांचा जर धबधबा पाडीत असतील, तर फुकटाफाकट आशीर्वादाचे शेंकडों फतवे निर्माण करून दात्यांच्या दातृत्वाचे दांत अधिकाधिक पाजळायला तुर्कीजगद्गुरूला कसली अडचण आहे?परंतु या मोहरांच्या धबधब्यांनीं हिंदी मुसलमानांच्या प्रचलित राष्ट्रीय अवस्थेची गुलामगिरी हापटून धोपटून पांढरीफेक धुतली जाईल आणि हिंदूपेक्षां त्यांच्या उन्नतीची कमान एकदोन अक्षांश रेखांश वर उचलली जाईल, अशी जर त्यांची अजूनहि समजूत असेल, तर ती फार भोळी समजूत आहे, असा इषारा त्यांना देणें आमचे पवित्र कर्तव्य आहे. तुर्की लोक आज स्वतंत्र आहेत. डार्डानेल्सवर जॉन बुल येऊन बसला, किंवा खुद्द कॉन्टांटिनोपलवर इटलीच्या पोपाचा टोप गिरक्या मारूं लागला, तरी ते आज स्वतंत्र व शस्त्रास्त्रसंपन्न आहेत. आज ना उद्यां ते त्यांचा समाचार घेतील.पण हिंदी मुसलमान?उघडा उघड मूळचे ते हिंदूच. अर्थात् अखिल हिंदुसमाज ज्या गुलामगिरीच्या कढईंत कढविला जात आहे, त्याच कढईंत त्यांचीहि अभेदभावानें बिरयाणी शिजत आहे. अशा स्थितींत हिंदी मुसलमान परकीय तुर्कांच्या तोंडाकडे पाहून आपल्या उन्नतीची आशा करीत असतील, तर वर्तमानकाळानें इषारा दिला आहे तरीसुद्धा भविष्य काळ त्यांना 'तुम्ही मोठी चूक केली' हेच उत्तर ठांसून देणार आहे.

परकी परदेशस्थ स्वतंत्र राष्ट्रांच्या दाढीला कुरवाळून त्यांच्या सहानुभूतीनें स्वतःच्या गुलामगिरीचे पाश तोडविण्याचा मोह अनैसर्गिक नाहीं. बुडत्यालाहि काडीचा मोठा आधार वाटतो. महायुद्धापूर्वी तुर्की

आणि जर्मन राष्ट्रांबद्दल हिंदी लोकांना मोठा भरंवसा वाटत असे; हिंदुस्थानच्या स्वातंत्र्य-आशेचीं सर्व किरणें या दोन घेलाशेटी राष्ट्रांवर केंद्रीभूत झालीं होतीं; आणि हिंदी गुलामांच्या तोंडाला सुटलेलें पाणी अधिक गुळमट करून वाढविण्यांत त्यांनीं कसलीहि कसूर केली नाहीं. सन १९०७-८ सालच्या बाँब प्रकरणाच्या धामधुमी असल्याच मृगजळावर भरारल्या होत्या. राजकीय अत्याचारांच्या जोरावर हिंदुस्थानाला स्वतंत्र करूं पहाणाऱ्या हजारों देशभक्तांचे (?) बुद्धिमान प्रतिनिधि जर्मन आणि तुर्की फॉरीन ऑफिसांत जेठा मारून बसले होते. सानफ्रान्सिस्को (अमेरिका) येथें सुप्रसिद्ध पंजाबी गुप्तकटवाला **हरदयाळ** यानें **घदर पार्टी** स्थापन करून गुप्तकट, खून, बंडें व अत्याचार यांना उत्तेजन देणारें जळजळीत वाङ्मय हिंदुस्थानांत गुप्त मार्गानें पाठविण्याचा धूम धडाका चालू ठेवला होता. इकडे महाराष्ट्रांत **सावरकर** बंधूंचा गुप्त कट नाशिकच्या पावन गोदावरींत आस्ते आस्ते हेंच कार्य करीत होता. सारें हिंदुस्थान अत्याचारांनीं पेटलें होतें. अखेर या मूर्खपणाचा व्हायचा तोच परिणाम होऊन, शेंकडों उमेदवार तरुण फांसावर गेले व हजारोंच्या जीविताची राखरांगोळी झाली. यांपैकीं**लाला हरदयाळ** एम. ए. या तरुणाचा जर्मन व तुर्की राष्ट्रांबद्दलचा अनुभव प्रत्येक विचारी व विवेकी हिंदु मुसलमान व्यक्तीनें मनन करण्यासारखा आहे. महायुद्धाला तोंड लागतांच या अत्याचारी देशभक्तांच्या आशेची भरती अपरंपार उसळली. हरदयाळ १९१५ मध्यें सान फ्रांसिन्को सोडून मोठ्या आशेनें जर्मनींत आला आणि फेब्रुवारी १९१५ पासून तों ऑक्टोबर १९१८ पर्यंत त्यानें जर्मनी व तुर्कस्थान यांची खरी वस्तुस्थिति प्रत्यक्ष पाहिली. डोंगर नेहमींच दुरून साजरे दिसतअसतात; पण प्रत्यक्ष अनुभव अगदींच निराळा व निराशाजनक असतो. ४४ महिन्यांच्या अनुभवानें हरदयाळचे डोळे लख्ख उघडले आणि सन १९०७ मध्यें गुप्त कटाच्या बंडाळीवर इंग्रजांना हिंदुस्थानांतून हांकलून देण्याच्या वल्गना करणारा बोलघेवडा देशभक्त हरदयाळ अगदीं उलट मनोवृत्तीचा विवेकी माणूस बनला! त्याने तात्काळ **Fortyfour months in Germany and Turkey** (जर्मनी व तुर्कस्थानांतील माझे ४४ महिने) या नांवाचें एक इंग्रजी पुस्तक लिहिलें व तें **P. S. King & Son Ltd., Orchard House, Westminster,**या कंपनीनें प्रसिद्ध केलें. या उत्कृष्ट ग्रंथाकडे जावें तितकें कोणाचें लक्ष गेलें नाहीं; कारण सर्व हिंदुमुसलमान हिंदवासी म. गांधींच्या असहकारितेचें तुणतुणें वाजवून अवघ्या ९ महिन्यांत खादीच्या जोरावर स्वराज्याची गादी प्राप्त करून घेण्याच्या गडबडींत होते. जर्मनी व तुर्की राष्ट्रांना वेळोवेळी हिंदुस्थानाचा पान्हा कां फुटत असे, त्या पान्हाला हिंदी अनार्किस्ट तरुण कसे फसले आणि या दोन राष्ट्रांची वास्तविक स्थिति, त्यांची संस्कृति, त्यांची राजकीय महत्वाकांक्षा आणि ती साधण्यासाठीं अहर्निष चाललेले गुप्त डांवपेंच काय आहेत, यांचा खुलासा प्रत्यक्ष अनुभवानें लाला हरदयाळ यानें या बोधप्रद ग्रंथांत केला आहें.या पुस्तकांत जे लिहिलें आहे तें "मी स्वतःच्या खास अनुभवानें लिहीत आहें. ग्रंथांचे किंवा वृत्तपत्रांचे उतारे देण्याची मला जरूर नाहीं. स्वतःच्या डोळ्यांनीं मी जें पाहिलें व स्वतःच्या कानांनीं मी जें ऐकलें, तेंच मी येथें नमूद करीत आहें." असा हरदयाळनें प्रस्ताव केला आहे. शेंकडों भिकारड्या इंग्रेजी नवलकथांचीं मराठी भाषांतरें करण्यांत आमचा दखनी लेखकवर्ग गुंतलेला असतो. त्यांपैकीं एखाद्यानें हरदयाळच्या या ग्रंथाचें मराठी भाषांतर करून छापलें असतें तर हिंदूंपेक्षां आमच्या महाराष्ट्रीय मुसलमानभाईंचीं व्यर्थ दिशाभूल झाली नसती खास. असो. जर्मनीबद्दल हरदयाळ म्हणतो कीं "जर्मनांची बुद्धिमत्ता २० व्या शतकाला शोभेशी आहे खरी, पण सामाजिक व राजकीय दृष्ट्या ते अझून मध्ययुगांतच आहेत." तुर्की आणि तुर्कस्थान यांविषयीं त्याची मतें हिंदुस्थानांतल्या प्रत्येक विचारशील मुसलमानानें निदान आतां तरी विचारांत घेणें जरूर आहे. खालीं दिलेले विचार लाला हरदयाळचे आहेत. त्यांत आमच्या पदरचें कांहीं नाहीं, हें सर्वांनी नीट लक्षांत घ्यावें. हरदयाळ म्हणतो:—

(१) राष्ट्रदृष्टीनें अखिल इस्लामी जगाचा पुढारपणा घेण्यास तुर्की लोक अझिबात नालायक आहेत. संस्कृति व राजकीय कर्तबगारी यांचा गंधसुद्धां त्यांना नाहीं. ज्या वेळीं तुर्कांच्या हातीं खिलाफतीची

सत्ता गेली, त्याच वेळीं इस्लामी जगाचें दुर्दैव ओढवलें. तुर्कलोक बेअक्कल आहेत, यांत मुळींच शंका नाहीं. ते चांगले लढवय्ये आहेत; पण राज्यकारभार चालविणें किंवा त्याची घटना करणें हें त्यांना मुळींच अवगत नाहीं. कित्येक शतकेपर्यंत ते अफाट प्रदेशाचे स्वामी आहेत; पण इतक्या अवधींत नांव घेण्यासारखें वाङ्मयसुद्धां त्यांना निर्माण करतां आलेलें नाहीं.
[पृ. ३१]

(२) तुर्कांना गायनविद्या किंवा तर्कशक्ति यांचाहि गंध नाहीं; याचें कारण मानसिक उत्क्रांतींत ते अगदींच खालावलेले आहेत. त्यांनीं ग्रीसवरहि राज्य केलें. पण आपल्या ग्रीक प्रजेपासून ते कांहींहि नवीन शिकूं शकले नाहींत. खरें म्हटलें तर ग्रीक भाषा म्हणजे उच्च ज्ञान व उच्च संस्कृति यांची गुरुकिल्ली; पण ती या बेट्यांना काय होय? [पृ. ३२]

(३) इतिहासानें हडसून खडसून सिद्ध केलें आहे कीं, तुर्की लोकांना बुद्धीचे आकलन करण्याची बीजरूप शक्तीच नाहीं. त्यामुळें ते कसल्याहि प्रकारच्या पुढारपणाला सर्वतोपरी नालायक ठरले आहेत, कारण पुढाऱ्यांचें पुढारपण बौद्धिक श्रेष्ठताच सिद्ध करीत असते; आणि तुर्कांत तर तिचा खडखडाट! अर्थात् इजिप्शियन्स किंवा इंडिअन्स (हिंदी) लोकांसारख्या सुसंस्कृत लोकांनीं या तुर्क लोकांच्या पुढारपणाच्या नादाला लागावें तरी कसें?तुर्क हा नालायक नेता आहे. त्याला त्याचा इलाज नाहीं; कारण तो जात्या मानसिक दृष्ट्याच मुळीं अवनत आहे. तुर्कांविषयीं एक इजिप्शिन गृहस्थ मला म्हणाले "या तुर्कांना दोनच गोष्टी अवगत आहेत. एक **लढाया** आणि दुसरी **मशिदी.**" [पृ. ३३]

(४) तुर्कांची राजसत्ता भयंकर अनीति, जुलूम जबरदस्ती आणि घाशीरामी यांचें मूर्तिमंत चित्र होय. मुसलमान प्रजा असलेल्या देशावरीलच तुर्की राज्यकारभाराविषयीं मीं हें लिहित आहें. ऐदीपणा व आंगसुस्ती हीं तुर्काधिपतीचीं मुख्य धोरणें व लक्षणें. एवढें छोटेखानी सीरिया, पण तेथेंहि यांना नीट राज्य करतां आलें नाहीं; आणि हे तुर्क लोक म्हणे इतर इस्लाम देशांना स्वयंशास्ते बनविण्यास मदत करणार! बर्लिन येथील एका इस्लाम वैद्याला मी एकदां सहज विचारलें कीं "कायहो, सीरियांत हा असला सांवळागोंधळ कां? तुर्की सरकारला चांगली खंबीर पोलिसांची सेना तेथें ठेवतां येत नाहीं काय?" त्यानें उत्तर दिले "होय. पण जेथें पोलिस खात्याचा वरिष्ठ अधिकारीच चोर लुटारूंचा साथिदार, तेथें काय व्यवस्था राहणार?" [पृ. ३३-३४.]

(५) तुर्कलोक हे जात्याच रानटी असल्यामुळें, त्यांच्या नशिबाशीं आपल्या दैवाचें संगनमत करण्यांत इजिप्ती व हिंदी मुसलमान मोठी घोडचूक करीत आहेत. शांतिप्रिय आर्मेनियन व ग्रीक लोकांच्या सर्रास कत्तली करणें आणि खुद्द पोलिस अधिकाऱ्यांच्या खास परवानगीनें शेंकडों ग्रीक अबलांचे पातिव्रत्य भ्रष्ट करणें यासारखीं राक्षसी व नीच मनोवृत्तींचीं दुष्कृत्यें तुर्कांनीं किती तरी वेळां केल्याचे दाखले आहेत. इस्लाम धर्म इस्लाम धर्म म्हणतात तो जर हाच असेल, तर माझ्या ७ कोट हिंदी मुसलमान भाईंच्या धर्माबद्दल मला अतिशय लज्जित होणें प्राप्त आहे. असल्या या अर्धवट रानटी तुर्कांच्या नादीं लागल्यामुळें इजिप्ती व हिंदी मुसलमान लोकांविषयीं पाश्चिमात्य जगाची सहानुभूती पुष्कळच कमी झालेली आहे. ... ...सुसंस्कृत जगाच्या कारभारांत आपल्या हिंदू देशबांधवांच्या हातांत हात घालून जर हिंदी मुसलमानभाईंना पडावयाचें असेल तर आधीं त्यांनीं या तुर्की लफड्यांतून आपलें अंग पूर्णपणें काढून घेतलें पाहिजे. कत्तली व जुलूमजबरदस्ती यांच्या जोरावर राज्य करण्याची तुर्की पद्धत विवेकी तर नाहींच नाहीं, पण तिला इस्लामीसुद्धां म्हणता येणार नाहीं. चेंगीझखान व हलाकु यांना शोभण्यासारखी ती एक शुद्ध

गाळीव रानटी प्रवृत्ति आहे. हें लोक सुवेझच्या पूर्वेला राहतात व इस्लाम धर्म (?) पाळतात, एवढ्याच सबबीवर या खुनशी लोकांशीं आम्ही संगनमत करणें केव्हांहि श्रेयस्कर होणार नाहीं. इजिप्ती आणि हिंदी मुसलमानांनीं आपली खरीखुरी स्थिति नीट ओळखून, या मध्य आशियाच्या लुटारूंशीं कसलाही संबंध ठेवतां कामा नये. [पृ. ३५.]

(६) 'पॅन-इस्लामीझम' (जगांतलें सगळे मुसलमान एक ही भावना) म्हणजे गेल्या शतकांतला एक मोठा विचित्र व चमत्कारिक फार्स आहे. याचा अर्थ काय? तर एवढाच कीं इतर मुसलमानी राष्ट्रांनीं तुर्कांचे स्तुतिपाठ गावे, त्यांची वरिष्ठ सत्ता मान्य करावी आणि प्रत्येक मुसलमानी राष्ट्रातल्या कांहीं थोड्या धाडसी व दांभिक लोकांनीं तुर्की सरकारचा दरमहा १० ते ५० पौंडांचा मलीदा खाऊन इस्तंबूलमध्यें भटकत असावें. ... ... . तुर्क कट्टे जात्याभिमानी आहेत. ते स्वजातियांशिवाय इतरांची केव्हांहि पर्वा न करणारे आहेत. जावा ते सेनेगालपर्यंत पसरलेल्या कोट्यावधि मुसलमानांच्या भानगडींत व नशीबाच्या सहाऱ्यांत त्यांना कसलीहि कळकळ वाटत नाहीं. ... ... आपण इस्लामी धर्माचे नेते, पवित्र मंदिराचे संरक्षक आणि खिलाफतीचे वारसदार आहोंत, असें इस्लामी जगाला भासवून त्यांची सहानुभूती आणि खिशातला पैसा उपटण्याची त्यांची खटपट असते. दरमहा कांहीं थोड्या पौंडांचा खुराक चारून, त्यांनीं कित्येक इजिप्ती, अलजीरी, टूनिशी, सुदानी आणि इतर देशांतील मुसलमानी स्तुतिपाठकांना हाताशीं धरलें आहे आणि तुर्कस्थान व तरुण तुर्क पार्टीच्या बोलबाल्याचा पॅनइस्लामीझमच्या सबबीवर सर्वत्र प्रसार करण्याचें काम चालविलें आहे. परंतु कोणत्याहि सामान्य कार्याकरितां आजपर्यंत यांनीं काय स्वार्थत्याग केलेला आहे? ...... तुर्कांना इस्लाम धर्माचे पुढारी मानून त्यांच्यावर आपल्या सहानुभूतीची उधळपट्टी करण्यापूर्वी, आपण भलत्याच खोट्या फिसाटाच्या मागें लागलों आहोंत, याची इजिप्ती आणि हिंदी मुसलमानांनीं जाणीव ठेवावी. गेल्या बाल्कन युद्धाच्या वेळीं हिंदी लोकांनीं पाठविलेले लाखों रुपये आपल्या खिशांत ठेवायला तुर्कांना कांहीं जड वाटलें नाहीं; आणि त्याच्या मोबदला त्यांनीं काय पाठविलें?तर एक साधीच परंतु **पवित्र सतरंजी** आणि आभारदर्शक संदेश. याला खर्च तो किती येणार?आज लक्षावधि मुसलमान मजूर या हिंदुस्थानांत उपासमार भोगीत आहेत. त्यांना या लाखों रुपयांच्या देणगीनें केवढी बरें मदत झाली असती?पण तेवढें कांहीं या देणगीवाल्यांना सुचलें नाहीं. प्रथमआपलें घर सुधारलें पाहिजे, ही गोष्ट विसरतां कामां नये. परंतु स्वदेशांतल्या स्वधर्मीयांच्या अडीअडचणींकडें दुर्लक्ष करणें, पण हिंदुस्थानाबाहेरील वाटेल त्या फिसाटाबद्दल जीव टांकणें म्हणजे कित्येक मुसलमानांना ही एक फॅशनच वाटते. पॅनइस्लामिझमच्या ढोंगधत्तुऱ्याचा हा परिणाम आहे. मी अगदीं या प्रकरणाच्या मुळाशीं राहून तपास केला, त्यावरून मी असें खात्रीनें म्हणूं शकतों कीं पॅनइस्लामिझम म्हणजे अंधश्रद्धाळू मुसलमानांना ठकविण्याचा शुद्ध ढोंगधत्तुरा व कपटी कावा आहे. [पृ. ३६-३८]

(७) हिंदुस्थान, इजिप्त, जावा आणि इराण येथील मुसलमानांनीं, खिलाफतीच्या स्वप्नांत गुंग न रहातां, आपल्या स्वतःच्या देशांचे राजकारण व्यावहारीक दक्षतेनें ठाकठीक बसविण्याचा उपक्रम केला पाहिजे. इस्तंबूल म्हणजे घाण, मेलेलीं कुत्रीं आणि कारस्थानी लुच्चांचें केवळ आगर आहे. या बाबतींत दुरून मात्र डोंगर साजरे दिसतात. प्रत्येक मुसलमान राष्ट्रानें आपापल्यापरीं आपल्या राष्ट्राची पुनर्घटना केली पाहिजे; इतर स्वधर्मी राष्ट्रांशीं खुशाल सहानुभूतीनें वागावें. परंतु जगाच्या ज्या कोंपऱ्यांत आपला जन्म झाला आहे, त्या मायदेशांतच प्रत्येक मुसलमान बांधवाचें कर्तव्यक्षेत्र आहे, हे कोणीहि विसरतां कामां नये. [पृ. ४९]

लाला हरदयाळच्या ग्रंथांतून असले अनेक स्पष्टोक्तीचे उतारे खच्चून भरले आहेत. वाचकांना शितावरून भाताची परीक्षा सहज करतां येईल. आमच्या महाराष्ट्रीय मुसलमान बाधवांना वरील उतारे विचार-क्रांतिकारक वाटल्याशिवाय खास रहाणार नाहींत. जसें दिसतें किंवा भासतें तसें नसतें, म्हणूनच माणूस फसतें, या म्हणीची सूचना त्यांना देणें अवश्य आहे. शेवटीं हरदयाळचा एकच उतारा खालीं देऊन आम्ही या मुद्याची रजा घेतों:—

(८) 'जुनी शिस्त बदलते क्रमानें नवीस जागा द्याया' हें सनातन तत्व आहे. खिलाफतीचाहि एक (बोलबाल्याचा किंवा आवश्यकतेचा) काळ होता. इतिहासाचा ओघ कधीं माघारा उलटत नसतो. कांहीं विशिष्ट राजकीय घटनेशीं इस्लाम धर्माची सांगड बांधण्याचे दिवस आतां गेले. क्रिस्ती शकाच्या विसाव्या शतकांत आपण आहोंत; हें कांहीं आठवें शतक नव्हे! खिलाफत आणि जिहाद या मध्ययुगीन चिंध्यांचा मुसलमानांनीं आतां त्यागच केला पाहिजे. जगाच्या धांवत्या प्रागतिक ओघांत इस्लाम धर्मसुद्धां जाणार; कारण या ओघाला इस्लाम हिंदु किंवा बौद्ध यांची थोडीच पर्वा आहे?मुसलमानांनी आतां अर्वाचीन बनण्याची व पाश्चात्य जगाच्या कल्पना व ध्येयें आंगीं पचविण्याची शिकस्त केली पाहिजे. मानवतेच्या उत्क्रांतीच्या घुरीणपणाचा मान आज युरप व अमेरिकेला आहे; आरबस्थान, मेसापोटेमिया किंवा तिबेटला नव्हे. भविष्य काळाकरितां नवीन जग आणि नवीन स्वर्ग तयार होत आहे; मात्र तो जुन्यापुराण्या फाटक्या तुटक्या धर्मतत्वांवर किंवा मतांवर उभारला जाणारनाहीं. अर्वाचीन विचारांचा परिपाक करण्याचा अग्रमान आतां सुशिक्षित इस्लाम बांधवांनीं घेतला पाहिजे. कित्येक शतकांपूर्वी जे विधि किंवा मोक्षसाधनांचे मार्ग थोर आणि जागृत समजले जात असत, त्यांवर जगण्याचा काळ आतां राहिलेला नाहीं. धर्मप्रचारक महात्मे येतात आणि जातात; (आजपर्यंत शेंकडों आले आणि शेंकडों गेले) परंतु सत्याचा व नीतीचा पाठलाग करणारी जनता प्रगतिपथानें धूम ठोकीत पुढें पुढें जातच आहे. माझ्या मुसलमान बाधवांनींहि चालू काळाशीं समगामी होऊन प्रगतीच्या मार्गावर पुढें सरसावलें पाहिजे आणि भूतकालीन रक्तानें बरबटलेल्या किल्लीनें भविष्यकाळचे दरवाजे उघडण्याचा यत्न त्यांनीं करतां कामां नये.

या उपदेशांत नवयुगाचा दिव्य संदेश आहे. जीर्णमताच्या फाटक्या तुटक्या चिंध्या पांघरून सद्यःकालीन नवयुगांत कोणाचाहि धर्मसंसार किंवा राष्ट्रसंसार चालणार नाहीं. नागव्या तलवारीच्या धमकीवर धर्मप्रसार करण्याची मुत्सद्देगिरी प्रतिपक्षाच्या भोळसट मनोवृत्तींमुळें एका काळीं कितीहि यशस्वी झालेली असली, तरी तीच युक्ती या विसाव्या शतकांत उपयोगांत आणतांच नागव्या तलवारीला नागव्या तलवारीचें प्रत्युत्तर मिळाल्याशिवाय खास रहाणार नाहीं. असे होऊं लागलें म्हणजे या परस्पर वैराला राक्षसी युद्धाचें स्वरूप येऊन, धर्माच्या उज्ज्वलपणाचाहि शेणसडा झाल्याविना कसा राहील?अलीकडे खिलाफतीच्या भाडोत्री ढोंगामुळें अखिल मुसलमान समाजांत जें एक अत्याचाराचें घाणेरडें वारें वाहूं लागलें आहे, त्याचा सरळ अर्थ एवढाच निघतो कीं ८ व्या शतकांतल्या साधनांनी ते २० व्या शतकात तसल्याच तामसी विजयाची अपेक्षा करीत आहेत. काळ बदलत असतो, मानवी जीवन व मानवी कल्पनाहि बदलत असतात आणि धांवत्या काळाबरोबरच धर्मकल्पनांचाहि खराखोटेपणा कसाला लागून त्याचा चुराडा उडत असतो, हीं साधीं तत्वें सुद्धां ते विचारांत न घेण्याइतके विवेकशून्य बनलेआहेत. धर्मप्रसारक महंमद पैगंबरानें आपल्या पवित्र कुराण शरीफांत नीतीचीं कितीहि उदात्त तत्वें नमूद करून ठेवलीं असलीं, तरी मुख्य आक्षेप पुढें येतो तो हाच कीं ती तत्वें खुद्द पैगंबरानें व त्याच्या अनुयायांनीं प्रत्यक्ष आचरणांत कितीशीं आणलीं?नुसत्या तत्वांचा चांगुलपणा व्यवहारांत प्रत्यक्ष घडणाऱ्या अत्याचारांची वकीली करण्यास कितपत टिकेल, याचा विचारवंत मुसलमान बांधवांनींच वास्तवीक विचार केला पाहीजे. आमचे महाराष्ट्र भाषाभिमानी इस्लामबंधु श्रीयुत सिकंदर लाल आतार हे आतां इस्लाम धर्म नांवाचें एक त्रैमासिक संपादन

अनुक्रमणिका

करीत असतात. त्यांच्या हेतुंबद्दल त्यांचा गौरव करणें उचित आहे. जानेवारी १९२३ च्या अंकांत (पृ. २३) ‘कुराण शरीफांतील युद्धनीति’ या मथळ्याखालीं ते खालीलप्रमाणें खुलासा करतातः—

“एका हातांत कुराण व दुसऱ्या हातांत तरवार घेऊन धर्माचा प्रसार करणें चांगलें, अशी नीति कुराणांत सांगितलेली नाहीं. मुसलमानांनी आपल्या धर्माचा प्रसार केला पाहिजे, असा उपदेश त्यांत केला आहे खरा, पण तो प्रसार तरवारीच्या जोरावर करण्यास सांगितलेला नसून तो उपदेशाच्या मार्गानेंच करण्याविषयीं त्यांत आज्ञा आहे. ‘आणि तुमच्या मधून असा एक संघ निर्माण झाला पाहिजे कीं, त्यांनीं (लोकांना) मंगलमय मार्गाकडे वळविलें पाहिजे. त्यांना सत्कर्मांच्या आज्ञा केल्या पाहिजेत व त्यांना अयोग्य (?) कृत्यांपासून परावृत्त केलें पाहिजे. असे लोक संसारापासून अगदीं अलिप्त असे असले पाहिजेत (सुरहू आल् इमरान्, र. ११).”

“परंतु धर्माच्या कामांत सक्ती करणें अगदीं गैर आहे. ‘धर्माच्या कामांत सक्ती नाहीं. खरोखर चुकीच्या मार्गापासून परावृत्त करून सन्मार्गाला लावण्याकरिता धर्माचा अवतार झाला आहे.’ (सुरहू बकरहू, र. ३४)

आणि जर तुमच्या प्रतिपालकानें अशी इच्छा केली असती, तर पृथ्वीमध्यें जे लोक रहात आहेत ते एकदमच सगळे एकाच पंथांत समाविष्ट झाले असते; तेव्हां जोंपर्यंत (धर्म?) लोकांच्या विश्वासास पात्र झाला नाहीं, तोंपर्यंत तुम्ही सक्ती करून काय उपयोग?” (सुरहू युनुस्, र. १०)

हे विचार तर ठीक आहेत; पण खुद्द पैगंबर व त्याचे अनुयायी यांचा धर्मप्रसारार्थ आटारेट्याचा आचार कसा काय झाला, याची साक्ष इतिहासावरून काय पटते? ‘एका हातांत कुराण आणि दुसऱ्या हातांत तरवार’ ही काय केवळ थट्टेची म्हण अस्तित्वांत आली आहे, असें तर श्री. आतार यांचें म्हणणें नाहीं ना?कुराण शरीफांत काय लाख गोष्टी असतील, नाहीं कोण म्हणतो?पण त्या जर स्वतः पैगंबरानेंच कधी मानल्या नाहींत, तर अनुयायांनीं त्यांची पर्वा कां करावी?आणि त्यांच्या सात्विकपणावर इतरांनी तरी विश्वास कां ठेवावा? इस्लामधर्मीयांनीं तलवारीच्या धमकीवर व अमानुष अत्याचारांवरच हिंदुस्थानांत मुसलमान निर्माण केला, हें ऐतिहासिक सत्य आहे. सात्विक वृत्ति आणि अनत्याचार या दोन गोष्टींचें इस्लाम धर्माला अगदीं वावडें आहे, असें छातिठोक विधान करण्यापुरता पुरावा वाटेल तितका आहे. जुन्या पुराण्या अंधाऱ्या युगांतल्या गोष्टी वादग्रस्त म्हणून सोडल्या, तरी चालू घडीला सुद्धां अत्याचारी इस्लाम धर्माची वृत्ति केवढी भयंकर बोकाळलेली आहे, हें श्री. आतारांसारख्या हिंदुसंघांतूनच निर्माण झालेल्या मुसलमान गृहस्थाला दिसतच नाहीं का? अलीकडे हरहमेश घडून येणारे दंगे सोडले आणि एकटें मोपल्यांचें बंड घेतलें, तरी इस्लामी अत्याचारानें लज्जित न होणारा मुसलमान (कुराण शरीफांतील पवित्र वाक्यांवर त्याचा विश्वास असेल तर!) मुसलमानच नव्हे! परंतु मोठ्या आश्चर्याची गोष्ट हीच कीं, मोपल्यांच्या किंवा इतर ठिकाणच्या अत्याचारी मुसलमान बंडखोरांचा निषेध करणारा एकही सच्चा पैगंबरभक्त अझून पुढे आलेला नाहीं, किंवा खिलाफतसंघ, मुस्लीम लीगसारख्या जबाबदार संस्थानींहीं त्याविरुद्ध चुकून ब्र काढला नाहीं. हिंदुमुसलमानांची ही एकीमोठी विलक्षण खरी!! पण जेथें हिंदू पुढारीच नामर्द, षंढ आणि बेशरम बनले आहेत, तेथें मुसलमान पुढाऱ्यांनीं तरी माफीची तोंडवाफ हकनाहक कां दवडावी?शिवाय मोपल्यांचे अत्याचार त्यांनीं ‘केवळ धर्माभिमानासाठींच केले.’ असें खुद्द महात्मा गांधीचेंच त्यांना सर्टिफिकीट! मग काय विचारतां?

अनुक्रमणिका

मोपल्यांचे बंड असहकारवादाने व खिलाफतीच्या चळवळीमुळेंच उत्पन्न झालें, ही गोष्ट आतां हडसून खडसून सिद्ध झाली आहे. या बाबतींत मुसलमान लोक जितके जबाबदार आहेत, त्यापेक्षां अधिक जबाबदार गांधी व अल्लीबंधू आहेत. या बंडांतले अत्याचार इतके घाणेरड्या व मनःसंतापकारक रीतीचे आहेत कीं, त्यांना कोणतें विशेषण लावावें, याची मोठी पंचाईत पडतें. फार खेदाची गोष्ट कीं मलबारांत अमानुष अत्याचारांचा सारखा धुमधडाका उडाला असतांही, महाराष्ट्रांतले सर्व 'राष्ट्रीय' पत्रकार अगदीं मूग गिळून बसले होते. इतकेंच नव्हे तर, मलबारांत आल्बेल आहे. बंडाच्या कंड्या असहकारद्वेष्टे उगाच उठवीत आहेत, अत्याचाराच्या हकिकती निव्वळ गप्पा आहेत, अशा प्रकारच्या भुलभुलावणीने या हरामखोर निर्लज्ज राष्ट्रीय पत्रकारांनीं लोकांची दिशाभूल केल्याचें अत्यंत निंद्य पातक केलें आहे. पंजाबच्या कत्तलीवर कमिशन बसवून, तेथल्या अत्याचारांच्या लहानमोठ्या सर्व हकिकती रिपोर्टद्वारें प्रसिद्ध करणारी या असहकारवादी राष्ट्रीयांची निस्पृहता, मलबारच्या मुसलमानी अत्याचारांची चौकशी करण्याच्या कामीं कां ठार मेली?सार्वजनिक हिताच्या कळकळीचा असला नामर्द देखावा फक्त हिंदुस्थानाखेरीज जगांत इतरत्र दिसणें शक्य नाहीं. वाचकांसाठी मोपल्यांच्या अत्याचारांचे अल्पस्वल्प चित्र रेखाटणारे कांहीं उतारे खालीं दिलें आहेत. त्यांवरून मलबारच्या हिंदुंभगिनीबांधवांच्या हालअपेष्टांची त्यांना कल्पना होईल.

(१) या बंडाच्या धामधुमींत हजारों हिंदू अत्यंत क्रूर रीतीनें ठार मारले. कित्येकांचीं जिवंतपणी आंगांचीं कातडी सोलून काढण्यांत आलीं. हजारोंना प्रथम त्यांच्याच हातांनी स्वतःकरतां थडग्यांचे खाडे खोदण्यास लाऊन मग त्यांची कत्तल करण्यांत आली. स्त्रिया—पडद्यांतील स्त्रियांवर राक्षसी बलात्कार करण्यांत आलें. हे बलात्कार केवळ तात्कालीक विकारांच्या उमाळ्यानें करण्यात आले नसून, त्यांच्या अब्रूचा विचका पद्धतशीर रीतीनें एकामागून दुसरा अशा अनेक नरधमांनी अत्यंत अमानुष रीतीनें केला! हे सर्व प्रकार इतके चित्तक्षोभकारक झाले कीं, त्यांना इतिहासांत दुसरी तोडच सांपडणें शक्य नाहीं. हजारों हिंदू जुलमानें बाटविले. हे सर्व प्रकार कशा करितां झाले? तर खिलापतीच्या नांवानें खिलापत चळवळ वाढविण्यासाठीं; आणि हे सर्व परिणाम गांधी व शौकतअल्ली यांनीं खिलाफत सभा स्थापण्यासाठीं मलबारला दिलेल्या भेटीमुळेंच घडून आले. त्यांना सरकारचा काहीही विरोध न झाल्यामुळें त्यांनीं आपल्या खटपटी खुशाल उघड माथ्यानें चालविल्या. खिलाफत-चळवळ्यांना पायबंद लावण्याच्या कामीं मद्रास सरकारचा हिंदुस्थान सरकारनें इनकार केला; अर्थात् हे सर्व अत्याचार प्रत्यक्ष करण्यास उत्तेजन देण्याइतक्याच पापाचें वाटेकरी हिंदुस्थानसरकार आहे. **(श्री. शंकरन् नायर कृत 'गांधी ॲन्ड अनार्की'**पृ. १००)

(२) टैम्स ऑफ इंडियाचा बातमीदार कालीकतहून ता. ७ सप्टेंबर १९२१ रोजीं 'राक्षसी अत्याचार' सदराखालीं लिहितो:— मलबारांत खिलापती व असहकारवादी चळवळ्यांनीं आपल्या माथेफिरू व भयंकर डांवपेचांनीं निर्माण केलेल्या धामधुमीनें, एरनाड वल्लुवनद वगैरें ठिकाणी बंडाची आग कशी भडकली व लुटालुट खून व जुलमी बाटवाबाटवीचे अत्याचार मोपल्यांनीं कसे केले, त्याच्या कारणाची मिमांसा पहिल्या पत्रांत केली. या पत्रीं त्या अत्याचारांचें स्वरूप व तपशील देत आहें. प्रत्यक्ष अनुभवाच्या ज्या हकिकती मी नमूद करीत आहे, त्यांवरून सर्वसाधारण बुद्धीच्या प्रत्येक हिंदूलाही स्पष्ट पटेल कीं मोपल्यांनीं चिळस आणणारे माथेफिरूपणाचे जे जे अत्याचार केले, त्यांच्या मुळांशी आपमतलब द्रव्याची लालसा आणि सत्तेची हांव याच गोष्टी होत्या. जीव घेऊन पळालेले लोक किती तरी भयंकर अत्याचारांच्या हकीकती सांगत आहेत. तरूण व देखण्या नायरकन्या व उच्च जातीय तरूणींना त्यांच्या आईबाप व नवऱ्यांपासून जुलमानें ओढून नेऊन, या (पाषाणहृदय) बंडखोर मोपल्यांनीं त्यांची सर्व वस्त्रें फाडून टांकलीं व त्यांना आपल्यासमोर नागव्या उघड्या चालण्यास लाविले आणि अखेर सर्वांनीं त्यांच्यावर बिनदिक्कत बलात्कार

अनुक्रमणिका

केले. कांहीं ठिकाणीं तर या नराधमांनीं आपली माणुसकी विसरून, पाशवी कामवासनेच्या तृप्तीसाठीं बारा बारा इसमांनी एकेका तरूणीची इज्ज़त घेतली. कित्येक सुंदर हिंदू स्त्रिया पकडून त्यांना जुलमानें बाटविण्यात आलें, त्यांच्या कानांना (मोपला पद्धतीप्रमाणें) भोंकें पाडण्यांत आलीं, त्यांना मोपलास्त्रियांचा पोषाक दिला आणि त्यांना आपल्या तात्पुरत्या बायका बनविल्या. हिंदू अबलांना धमकावणें, त्यांना त्रास देणें आणि अर्ध्या वस्त्रानिशी त्यांना हिंस्त्रपशूंनीं गजबजलेल्या रानांवनांत जीव घेऊन पळावयास लावणें, ही तर मोपल्यांची सहज लीला होय. प्रतिष्ठित हिंदू गृहस्थांना जुलमानें बाटवून, कित्येक मुसलियर व थंगलांच्या साहाय्यानें त्यांचें सुंताविधि करण्यांत आले. हिंदुंचीं हजारों घरें लुटलीं व जाळलीं. हिंदु-मुसलमान एकीचीं किती हीं घाणेरडीं बेशरम चित्रें! आणि याच एकीचें तुणतुणे खिलाफतवाले आणि नॉन्कोऑपरेशनवाले वाजवीत होते ना?छिनाल हलकट मोपल्यांनी हिंदुतरूणींना आपल्यासमोर नागव्याउघड्या स्थितींत धांवण्याचीं बळजबरी करावी, या हृदयविदारक स्थितींचे दृश्य कोणीहीं अब्रूदार हिंदू गृहस्थ विसरणार नाही किंवा तें त्याच्या स्मृतिपटावरून खोडलेंहीं जाणार नाही. उलटपक्षीं मोपलास्त्रीवर एखाद्या हिंदुने हात टाकल्यांचें उदाहरण मला मुळीच आढळण्यांत आलें नाहीं.

[३] न्यू इंडियांच्या २९ नवंबर १९२१ च्या अंकात मिसेस (आतां डॉक्टर) ॲनी बेझंट 'मलबारच्या वेदना' या मथळ्याखाली लिहितातः— गांधींना कोणी तरी या वेळीं मलबारांत घेऊन येईल तर बरें होईल. म्हणजे त्यांच्या स्वतःच्या व त्यांचे 'प्रियकर बंधू' मंहमद अल्ली व शौकत अल्ली यांच्या व्याख्यानांनीं घडून आलेले राक्षसी अत्याचार त्यांच्या स्वतःच्या उघड्या डोळ्यांना दिसतील ...... मुंबईच्या पार्शी स्त्रियांची वस्त्रे (उनाड बंडखोरानीं) फाडल्यामुळें गांधीच्या मनाला मोठा धक्का बसला,हें योग्यच झाले. विलायती कपडे वापरणें हें पातक आहे असें या 'देवभीरू' टोळभैरवांना शिकविलें असल्यामुळें, (पार्शी अबलांचे वस्त्रहरण) हें त्यांना मोठें धार्मिक कृत्य वाटलें असेल! पण इकडे मलबारांत हजारों स्त्रिया नुसत्या चिंध्यांवर आपली अब्रु बचवीत आहेत, घरादारांना मुकल्या आहेत. त्यांची धांवपळ चालली असतां वाटेंत जन्मलेलीं त्यांचीं मुलें तात्पुरत्या उघडलेल्या आश्रयस्थानांत कशीं बशीं जगत आहेत, त्यांच्याबद्दल गांधीना थोडासा तरी करूणेचा द्रव येईल काय? मलबारस्थ हिंदू अबलांची करूणकहाणी वर्णन करतांच येणें शक्य नाहीं. रडून रडून डोळे सुजले आहेत, भीतीनें क्षणोक्षणीं कावऱ्याबावऱ्या होत आहेत अशा नुकत्याच लग्न झालेल्या अल्पवयी सुंदर देखण्या मुली, डोळ्यांसमक्ष आपल्या प्रिय नवऱ्याची झालेली अमानुष कत्तल पाहिलेल्या स्त्रिया; (हि कत्तल मोपल्यांनीं 'शुद्ध धार्मिक भावनेनेंच' केली, हें गाधींचे समर्थन लक्षात असावे.) दुःखानें मृत्यूच्या दारांत बसलेल्या वृद्ध स्त्रिया! किती बेशरम अमानुषपणा हा! ...... दोन पुलय्यांचे धर्मप्रेम पहा. पुलय्या म्हणजे मलबारकडील शूद्रातिशूद्र.अस्पृश्य.हिंदुधर्मानें बहिष्कृत ठरविलेलीं एक हतभागी जात. सावत्र आईप्रमाणें तिरस्कारानें वागविणाऱ्या हिंदुधर्मावर त्यांचें प्रेम किती विलक्षण पहा. मृत्यु किंवा इस्लाम धर्म या दोहोंशिवाय गत्यंतर नाहीं, असें त्यांना पकडणाऱ्यांनीं बजावतांच त्यांनीं मुसलमान होण्यापेक्षा मरण पत्करलें. हिंदू आणि मुसलमानांचा परमेश्वर आपले दूत या दोन शूर जीवांना स्वागत देण्यासाठीं पाठवो आणि ज्या धर्मासाठी ते मेले त्याच धर्मांत त्यांना पुनर्जन्म देवो!

(३) न्यू इंडिया ६-१२-२१:—अवघ्या १५ दिवसांत हिंदुंची सर्रास अमानुषपणाची कत्तल म्हणजे मोपल्यांच्या हातचा मळ झाला .... पुथूर आमनादला एक दिवसभर दिवसा इस्लाम धर्माचा अव्हेर करणाऱ्या २५ हिंदूंची मोपल्यांनीं खाटकाप्रमाणें कत्तल केली..... लहान लहान अर्भकांचे व गरोदर स्त्रियांचे खून, यापेक्षां अमानुष व राक्षसी अत्याचार आणखी कोणते असतात? ..... एका सात महिन्याच्या गरोदर हिंदू स्त्रीचे पोट एका मोपल्यानें फाडलें व गर्भाशयांतून अर्धेच बाहेर पडलेल्या त्या अर्भकासह त्या बाईचें प्रेत रस्त्यावर उघडें नागडे पडलेले पुष्कळांनी पाहिले. ...... तरूणीवरच्या बलात्काराची एक हकीकत तर

अनुक्रमणिका

इतकी संतापजनक आहे, इतकी चिळस आणणारी आहे, कीं तिंचे शब्दांनी वर्णनच करतां येणार नाही. हा बलात्कार चेंब्रासरी थंगल याच्यां खास देखरेखी खालीं झाला. मिलादूरच्या एका अब्रुदार नायर घराण्यांतल्या स्त्रीला, तिच्या नवऱ्याच्या व त्याच्या भावांच्या डोळ्यांसमक्ष, नागवी करण्यांत आली. त्या सर्वांचे हात पाठीकडे घट्ट बांधून टांकण्यांत आले होते. हा प्रकार पहावेना म्हणून, त्यांनी डोळे मिटतांच, त्यांना तलवारीच्या धमकीवर, त्या अबलेवर त्या नराधमानें प्रत्यक्ष केलेला अत्याचार पहावयास भाग पाडलें. हा प्रकार लिहितांना सुद्धां मला शरम उत्पन्न होते ......अशा प्रकारचे आणखीही बरेच अत्याचारझालेले आहेत, पण शरमेसाठीं लोक ते प्रसिद्ध करीत नाहीत.

मोपल्यांच्या अत्याचारांचा इतिहास कधींकाळी कोणी लिहिलाच तर त्यांतल्या अमानुषपणाच्या वेदनेनें लेखक प्राण देईल व यदाकदाचित् त्याचें लेखन पूर्ण झालेंच, तर हृदय शाबूत असलेले वाचक छाती फुटून मरतील; इतका तो बीभत्स राक्षसी-छे: हीं विशेषणें फारच माणुसकीचीं ठरतात! असले अत्याचार करणाऱ्या नरराक्षसांना गांधी जेव्हां धर्माभिमानाचें सर्टिफिकीट देतात व त्यांच्या पाशवी दंगलीची ‘मर्द मोपले’ म्हणून प्रशंसा करतात, तेव्हां ‘महात्मा आहात झालें?’ यापेक्षा अधिक काय म्हणावें?मलबारांतल्या अत्याचारांचा कळस इतका झाला कीं, निसर्गतःच अल्पभाषी असणाऱ्या आमच्या मलबारस्थ हिंदुभगिनी, व्हाईसरॉयच्या पत्नि लेडी रेडिंग यांच्याकडे, अर्जद्वारां हंबरडा फोडण्यास उद्युक्त झाल्या. त्यांच्या अर्जांत नमूद झालेली भाषा व विकारांचा उमाळा वाचतांना न रडणारा प्राणी अंतःकरणानें मोपला चाण्डाळच असला पाहिजे. त्यांतील कांही कलमांचा भावार्थ खालीं देत आहों:—

“दयावंत बाईसाहेब, गेल्या शंभर वर्षांत आमच्या या दुःखी मलबारांत मोपल्यांचे दंगे अनेक वेळां झाले. पण चालू बंडाचा व्याप आणि त्याच्या अत्याचारांची क्रूरता पूर्वी कधींच कोणी अनुभवली नाहीं. या राक्षसांनी केलेल्या घातपातांची व अमानुष अत्याचारांची, बाईसाहेब, आपल्याला कदाचित् पुरी कल्पनाही नसेल, अहो काय सांगावे, वाडवडिलांचा प्रिय हिंदुधर्म सोडण्याचें नाकारल्यावरून आमच्या जिवलग नातलगांना अर्धवट ठार मारून त्यांना विहिरींत फेंकून दिलें. प्रेतांनी तळीं सुद्धां भरून टाकली. गरोदर भगिनींची जिवंतपणी पोटें कीं हो चिरली. त्यांच्या शरीराचे राई एवढे तुकडे करुन रस्त्यावर व जंगलांत फेंकून दिले. प्रेतांच्या खचांत गर्भाशयांतून अर्धवट बाहेर पडलेली मुलें तशींच तेथे पडलेलीं, अहो, आमची लहान लहान तान्हुलीं—काय बरं त्यांनी कोणाचा असा अपराध केला? — अहो तीं आमची लाडकीं तान्ही आमच्या गळ्यातून हिसकावून नेलीं आणि आमच्या डोळ्यासमक्ष त्यांचे खाटका प्रमाणें तुकडे तुकडे केले. आमचे प्राणापेक्षांहिं प्रिय असे पति, बाप, भाऊ यांचे अतोनात हालहाल केले, कोणाच्या अंगाचीं सालटीं जिवंतपणीं सोलली तर कोणाला जिवंत उभे जाळले! आमच्या शेंकडो बहिणी आप्तेष्टांनीं गजबजलेल्या घरांतून फरफरा ओढीत नेल्या आणि त्यांवर या नराधम राक्षसांनी मन चाहील तसे बिभत्स-उच्चारू नये-असले अत्याचार केले. आमच्या घरादारांची राखरांगोळी केली. आमची पवित्र देवस्थानें भ्रष्ट केली. आमच्या बागांतून गाईंचे रक्त मांस हाडें आणून ओतली. आज आम्ही मूठभर तांदळालाही वैरी झालों. प्रत्यक्ष भीक मागत आहों..... आमच्या डोळ्यांसमक्ष क्रूरपणे कत्तल केलेल्या बचड्यांच्या त्या केवीलवाण्या किंकाळ्या, बाईसाहेब, आमच्या कानांत एकसारख्या घुमत आहेत हो घुमत आहेत! काळ आमचे डोळे झांकीपर्यंत त्या किंकाळ्या कधींच थांबणार नाहींत. घरादारांची राखरांगोळी झाल्यावर केवळ जीवासाठी आम्ही नागव्या उघड्या स्थितींत कसें रानवन गांठलें, आमच्या लपण्याच्या जागेचा सुगावा लागूं नये म्हणून आमच्या अजाण बचड्यांना गप्प रहाण्यासाठी आम्हीकसकसली धडपड केली, या सर्व गोष्टींचे, बाईसाहेब, आज स्मरण होत आहे. या खुनशी चाडाळांच्या धर्माची आम्हा हजारों लोकांवर प्राणांतिक बळजबरी झाली, त्या वेळच्या आमच्या नैतिक व धार्मिक मनाच्या वेदना आजहि आम्हांला तितक्याच तीक्ष्णतेनें दंश करीत

आहेत. अहो, काय सांगावी आमची कर्मकहाणी! चांगल्या कुलींन घराण्यात वाढलेल्या आमच्या काहीं भगिनींना या चाण्डाळांनी जेव्हा मुसलमान धर्माची दीक्षा दिली व बळजबरीनें त्यांची कैद भोगलेल्या गुन्हेगार अशा कवडी किंमतीच्या मजुरांशी लग्नें लावलीं, तेव्हांच्या त्यांच्या मरणप्राय मानसिक वेदनांची, बाईसाहेब, आम्ही आपल्याला कशी कल्पना करून द्यावी?"

बस्स पुरे. मन बेताल होत आहे, लेखणी कांपत आहे. संतापाचा छापा हृदयावर पडत आहे. डोळें पाण्यानें भरले आहेंत. विवेक लटपटूं लागला आहे. विचारसरणी सैरावैरा नाचूं लागली आहे. सध्यां याच ठिकाणीं थोडा मुक्काम करून मग पुढें जावें हें बरें!

**[तब्बल ८ दिवसांचा मुक्काम.]** * * *

प्रस्तुत लेखन चालू असतां, ठिकठिकाणी मुसलमानांच्या दंगली होत असल्याची वृत्तें कांनीं पडत आहेत. ही केवळ शोचनीयच नव्हे तर, तिरस्कारार्ह स्थिति होय. हिंदुबांधवांशीं वैरभाव धरून त्यांच्या विरूद्ध दंगे व बण्डें करण्यांत आपला राजकीय व धार्मिक मोक्ष आहे, ही आमच्या एतद्देशीय मुसलमानांची समजूत अत्यंत आत्मघातकी आहे, हें आम्ही त्यांना प्रेमपूर्वक बजावून ठेवतो. 'अल्ला हो अकबर' च्या गर्जना करणाऱ्या मुसलमानांना अत्याचारी प्रवृत्ति जशी लाजीरवाणी आहे, त्याचप्रमाणें मुसलमानी अत्याचारांना शेळ्यामेंढ्यांप्रमाणे बळी पडणें हें शिवाजीच्या अनुयायी हिंदूंना नामर्द व बेशरम ठरविणारे आहे. अत्याचाराच्या जोरावर धर्मप्रसार व धर्मप्रसाराच्या जोरावर स्वतंत्र इस्लाम बादशाही स्थापन करण्याचे दिवस आतां उरलेले नाहीत. इतिहासाला पुनरावृत्तीची गोलांटी उडी मारण्याचें कौशल्य कितीही आंगवळणी पडलेलें असलें तरी, हिंदूंच्या रक्तस्त्रावावर इस्लामधर्माची पुनर्घटना करण्याची अदूरदृष्टी आकांक्षा अखेर त्या धर्माची सर्व जगभर नाचक्की केल्याशिवाय रहाणार नाही, असा इषारा देणे प्राप्त आहे. अत्याचाराच्या मार्गाने धर्मप्रचार करूं पहाणाऱ्या माथेफिरू इस्लाम-भक्तांनी आपण २० व्या शतकांत आहों, हे विसरुन चालणार नाहीं. कोठें ती अकबर बादशाहाची सर्वसंग्राहक व सर्वपाचक धर्मप्रवृत्ति आणि अल्लाहो अकबरच्या आरोळ्या मारणाऱ्या माथेफिरू मुसलमानांची कोठें ही अत्याचारी वृत्ति! बहुत दिवस माजलेल्या उदंड म्लेंच्छ दुर्जनांच्या बंडावर, छातिठोक प्रतिकाराच्या बरोबरीनेंच पतितपरावर्तनाचा बिनतोड तोडगा सणसणींत भिरकावून, इस्लामधर्माचा लवमात्र अवमान न करतां, हिंदूंचा लोकसंग्रह करणारे कोठें ते पुण्यश्लोक शिवाजीमहाराज आणि महाराष्ट्रांत क्रिस्ती बाट्यांनी घातलेला धुमाकुळ उघड्या डोळ्यांनी पहाणारे कोंठे हे शिवानुयायी नामर्द मराठे! हिंदु आणि मुसलमान या दोन समाजांचें राष्ट्रीयदैव एकाच बिकट परिस्थितीच्या अधणांत उकडत आहे. दोघांच्याहि उरावर एकजिनसी पारतंत्र्यांचा वरवंटा अभेदभावाने सबसारखा फिरत आहे, अशा वेळीं आमच्याच हाडारक्ताच्या—परंतु धर्मांतराच्या क्षुल्लक सबबीवर सर्वच बाबतीत परकी बनलेल्या—हिंदी मुसलमानांनी सरदार करतारसिंग यांची स्पष्टोक्ती ध्यानांत ठेवल्यास बरी! कांही दिवसांपूर्वी रावळपिंडीला जाहीर भाषण करतांना सरदार साहेब म्हणाले, "मुसलमान हिंदुओंकों कष्ट पहुचानेका खयाल दिलसे निकाल दे. वह हर जगह को मुलतान नहीं बना सकता.और यदि मुसलमानोंका इरादा वास्तवमें हिंदुओंके साथ किसी तरहकी जबरदस्ती करनेका हो तो ३२ लाख सिक्ख हिंदुओकेलिये सिर कटानेको तैयार है. जबतक सिक्ख मोजूद हैं मुसलमान हरगिज हिंदूओंपर हाथ नही उठा सकेंगे. मुसलमान यह भाव भूलजाय की मुस्तफा कमालपाशा या किसी अन्य मुसलमान शक्तीके द्वारा वे फिर भारतवर्षपर अपना अधिकार जमा सकेंगे. सिक्खोके होते मुसलमानोका यह ख्याल करना भी फजूल है की कोई दूसरी शक्ति बाहरसे आकार हिंदूओंको कुचल सकेंगी. हम जिस तरह हिंदूओंपर अत्याचार होते न देख सकेंगे, उसी तरह मुसलमानोपर भी अत्याचार न होने देयेंगे "हिंदु व मुसलमान

बांधवांनी स्वार्थी चळवळ्यांच्या नादीं लागून हातघाईचे प्रसंग आणलेच, तर त्यांत दोघांचाही अधःपात आहे, हें कोणी सांगितलेंच पाहिजे असें नाहीं. निदान महाराष्ट्रांत असे प्रसंग येतील अशी आमची मनोदेवता आम्हांला सांगत नाहीं. महाराष्ट्रीय मुसलमान समाज अझून आपल्या मूळच्या हिंदूसंस्कृतीला पारखा झालेला नाहीं. मात्र पूर्वजांवर झालेल्या बळजबरीच्या धर्मांतरामुळे आज त्याच्या हृदयांत संस्कृतीचा घनघोर संग्राम माजून राहिलेला आहे. रक्ताची व संस्कृतीची पर्वा राखावी तर भिन्न धर्मांचें बाह्यांग आड येतें; आणि बाह्यांगाची पर्वा करावी, तर हृदयांत बंडाळी माजते! अशा परिस्थितींतहि उत्तर हिंदुस्थानांतला इस्लामी माथेफिरूपणा यदाकदाचित् दुर्दैवानें महाराष्ट्रांत प्रादुर्भूत झालाच, तर मात्र असें खात्रीनें सांगतां येईल, कीं निष्कारण प्रतिकाराची ठिणगी पडून महाराष्ट्राचें मलबार किंवा मुलतान होण्यापूर्वीच शिवाजीचा मराठा निकराचा थैमान करायला मुळींच सोडणार नाहीं. मराठ्यांची सहिष्णुता वाटेल तेव्हां स्थानभ्रष्ट व विवेकभ्रष्ट होण्याइतकी कमकुवत नसली, तरी मलबारी अत्याचार उघड्या डोळ्यांनी पहात स्वस्थ बसण्याइतकें त्याच्या रक्तांतलें शिवतेज आजच भ्रष्ट किंवा पतित खास झालेलें नाहीं. हें एक दुष्ट स्वप्न आहे. ही एक आत्मघातकी कल्पना आहे. आणि हिंदुमुसलमानांच्या दुर्दैवानें इतका अतिप्रसंग येऊन भिडलाच, तर त्याचा परिणाम दोघांच्याही पारतंत्र्याच्या शृंखळा प्राणांतिक घट्ट बसण्यांतच होईल, हें सर्वांनीं ध्यानांत ठेवावें. हिंदूंचा निःपात केल्यानें हिंदुधर्म व हिंदु संस्कृति ठार मरणार नाही, अशी इतिहासाची ग्वाही आहे. हिंदूंची कत्तल करून मुसलमानांचा राष्ट्रोदय व भाग्योदय होईल, ही अटकळ तितकीच मूर्खपणाची अतएव त्याज्य आहे. हिंदु आणि मुसलमान हे हिंदुस्थानरूपी विराटपुरूषाचे उजवे डावे हात आहेत. हे दोन अवयव बाह्यतः जरी भिन्न दिसत असले, तरी त्यांच्या दैवाचें बरेंवाईट सांधे एकाच धडाला चिकटलेले आहेत, हें हिंदूप्रमाणे मुसलमानांनींहि लक्षात घ्यावे.

खिलाफतीच्या मृगजळानें राजकीय सत्ताप्राप्तीचा मोक्ष मिळवूं पहाणाऱ्या आमच्या हिंदी मुसलमानभाईंनीं आपल्या मनोवृत्तीची मुसंडी अत्याचाराकडे कलंडू देण्यापूर्वी निदान मोगल बादशाहीचा इतिहास तरी नीट वाचावा. मोगल बादशाही म्हणजे हिंदूंना नेस्तनाबूद करणारी इस्लामशाही, असा पुष्कळ मूर्खांचा समज आहे. एखाद दुसरा नागीरशहा किंवा औरंगझेब म्हणजे कांहीं मोगल बादशाही नव्हे. हिंदु आणि मुसलमानांतले धार्मिक मतभेद नाहींसे करून दोनही धर्मांतील शुद्ध तत्त्वसहस्यावर त्यांची एकी करण्याचे अनेक यशस्वी यत्न खुद्द मुसलमांनी सत्ताधाऱ्यांनी वेळोंवेळीं केलेलें आहेत. बंगालचा सुभेदार हुसेनशहा (१४५२ ते १४७८) यानें या दिशेने केलेली कामगिरी विचार करण्यासारखी आहे. हिंदु तत्त्वज्ञानाची त्याच्यावर एवढी छाप पडली कीं त्यानें मालधर बसु नांवाच्या शास्त्र्याकडून महाभारताचें व भागवताचें बंगालींत भाषांतर करविलें. इतकेंच नव्हे तर हिंदूंच्या सत्यनारायणाच्या धर्तीवर त्यानें सत्यपीराच्या पूजेचा एक नवीनच प्रघात सुरू केला. अस्सल मुसलमानी संस्कृतीचा कोरडा दिमाख मिरविणाऱ्यांना इतिहास असें हटकून सांगत आहे कीं दिल्लीच्या तक्तावर बसलेल्या १२ बादशहांपैकी ६ बादशहा हिंदु मातांच्या उदरीं जन्मलेले होते, आणि या हिंदु राजमाता आपल्या हिंदुधर्माचे आचार खास व्यवस्थेनें प्रत्यक्ष दिल्लीच्या राजवाड्यांत आमरणान्त आचरीत होत्या. 'दिने इलाही' ची कल्पना प्रत्यक्ष आचारविचारांत उमटविणाऱ्या महात्मा अकबराचा नामघोष करणाऱ्या अत्याचारी मुसलमानांना, आपण आपल्या आडदांड पाशवी वर्तनानें त्या थोर अकबराचा कसा अवमान करीत आहोत, याची कोणी कल्पना करून देईल तर बरें होईल. सारांश, हिंदु-मुसलमान भेद हा कृत्रिम आहे, तलवारीच्या जोरावर असंख्य हिंदु बाटवून मुसलमान केले तरी अखेरीस इस्लाम संस्कृतीच हिंदु संस्कृतीनें पचनी पाडली आणि या दोनहि समाजांनी अन्योन्यावलंबनानें हिंदुस्थानासाठीं झगडल्यास त्यांत दोघांचेंहि कल्याण आहे, इत्यादि अनेक विचार मोगल बादशाहीच्या इतिहासांत ज्याला दिसणार नाहींत, त्याला कसल्यातरी स्वार्थाची कांवीळ झाली आहे, असें ठाम समजावें.

अनुक्रमणिका

हिंदु मुसलमानांचे राजकीय व सामाजिक बाबतींत ऐक्य झालेंच पाहिजे. या ऐक्याशिवाय स्वदेशांतल्या स्वदेशांत दोघांचाहि तरणोपाय नाही. दोघेहि इंग्रजी सत्तेचे गुलाम आहेत. गुलामांत जितकी लाथाळी भासते तितकी नेत्यांच्या पथ्यावरच पडत असते. राजकीय व सामाजिक ऐक्यासाठी हिंदुंच्या धार्मिक स्वातंत्र्याचा बळी घेतलाच पाहिजे असें कोणत्या फतव्यांत, खुतब्यांत किंवा कुराणांत लिहिलें आहें?मुसलमानांना जितका स्वधर्माचा अभिमान आहे, तितकाच हिन्दूनाहि आहे. हिंन्दुस्थानच्या स्वराज्यविषयक चळवळीत हिन्दूंच्या जानव्याचा मुसलमानांच्या गळ्याला फास बसल्याचें ऐकिवांत नाहीं. उलटपक्षी ताबुतासारखे मुसलमानी उत्सव साजरे करण्यांत मुसलमानांपेक्षां हिन्दूंचीच चढाओढ जास्त असते. तेव्हां धार्मिक स्वातंत्र्य वगळून राजकीय पुनर्घटनेच्या कार्यात मुसलमानांना हिन्दूंशी सहकार्य करण्यापुरती एकीची भावना नसेल, तर त्या आत्मघातकी भावनेंत शुद्ध अरेरावीपेक्षां दुसरें काहीं नाहीं असेंच म्हटले पाहिजे.

उत्तर हिन्दुस्थानात स्वामी श्रद्धानंद यांनी पतीतपरावर्तनाची दांडगी चळवळ सुरू केल्यामुळे, हा धार्मिक स्वातंत्र्याचा प्रश्न विशेष पुढें आला आहे. इस्लामधर्म हा मिशनरी धर्म आहे, हे प्रसिद्धच आहे. परंतु हिन्दु धर्म हा मिशनरी धर्म नाही, किंवा पूर्वी तसा नव्हता, हें या शुद्धीकार्याच्या आक्षेपकांना कोणी सांगितले?हिन्दुधर्म हा मिशनरी धर्म नव्हता, असेंहि गृहित धरलें तरी धर्मस्वातंत्र्याच्या दृष्टीनें त्याला मिशनरी धर्म बनविण्याला कोणाची का म्हणून हरकत असावी? खरें पाहिलें तर बळजबरीच्या बाटवाबाटवीमुळे आणि भिक्षुकशाहीच्या मयत धर्ममार्तंडांच्या मूर्खपणामुळें धड ना मुसलमान धड ना हिन्दु अशा संस्कृतीच्या संग्रामांत पडलेल्या न हिंदुनर्यवनांना त्यांच्या प्रेमाच्या हिन्दु धर्मात स्वामी श्रद्धानन्द घेत आहेत, यामुळे अस्सल मुसलमानांच्या अस्सल धार्मिक भावना कां व कशा दुखविल्या जातात हें एक खिलाफतीच्या कोड्याइतकेंच कोडे आहे. परंतु या कोड्याला आपल्या रड्या ओरड्याची साथ देण्यासाठी काहीं गांधीभक्त हिन्दू पुढें यावेत, ही मोठ्या आश्चर्याची गोष्ट आहे. गांधीनी हिंदुमुसलमान–एकीच्या पिटलेल्या डांगोऱ्यांच्या तपशीलाचा विचार केला, तर गांधीभक्तांचें किंचाळणें गैरवाजवी नाहीं; आणि महात्मा

## हिंदु धर्माचें दिव्य

दयानन्द सरस्वति यांच्या पतितपरावर्तनविषयक महत्त्वाकांक्षेचा विचार केल्यास त्यांचे सच्चे शागीर्द स्वामी श्रद्धानंद हिंदुशुद्धीसभेच्या विद्यमानें मोठ्या वर्णनीय धडाडीनें करीत असलेली कामगिरी मुळींच गैरशिस्त नाहीं असें प्रत्येक विवेकी हिंदुमुसलमानाला कबूल करणें प्राप्त आहें. स्वामी श्रद्धानंद धार्मिक क्षेत्रापुरता संस्कृतीचा संग्राम हिन्दुस्थानांतून नष्ट करण्याचा चिरस्मरणीय प्रयत्न करीत आहेत. आत्म्याच्या आवडीचा विषय ते आत्म्याला देत आहेत. भाडोत्री धर्मबंधनांनी गुदमरलेल्या संस्कृतीची मान ते मोकळी करीत आहेत. आणि स्वामी दयानंदाचे अपूर्णकार्य अत्यंत निःस्वार्थबुद्धीनें पुढे चालवून या प्राचीन आर्यजननीच्या आर्यसंस्कृतीची अब्रु ते संरक्षण करीत आहेत. श्रीकृष्ण भगवंताचा हा हिन्दु लोकसंग्रह यशस्वी होवो!

# प्रबोधनकार ठाकरे
# समग्र वाङ्मय

## खंड चौथा

हिंदुजनांचा ऱ्हास
आणि अधःपात

अनुक्रमणिका

# हिन्दु जनांचा ऱ्हास आणि अधःपात.

बॅरिस्टर एस. सी. मूकर्जी कृत
THE DECLINE & FALL
OF THE HINDOOS.

नामक इंग्रेजी ग्रंथाचा मराठी अनुवाद.

—अनुवादक, मुद्रक व प्रकाशक—
**केशव सीताराम ठाकरे.**
प्रबोधन मुद्रणालय, ३४५ सदाशिव पेठ,
पुणें शहर.

**किंमत एक रुपया.**

अनुक्रमणिका

हें पुस्तक श्रीयुत केशव सीताराम ठाकरे यांनीं प्रबोधन मुद्रणालय, ३४५ सदाशिव पेठ, पुणें शहर येथे. छापून प्रसिद्ध केलें.

या मराठी अनुवादाचें व त्यावरून इतर देशी भाषांत भाषांतरें करण्याचे सर्व हक्क श्री. ठाकरे यांच्या स्वाधीन आहेत.

---

**पुस्तकें मागविण्याचा पत्ता**
व्यवस्थापक, प्रबोधन कचेरी, ३४५ सदाशिव पेठ,
पुणें शहर.

अनुक्रमणिका

# ग्रंथ—परिचय.

मराठी पेहरावांत मऱ्हाठ्यांच्या हातीं पडणारा हा निबंध प्रथम इंग्रेजी भाषेंत कलकत्त्याच्या इंडियन रॅशनॅलिस्टिक सोसायटीच्या सभेंत तारीख ७ सप्टेंबर १९१९ रोजीं लेखक श्रीयुत एस. सी. मूकरजी, बार-अॅट-लॉ यानीं वाचला. सोसायटीच्या मासिक बुलेटीनच्या नवंबर १९१९ च्या अंकांत तो छापून प्रसिद्ध झाला. यांतील विचारांचा विद्वज्जनांत एवढा गौरव झाला कीं, कलकत्त्याच्या इंडियन डेली न्यूज पत्राच्या संपादकांनीं हा निबंध ५ नवंबर ते १९ नवंबर पर्यंत आपल्या दैनिकाच्या अंकांत हप्त्याहप्त्यानें छापून पुनर्प्रकाशित केला. त्यामुळें या निबंधाला इतकी विलक्षण मागणी आली कीं अखेर इं. रॅ. सोसायटीला तो पुस्तक रूपानें प्रसिद्ध करावा लागला. भारतमहर्षि डॉ. सर पी. सी. रॉय यानीं या निबंधाला प्रस्तावनेचा आशीर्वाद देऊन, “भरतखंडाच्या पुनरुज्जीवनाचा खास संदेश” अशी त्याची सूत्रबद्ध स्तुति केल्यानंतर, प्रस्तावने दाखल अधिक कोणी कांहीं लिहिण्याचा प्रयत्न करणें म्हणजे “रंगविण्या लिलि धजला” या शेक्सपियरोक्ती प्रमाणें स्वतःस उपहासास्पद करून घेणेंच होईल.

प्रस्तुत निबंधाचें इंग्रेजी पुस्तक ‘डिकलाईन ॲण्ड फॉल ऑफ धी हिंदूज’ सन १९२० सालीं माझ्या वाचनांत आलें आणि त्याचा मराठी अनुवाद करण्याची प्रेरणाहि त्याच वेळीं मनांत आली. माझे परम मित्र बॅरिस्टर मूकर्जी (पाटणा, बिहार) यांना हा मनोदय कळवितांच, त्यांनी कसल्याहि प्रकारच्या अटी न घालतां मराठी अनुवादाची शुद्ध उदार भावनेनें आणि राष्ट्राभिमानानें परवानगी दिली. भाषांतरास सुरुवात केली आणि प्रबोधन पाक्षिकांतून त्याचे हप्ते छापण्यास १९२१ सालीं आरंभ केला. पुढें हें भाषांतराचें काम माझें स्वर्गवासी स्नेही व प्रबोधनाचे सह-संपादक कै. श्रीयुत रामचंद्र वामन ऊर्फ बापूसाहेब चित्रे, बी. ए. यानीं सर्वस्वीं आपल्याच हातीं घेतलें. गुदस्त सालीं त्यांचा अकालीं शोचनीय मृत्यू होईपर्यंत, हें भाषांतर—प्रकाशनाचें कार्य हळुंहळूं प्रबोधनद्वारां होत होतें.

गेलीं पांच वर्षे रेंगाळत पडलेलें आणि बापूसाहेबांच्या निधनानें मध्येंच अर्धवट तुटलेलें हें कार्य संपूर्ण तडीला नेण्याची प्रेरणा गेल्या सपटंबरांत उद्भवली आणि “शोधन-प्रकाश” नामक स्वतंत्र ग्रंथाच्या लेखनाचें काम तात्पुरतें बंद ठेऊन, मी या कामाकडें वळलों. श्रीहरीच्या कृपेनें हा ग्रंथ पूर्ण होऊन, आज आपल्या सेवेला सादर रुजूं होत आहे.

बॅरीस्टर, मूकरजीनीं वेदपूर्व काळापासून तों थेट मुसलमानांच्या स्वाऱ्यांपर्यंत भारतीय इतिहासाची चिकित्सक छाननी करून, हिन्दु जनांच्या ऱ्हासाची आणि अधःपाताची मीमांसा केली आहे. एका निबंधाच्या आकुंचित जागेंतच हा सर्व मीमांसेचा चित्रपट त्यांना दाखविणें भाग पडल्यामुळें, त्यांची विवेचनपद्धति विहंगम निरीक्षणासारखी झालेली आहे. ‘थोड्यांत फार—’ दिसावें, अशी त्यांची धांवती लेखनशैली असल्यामुळें, वाचकांनीं फार सावकाश व मननपूर्वक वाचन केलें तरच त्यांना ‘सूत्रांतलें सार’ स्पष्ट पटत जाईल.

बॅरीस्टर मूकरजी हे उच्च जातीय ब्राम्हणच असल्यामुळें, भिक्षुकशाहीची त्यानीं केलेली निर्दय छाननी वाचून, त्यांच्यावर ब्राम्हणद्वेषाचा आरोप करतांना, इरसाल ब्रम्हमुखोत्पन्नांना तोंड नसलें, तरी लाज वाटेल, असा मला भरंसा आहे. बॅरीस्टर मूकरजी हे भावनावश लेखक नाहींत. त्यांच्या विधानांचा आणि चिकित्सेचा सर्व आवेश इतिहाससिद्ध भरभक्कम पुराव्यांवरच विशेष असल्यामुळें, त्यांच्या सिद्धांतांकडे आणि शुद्ध राष्ट्राभिमानानें केलेल्या अनेकविध सूचनांकडे विवेकी व विचारी हिंदुजनांचें आदरपूर्वक लक्ष वेधलें

अनुक्रमणिका

जाणे अगत्याचें आहे. हिन्दु जनांच्या सामाजिक आत्मप्रबोधनाच्या क्षेत्रांत काम करणाऱ्या समाजसुधारकांनाहि आपापली कार्याची दिशा ठरविण्याच्या कामीं अनेक उपयुक्त सूचनाचें भांडार या ग्रंथाच्या अध्ययनानें आज खुलें होत आहे.

हिंदुसमाजाच्या काळजाला झोंबलेल्या भिक्षुकशाही ब्राम्हणांच्या मुर्दाड स्वभाव-प्रवृत्तीचीं या ग्रंथांत दिलेलीं इतिहासप्रसिद्ध चित्रें अत्यंत मननीय आहेत. हिंदुजनांच्या आत्मोद्धाराच्या प्रत्येक सुधारक चळवळीला जमीनदोस्त करण्याच्या कामीं भिक्षुकशाही कधीं नमतें, कधीं वांकतें, तर कधीं जुळतें घेऊन, जरा थोडी संधि सांपडतांच, एकदम उचल खाऊन, एक दांत पाडल्याचा सूड बत्तिशी ठेचून कसा उगविते, हेंहि अनेक उदाहरणांवरून स्पष्ट दिसून येतें. भिक्षुकी वर्चस्वस्थापनेचीं कारस्थानें पार पाडण्यासाठीं परक्यांना हातांशीं धरून, वेळीं त्यांचे पाय धरून, ब्राम्हणेतर स्वदेशबांधवांना चिरडून टाकण्याचे भिक्षुकशाहीनें केलेले प्रयत्न, रजपूत विरुद्ध बौद्ध, शंकराचार्य विरुद्ध बौद्ध इत्यादि प्रकरणांत निःसंदिग्ध पुराव्यानिशीं आढळून येतात. बौद्धधर्माच्या पाडावाची भिक्षुकी कारस्थानें चालूं मन्वंतरांत विचारी वाचकांना नानाविध विचारांचें ब्रम्हांड खुलें करून दाखवितील, यांत मला मुळींच संशय वाटत नाहीं. विशेषतः पृ. १५८ वर, बौद्धांच्या ससेहोलपटींतूनच आद्यशंकराचार्यांनीं हिंदु समाजांत अस्पृश्यता प्रथमच निर्माण केली, हा इतिहास विचार करण्यासारखा आहे.

कितीहि आणि कसाहि विचार केला तरी "जातीभेदाचा पुरस्कार करणारी सामाजिक क्षेत्रांतली भिक्षुकशाही म्हणजे हिंदुस्थानाला जडलेली व्याधी होय" हा भारतमहर्षि प्रफुल्लचंद्र रॉय यांचा रोखठोक अभिप्रायच सर्वत्र प्रत्ययास येत आहे. अशा स्थितींत या हिंदुभारताच्या आत्मोद्धाराचा मार्ग कसा चोखाळावा, हें प्रस्तुत ग्रंथाच्या वाचन मनन निदिध्यासानें अखिल हिंदू भगिनी बांधवांना नीट कळेल, असा मला भरंसा आहे.

**प्रबोधन कचेरी**
३४५ सदाशिव पेठ, पुणें शहर.
ता. १ दिसेंबर १९२६.

देशबांधवांचा नम्र सेवक
**केशव सीताराम ठाकरे.**

अनुक्रमणिका

## सर पी. सी. रॉय यांची प्रस्तावना.

श्रीयुत मुकर्जी यांचा 'हिन्दु जनांचा ऱ्हास व अधःपात, हा प्रबंध मी वाचला व तो मला अत्यंत हृदयंगम वाटला. अभिनव भारताचा उषःकाल होत आहे. अशा वेळीं भारताचें कल्याण चिंतणाऱ्या प्रत्येक व्यक्तीनें आपल्या राष्ट्रीय अवनतीचें प्रस्तुत प्रबंधांत केलेलें विचार—परिपूर्ण पृथःकरण अवश्य विचारांत घ्यावें, असें मी निःसंकोच सांगतों. हा प्रबंध श्रीयुत मुकर्जी यांच्या दीर्घ परिश्रमपूर्वक केलेल्या अभ्यासाचें विचारपरिप्लुत असें फळ आहे. रोगाचीं कारणें जर समजलीं नाहींत तर रोग कधींहि बरा करतां येणार नाहीं. हाच नियम आजच्या राष्ट्रीय अवनतीला सुद्धां लागूं पडतो. प्रस्तुत प्रबंध म्हणजे **भरतखंडाच्या पुनरुज्जीवनाचा खास संदेश** आहे, असें माझें ठाम मत आहे.जातिभेदाचा पुरस्कार करणारी सामाजिक क्षेत्रांतली **भिक्षुकशाही म्हणजे हिन्दुस्थानाला जडलेली व्याधी** होय.इतर अनेक गोष्टीपेक्षां या भिक्षुकशाहीनेंच आमच्या प्रगतीला कुंठित करून, राष्ट्रीय भावनांची कलमछाट केलेली आहे. सारांश, भिक्षुकशाही म्हणजे आमच्या वर्तमान दुर्दैवी अधःपाताची खाणच म्हटली पाहिजे. ज्या तोंडानें राजकीय हक्क आणि ब्रिटिश नागरिकत्वाचे अविच्छिन्न अधिकार मागण्यासाठीं आम्हीं मोठमोठ्यानें वल्गना करतों, त्याच तोंडानें अवनत देशबान्धवांच्या बुचाडून घेतलेल्या हक्कांना परत देण्याविषयीं अथवा त्यांच्यावरील आपल्या सत्तेचा चाप लवमात्र ढिला करण्याविषयीं, आम्ही कधीं एक ब्र तरी काढला आहे काय? वातावरणांत आतां लोकशाहीचे मेघ जमूं लागले आहेत. सारें वातावरण लोकशाहीनें दुमदुमूं लागलें आहे. अशा वेळीं आमच्या अवनत देशबान्धवांना जर आम्ही हात देऊन वर उचलणार नाहीं, उदार मनानें सामाजिक क्षेत्रांत योग्य ठिकाणीं त्यांची स्थापना करणार नाहीं, तर राजकीय हक्कांसाठीं नित्य चालणारा आमचा हलकल्लोळ म्हणजे पोकळ वल्गनांचा शुद्ध तमाशा होय, असें मानण्यास कांहीं हरकत नाहीं. श्रीयुत मुकर्जी हे उच्चजातीय ब्राम्हण आहेत. तथापि हिन्दु जनांचा ऱ्हास व अधःपात यांच्या कारणांची तात्विक दृष्ट्या मिमांसा करतांना त्यानीं आपली सहृदयता आणि राष्ट्राभिमानाची तडफ अत्यंत उत्कटतेनें व्यक्त केलेली आहे. माझ्या सर्व देशबान्धवांनी प्रस्तुत प्रबंध अवश्य विचारांत घ्यावा, अशी माझी शिफारस आहे.

धी युनिवर्सिटी सायन्स कॉलेज.
२१ डिसेंबर १९१९.

**पी. सी. रॉय.**

अनुक्रमणिका

# अकालीं तुटलेला तारा.

**प. वा. रामचंद्र वामन उर्फ बापूसाहेब चित्रे,** बी, ए.
[मृत्यू २८ मे १९२६.]

**यांच्या दिव्यात्म्यास अर्पण.**

अनुक्रमणिका

॥ वन्दे मातरम् ॥

# हिन्दु जनांचा ऱ्हास
# आणि अधःपात.

बॅरिस्टर ए. सी. मूकरजी कृत

**Decline & Fall of the Hindus.**

नामक सुप्रसिद्ध इंग्रजी ग्रंथाचा मराठी अनुवाद.

प्रस्तुत निबंधाचा मथळा वाचतांच 'गिबनकृत रोमन साम्राज्याचा ऱ्हास व अधःपात' या महाग्रंथाची वाचकांना आठवण झाल्याशिवाय राहणार नाहीं. हाच मथळा माझ्या या निबंधाला मी कां घेतला, अशी कोणी पृच्छा केली तर त्याला उत्तर हेंच कीं माझा यत्न अल्पमतीचा असून अल्प सामुग्रीवर जरी उभारलेला आहे, तरी त्याचें धोरण काय असावें, याची या मथळ्यामुळें वाचकांना स्पष्ट अटकळ व्हावी. हातीं घेतलेल्या विषयप्रतिपादनाच्या मार्गांत अनंत अडचणी आहेत, याची जाणीव मला नाहीं असें नव्हे. विषयाचा व्याप तर इतका दांडगा आहे कीं कोणाचीही क्षणभर तिरपीट उडाल्याविना राह्यची नाहीं. परंतु रसिक वाचकवृंद माझें म्हणणें शांतपणानें, इतकेंच नव्हे तर अत्यंत कळकळीनें ऐकून घेईल, अशी मला खात्री असल्यामुळेंच, मनांत आलेले विचार दडपून टाकण्यापेक्षां स्पष्ट बोलून दाखविण्याचें धैर्य मला येत आहे. सुप्रसिद्ध इतिहासकार गिबन याचें ग्रंथकर्तृत्व त्याच्या अगाध बुद्धिसामर्थ्यास व लेखनकौशल्यास साजे शोभेसेंच आहे, यांत तिळमात्र शंका नाहीं. परंतु गिबन हा रोमन नसल्यामुळें किंवा रोमन साम्राज्याच्या अधःपाताशीं त्याचें कांहींच सुहेरसुतक नसल्यामुळें, हा इतिहास आपल्या ओजस्वी लेखनकौशल्यानें त्यानें जरी अजरामर करून ठेवला, तरी तो लिहीत असतां गिबनच्या अंतरात्म्यास आत्मत्वाचा चटका लागण्याचें कांहींच कारण नव्हतें, हें आपण विसरतां कामां नये. बोलून चालून गिबन पडला उत्तरदेशस्थ युरपियन; तथापि जात्याच कुशाग्र बुद्धीचा असल्यामुळें अधःपतन पावलेल्या रोमन साम्राज्याकडेत्याची इतिहासभिज्ञ विवेचन दृष्टी वळावी यांत कांहीं नवल नाहीं. ऐतिहासिक दृष्ट्या हा इतिहास गिबनला कितीहि जरी जिव्हाळ्याचा वाटला तरी तो त्याचा जिव्हाळा एखाद्या रसायनशास्त्रवेत्त्याच्या जिव्हाळ्यासारखाच असणार; अंतरात्म्याला आत्मत्वाचा पीळ पाडणारा जिव्हाळा नव्हे! एखाद्याच्या मुलानें विष खाल्लें व त्या विषाचें पृथक्करण करण्यासाठीं त्याला रसायन शाळेंत आणलें, अशा स्थितींत तें वीष कोणत्या प्रकारचें आहे, हें समजावून घेण्याची रसायनशास्त्र्याची जी जिज्ञासा व जिव्हाळा, तोच त्रयस्थपणाचा जिव्हाळा रोमन साम्राज्याचा इतिहास लिहितांना गिबनच्या अंतःकरणांत होता; आत्मत्वाचा जिव्हाळा कांहीं नव्हें! रोम किती झालें तरी गिबनला परकीच. माझी हिन्दुस्थानाविषयीं तशी भावना असणें शक्यच नाहीं. भारतीय हिन्दुजनतेचा आज कितीहि ऱ्हास व अधःपात झालेला असला, तरी हिन्दुस्थान ही माझी प्यारी मातृभूमी आहे, मी तिचा एक रहिवाशी आहे—नागरीक आहे, ही माझी भावना जागतीज्योत जिवंत असणारच. अर्थात् माझी मातृभूमी अधोगतीच्या व अवनतीच्या दुर्गंधीनें नासून सडली आहे, असा कोणी परकीयांनी कितीहि गिल्ला केला तरी त्याकडे लक्ष देण्याचें मला काय प्रयोजन?या परक्यांचें काय घेतां?बेटे उद्यां चंबुगबाळें खांकेंत मारून खुशाल आपल्या मायदेशाला सूं बाल्या ठोकतील! पण माझ्या मातृभूमीचा सत्पुत्र म्हणून कोणत्याही अवस्थेंत मला येथेंच राहणें भाग आहे. अशा भावनेनें वर्णन केलेली हिन्दुजनांच्या ऱ्हासाची व अधःपाताची कहाणी अर्थातच निराळ्या मनोभूमिकेंत रेखाटली जाणार, हें सांगणें नको. हिन्दु—भारत साऱ्या जगाच्या सुधारणेची एक विलक्षण शक्ति आहे. तिचा परिणाम इतरांप्रमाणेंच माझ्या कोट्यवधि देशबांधवावरहि होत

अनुक्रमणिका

आहे, या दृष्टीनें त्या शक्तीचा योग्य संदेश काय आहे, त्याची व्याप्ति केवढी आहे, यांचा मनःपूर्वक अभ्यास करणें मला अत्यंत आवश्यक आहे. हा प्रश्न असा तसा नव्हे, माझ्या जिव्हाळ्याचा आहे. ऱ्हास पावलेल्या व नामशेष उरलेल्या रोमन साम्राज्याबद्दल गिबनला या भावनेची जाणीव असणें शक्यच नाहीं.

आपल्या परमप्रिय हिन्दुस्थान देशाचें प्राचीन ऐश्वर्याचें चित्र पाहिलें तर काय दिसतें?युगानुयुगाचा हिन्दुस्थान. संतमहंतांचा हिन्दुस्थान. त्याच्या प्राचीन धवलतम चारित्र्यानें हिमालयाच्या उत्तुंग धवलगिरीशींच स्पर्धा करावी. वेदोपनिषदांची ही जगन्माता. याच मातेच्या प्रेमळ हृदयांतून सांख्य आणि योग या आध्यात्मिक शास्त्रांच्या दुग्धधारा निर्माण होऊन, त्यांचाच पुढें बुद्ध आणि शंकर या महर्षींच्या उत्कृष्ट व उदारतम तत्वज्ञानाशीं बिनतोड त्रिवेणी संगम झाल्यामुळें, नीतिप्रचुर अशा बिनमोल आध्यात्मशास्त्राची उत्पत्ति झाली. या शास्त्राचें स्वरूप तरी किती युक्तिसिद्ध, किती सर्वव्यापी आणि किती अत्युत्तम! विश्वाच्या कोड्याचा निरास करून चिकित्सक व साधक मुमुक्षूंच्या हातीं जन्ममृत्यूच्या गूढ तत्वनिरसनाची प्रत्यक्ष गुरुकिल्ली देण्याचाअग्रमान पटकविणारी ही आपली भारतमाता. या पुराणश्रेष्ठ जगन्माउलीला माझा प्रणाम असो. वन्दे मातरम्.

मनुष्यप्राणी हा कांहीं एकजात एकसारखा संस्कृत नसतो. कोणाची संस्कृति नीच, तर कोणाची स्वार्थी; कोणी जड असतात, तर कोणी विषयलंपट असतात; आणि कित्येकांच्या राक्षसी प्रवृत्तीमुळें त्यांच्यांत आणि पशूंत कांहीं भेदच नसतो. असल्या वृत्तींच्या माणसांना काबूंत आणून त्यांच्या पाशवी संस्कारांना कधीं चुचकारून तर कधीं दपटशा दाखवून, आस्ते आस्ते त्यांना खऱ्या माणुसकीला आणून पोहचविण्याचें कार्य मोठें कठीण आहे. या साठीं आत्मज्ञान, आत्मपरिणति (आत्मसंस्कृति), स्वावलंबन आणि उत्कटतम नीतिमत्ता या गुणांचा प्रकाश त्या असंस्कृत प्राण्यांत मोठ्या कुशलतेनें पाडावा लागतो. हा प्रकाश पाडण्याचें आणि वरील सर्व प्रकारच्या असंस्कृत वृत्तींना पद्धतशीर उन्नत करण्याचें धाडसी कार्य यशस्वी करून दाखविण्याच्या कामीं—नराला नारायण स्वरूपाची आत्मप्रतीति आणून देण्याच्या कामीं—जगांतील सर्व राष्ट्रांपेक्षां हिंदुस्थानानेंच अखेर सर्वांवर मात केली आहे.इतर सर्व गोष्टी सोडून दिल्या, तरी निदान या बाबतींत तरी आतांपर्यंत हिन्दुभूमीनें 'जगद्ज्ञानमाता' ही आपली अद्वितीय आणि असामान्य श्रेष्ठता अजिंक्य कायम राखिली आहे; मग तिचा कोणी कितीहि विपर्यास करो! हिन्दुभूमी ही गूढशक्तीची अधिष्ठात्री आहे. मग तिच्या मुखावर भविष्यकालदर्शक असें जें गंभीर विलक्षण हास्य अजूनसुद्धां चमकत आहे, त्याचें कारण काय?त्याचें कारण हेंच कीं कसेहि बरेवाईट प्रसंग तिच्यावर येत असले, तरी 'हेंहि दिवस निघून जातील' हा तिचा आत्मविश्वास अत्यंत प्रखर आहे.

प्राचीन काळीं हूण शक, जाठ, सिथिअन वगैरे रानटी व क्रूर संस्कृतीच्या लोकांच्या टोळधाडी हिंदुस्थानाला लुटून फस्त करण्याकरितां काय थोड्या थोडक्या येऊन कोसळल्या?परंतु त्या लोकांना सुद्धां चुचकारून व माणसाळून त्यांच्या रानटी प्रवृत्तीची नांगी अज्बिात बोथट करण्याच्या कामीं कोणाच्या उज्वल संस्कृतीचा पराक्रम यशस्वी ठरला बरें? हिदुस्थानचीच लुटालूट करण्यास आलेले हे रानटी लोक अखेर हिंदमाउलीच्याच चरणीं लागले, तिला त्यांनीं आपली माता मानली आणि वैयक्तिक गुणकर्मानुसार चातुर्वर्ण्याच्या चार भव्य दरवाजानीं हिंदुसमाज—संघटनेंत समरस होऊन जाण्यांत त्यांनीं धन्यता मानली. म्हणजे निराळ्या शब्दांत स्पष्ट सांगायचें तर ही परकीय मंडळी अखेर हिन्दुसमाजाचे प्रत्यक्ष घटकांवयव बनले. मात्र येथें हें नीट लक्षांत ठेविलें पाहिजे कीं त्यावेळीं भिक्षुकशाही आतांप्रमाणें कुत्सित व वर्णविद्वेषी बनलेली नव्हती, जात्यंधपणा, कुटीलपणा, ताठरपणा किंवा कूपमंडूकी संकुचितपणा तींत अझून घुसला नव्हता आणि विद्वता संस्कृति व ज्ञान यांचे फायदे फक्त आपल्या विवक्षित जाती पुरतेंच वंशपरंपरागत

मर्यादित करण्याची नीच वृत्तिभिक्षुकशाहींत बोकाळलेली नव्हती. स्मृतीच्या कक्षेपार असलेल्या अत्यंत प्राचीन काळापासून हिन्दमाता जगातल्या सर्व लेकरांना मोठ्या ममतेनें हांक मारून बोलावीत आहे व म्हणत आहे; कीं 'बाळांनो! या. तुम्हीं सर्व माझीच लेंकरें आहात. विश्वात्मैक्य भावाचें प्रेम आणि मानवजातीची निरःसित निःस्वार्थी सेवा यांतून निर्माण होणारें समाधान आनंद व शांतिमिश्रित दुग्धाचें स्तनपान, लेकरांनो, मी तुम्हांला करविते. अभेदभावानें खुशाल या. "आशियाखंडस्थ जनतेलाच अशा प्रकारचें आव्हाहन हिंदमातेनें केलें असें नव्हे. तिचा साराच व्यवहार अभेदभावाचा. त्यांत खंडभेदादि भेद यांचा वास सुद्धां यावयाचा नाहीं. आशियाखंडाप्रमाणें ग्रीस व इजिप्त येथील जनतेला हिन्दमातेनें ज्ञान धर्म व संस्कृति याचें उदार मनानें घ्या घ्या म्हणून दान केलेलें आहे. हिंदुस्थानांत हातमागावर विणलेलीं सुताची व रेशमाची कापडें, नाना तऱ्हेच्या कलाकुशलतेच्या वस्तु, यांवर बादशाही रोम अथेन्स अलेक्झांड्रिया व आशियाखंडस्थ इतर अनेक मोठमोठ्या देशांची मारे धूम उडी पडत असे.

भूतकाळीं हिंदुस्थान म्हणजे दुधाचे व मधाचे पाट वहात असलेली सुवर्णभूमि होती. (या देशांत सर्व प्रकारची संपत्ति व समृद्धि विपुल होती.) हिंदुस्थानरूपी नंदनवनाचा आस्वाद फक्त हिन्दूच घेत होते असें नव्हे, तर वाटेल त्या परदेशस्थ चहात्याला व रसिकाला सुद्धां या नंदनवनाचे दरवाजे खुले असत. हिंदुस्थानानें साऱ्या जगाचें लक्ष आपल्याकडे वेधून घेतलेलें होतें. त्याच्या स्वर्गतुल्य ऐश्वर्याच्या कीर्तिदुंदुभीचा दणदणाट आशियाखंडाच्या उंच उंच पर्वतांवरून व मैदानांवरून रोंरावत थेट पाश्चिमात्य युरपच्या ओसरीवर जाऊन धडकला. त्या दणदणाटाचा प्रतिध्वनि, हिंदुस्थानावर ऱ्हासाचा भयंकर पगडा पडल्यानंतर बऱ्याच काळानें, दिल्लीच्या मोंगल बादशाहीच्या ऐश्वर्यांत पुनश्च व्यक्त झाला. याचें प्रत्यंतर पहाणारांना दिवाण-इ-खास या बादशाही इमारतीच्या भिंतीवर "पृथ्वीवर जर स्वर्ग असेल तर तो येथें आहे, येथें आहे, येथेंच आहे" अशी रत्नजडित अक्षरांनीं लिहीलेली साक्ष आज घटकेलाहि पहावयास मिळेल.

आपल्या थोर मातृभूमीच्या या हृदयंगम उत्कृष्ट चित्राच्या जोडीनें, त्याची हृदयविदारक निःकृष्ट अशी दुसरीहि बाजू मला आपल्यापुढें मांडली पाहिजे. हिंदमातेच्या पायांपाशीं घोंटाळणाऱ्या तिच्या मुलांची स्थिति आज काय आहे?कोणाच्या तोंडावर तेज नाहीं, क्षणोक्षणीं मरणाच्या भीतीनें गांगरलेले, दारिद्रामुळें पाठपोट एक झालेले, नानाविध दुःखांनीं होरपळलेले, भलत्याच फंदांत भडकलेले, अशी आजच्या हिंदूंची स्थिति आहे. साऱ्या संस्कृत जगाच्या दृष्टीला हिन्दू हा एक तिटकाऱ्याचा विषय होऊन बसला आहे. कोणी त्यांना होंडस म्हणतो, कोणी इन्डोस म्हणतो, कोणी जेन्टु म्हणतो (जन्तु किंवा हैदोस असे अजून म्हणूं लागले नाहींत हेंनशीब!) माझी अशी खात्री आहे कीं (सध्याप्रमाणेंच जर हिंदुजन आपले हात पाय पोटाशीं आवळून स्वस्थ बसतील तर) असले वाक्प्रचार जगांतल्या सुधारलेल्या राष्ट्रांच्या शब्दकोशांतून आणि ज्ञानकोशांतून बिनधोक प्रगट होतील आणि त्यांना खालच्या सारखे कांहीं तरी विलक्षण अर्थ देण्यांत येतील:—

हिन्दू म्हणजे कोण?

(१) हिन्दुस्थानांत सांपडणारी द्विपादांची एक जात.

(२) हिन्दुस्थानांत सांपडणारी श्ववृत्तीची (अगदींच कुत्रा नव्हे,) बेवकूब अशा दोन तंगड्या असलेल्या बावळटांची जात.

(३) एक प्रकारचा हिंदुस्थानी राक्षस. ही एक रानवट माणसांची पैदास आहे. त्यांना लाजलज्ञा, मानापमान, सदाचरण आणि स्वातंत्र्य यांचें वारें सुद्धां लागलेलें नसतें.

(४) अल्पवयांतच मातृपद भोगणाऱ्या स्त्रियाचें पोटी जन्माला आलेली नैतिक दुबळ्यांची एक जात. ही फक्त हिंदुस्थानांतच सांपडते.

(५) रानवट हिंदु संस्कृतीच्या नैतिक षंढांची एक जात.

अशा प्रकारची घाणेरडी माहिती सर्व संस्कृत राष्ट्रांनीं एक मतानें जर जगभर पुकारली तर त्यांच्या एकवटलेल्या कलमांच्या फटकाऱ्यानें सर्व हिंदु जनांना वर्तमान युरपियन संस्कृतीच्या क्षेत्राबाहेर गचांडी मिळण्यास अवकाश का आहे?दुर्दैवानें खरोखरच अशी स्थिति आली तर आम्हांला शिक्षणाकरितां, व्यापारधंद्याकरितां किंवा चैनीकरितां, जेव्हां जेव्हां पाश्चात्य देशांत जाण्याचा प्रसंग येईल, तेव्हां तेव्हां तिकडचे सारे लोक आमच्याकडे बोट दाखवून 'पहा गचाळ हिंदु आले' असें म्हणू लागतील. हिंदू गचाळ अं?अवनत हिन्दु?साऱ्या संस्कृत जगाचा हाच शेरा जर आमच्या कपाळीं पडावयाचा असेल तर जगांतल्या कोणत्या हाय पिनलकोडमध्यें या पेक्षां अधिक जलाल शिक्षेचा प्रकार सांपडणें शक्य आहे?या ठिकाणीं आपण हें लक्षांत ठेवलें पाहिजे कीं प्राचीन ग्रीक, एट्रुस्कन्स, रोमन्स, त्याचप्रमाणें नार्वे स्वीडन डेन्मार्क देशांत राहणारे जर्मन संस्कृतीचे लोक आणि महायुद्धपूर्वकाळीं जर्मन साम्राज्याचा बराच मोठा भाग व्यापणारे जर्मन लोक, ज्या मूळहिन्दू—आर्य (Indo-Aryan)मानव वंशापासून आपल्या उत्पत्तीचा हक्क सांगतात, त्याच उगमापासून आम्हा हिन्दूंचाहि जन्म झालेला आहे. हिन्दुसमाज हें एक राष्ट्र आहे, एक मोठा विस्तीर्ण मानवसमूह आहे, आणि त्याची एक विशिष्ट परिणत संस्कृतीहि आहे. अशा राष्ट्राचा समंजस जगाच्या न्यायमंदिरांत अपमान व्हावा, त्याची मानखंडना व्हावी, त्याला तुसडेपणानें वागविण्यांत यावें, न्यायाच्या घणाच्या एकाच ठोकरीनें एकजात सर्व हिन्दूंना शिध्द्यांच्या, नरमांसभक्षकांच्या आणि रानटी लोकांच्या पंक्तीला बसण्यास झुगारून देण्यांत यावें आणि त्यांच्या शीलांवरही डांबर फांसण्यांत यावी; अन्यायाची केवढी ही परमावधि!

राष्ट्रीय अवनति व राष्ट्रीय अपमानाच्या या दुःसह प्रसंगीं, हिन्दुस्थान देश हीच आपली जन्मभूमी—हीच आपली थोंर माता—ही भावना जागृत असणाऱ्या सर्व हिन्दु मुसलमान क्रिस्ती पारशी जैन बौद्ध शीख जनांनीं या गोष्टीचा एकमतानें विचार केला पाहिजे. आमच्या किंवा आमच्या पूज्य पितरांच्या हातून काय अशीं पातकें घडलीं कीं ज्या मुळें आमच्या शीलावर ही नामोशी फेंकण्यांत येत आहे; याचा सर्वांनीं नीट काळजीपूर्वक विचार केला पाहिजे. बांधवहो, एकाच मातृदेवतेच्या सत्पुत्रानों, हिन्दु आणि मुसलमान, क्रिस्ती आणि पारशी, जैन आणि बौद्ध अथवा शीख, असे तुमचे निरनिराळे पंथभेद, मतभेद, धार्मिक आचार-विचार—भेद, सामाजिक रूढीभेद कितीहि असले, तरी या भेदांना सप्तसमुद्रपलीकडच्या त्या भव्य आणि विस्तीर्ण जगांत कवडीचीहि किंमत नाहीं. तेथें धार्मिक आणि आनुवंशिक भेदाभेदांचें शुद्ध देशीय राष्ट्रीयत्वांत (Territorial Nationality)आमूलाग्र पर्यवसान होत असतें, हें लक्षांत ठेवा. त्या विस्तीर्ण जगांत हिन्दु काय अथवा हिन्दी (इंडिअन) काय, दोनही शब्दांची किंमत सारखीच (कवडीमोल) आहे; आणि हिन्दुविरुद्ध ज्या बहिष्काराची तयारी चाललेली आहे, तो अमलांत आला कीं या दोन शब्दांऐवजी तितकाच निंद्य असा दुसरा शब्द इंडिअन डोमिसाइल (हिन्दुस्थानांत माणसाळलेला) हा उपयोगांत आणला जाईल. यावर कोणी अशी पळवाट सुचवितील कीं मुसलमान, क्रिश्चन, पार्शी इ. मंडळी तरी निदान या बहिष्काराच्या रामरगाड्यांतून निसटतील. गोष्ट सोडून द्या. या रामगाड्यांत त्यांचीसुद्धां हिंदुमुसलमान, हिन्दुक्रिस्ती, हिन्दुपारशी या संज्ञेनें चटणी झाल्याशिवाय रहाणार नाहीं; आणि हिन्दूंना जो राष्ट्रीय अपमान सोसावा लागणार तो त्यांच्याहि कपाळचा चुकणार नाहीं. अर्थात् जो जो म्हणून हिंदुस्थानांत जन्मलेला असेल, मग तो हिन्दु मुसलमान क्रिस्ती पार्शी कोणीहि असो, त्यानें या प्रसंगाचा नीट विचार करण्याची वेळा येऊन ठेपली आहे. विचार! हा विचारच इतका भयंकर आहे कीं त्याचा उच्चार करतांना आमचे अश्रु ठिकच्या

ठिकाणीं थिजतात व छाती भरून येते. या बाबतींत आमच्या देशी कायदे मण्डळांत पसार केलेला अथवा खुद्द इंपिरियल ब्रिटीश पार्लमेंटानें जाहीर केलेला एखादा ठराव आमच्या उपयोगीं मुळींच पडणार नाहीं. बादशहाकडें, अमेरिकन प्रेसिडेंटाकडे किंवा राष्ट्रसंघाच्या अध्यक्षाकडे अर्ज्या पाठवून तोंड वेंगाडण्यात आमच्या राष्ट्रीय इभ्रतीला–जी कांहीं थोडीबहुत इभ्रत शिल्लक राहिली असेल तिलाहि–तें साजेशोभेसें दिसत नाहीं. पण आता काय उरलें आहे?निकाल दिला गेला. शिक्षाहि ठोठावली गेली. या शिक्षेवर अपील करण्याचीहि सध्या सोय नाहीं.उद्यां परवां मात्र या अपीलाचा परिणाम घडवून आणण्याची एक बारीकशी फट आहे. आपण सर्व हिन्दवासी जर एकजूट झालों. आम्हांला जगत्बहिष्काराची शिक्षा ठोठावणाऱ्यांच्या मनांत आमच्या संयुक्त कर्तबगारीनें जर आम्ही आदर व विश्वास उत्पन्न केला आणि आम्हीहि तुमच्या सारखींच (विचार–विकारमय) माणसें आहोंत असें त्यांना पटवून दिलें, तर त्यांची सदसद्विवेक बुद्धी जागृत होऊन या शिक्षेचें परिमार्जन करील. आशेला जागा एवढीच!

प्रसंग येऊं नये, आला.अर्थात् सत्य, न्याय आणि हक्क या सनातन सर्वव्यापी तत्त्वांवर पूर्ण विश्वास ठेवून निधड्या छातीनें आपण त्याला तोंड दिलें पाहिजे; आणि आपल्या प्रिय भारतमातेप्रमाणें 'यह भी दीन चले जायेंगे' हा विश्वास अढळ राखिला पाहिजे. आपल्या संत मंडळीनीं आपल्या हृदयांवर एक बिनमोल उपदेश बिंबविलेला आहे.तो हा कीं कोणी कितीहि धिःकार करो, निंदा करो, आपल्या दुस्मानाची दुस्मानगिरी कितीहि करडी असो, तरी आपण आपला आत्मविश्वास निर्लेप ठेवून नुसतें स्मितहास्य करीत रहावें. आपण या जगड्व्याळ विश्वरचनेचे एक घटकावयव आहों आणि आपण आत्मप्रतारणा केली नाहीं तर त्या विश्वरचनेच्या सनातन नियमानें आपोआप बुऱ्याचें भलें होत असतें. या तत्त्वावर विश्वास ठेवून आपण खुशाल निर्धास्त रहावें. “हाती चाले अपने चालसे; कुत्ता भूकत वांकु भुंकवा दे.” परंतु आपल्या पुढचा प्रसंग मात्र भयंकर आहे. अशा वेळीं यावर जर कांहीं तोडगा शोधून काढावयाचा असेल तर तो आत्मनिरीक्षणानेंच काढला पाहिजे.

एकजात सबंध राष्ट्राच्या मानववंशाच्या शीलावर कलंक अं! केवढी ही मानखंडना! या मानखंडनेचें कारण शोधून काढण्यासाठीं व कायमचें निराकरण करण्यासाठीं आपल्याला एकांतांत आत्मशोधनच केलें पाहिजे. आमची विशिष्ट वंशसंस्कृति काय आहे, आमचा भूतकालीन इतिहास कसा आहे आणि आमच्या उत्पत्तीचा उगम कसा झाला, या गोष्टींचा आपण नीट विचार केला पाहिजे. हिंदुस्थानांत मुसलमानांचा धौशा सुरू होण्यापूर्वी साम्राज्यसत्तेच्या काळांत आमच्या हातून कोणकोणतीं बरीं वाईट कृत्यें घडली, आणि त्यावेळीं आमच्या गृहस्थधर्माची नीति व त्याचें वळण कोणत्या धर्तीचें होतें, याचेंहि पृथःकरण आपणांस केलें पाहिजे. इतकेंच नव्हे तर, आपल्या आत्मनिरीक्षणाची दृष्टी धर्माच्या क्षेत्राकडेसुद्धां वळविली पाहिजे, आणि ज्या वैदिक धर्मानें हिन्दुस्थानच्या वैभवाचा पारा एकवेळ अत्युच्च बिन्दूला नेऊन भिडविला होता, त्याच धर्माच्या ऐवजीं आज प्रचलित असलेल्या भिक्षुकी धर्माचा परिणाम आपणांवर कसा काय होत आहे, याचीहि चिकित्सा निस्पृहपणानें केली पाहिजे. असें आपण केलें, तर माझी खात्री आहे कीं आपला अधःपात व ऱ्हास कां झाला याची कारणें पद्धतशीर शोधून काढून त्यांवर आपल्याला उपाय करतां येणें शक्य आहे.

बान्धवहो, मला मार्क अँटनीच्याच शब्दांत आपणांपुढें हा विषय मांडावयाचा आहे. तो म्हणाला “मी सीझरला मूठमाती द्यायला आलों आहे, त्याची स्तुति करण्याकरितां नव्हे. माणसांचीं कुकर्मे त्यांच्या मृत्युनंतरहि जिवंत राहतात, त्यांचीं सत्कृत्यें मात्र त्यांच्या हाडांबरोबरच गाडलीं जातात.” माझी विषयप्रतिपादनाची शैली याच प्रवृत्तिबरहुकूम मी ठेवणार आहे. आत्मस्तुतीला अजीबात फाटा देऊन सत्य गोष्टी मी स्पष्ट बोलून दाखविणार आहे. आमचें वर्तन, स्वभाव, रीतरिवाज, आमचा हलगर्जीपणा आणि

राष्ट्रीय दृष्ट्या आमचा परस्पर तुसडेपणा, यांचें उद्घाटण मी स्पष्ट स्पष्ट मोकळ्या मनानें, परंतु किंचित् झणझणीत रीतीनें करणार आहे. भूतकालची साम्राज्य–सत्ता हातची गमावून आज आम्हांला ही जी भिकारडी अवनत स्थिती आली आहे, तिची ग्यानोबाची मेख आमच्या नैतिक अधःपातांत आहे, हें विसरून चालणार नाहीं. आमचा भूतकाळ मोठा उज्वल व चिरस्मरणीय असा होता; आमच्या भारतमातेचा अध्यात्मगौरव वृद्धिंगत करण्याच्या कामीं अनेक संत महंतांनीं व नृपतींनीं आपल्या कर्तबगारीची पराकाष्ठा केली, या सर्व गोष्टी मला मान्य आहेत. इतकेंच नव्हे, तर त्यांच्या आदर व प्रशंसेच्या बाबतींत मी कोणासही हार जाणार नाहीं.

आमचे निंदक म्हणतात कीं हिन्दुस्थानाला इतिहासच नाहीं, किंवा इतिहासविषयक बुद्धि कधीं आमच्यांत परिणतच झाला नाहीं. पण ही गोष्ट अजीबात खोटी आहे. उठल्यासुटल्या आमच्यावर असला आरोप करणाऱ्या शहाण्यांना आमचा इतिहास अभ्यासण्याइतकी प्रवृत्ति नसते किंवा संशोधनाची अक्कलहि नसते. पुराणांची गोष्ट सोडून द्या. रामायण महाभारत ही आमचीं राष्ट्रीय महाकाव्यें मूळांतून वांचण्याची कितीकांनीं तसदी घेतलेली असतें बरें?आमच्या देशाचा इतिहास व भूगोल, त्याचप्रमाणें प्रसिद्ध प्रसिद्ध राजघराणीं व ऋषीकुळें यांच्या वंशांची माहिती पुराणात चांगल्या प्रकारें आढळते. अर्थात प्राचीन भारताचा संपूर्ण इतिहास व भूगोल पुराण ग्रंथांत आहे, असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं. तथापि अजून बराच इतिहासाचा भाग उकरून काढावयाचा आहे. त्याचे बरेचसे तुकडे आमच्या धर्मग्रंथांतून व स्मृत्यांतून त्याप्रमाणें चिनी तिबेटी जपानी ब्रम्ही सायामी आणि सिंगाली अशा अनेक भाषांच्या ग्रंथांत इतस्ततः पसरलेलें आहेत. त्यांचें एकीकरण केलें पाहिजे. शोधा म्हणजे मिळेल, या सूत्रानुसार आपले प्रयत्न झाले पाहिजेत. परंतु या निंदकांच्या निष्कारण निंदेमुळें तुमचें मायदेशावरील प्रेम विश्वास व शोधक वृत्ति यांचे पाय लटपटूं देण्याचें कांहींहि प्रयोजन नाहीं.

आमचे आक्षेपक आणखी असें सांगतात कीं या देशांत अनेक मानववंशांचे समूह रहात असल्यामुळें हिंदुस्थान ही नुसती भौगोलिक संज्ञा आहे. यावर माझा त्यांना जबाब असा आहे कीं, अहो! तुम्हीं आंधळे आहांत; तुमचे डोळेच फुटल्यामुळें भेदांतच अभेदाचें वैभव तुम्हांला कसचें दिसणार?काश्मीरपासून कामोरीनपर्यंत, जलालाबादपासून चितागांगपर्यंत आणि पलीकडे, कुणीकडेहि पहा सर्वत्र हिन्दु संस्कृतीचाच अंमल पसरलेला आहे. ही संस्कृति सध्यां जरी अवनत स्थितींत आहे तरी देखील आमच्या अभिमानापुरती ही कांहीं लहान सहान गोष्ट नव्हे आजला हिंदुस्थान आणि हिन्दुत्व हीं दोन्ही संक्रमणावस्थेंत आहेत मध्ययुगांत त्यांच्या आंगावर वाढलेले पापुद्रे आज खळखळ कोसळून पडण्यास सुरवात झाली आहे; आणि आपण स्वतःशीं किंवा आपल्या मायदेशाशीं जर प्रतारणेचें पातक करणार नाहीं तर आत्मशुद्धीचा व आत्मोद्धाराचा उषःकाल व्हायला कांहीं वेळ लागणार नाहीं. अज्ञान आणि अंधश्रद्धा यांचा सर्वत्र अंधार पसरल्यामुळें निरनिराळ्या भेदांचीं पिशाच्चें आज आपणांस भेवडावीत आहेत. परंतु आपण सर्व भारतवासियांनीं प्रेमानें व निस्वार्थ बुद्धीनें खांद्याला खांदा भिडवून राष्ट्रकार्याची लगबग केली, तर ज्या शास्त्रीय ज्ञानाची व व्यापक दृष्टीची आपण मार्गप्रतिक्षा करीत आहोत, त्यांना बरोबरच घेऊन उगवणाऱ्या प्रबोधनाच्या सूर्यप्रकाशामुळें त्या भूतांच्या भूतचेष्टा आपोआपच नष्ट होतील.

'जननी जन्मभूमिश्च स्वर्गादपि गरीयसि' हा उज्वल ध्येयमंत्र आमच्या अंन्तःकरणांवर ठसठशीत कोरलेला असतांहि मातृभूमीच्या प्रेमाच्या बाबतींत इतर राष्ट्रांनीं आमच्यावर वरचढ करावी काय?हें जर खरें असेल, तो मंत्र आमच्या हृदयांतून साफ पुसून गेला असेल आणि आमच्या मातृभूमिप्रेमांत खरोखरच

जर विरजण पडलें असेल तर मग—तर मग काय?—झाला, संपूर्ण अंधःपातच झाला! या लोकीं मोक्ष तर नाहींच, पण परलोकीं सुद्धां नाहींच नाहीं!

मला एक दिवस असें स्वप्न पडलें कीं मला कोणी उचलून हिंदभूमातेच्या मांडीवर ठेवलें. मी तिच्याकडे पहातों तों तिला मूर्छना येत असलेली दिसली. मी चटकन उठून प्रेमाच्या झटक्यानें तिला पाठुंगळी मारली आणि चिंताक्रांत स्थितींत दवाखान्याकडे धावत सुटलों. तेथें बरेच डॉक्टर लोक होते. माझ्या आईला त्यांनीं कांहीं उपचार करावा म्हणून मी तिला त्यांच्या समोर टेबलावर हळूच निजविले. ते कांहीं उपचार करणार तोंच तिनें एक दीर्घ श्वास सोडला आणि मी जागा झालों. आज आपल्यापुढें मी ठेवीत असलेल्या ह्या निबंधाचें लेखन मी जागा होतांच तात्काळ हातीं घेतलें.

आपल्या अधःपातासंबंधानें विचार करतांना काहीं आध्यात्मिक बिनमुर्वत तत्वांचा आपणांस अवश्य विचार करणें प्राप्त आहे. या तत्वांचे मी दहा विभाग पाडले आहेत.

ते असे:—

(१) 'जमका अजब तडाखा' जसा कोणास टाळता येणें शक्य नाहीं. तसें कर्मन्यायाच्या चरकांतूनकोणास निसटतां येणें शक्य नाहीं. तुमचा दोष कितीहि क्षुल्लक असो, त्याबद्दल यथातथ्य प्रायश्चित द्यायलाकर्मन्याय तुम्हांला वाटेल तेथून हुडकून काढील.

(२) जसें पेरावें तसें उगवतें.

(३) जसें करावें तसें भरावें.

(४) राष्ट्राचें जीवित असो किंवा व्यक्तीचें जीवित असो, त्याला अचेतन अशी स्थिरावस्था प्राप्त झालीकीं त्याचा सत्यानाश झाल्याशिवाय रहात नाहीं.

(५) सत्य नीति आणि न्याय मिळून धर्म होतो. या धर्मावरच मानवी समाजाचें धारण होत असतें.

(६) ढोंगीपणाच्या दंभोक्तीचीं सूत्रें अनीतिमत्तेची फार वेळ तरफदारी करूं शकत नाहींत. किंवानीतिमत्तेचें पांघरलेलें सोंग या सूत्रांना फार वेळ झेपतहि नाहीं. (धर्माच्या नांवावर रचलेलीं दांभिक सूत्रेंनीतिमत्तेचें समर्थन करूं शकत नाहींत.)

(७) धर्मपालनाच्या भरती ओहोटीप्रमाणें राष्ट्रांचें व साम्राज्याचे अस्तोदय होत असतात.

(८) या जगांत केलेल्या पातकाच्या प्रायश्चित्तापासून सवलतीची सूट मिळविलेले एकहि राज्य, राष्ट्र,जात अथवा व्यक्ति सांपडणें मुष्कीलीचें आहे.

अनुक्रमणिका

(९) काळाचें चक्र हळुहळू फिरतें; कोठच्या दिशेने वारा येऊन त्याला केव्हां कशी गति मिळेल त्याचीकोणाला दाद नसतें, परंतु त्याची घरटी एकदां फिरूं लागली कीं तींत सांपडेल त्याचे मात्र वस्त्रगाळ पीठपडतें.

(१०) घराचे वासे एकमेकांशीं आडवे तिडवे वागूं लागले कीं त्या घराचा डोलारा जमीनदोस्त झालाचसमजावें.

आतांपर्यंत नमनालाच घडाभर तेल जळल्यामुळें वाचकांना कंटाळा आला असेल. परंतु मूळ विषयाची इतकी प्रस्तावना करणें भागच असल्यामुळें वाचकानीं या लांबलचक उपोद्घाताबद्दल मला क्षमा करावी. यापुढें होतां होईल तों मी माझें विषयनिरूपण ऐतिहासिक कालक्रमानुसार रेखाटण्याचा निश्चय केला आहे.

एखाद्या वाहत्या झऱ्याचें पाणी जर गढूळ झालें तर खालपासून आपण तपास काढीत काढीत त्याच्या उगमाकडे जातो. पण प्रस्तुतच्या बाबतींत हा नेहमीचा क्रम आपण जराउलट करूं आणि एकदमच थेट उगमापाशीं किंवा जेथपर्यंतचा प्रदेश आपल्या आटोक्यांत आला आहे तेथपर्यंत जाऊन एकंदर स्थितीची पाहणी करूं.

तर मग आतां प्रथम अगदीं प्राचीन वेदकालाकडे नजर फिरवून तेथें या सर्व परंपरेचें कांहीं विषबीज सांपडतें कीं काय, हें एकदां नीट पाहूं या. या निबंधांतील विचारसरणीकरितां आपण श्री. टिळक यांनीं आपल्या **Aretic Home in the Vedas**या विद्वत्ताप्रचुर ग्रंथांत प्रतिपादल्याप्रमाणें आर्यांचें मूल वसतीस्थान उत्तर ध्रुवाकडील युरोपएशियन किंवा युरेशियन भागाकडे होतें असेंच गृहित धरूं. त्याचप्रमाणें इ.स.पू. ७००० वर्षे ही त्यांत दिलेली वेदकालमर्यादाहि आपण मान्य करूं.

कोणत्या कां कारणानें होईना, पण ही उत्तरध्रुवाकडील आर्यांची वसाहत विस्कळीत झाली आणि तेथून टोळ्यांमागून टोळ्या नवीन नवीन प्रदेश धुंडण्याकरितां व तेथें नवीन वसाहती स्थापन करण्याकरितां दक्षिण, ईशान्य व नैऋत्य या दिशांकडे उतरूं लागल्या.

मृगशीर्ष **(Orion)**या तारकापुंजाला, विद्वानांच्या मतें, त्याकाळीं अत्यंत महत्व असलें पाहिजे, व म्हणूनच ही फाटाफूट होण्यापूर्वी, किंवा कदाचित् त्याच वेळींहि असेल, या तारकापुंजांतील वैशिष्ट्यदर्शक चिन्हें जीं कमरपट्टा आणि बाण तीं आर्यजातीची एक विशिष्ट खूण किंवा एक प्रकारचा शुभदायी ताईत म्हणून त्यांनीं अंगिकारिलीं असावी.

आर्यवंशांतील या प्रवासी टोळ्यांनीं या मेखलेचें जानव्यांत आणि बाणाचें हातांत धरण्याच्या दंडांत रूपांतर केलें. हाच आमच्या उपनयन किंवा पैताविधीचा उगम होय.

जे जन्मतः ब्राम्हण, क्षत्रिय किंवा वैश्य असतील त्यांच्या मध्येंच हा उपनयनाचा संस्कार रूढ आहे, हें सर्वांना माहीत आहेच. हिंदुस्थानांतील भिक्षुकशाही ज्यावर उभारलेली आहे त्याचा हा एक मोठा आधारस्तंभ आहे. म्हणून याकडे आपणाला दुर्लक्ष करून चालणार नाहीं.

अनुक्रमणिका

या उपनयनविधीचा कसा उपयोग करून घेण्यांत आला आहे हें लवकरच आपल्या निदर्शनास मी आणणार आहे. पण तत्पूर्वी एक गोष्ट मला स्पष्टपणें सांगितली पाहिजे. ती ही कीं, आज या देशांत ब्राम्हणधर्म या नावांखालीं धिंगाणा घालणाऱ्या, परंपरागत चालत आलेल्या व त्यामुळेंच तुम्हाला अत्यंत पूज्य वाटणाऱ्या बिनकाळजाच्या 'भिक्षुकशाही' संस्थेला या निबंधांत मी चांगलाच तडाखा देण्याचा प्रयत्न करणार आहे.

कमरेचा कमरपट्टा आणि हातांत दंड, हीं उपनयन विधीचीं मुख्य चिन्हें, एट्रस्कन रोमन इजिपशियन क्रीटन ग्रीक इत्यादि प्राचीन लोकांतहि दिसून येतात, ही विचारांत घेण्यासारखी गोष्ट आहे. या लोकांच्या निरनिराळ्या ठिकाणीं वसाहति वसल्या. हवा पाणी, अर्थोत्पादनाचीं साधनें, प्रतिकारार्थ शत्रूंशीं करावे लागलेले झगडे, या सर्वभानगडींना तोंड देऊन त्यांनी आपली निनिराळीं राज्यें उभारली. राज्यें अस्तित्वांत आली कीं महत्वाकांक्षेचें क्षेत्र विशाळ झालेंच. यच्चावत् नागरीक व्यक्तीला लष्करी आटारेट्याचा खणखणाट आणि सांपत्तिक वैभवार्थ उलाढालींचा धडपडाट याशिवाय दुसरी बात माहिती नाहीशी झाली. अर्थात्, या गोष्टींपुढें भिक्षुकशाहीप्रणित विकृत धार्मिक कल्पना, भरंसाट पारलौकीक आकांक्षा, कसली तरी जपजाप्यें व चिंतनें, विधिकर्मे, हीं माजी पडून गतीला लागली.

प्राचीन असिरियन व बॅबिलोनियन, त्याचप्रमाणें सध्यांच्या पारशी लोकांचे पूर्वज, यांच्यामध्यें ही उपनयनाची चाल होती; आणि पारशी समाजांत ती अजूनहि चालूं आहे. हिब्रूंच्याहि धार्मिक विधींत तिचा अंतर्भाव झालेला होता. या पारशी आणि हिब्रू समाजांत हिंदूंच्यापेक्षांहि भिक्षुकशाहीचें प्रस्त फार माजलें होते; आणि त्याचमुळें शेवटीं त्यांची फाटाफूट होऊन त्यांची सामाजिक संघटना उध्वस्त झाली.

उत्तर ध्रुवाकडील हिमाच्छादित प्रदेशांत सहा महिनें रात्र आणि सहा महिनें दिवस असतो, हें सर्वांना माहीतच आहे. तेव्हां अशा ठिकाणीं राहणाऱ्या आपल्या आर्य पूर्वजांना सहा सहा महिन्याच्या गुडूप अंधःकारानंतर प्राप्त होणारा सूर्याचा पहिला किरण, सर्वत्र पसरलेल्या अंधःकाराचा थोडासा तरी भेद करणारा आकाशांतील तारकांचा लुकलुकता प्रकाश, एवढेंच काय पण, कृत्रिम रीतीनें निर्माण केलेला अग्निज्वालेचा प्रकाशमय स्फुल्लिंग हा सुद्धां मोठा आनंदाचा शुभ प्रसंगच वाटावा, यांत कांहीं आश्चर्य नाहीं.

सर्वत्र पसरलेल्या घनदाट अंधःकाराची, त्याच प्रमाणे भयंकर रोगराईच्या साथींची भीति, म्हणजे जवळ जवळ मृत्यूचीच धास्ती. या धास्तीमुळेंच प्रकाशाचा एकच किरण म्हणजे उत्तर ध्रुवस्थ आर्यांना आनंदाची पर्वणी वाटे. या धास्तीच्या आणि आनंदाच्या संमिश्र भावनांतूनच आमच्या धर्मकल्पनांची उत्पत्ति झालेली आहे.

थंडीच्या भयंकर कडाक्यापासून संरक्षण करण्यासाठीं त्यांना आरोग्याचे नियम धाब्यावर बसवून अत्यंत गचडीनें रहाणें भाग पडत असे. असल्या मेंढरी गचडागचडी पद्धतीच्या टोळ्या करून राहिल्यामुळें अर्थातच वैषयिक निर्बंध व नीति त्यांच्यात यथा तथाच राहिली. आरोग्यनियमांचें उल्लंघन आणि स्त्रीपुरुष-संबंधांतील शिथिलता यांचा यथाप्राप्त परिणाम म्हणजे महारोग आणि उपदेश यांचा त्या समाजांत जारीनें फैलाव झाला.

उष्णता आणि मांस-विशेषतः गोमांस आणि सोमरस यांची त्यांना दररोजच्या जीवनाकरितां अत्यंत आवश्यकता होती. प्रत्येक ऋतु बदलण्याचें वेळीं, जे त्यांचे सार्वजनिक स्वरूपाचे उत्सव व मेजवानीचें

प्रसंग किंवा यज्ञ दिवसांचे दिवस चालतअसत, तेव्हां तर या खाद्यपेयांचा समारंभ फारच थाटानें होत असे. थंडीचा कडाका टाळण्यासाठीं आणि मारलेल्या पशूंचें मांस भाजण्यासाठीं हे यज्ञांतील होमाग्नि एकदां प्रज्वलित झाले कीं, एकंदर समारंभ पूर्ण आटपेपर्यंत एकसारखे धडधडत असत.

हे सार्वजनिक उत्सवप्रसंग किंवा यज्ञ ही एक आमच्या आर्य पूर्वजांच्या व्यवहारांतली अत्यंत महत्वाची संस्था होती. या प्रसंगी स्त्रीपुरुष एकत्र जमत, यथेच्छ खातपीत, मनसोक्त रीतीनें नृत्य गायन वगैरे क्रीडा करीत, एकमेकांशीं शृंगारविलास करीत व अशा अनेकविध आनंदाच्या निमित्तांनीं त्या समारंभांत मोठ्या उत्साहानें भाग घेत असत. अर्थातच त्यांच्यामधील वृद्ध मंडळी आपल्या संघाच्या एकंदर स्थितीविषयीं, त्याचप्रमाणें बाहेरून कांही संकटें येण्याचा संभव आहे कीं काय, असल्यास त्यांचें निवारण कसें करतां येईल, वगैरे महत्वाच्या गोष्टींचा नीट खल करून आपलें पुढील धोरण आंखीत असत. राजनीति आणि पक्षभेद ही मानवी समाजा इतकीच पुरातन आहेत. आणि ज्या अर्थी हे समाज दांडग्या लढवय्या लोकांचे संघ आणि त्यांच्या जिंकलेल्या स्त्रिया यांनीं बनलेले असत, त्या अर्थी असल्या समाजाचे नेतृत्व राजनीतिकुशल आणि रणशूर योध्यांच्याकडेंच असे, यांत कांहींच नवल नाहीं.

असले उत्सव म्हणजे गायक, कवि, मांत्रिक, वैद्य भविष्यवादी, ज्ञानी, द्रष्टे, तत्त्ववेत्ते, त्याचप्रमाणें ताज्या दमाचे तरूण आणि आपल्या सौंदर्यानें मोहनी घालणाऱ्या तरूण स्त्रिया यांना स्फूर्तिदायक आनंदाच्या पर्वण्याच वाटत असल्यास काय आश्चर्य?

असल्या नानाविध चळवळींतूनच वाटेल त्या प्रकारच्या संस्कृति निर्माण झाल्या. यांपैकी हिंदुस्तानांतील संस्कृतीनें कोणतें विशिष्ट वळण घेतलें तें आपण लवकरच पाहूं.

या उत्सवांना व्यवस्थित स्वरूप देण्याकरितां त्यानीं लवकरच कांही नियम तयार केले. कांहीं काळानें हेच नियम धार्मिक विधी बनले. त्यांच्यांत होऊन गेलेले मोठमोठे नामांकीत पुढारी 'देवता' म्हणून पुजनीय मानले गेले. ['देवता' याचा अर्थ प्रकाशमान, तेजस्वी एवढाच आहे. 'देवता' म्हणजे देव परमेश्वर असा मुळींच नव्हे.] त्यावेळीं प्रचारांत असलेली गाणीं, प्रार्थना, आकांक्षा, आशा, त्यांचे सोमपानोत्सव यांचें वर्णन त्यांनीं ज्या ऋचांत करून ठेवलें, त्यांच्या संग्रहाला 'वेद' ही संज्ञा प्राप्त झाली. वेद हे माणसांनींच लिहून ठेवलेले आहेत. परमेश्वराचा त्यांच्याशीं कांहींहि संबंध नाहीं.

आतापर्यंत आर्यांमध्यें विवाहसंस्था निर्माण झाली नव्हती; आणि स्त्रियांना कोणत्याहि प्रकारचा दर्जा प्राप्त झालेला नव्हता. ज्याप्रमाणें पुरुषांना उपनयनाच्या विधीनें द्विजत्वाच्या श्रेष्ठ पदवीला जातां येत होतें, त्याप्रमाणें स्त्रियांना कोणत्याहि विधीनें पुरुषांच्या बरोबरीची योग्यता प्राप्त होत नव्हती. स्त्रियांना एकाच संस्काराची मोकळीक होती आणि तो संस्कार म्हणजे स्त्रीपुरुष-संयोग हाच.

प्राचीन काळच्या इंडोआर्यन समाजव्यवस्थेंत स्त्रिया म्हणजे 'आव जाव घर तुम्हारा' असल्या दर्जाच्या राष्ट्रीय मालमत्तेच्या वस्तू मानण्याची अधम चाल होती, असें मानण्याला पुष्कळशी जागा आहे. स्त्रीपुरुषांच्या समान योग्यतेचा जो आज मोठा बोलबाला आपण ऐकतो तो सर्व नव्या युगाचा नवा खेळ आहे. प्राचीन काळांत त्याचा मुळींच मागमूस लागत नाहीं. जंगलांत जाऊन शिकार करावी आणि मारलेलीं जनावरें शिजवून खाण्यासाठीं घरीं आणून टाकावी, ही पुरुषांची कामगिरी असे. घरचा विस्तव सारखा पेटलेला ठेवणें, आणलेल्या शिकारीचें अन्न तयार करणें आणि इतर सर्व गृहव्यवस्था ठेवणें, ही कामें पकडून

आणलेल्या स्त्रियांकडून चोपून करून घेण्यांत येत असत. मानवी इतिहास म्हणजे एक 'झाकली मूठ' आहे. ती उघडून पाहिली तर सारा विद्रुप आणि विलक्षण शेणसडाच दिसायचा. त्याला नटविण्यासाठीं वाटेल तितक्या सोन्यानें मढवा किंवा हिऱ्यामोत्यांनीं अलंकृत करा, मनुष्याचा पूर्वेतिहास म्हणजे खादाडीकरिता पशूंची शिकार आणि पशूंप्रमाणेंच स्वतःची विषयसुखसेवनाची धडपड, यापेक्षां अधिक कांहीं नाहीं असेंच आढळून येईल. जो अरण्यांत जाऊन जीवावर उदार होऊन पशूंची शिकार करी आणि घरीं मुबलक अन्न आणि पाणी आणी तो अर्थातच घराचा मालक—स्वामी, आणि जे घरीं स्वस्थ बसून तें अन्न शिजविण्याची व विस्तव पेटलेला ठेवण्याची वगैरे व्यवस्था करीत ते त्यांचे गुलाम. आमच्या अधःपाताचें मुख्य कारण जी विषारी भिक्षुकशाही तिचा मोठा आधारस्तंभ म्हणजे या गुलाम बनविलेल्या स्त्रिया.

पंडित उमेशचंद्र विद्यारत्न यांच्या सिद्धांताप्रमाणें आपले हे अर्धवट संस्कृतीचे आर्य मंगोलियांत वसाहतीसाठीं उतरले असें आपण धरून चालूं. या लोकांनीं आपल्या गुलाम बायका उत्तरध्रुवाकडील प्रदेशांतच टाकून दिल्या. अर्थातच मंगोलियांत आल्यानंतर त्यांनीं तेथें नवीन स्त्रिया पकडून आणल्या असल्या पाहिजेत व त्यांच्यापासूनच तेथें त्यांचा वंशविस्तार होऊन ते बरेच वर्षे तेथें वसाहत करून राहिले असावे, असें मानण्याला बरीच जागा आहे. कारण, हिंदुस्थानांतील कांहीं चांगल्या चांगल्या उच्च ब्राम्हण कुलांत मंगोलियन रक्ताची झांक अझून स्पष्टपणें दिसून येते.

पंडीत उमेशचंद्रांच्या मताप्रमाणें हे आर्य लोक नंतर मंगोलियातून इराणकडें वळले. दुर्दैवी इराणांत आर्यांच्या वेदसंस्कृतीच्या प्रगतीबरोबरच पारशांच्या अवेस्ताचीहि वाढ झालेली दृष्टीस पडते. या दोन संस्कृतींत इतकें साम्य आहे कीं, जणुं काय दोन निरनिराळ्या पोषाखांत असलेलीं ही दोन जुळीं भावंडेच होत. दोन कुत्रीं किंवा मांजरें भेटलीं म्हणजे जशीं एकमेकावर गुरगुरून लागलींच भांडायला सुरवात करतात, तसा वैदिक आर्य आणि वेस्तिक आर्य यांचा एकसारखा झगडा चालूं होता. गाथा नांवानें प्रसिद्ध असलेले अवेस्ताचे अगदी पहिले प्राचीन भाग आणि वेदाच्या ऋचा यांच्यामध्येंविलक्षण साम्य आहे, ही विचार करण्यासारखी गोष्ट आहे. विद्वानांच्या मतें झेंदांतील गाथा जर नीट समजून घ्यावयाच्या असतील तर अगोदर त्याकरितां वेदांचें नीट सम्यक ज्ञान असणें अत्यंत अवश्य आहे.

अवेस्ता संघानें आपल्या नामांकीत पूज्य नायकांना (Hero)अहूर असें नाव देऊन त्यांना देवतारूप दिलें. वैदिक आर्यांनीं त्यांची टायली करण्यासाठीं अहूरांना असूर असें खोडसाळ नांव दिलें. उलट पक्षीं, झेंदावेस्तावाल्यांनीं वैदिक आर्यांच्या देव देवतांना चोर लुटारू असलीं विशेषणें दिलीं. इराणांत वैदिक आर्य म्हणजे परकी उपटशुंभच आले होते. त्यांचा तेथें टिकाव लागे ना, म्हणून वसाहतीसाठीं त्यांना जवळच्या पंजाब गंगेच्या नवीन प्रदेशाकडे आपला मोर्चा अखेर वळवावा लागला.

इराणांतील हे दोनहि प्रतिस्पर्धी संघ विभूति—पूजेचे विलक्षण कडवे भोक्ते होते. "हे इंद्रा, वस्तुमात्राच्या अधिराजा, त्या दुष्ट वृत्राचें हनन कर!" हा वैदिक आर्यांचा आक्रोश एका बाजूला सारखा ऐकूं येत होता, तर त्याचाच प्रतिध्वनी"हे वृत्रा, विश्वाच्या अधिराजा, देवांच्या नायकाचे, त्या चोर दरोडेखोर इंद्राचें अणुरेणू इतके तुकडे तुकडे करून टाक!" या वेस्तिक आर्यांच्या ओरडण्यात उमटत होता. असले शिवराळ आक्रोश चिळस आणण्याइतके मुबलक आढळतात. वाटेल त्या क्षुल्लक गोष्टीच्या प्राप्तीकरितां वेळीं अवेळीं इंद्राची प्रार्थना करण्याच्या धार्मिक संवयीमुळें आर्यवंशाच्या स्वभाव—प्रवृत्तीवर केवढा भ्रष्ट आणि घातुक परिणाम झालेला आहे, हें मला अत्यंत स्पष्टपणें तुमच्या निदर्शनास आणले पाहिजे.

असले हे विलाप, धावे, प्रार्थना, आणि आमच्या प्रकृतिस्वभावात त्यामुळें भिनलेली सूडाची प्रवृत्ति याचा यथाप्राप्त परिणाम आज आमच्या तरूण मुलांत घरींदारीं व शाळांत दिसून येणाऱ्या कुत्सित आणि हलक्या कानाच्या प्रवृत्तींत दिसून येतो. चांगले वयांत येऊन उद्योगधंद्याच्या मार्गाला लागले तरी त्यांच्यांतील ही कुत्सितपणाची बुद्धी आणि चहाडखोरपणाची घातुक संवय जात नाहीं. कोणाला काय सांगावे आणि काय सांगूं नये ही तारतम्यबुद्धीच कोणांत दिसत नाहीं. या असल्या घाणेरड्या प्रवृत्तीमुळें अतिशय अनर्थ होतात. फार काय पण, कुटुंबांतल्या गुप्त गोष्टी युरपियन वकील किंवा युरपियन डॉक्टर यांना आम्ही जशा बिनधोक सांगूं शकतो, तितका विश्वास कोणत्याहि मोठ्या व पोक्त हिंदु वकीलावर किंवा हिंदु डॉक्टरावर टाकण्याचा आम्हाला धीर होत नाहीं.

स्वभावाच्या या कमकुवतपणामुळें वाह्यात वाचाळपणा येतो. पोटांत कोठलीहि गोष्ट ठरत नाहीं. रिकामटेकड्या आजीबाई प्रमाणें निंदाकुचेष्टांची भरंसाट पैदास करण्याची संवय लागते, आणि शत्रूमित्र भेद न मानतां सर्वांसाठीं गटारगप्पा पसरविण्याचे सार्वजनिक अड्डे सर्वत्र निर्माण होतात. आमच्या समाजाला सध्यां जी अधोगति आणि सत्वहीनता प्राप्त झाली आहे तिची हीं उघड उघड लक्षणें आहेत.

वर सांगितल्याप्रमाणें, इराणांत डाळ न शिजल्यामुळें ही वैदिक आर्यांची टोळी तशीच पुढें पंजाबात सरकली, व गंगेच्या खोऱ्यानें आपली वसाहत वाढविण्याच्या मार्गाला लागली. पण तेथेंहि त्यांना आपला मार्ग निष्कंटक आढळला नाहीं. त्यांच्या पूर्वी तेथें वसाहत करून राहिलेले लोक होतेच.त्या लोकांनीं आर्यांना चांगलीच विरोधाची टक्कर दिली. या जुन्या लोकांची संस्कृति या परकीय वेदशाखेच्या आर्यांच्या संस्कृतिपेक्षां कोणत्याहि प्रकारें हिणकस नव्हती. अर्थातच आपलें बूड प्रस्थापित करण्याकरितां या नवीन मंडळींचे त्यांच्याशीं बराच काळपर्यंत निकराचे झगडे, मारामाऱ्या व युद्धे सुरू होती आणि या सतत चाललेल्या झगड्यांत आर्यांना पुष्कळ वेळां सणसणीत माघारहि खावी लागली.

या विरोधी परिस्थितीमुळें नवीन वसाहतवाल्यावर मुळचीच असलेली जबाबदारी प्रचंड पटीनें वाढली. ह्या सदैव पुढें उभ्या ठाकलेल्या शत्रूंशीं लढाया मारणें, व त्यांच्याशीं युक्तीप्रयुक्तीचे डाव खेळणें हें तर प्राप्तच होतें पण त्याच बरोबर, जिंकलेल्या जमिनीची मशागत व लागवड करणें, चराईच्या कुरणांसाठीं जंगलतोड करणें, घरें बांधणें, बायकां मुलांच्या संरक्षणाची तरतूद ठेवणें, उदरनिर्वाहा करितां व चामड्यां करितां रानटी जनावरांची शिकार करणें, गुरांढोरांची जोपासना करणें, रांजण भांडी बनविणें, वस्त्रें शिवणें, धनुष्य बाण तयार करणें, नेहमीं लढायांसाठीं सज्ज असणें, हजार भानगडीचें आणि खटपटींचे वैदिक यज्ञ होमहवनादि कर्मे यथासांग आचरणें, इत्यादि अनंत कामें त्यांना करावयाची होती.

वसाहती करण्याकरितां आलेले हे लोक स्वावलंबनी, काटक आणि आपल्या चिमुकल्या संघाच्या भवितव्यतेची जबाबदारी पूर्ण ओळखणारे असे होते. काय वाटेल तें होवो, पण ह्या नवीन सांपडलेल्या सुपीक आणि सुसंपन्न हिंदुस्थानचा प्रदेश आपल्या हातातून मुळींच गमवायचा नाहीं, असा त्यांचा कृतनिश्चय झालेला होता.

पूर्वापार चालत आलेल्या पैत ऊर्फ उपनयनविधीनें प्रारंभीं जरी ते सर्व स्वतःस ब्राम्हणच म्हणवीत होते, तरी परिस्थित्यनुसार ज्याच्या त्याच्या मगदुराप्रमाणें त्यांना आपापसांत निरनिराळी शारीरिक व मानसिक कष्टाचीं कामें आपापसांत वाटून घ्यावी लागली.

श्रमविभागाच्या तत्वांवर उभारलेल्या या कामांच्या वांटणीमुळें आपल्यांत वैश्य, क्षत्रिय, त्याचप्रमाणें वेद आणि वेदमान्य निरनिराळे धार्मिक विधी, ग्रहताऱ्यांच्या स्थानावरून कालमापन करणें, मंत्रतंत्रविद्या, वैद्यकी, इत्यादि बौद्धिक विषयांचें सम्यक ज्ञान असलेला एक निराळाच वर्ग, याप्रमाणें निरनिराळे समाजवर्ग उत्पन्न झाले.

या शेवटल्या बुद्धिजीवी वर्गामधूनच ज्ञानी, ऋषी इत्यादि समाजाचे पुढारी उत्पन्न झाले. अशा रीतीनें समाज बनूं लागतांच त्याच्या नियंत्रणासाठीं, राज्यकारभाराचे धोरण कोणत्या प्रकारें ठेवावें किंवा विशिष्ठ प्रसंगीं कोणता मुत्सद्दी डाव खेळावा, वगैरे राजकारणी जबाबदारीहि त्यांच्यावरच पडली. ज्याप्रमाणें धार्मिक विधीचा अर्थ लावणें, त्यांना नियमबद्धता आणणें हा अधिकार त्यांचा, त्याचप्रमाणें देशाचें कायदे करणें आणि त्या कायद्यांचा योग्य अर्थ करून त्यांची बजावणी करणें हाहि अधिकार त्यांनींच आपल्या हातांत घेतला.

याच वर्गामधून ब्राम्हण जातीचा उदय झाला आहे. सर्वांना पूज्य वाटणाऱ्या या खास जातीनें पूर्वीच्या वर्गाचे नांव कायम ठेवून धर्म आणि राजकारण या दोहोंचीहि सूत्रें आपल्याच हातांत ठेवली. त्यांच्या दृष्टीनें राजकारण म्हणजे धर्मनियंत्रणसत्तेचीच पुरवणी म्हणून समजली जात असे. अर्थातच इतर सर्व वर्गाचे गुरुन किंवा धार्मिक नेते म्हणून ज्यांचे स्थान आज तागायत या समाजांत चालत आलें आहे, त्या लोकांचा ‘उपाध्याय’ किंवा ‘भिक्षुक ब्राम्हणवर्ग’ म्हणून निर्देश केल्यास त्यांत कांहीं वावगें नाहीं.

वेदशाखीय आर्यांचे हिंदुस्थानांत पाऊल पडण्यापूर्वी जे लोक येथें होते त्यांना आपण द्रविड—नाग या नांवानें संबोधूं. प्रस्तुत निबंधाच्या सोईकरितां द्रविड आणि नाग या दोन जातींच्या नामसमुच्चयानें बनविलेल्या या नांवामध्यें असुर, गंधर्व, राक्षस, दैत्य, दानव, पिशाच्च, भूत वगैरें निरनिराळीं नांवें आर्यांनीं दिलेल्या सर्व वर्गांचा मी समावेश केलेला आहे. हें सर्व वर्ग वसाहतीच्या प्रवृत्तिपेक्षां युद्धकलेंत आर्यांपेक्षां केव्हांहि अधिक निष्णात आणि बलवान होते.

हे द्रविडनाग अगदींच सरळ, प्रामाणिक, उदार, अतिथींचा मोठ्या प्रेमानें सत्कार करणारे, छक्केपंजे न जाणणारे आणि चटकन् फसले जाणारे असले भाबडे आहेत, हें त्यांच्या शत्रूंच्या लवकरच ध्यानांत आलें. अशा भोळसट आणि उदार प्रतिस्पर्धांच्या मनांतील आपल्याविषयींचा वैरभाव काढून टाकून त्यांच्याकडून तहनामें, सवलती, वगैरेंच्या रूपानें बरेचसे हक्क प्राप्त करून घेणें, हें मुत्सद्देगिरींत मुरलेल्या लबाड ब्राम्हणवर्गाला अगदींच सहजसाध्य झालें.

अगदी प्राचीनकालापासून या पुरोहितशाहीचा ऊर्फ भिक्षुकशाहीचा वरचढपणा कसा प्रस्थापित झाला, हें तुमच्या आतां लक्षांत आलें असेल. ते कधीं राजे झाले नाहींत किंवा राजपद घेण्याची त्यांनीं इच्छा केली नाहीं, परंतु राजाचे सल्लागार राजमंत्री म्हणून मात्र सर्व सत्ता आपल्याच हातांत ठेवण्याचा त्यांचा नेहेंमींचा कावा होता. एवढेंच नव्हे तर प्रसंगी नवीन नवीन राजे निर्माण करण्याकडेहि आपल्या सत्तेचा ते उपयोग करीत असत. राजांच्या गैहजेरीची सवलत मिळून, राज्यकारभार आपणांस हवा तसा हाकण्यास मिळावा, म्हणून खुद्द राजांना राणीवशात राजपत्न्या आणि नाटकशाळांच्या शृंगारविलासांत हवे तितके दिवस, कधिं कधिं वर्षांनुवर्षे सुद्धां, रमण्याची सवलत हे धर्मगुरू खुशाल देत असत.

या ब्राम्हण भिक्षुकांच्या वर्गानें ज्ञान संपादण्याच्या आणि सृष्टीचें ज्ञानभांडार ज्या ज्या मार्गानें खुलें होईल ते ते मार्ग शोधून काढण्याच्या कार्याला अत्यंत निःस्वार्थबुद्धीनें आणि अकृत्रिम उत्साहानें पूर्णपणें वाहून घेतले. उग्र आणि दुस्तर योगसाधनांचा अवलंब करून, वर्षानुवर्षे निरनिराळे अवघड सिद्धींचे प्रयोग करून, ज्ञात वा अज्ञात सृष्टींचे नियम संशोधन करून आपल्या सुप्त शक्ती कोणत्या प्रकारें जागृत करतां येतील, यांचा त्यांनीं अभ्यास चालविला. अशा रीतीनें बौद्धिक सामर्थ्यांत इतर मानवापेक्षां आपण सर्वांत श्रेष्ठ किंवा एक प्रकारें आधिदैविक गुणानीं संपन्न आहोत, अशी इतरेजनांवर त्यांनीं छाप बसविली. अर्थातच सर्वांनीं यांना प्रत्यक्ष देव मानून, यांच्या पायावर धडाधड लोटांगणें घालावी, अशी इतर लोकांची समजूत होऊन बसली.

पृथ्वीवर सम्राट काय किंवा एकंदर साधारण जनता काय, या दोघांचेंहि आपणांवाचून अडलें पाहिजे, इतकें त्यानीं जापलें प्रस्त समाजात वाढविलें. समाजव्यवस्थेची अखिल रचनाच जणुं काय या भिक्षुकशाहीच्या मिजासखोर लहरीवरच अवलंबून राहिली पाहिजे, अशी स्थिती प्राप्त झाली. राजे लोक मोठमोठी युद्धें करीत; का? तर त्यांच्या भिक्षुक मंत्र्यांची इच्छा म्हणून शत्रूंना जिंकून त्यांचे देशचे देश उध्वस्त करीत; कां? तर तेथें भिक्षुकवर्गाला आणि भिक्षुकशाहीच्या पुरस्कर्त्यांना हातपाय पसरण्याला वसाहतीची जागा हवी म्हणून. युद्ध संपल्यानंतर दोन्ही पक्षांच्या तहनाम्याच्या अटी ठरविण्याचा अधिकार यांचाच. एवंच पूर्वीपासून सगळ्याच बाबींत आपण विशेष हक्कदार असल्या विशिष्ट अधिकाराचें अत्यंत उच्च स्थान या भिक्षुकानीं समाजात प्राप्त करून घेतलें. हळूं हळूं ही द्रविडनाग राज्यें भिक्षुकशाहीच्या वजन व सत्तेच्या कारवाईला बळी पडत चालली. नागरीक संघ नात्यानें त्यांचें स्वातंत्र्य जरी कायम होतें. तरी एकंदरीने भिक्षुकशाहीचा पगडा त्यांच्यावर जबरदस्त बसला होता. जातीभेदसंस्थेचा त्यानीं आपल्या समाजरचनेंत अंगिकार केला. उपनयनविधी आणि होमाग्नीच्या द्वारें यज्ञपूजा वगैरे ब्राम्हणी धर्मविधीचाहि त्यांनी स्वीकार केला. मात्र या धार्मिक विधींचे कर्तृत्व व नेतृत्व बिनशर्त भिक्षुकांच्याच हातीं ठेवलें लवकरच सोमरस काढण्याच्या आणि पिण्याच्या कलेंत द्रविडनाग तरबेज झाले. थोडक्यात सांगावयाचें म्हणजे वेदशाखीय आर्यसमाजाच्या शरीरावर हें एक कलमच बांधण्यांत आलें. आर्य हे सुंदर, उंच, भव्य, मजबूत बांध्याचे, गौरवर्णाचे, कांतीमान् असून त्यांची शरीररचना रेखीव होती. साहजिकच द्रविडनाग जातीच्या काळ्यासावळ्या कुमारिकांच्या चित्ताला त्यांनीं भुरळ पाडली असल्यास काय नवल?

वेदानुयायी आर्य आणि ब्राम्हणधर्मीय बनलेल्या या द्रविड नाग जाती, त्याचप्रमाणें ह्यांची संतती आणि भिक्षुकशाहीच्या अंमलाखालीं अजून न आलेल्या शुद्ध अनार्य जाती यांच्या सर्रास मिसलीनें आपल्यामध्यें आठ प्रकारचे विवाहविधी उत्पन्न झाले.

परिस्थितीच अशी झाली होती कीं, स्वतःच्या स्वास्थ्यसंरक्षणाकरितां आर्यांना परस्पर बेटीव्यवहाराच्या द्वारें द्रविडनागांशीं असले विवाहसंबंध जुळवून आणणेंच जरूर पडले. या दोन समाजाची अशा रीतीनें देवाण घेवाण सुरूं होऊन एकमेकांची घसट सुरूं झाल्यावर ब्राम्हणांनाहि द्रविडनागांच्या विद्रूप आणि ओबडधोबड देवतांना आपल्या देव्हाऱ्यांत स्वतःच्या वैदिक देवतांच्या शेजारीं स्थान द्यावें लागलें. परिस्थितीनें घडवून आणलेला हा समेट होता. अशा रीतीनें आर्यांना आपल्या पूर्वीच्या शुद्ध वैदिक वळणापासून जबरदस्तीनें बाजूला सरणें भाग पडलें.

आर्य आणि अनार्य या दोन्ही वर्णांतील खालच्या वर्गांची एकमेकांशीं सरसहा भेसळ होऊन त्यापासून शूद्राचा नवीन वर्ग उत्पन्न झाला. त्यांच्या रक्तमिश्रणाच्या गुणधर्माप्रमाणें आणि त्यांच्या

अनुक्रमणिका

कर्यक्षमतेच्या स्वरूपाप्रमाणें त्यांच्यामध्येंहि निरनिराळे थर पडले. अशा रीतीनें त्यावेळचे श्रम विभागाचे (लेबर प्रॉब्लेम्स) बरेचसे प्रश्न सुटले.

शूद्र आणि ब्राम्हण यांच्या विवाहासंबंधाविषयीं मनुस्मृतीमध्यें कांहीं ठिकाणीं सांपडत असलेला निर्बंध आणि कांहीं इतर ठिकाणीं असल्या विवाहाची फक्त ब्राम्हणालाच त्यानें दिलेली मोकळीक, ह्या गोष्टी वरून असें स्पष्ट दिसतें कीं, मनूच्यापूर्वी ब्राम्हण लोक शूद्र स्त्रियांबरोबर राजरोसपणें स्वैर संबंध ठेवीत असले पाहिजेत.

रामायण आणि महाभारत या महाकाव्यांचे नीट चिकित्सक परिशीलन करा, म्हणजे त्या वेळच्या समाजाचें स्पष्ट चित्र तुमच्या समोर उभें राहील. भिक्षुकशाहीच्या अंमलाखालील त्या समाजांत अनिर्वेध स्वेच्छाचार आणि आठ प्रकारच्या विवाहपद्धतीच्या योगें वाटेल तितक्या स्त्रिया करण्याची रीत यांच्या द्वारें समाजाची वाढ होत चाललेली तुम्हास दिसेल. त्याचप्रमाणें, त्यावेळच्या क्षत्रियांनीं लढलेल्या मोठमोठ्या लढाया आणि त्यांचीं धैर्याचीं आणि धाडसाचीं अद्वितीय शूर कृत्यें यांच्या मुळांशीं तुम्हाला एकच गोष्ट दिसून येईल कीं, या सर्व शूरधीर कृत्यांच्या पाठीमागें, क्षत्रिय सत्तेला किंवा राजसत्तेला वाटेल तशी नाचविणारी शक्ती ही भिक्षुकशाहीच होय.

प्राचीन हिंदुस्थानचा इतिहास ब्राम्हणवर्गानेंच घडवून आणला आहे यांत तिळमात्र संदेह नाहीं. त्या वेळचा ब्राम्हणवर्ग खरोखरीच थोर होता. कारण कसाहि वारा येवो, कितीहि भयंकर वादळ होवो, धीर खचूं न देतां, आर्यसमाजाचें तारूं कुशल नाविकाप्रमाणें त्यांतून सुरक्षितपणें कसें हांकारावें हें फक्त त्यालाच माहीत होते.

समाजाच्या नेतृत्वपदासाठीं क्षत्रिय आणि ब्राम्हण यांच्यामध्यें पुष्कळ वेळा झगडे झाले. या प्रत्येक झगड्यांत क्षत्रियांपेक्षां ब्राम्हणानींच यश संपादन केलें. आपण प्रत्येकबाबतींत, क्षत्रियोचित शस्त्रधारणेच्या बाबतींतसुद्धां, निःसंदेह श्रेष्ठ आहोंत हें त्यांनीं सर्वांच्या निदर्शनास आणून दिलें. अशाच एका झगड्यांत क्षत्रियांना नामोहरम करून त्यांना सफाई नष्ट करण्याच्या हेतूनें ब्राम्हण परशुरामानें एकवीस वेळा क्षत्रियांचा भयंकर पराभव करून जवळ जवळ त्यांची सत्ता नामशेष केली होती. पण क्षत्रियांच्या नाशाबरोबरच परशुरामानें ब्राम्हणांच्या नाशाचाहि खड्डा तयार केला, यांत मुळींच शंका नाहीं.

क्षत्रियांची सत्ता अशा रीतीनें एकदम रसातळास गेल्यामुळें समाजव्यवस्थेचा सर्व तोल नाहींसा झाला. ब्राम्हणाला कह्यांत ठेवील किंवा त्याला विरोध करील असा कोणीहि बरोबरीचा उरला नाहीं. त्यामुळें तो वर्ग अधिकारमदानें बेताल आणि धुंद झाला. त्याच्या ठायीं असलेल्या सद्‌गुणांचा लोप होऊन तो चैनी, विषयासक्त, दुराचारी आणि अधम झाला. अर्थातच त्याचा यथागत परिणाम म्हणजे त्याचा अंधःपात झाला. त्याच्या अंधःपतनाबरोबरच त्यानें उभारलेल्या प्राचीन हिंदु समाजाचा मनोराहि गडगडून कोसळला. समाजाचा नेता आणि धर्मगुरू ब्राम्हण याचा अंधःपात म्हणजेच त्या अखिल हिंदु समाजाचा अंधःपात होता. मी त्याच अंधःपाताचें चित्र कोणताहि आडपडदा न ठेवतां आपल्यापुढें स्पष्टपणें रंगवून ठेवण्याचा प्रयत्न केला आहे.

पण त्याचबरोबर एक दोन गोष्टी नाकबूल करून चालणार नाहींत. समग्र हिंदुस्थान जो आर्यांच्या ताब्यांत आला तो ब्राम्हण वर्गानेंच आपल्या राजकारणी डावपेचांनीं व मंत्रतंत्रादि धार्मिक अवडंबराच्या भुल

भुलावणीनें आणला व एकदां तो आपलासा केल्यावर त्यावर आपल्या जुन्या पुराण्या भिक्षुकशाहीच्या संस्कृतीची जबरदस्त छाप बसविली. ही संस्कृति व तिच्यावर उभारलेली समाजघटना शतकानुशतकें सर्व प्रकारच्या परिस्थितींतून बौद्ध आणि इस्लामी धर्म ह्यांच्या जबरदस्त घाल्यांनाहि न जुमानतां, कशीबशी दुर्बल स्थितींतच कां होईना, पण आजतागायत तगविली.

त्याचप्रमाणें आज ब्रिटीश अमदानींत, लोकांच्या सामाजिक किंवा धार्मिक आचारविचारांत ढवळाढवळ किंवा जुलूम जबरदस्ती करावयाची नाहीं, या राजकर्त्यांच्या उदार आणि विवेकी धोरणामुळें, आपली सत्ता पुन्हां सांवरून दृढ करण्यास या भिक्षुकांना चांगलीच संधी मिळाली, हीहि गोष्ट प्रत्येकाला कबूल केली पाहिजे. व्यक्तीच्या विशिष्ट धर्मभावनांना धोका पोहचण्याची मुळींच भिती नाहीं व आचारविचारांच्या बाबतींतहि दुसऱ्यांकडून उपसर्ग होणें शक्य नाहीं. अशी नामी संधी पाहतांच भिक्षुकशाहीला अर्थातच मूठभर मांस चढल्यासारखें होऊन, आपल्या जुन्यापुराण्या सामाजिक वर्चस्वाचा अंमल अखिल हिंदु समाजावर गाजविण्याची त्यांनीं जबरदस्त खटपट चालविली.

सध्यां आमच्या देशांत कायदा आणि शिस्त राखण्याची जबाबदारी ब्रिटीश सरकारनें पत्करली आहे. तो मामला आतां भिक्षुकशाहीकडे राहिलेला नाहीं. पण प्राचीन काळापासून, आमच्या धार्मिक, सामाजिक, नैतिक, आत्मिक किंवा बौद्धिक संरक्षणाचा प्रश्न जर ब्राम्हण पुरोहित आणि धर्माच्या सबबीखालीं उभारलेली त्यांची अधार्मिक भिक्षुकशाही यांच्याच हातीं आहे, आणि त्या बाबतींत जर आमचा अधःपात झाला असेल, तर हिंदुस्थानांतल्या प्रत्येक हिंदूनें त्याबद्दल भिक्षुकशाहीला खडखडीत जाब विचारला पाहिजे. आमच्या सर्व श्रेयाची ठेवच जर त्यांनीं सांभाळली होती, तर तिच्या बऱ्या वाईटाचा सर्व हिशोब भिक्षुकशाहीला आतां बिनचूक दिलाच पाहिजे.

ऋग्वेद, यजुर्वेद आणि शतपथ ब्राम्हण यांमध्यें अखिल ब्रम्हांडाचा अधिराज सर्वशक्तिमान असा एकच परमेश्वर आहे अशा भावनेनें गाईलेलीं किती तरी गंभीर आणि उदात्त कवनें सांपडतात. पण हें उदात्त तत्त्व आपल्यापुरतेंच गुप्त ठेऊन, समाजाच्या मनावर भिक्षुकशाहीचें वर्चस्व कायम राखण्याच्या हेतूनें, **जसा भक्ताचा भाव तसा त्याचा देव या निमित्तानें, शेंकडों देव आणि देवता निर्माण केल्या.** ह्या देवदेवतांच्या नानाविध कथांनीं ही भोळसट कुळें चांगलीच भारली गेलीं. मग काय?भिक्षुकशाही आणि त्यांचे जातभाई यांना मोकाट चरण्याकरतां सर्व रान मोकळें झालें. जितके देव तितक्या पूजा. पूजा म्हटली कीं ब्राम्हणाला मोठमोठ्या दक्षिणा दिल्याच पाहिजेत. त्याशिवाय, या देवांच्या नांवानें मधून मधून जातीची व त्याबरोबर ब्राम्हणांचीही भोजनें घातली पाहिजेत. त्याशिवाय इहपरलोकाच्या शाश्वत सुखाची संपादणी कशी होणार? असल्या शिकवणीमुळें भक्तांच्या पिशविचें तोंड चांगलेंच मोकळें झालें आणि त्यांतला सारा ओघ ब्राम्हणांच्या घरादारांकडे वळला. पुष्कळशा देवदेवता असल्या म्हणून बिघडलें कुठें? बरोबरच आहे! भक्ती ही काय? एकनिष्ठपणें कोणत्याहि देवतेची केली तरी फलप्राप्ती एकच. कारण भिक्षुकशाहीचें एक जाडें तत्त्व आहेना कीं, उपासना कोठल्याही मार्गानें केली तरी शेवटीं ती एकाच परम ईश्वराकडे पोहोंचणार!

मी पूर्वी सांगितलेंच आहे कीं, वेदांमध्यें 'देवता' हा शब्द 'ईश्वर' या अर्थानें मुळींच वापरलेला नाहीं. जुने आग्रही शास्त्री पंडित आणि परकीय युरपियन विद्वान यांनीं त्याचा तसा चुकीने अर्थ लावला आहे. निरुक्तामध्यें (७–१५) 'देवता' शब्दाची अगदीं स्पष्ट व्याख्या केली आहे. "जें जें काहीं आपल्या सुखाची अभिवृद्धि करण्यास समर्थ आहे, जें चराचर वस्तुमात्राला प्रकाशित करूं शकतें, किंवा वस्तुमात्राचें ज्ञान ज्यामुळेंच मिळणें शक्य आहे, त्याचप्रमाणें सर्व तेजाचें तेज ज्यांत सांठविलें आहे, अशा प्रत्येक गोष्टीला

अनुक्रमणिका

देवता हें अभिधान देण्यास हरकत नाहीं. "या व्याख्येवरून 'देवता' हा शब्द कोणत्या अर्थानें वापरीत असत याचा नीट उलगडा होईल.

भिक्षुकशाहीनें आपल्या संस्कृतीचा प्रसार करतांना कमी प्रतिकाराच्या प्रसंगाचें धोरण स्वीकारलें होतें. स्वतःचा हेतु साधण्यासाठीं त्यांनीं आपल्या पूज्य वेदांची सुद्धां पर्वा केली नाहीं. एका परम ईश्वराच्या भक्तीचें उदात्त ध्येय पायांखालीं तुडवून, शेकडों देव देवतांच्या उपासनेचा प्रसार करण्यांत ब्राम्हण वर्गानें, समाजाचा अध्यात्मिक गुरू या नात्याची आपली जबाबदारी ओळखली नाहीं व समाजाचा त्या बाबतींत त्यानें अगदीं विश्वासघात केला, असेंच म्हणणें भाग आहे.

यामुळें खरें तत्त्व बाजूला राहून त्याच्या भोंवतीं निरनिराळ्या पोकळ नांवांचें आणि कोरड्या विधींचें जाड कवच पडलें. बहुजनसमाज या वरच्या आगंतुक आवरणालाच सत्तत्त्व म्हणून कवटाळूं लागला. नाना मतांचे आणि नाना तऱ्हेचे पंथ त्यांच्यामध्यें भराभर उत्पन्न होऊं लागले. स्वतःच्या संस्कृतीचा आणि सत्तेचा विस्तार करण्याच्या लालसेनें ब्राम्हण वर्गानें धर्माचें गांभीर्य मात्र गमावलें. सत्ता, इभ्रत आणि संपत्ति यांच्याकरितां आपल्या सद्सद्विवेक बुद्धीचा त्यानें भर चव्हाट्यावर लिलांव केला आणि त्यांचे अनुयायी भक्तजन ज्या भिकार अभिरुचीच्या खातेऱ्यांत लोळत होते त्याच नैतिक अधःपाताचे त्यानें कुंटणखानें उघडले.

सर्व समाज मानसिक गुलामगिरींत जखडल्यामुळें चोहींकडून भिक्षुकशाहीचीं स्तुतिस्तोत्रें झडूं लागलीं. समाजांतील सर्व प्रकारचे लोक त्यांच्या पदारविंदीं लोटांगणें घालूं लागले. इतर तऱ्हेनेंहि त्यांना शेकडों प्रकारच्या विशेष सवलती व अधिकार प्राप्त झाले. मनुस्मृतीसारख्या कायद्यांनीं त्यांना शिक्षेची भीति ठेवली नाहीं. अशी वाटेल तशीं बेजबाबदार सत्ता त्यांच्या हातांत सामावली होती. फाजील मान सन्मान आणि फाजील सत्ता यांमुळें हिंदुस्थानच्या धर्माचे हे अधिराज ब्राम्हणदेव भ्रष्ट झाले. नागडा स्वार्थ आणि बेहोष चैनबाजी यांनीं ते धुंद होऊन गेले.

आपल्या सत्तेचा त्यांनीं वाटेल तसा प्रसार केला. पण ज्या नानाविध वर्गांशीं त्यांचा संबंध आला किंवा ज्यांना त्यांनीं आपल्या कह्यांत आणले त्यांची संस्कृति कोणत्या दर्जाची आहे, याची त्यांनीं मुळींच फिकीर केली नाहीं. किंवा जीमुळें त्यांच्यामध्यें कांहीं तरी एकजिनसीपणा येईल, किंवा ते चांगले सुशिक्षित होऊन सर्व तऱ्हेनें त्यांचा विकास होईल, अशा तऱ्हेच्या संस्कृतींची त्यांनीं अपेक्षाहि केली नाहीं. नवीन नवीन प्रदेश आणि नवीन नवीन समाज आपल्या सत्तेखालीं येत आहेत; मग नसता व्याप आणि चिकित्सा करावयाला सांगितली कोणी?इतकी त्यांची दृष्टी सकुंचित आणि सत्तामोहानें आंधळी झाली होती.

स्वतःची सत्ता अबाधित रहावी, तिचा कोणत्याही तऱ्हेने भंग होऊं नये म्हणून त्यांनीं 'फोडा आणि झोडा' या मुत्सद्दी तत्त्वानुसार समाजाचे निरनिराळे वर्ग पाडले. शतकानुशतकांच्या लोकांच्या अज्ञानामुळें हेच भेद जुन्या पुराण्या हाडांप्रमाणें निर्जीवआणि अभेद्य बनले. आपणा व्यतिरिक्त सर्व समाज असा वेगळा व स्थिरस्थावर बनलेला सांपडल्यावर ब्राम्हणी सत्ताधाऱ्यांनीं सगळ्या विद्यांचा आणि ज्ञानाचा मक्ता आपल्याकडे ठेवला आणि आपल्या उत्पत्तीची मूळपीठिका थेट स्वर्गांतल्या ब्रम्हदेवाच्या तोंडापर्यंत नेऊन भिडविली, यांत नवल तें काय? अहंकार आणि मद काय करणार नाहीं?

अनुक्रमणिका

चक्रवर्ती राजाच्या कन्येपासून तों एखाद्या चांडाळाच्या मुली पर्यंत ब्राम्हणाला वाटेल त्या स्त्रीची मुभा! स्वतःची उत्पत्ति खुद्द ब्रम्हदेवापासून झाल्याची प्रौढी मारल्यावर एका वेळीं किती स्त्रियांचा स्वीकार करावा याचा धरबंधच उरला नाहीं. प्रेमासाठीं स्त्रियांचा स्वीकार, ही कल्पनाच त्याला कधिं शिवली नाहीं. लहर लागतांच विषयवासना तृप्त करण्याकरितां शेंकडों तरूण स्त्रिया जर हात जोडून त्याच्यापुढें केव्हांहि हजर, तर प्रेमशोधनाच्या नसत्या फंदांत त्यानें तरी कां पडावें?मुलें बाळें झालीच तर एखाद्या स्त्रीवर यांची प्रेमाची मेहरनजर कधीं फिरली तर एखादे वेळेस फिरावयाची.

संतति व्हावी म्हणून लग्न करावयाचें. ती संतति कायदेशीर ठरावी म्हणून विवाहाचा खटाटोप. लग्न-संबंधांत प्रेम म्हणून कांहीं चीज आहे, पत्नीवर प्रेम करावें किंवा तिच्यापासून प्रेमाची अपेक्षा करावी, असली कोणतीहि भावना विवाहाच्या मुळाशीं नसे. वधूशोधनाची खटपट करण्याची त्याला कधीं जरूरच भासली नाहीं. आपल्या मुलींना पदरांत घ्यावें म्हणून त्या मुलींचे आईबाप किंवा पालक आपण होऊन त्यांच्या चरणांवर आपल्या मुली घालीत असल्यावर, वधूसंशोधनाची त्याला काय जरूर पडली आहे?जर तिला मुलेंच होत नसतील तर, किंवा नुसत्या मुलीच होत असतील तर, शास्त्राच्या अनुज्ञेप्रमाणें मुलगा होण्याकरितां दुसऱ्या बायकोची तजवीज पहाणे त्यांना भाग पडे. धर्माज्ञेपुढें त्यांचा तरी काय इलाज चालणार!

कारण, जर पोटीं मुलगाच झाला नाहीं तर मृत्यूनंतर पूत नामक नरकांत जाण्याची पाळी येणार! असल्या घोर आपत्तीपासून बचाव करण्यासाठीं बिचाऱ्यांना पुत्रप्राप्ती होईपर्यंत पोसवतील तितक्या स्त्रिया करण्याचा खटाटोप करणें भाग असें. इच्छित फलप्राप्ती होईपर्यंत त्यान वाटेल तितक्या स्त्रीरूपीं शेतवाड्यांची नांगरणी पेरणी करण्याचा जन्मसिद्ध हक्कच होता.

मी हें स्वतःच्या पदरचें कांहीं तरी बनवून तुम्हास सांगत आहे असें तुम्हीं समजूं नका. “पुत्रार्थे क्रियते भार्या” हें हिंदु विवाहधर्मांतील सूत्र तुमच्या खास ऐकिवांत असेल. विवाह आणि प्रेम याबद्दलची हिंदु समाजाची कल्पना कोणत्या कृत्रिम, यांत्रिक, पाशवी व बिनकाळजाच्या प्रेमशून्य आचारपद्धतीवर उभारलेली होती आणि ती किती घाणेरडी आणि स्त्रीवर्गाची विटंबना करणारी होती, ही गोष्ट अगदीं ढळढळीतपणें तुमच्या नजरेस येईल.

असल्या बळजबरीच्या प्रेमशून्य संबंधापासून उत्पन्न झालेली प्रजा कशी होणार याचें काय भविष्य सांगण्याची जरूर आहे?राष्ट्रांतील स्त्रीपुरुषांच्या आंगीं राष्ट्रसंवर्धनाकरितां ज्या शारिरीक नैतिक वा आत्मिक गुणांची जरूरी असते, यांचा त्यांच्याठायीं अर्थातच पूर्ण अभाव असणार आणि असतोहि. मग आम्ही आज इतके खालावलेले आणि दुर्बल कां बनलो आहोंत याचीं कारणें आणखी निराळी सांगितली पाहिजेत काय?

या जगांत मानसन्मानाच्या आणि सुखोपभोगाच्या ज्या ज्या गोष्टी आहेत त्या सर्वांची हिंदू समाजानें ब्राम्हण वर्गावर हवीतशी मनमुराद मुबलक खैरात केल्यामुळें त्या वर्गाचा स्वर्ग मात्र हातचा गमावला खास, आत्मस्तोमाला आणि चैनबाजीला ब्राम्हण आरपार लालचटला. स्वतःच्या बडेजावीची फाजील कल्पना, गिधाडाप्रमाणें सदोदित लोभी हावरटपणा आणि मनाचा नीचपणा असल्या अधर्म दुर्गुणांचा तो गुलाम बनला. स्वतःच्या हृदयांत राष्ट्रप्रेमाची जाणीवच नसल्यामुळें, प्रत्येक गोष्टीत भटांच्या तोंडाकडे पाहण्याची

संवय लागलेल्या हिंदु समाजाला राष्ट्रभक्ति ही काय चीज आहे, याचें ज्ञान करून देण्याची भटांत अक्कलच उरली नाहीं.

“द्या द्या द्या ब्राम्हणांना दक्षिणा द्या, त्याला संतुष्ट करा, म्हणजे या जगांतील तुमची इतिकर्तव्यता संपून परलोकांतील शाश्वत सुखाचीहि तुमची तरतूद होईल. तुम्हांला कांहीं करण्याची जरूरीच नाहीं.” ही यांची समाजाला अहर्निश शिकवण. **लोकांनीं शहाणे होऊन आपलें बिंग ओळखूं नये आणि आपल्या मानेवरचें अंधश्रद्धेच्या आणि बदनामीच्या गुलामगिरीचें जूं झुगारून देऊं नये, म्हणून या सुलतानी भिक्षुकशाहीनें कोणत्याहि प्रकारच्या शिक्षणाची लोकांना कधींच मोकळीक ठेवली नाहीं.**

ब्राम्हणांच्या या कारस्थानांवरून बायबल मधील अडॅम आणि ईवच्या गोष्टीची तुम्हाला आठवण होत नाहीं कां?ईश्वरानें अडॅम व ईव्ह याना ईडनच्या बागेंतील ज्ञानाचें फळ चाखण्याची जशी सक्त मनाई केली होती, तसाच प्रकार या ब्राम्हणानीं केला. या ‘देवांच्या आज्ञा’ म्हणून समजूत झालेल्या हिब्रू, मुसलमान आणि क्रिश्चन समाजाचें किती नुकसान झालें आहे याची तुम्हाला कल्पना आहे काय?हिब्रू, मुसलमान व क्रिस्ती लोकांना त्यांच्या भिक्षुकशाहीनें हिंदू प्रमाणेंच, पूर्ण अज्ञानांधःकारांत ठेवले आहे.

क्रिस्ती समाजाला चर्चच्या धार्मिक मगरमिठींतून आपण सुटलों आहोत असें अझून तरी म्हणतां येईल काय?मला नाहीं असें वाटत. भिक्षुकशाहीची मिठीच मोठी जबरदस्त असते. तरी पण त्यांतूनहि कांहीं निधड्या छातीचे क्रिस्ती निषेधक वीर जगाच्या उद्धाराकरितां सत्य आणि शास्त्रीय ज्ञान यांचे तेजस्वी पलीते पाजळीत धिटाईनें पुढें येत आहेत. जगाच्या उन्नतीकरितां ज्ञानाचा असला प्रकाश कोणत्याच भिक्षुकशाहीनें आजपर्यंत पाजळलेला नाहीं. शिक्षुकशाहीच्या छळाची दरकार न बाळगतां जगाच्या उन्नतीच्या मार्गावर उजळलेल्या या ज्ञानदीपांबद्दल आपण त्यांचे सदैव ऋणी राहिले पाहिजे.

आजचें कोणतेंहि सुधारलेलें राष्ट्र घेतलें तर त्याच्या राज्य कारभाराचें धोरण आपली व्यापारी भरभराट कशी होईल व त्या योगानें राष्ट्राचें सांपत्तिक वैभव कसें वृद्धिंगत होईल या एकाच दिशेनें आखलेलें बहुतेक आपल्या नजरेस येईल. तद्वत हिंदूंच्या वैभवकालीं त्यांच्या राज्यकारभाराचें सुकाणू सवतःच्या हातीं ठेवणाऱ्या ब्राम्हणांचें धोरण आपल्या भिक्षुकशाहीचें धार्मिक वैभव व वर्चस्व कसें वाढेल या दिशेकडेच नेहमीं वळलेलें असे. आणि हें धोरण संभाळण्यासाठीं समाजस्वास्थाची बिलकूल पर्वा न करतां आपल्या भिक्षुकशाही महत्त्वाकांक्षेच्या कुंडांत वाटेल त्या गोष्टीची आहुती देण्यास ते केव्हांहि मागें पुढें पहात नसत.

हिंदु जनांच्या सामाजिक व धार्मिक व्यवस्थेंत कोणत्याहि प्रकारें हात घालावयाचा नाहीं, हें आजच्या ब्रिटिश राजकर्त्यांचें राज्यधोरण असल्यामुळें, लोभी आणि काकवृत्ती कपटी भिक्षुकशाही तापल्या तव्यावर हव्या तशा पोळ्या भाजून घेत आहे. या नामी संधीचा फायदा घेऊन आपल्या भरंवशाच्या कुळांना, आजच्या अज्ञानी धर्मभोळ्या व अन्नाला मोताद झालेल्या दरिद्री हिंदु जनांना, नागवून ते वाटेल तशी चैन करीत आहेत.

ब्राम्हण पुरोहितांनों, हिंदुस्थानच्या आध्यात्मिक संपत्तीच्या बादशाहानों, तुम्ही निर्माण केलेल्या या दगडासारख्या चैतन्यहीन समाजघटनेच्या गुलामांनों, तुम्ही घमेंडखोर हेटाळणीनें आमच्याकडे पाहून हसत आहांत, हें आम्हाला कळत आहे बरें! पण, मेहरबान, लक्षांत ठेवा, मी तुम्हाला बजावून ठेवतों कीं,

अनुक्रमणिका

तुमच्या अंतःकरणांत हिंदुस्थानाबद्दल अझुनहि किंचित प्रेम असेल, तर हें तुमचें विकट हास्य जागच्या जागीं जिरून तुमच्या डोळ्यांतून अश्रूंचे पाट वाहू लागतील. जरा डोळें उघडून आजूबाजूला नजर टाका.जगांतील इतर धर्मांच्या छत्राखालीं वावरणाऱ्या समाजांची स्थिती काय आहे आणि **तुमच्या स्वतःच्या छायेखालीं नांदणाऱ्या या अफाट जनसमाजाची आज काय दशा आहे**?इतिहासाचा मागमूसहि नीट लागत नाहीं अशा अनादि कालापासून पिढ्यानपिढ्या या लोकांचें पूर्वज तुमच्या धर्माच्या आणि संस्कृतीच्या झेंड्याखालीं वावरले, त्यांना तुम्ही मन मानेल त्या अंधःश्रद्धेचे बौद्धिक आणि धार्मिक कल्पनांचे दिलेले धडे त्या बिचाऱ्यांनीं निमूटपणें, बिनतक्रार, भोळसट गुलामी भावानें घटविले. त्या या पुराण समाजाचे आज काय धिंडवडे उडाले आहेत याचा जरा नीट तपशीलवार विचार करा, म्हणजे ते अश्रूहि जागच्या जागीं थांबतील.डोळे कोरडे ठणठणीत पडून त्यांतून रक्ताचे थेंब पडूं लागतील. पण ही डोळ्यांवरची धुंदी बाजूला सारून वस्तुस्थितीचें नीट आकलन कराल तर!

कार्यपद्धतीच्या या तुमच्या विशिष्ट धोरणामुळें हिंदु समाजांतील पुरुषत्वाची आणि स्त्रीत्वाची कशी माती होत चालली आहे, याची तुम्ही जाणीवहि करून घेत नाहीं. तुमची आचार विचाराची आणि समाजघटनेची पद्धत हिंदु समाजांतील स्त्रीपुरुषांचे ऐन उमेदीचे रक्त एखाद्या डाकीनी प्रमाणें घटघटा शोषून घेत आहेत. बालपणांतून पुढें पाऊल टाकल्यावर चैतन्यपूर्ण ऐन धडाडीचें पण तितकेंच निष्पाप असें मुसमुसणारें तारुण्य त्यांना कधींच प्राप्त होत नाहीं. मनुष्याच्या जीवनक्रमांतील रसरशीत तारुण्याची ही अवस्था आज हिंदु समाजाला पारखी झाली आहे. पण जगांतील कोणत्याहि सुसंस्कृत आणि जिवंत समाजाकडे पहाल तर त्याची घटना याच निसर्गदत्त चैतन्याच्या अभेद्य पायावर उभारलेली आहे, असेंच तुम्हाला आढळून यईल.

तुमच्या समाजांतील तरुण व तरुणी कधींच एकत्र येत नाहींत विचार व विकार—विनिमयासाठीं एकत्र मिसळण्याची त्यांना कधिं संधीच मिळत नाहीं. यच्चावत वस्तुमात्राला स्पर्शमात्रानेंच रोमांचित करणाऱ्या ईश्वरदत्त प्रेमाच्या जादुची भावना त्यांच्या हृदयांत कधींच स्फुरण पावत नाहीं.

हिंदुस्थानाचें नांव कीर्तीमान करून, स्वतःचा काव्यलौकीक अजरामर करणारा 'शब्दसृष्टीचा ईश्वर' कालीदास यानें आपल्या चिरंजीव 'कुमार—संभव' काव्यांत रेखलेलें कुमारी महासती पार्वतीचें सहजसुंदर दृश्य पहा. तारुण्याचा उमलता बहार तिच्या कांतीला उजाळा देत आहे. उफलत्या यौवनानें सर्व अवयवांची वाढ, नकळतच पण जोरानें फोंफावल्यामुळें, तारुण्यमदाच्या भारानें ती कुमारिका लवली आहे. यौवन—चैतन्यानें आपल्या देहावर व कांतीवर कसलें तेज उधळलें आहे, त्याचें प्रतिबिंब आरशांत पहाण्याचेहिं तिला भान उरलेलें नाहीं. गजगतीने हळूं हळूं पावले टाकीत, कुमारी पार्वती, आपल्या प्रेमसर्वस्वाकडे—आपल्या शिव देवाकडे—कडेकपारांतल्या एकांत गुहेकडे चालली आहे. आपल्या प्रेमदैवतानें समाधींतून जागृत होऊन प्रेमाच्या दृष्टीला प्रेमाची दृष्टी भिडवावी, म्हणून तिनें शिव देवावर फेकलेला तो पहिलाच दृष्टीकटाक्ष. शिव देवाची समाधी उतरली. त्यानीं आपले अकामुक विशाळ नेत्र उघडले. तृतीय नेत्रांतल्या तेजानें कामदेव भस्म केला. कुमारी पार्वतीचे पाणिग्रहण केलें.किती मनोहारी, किती निसर्गसुंदर आणि किती यथातथ्य तपशिलाचें हें चित्र वागीश्वर कालीदासानें रंगऊन ठेविलें आहे?त्याच या हिंदु—स्थानांत तसल्याच दिव्य कुमारिकांना प्रेम करण्याची—आपल्या वल्लभांची—हृदयस्थ शिवाची—पूजा करण्याची—कधिं तरी कसली तरी संधी देण्यांत येत असते काय?

मुसमुसणाऱ्या तारुण्याचा विकास होण्यापूर्वी त्या बिचाऱ्यांचें दैव ठरून जाते. त्यांच्या नशिबाचा तो बेशरम खेळखंडोबा अधिक स्पष्ट करून सांगावयास पाहिजे काय?तुम्हाला तो माहीत नाहीं काय?तुम्हा भटांच्या मध्यस्थीशिवाय ज्याची सांगताच नाहीं, अशा 'सनातन हिंदु विवाह' या गोंडस नांवाखालीं तुमच्याच डोळ्यांसमोर चाललेला त्यांच्या बळजबरीच्या कौमार्यभंगाचा लज्जास्पद समारंभ तुम्हाला दिसतच नाहीं काय?ज्याचे तुम्ही नेते आणि प्रमुख म्हणून मिरवितां त्या या हिंदु समाजाची त्या पापाच्या पेटलेल्या यज्ञांत राखरांगोळी होत आहे याची तुम्हाला जाणीवच नाहीं अं?हे सर्वसाक्षी देवतांनों, हा धर्मभ्रष्ट पतित ब्राम्हण धर्माच्या नांवाखालीं घालीत असलेला समाज—विध्वंसनाचा हा नंगा नाच तुम्ही असाच खुशाल चालूं देणार काय?प्रत्येक दिवशीं अधिकाधिक खोल खाड्यांत आम्ही चाललो आहों. या असह्य अधोगतीपासून वाचविण्याला स्वर्गांत, नरकांत, या अखिल विश्वमंडलांत कोणतीच समर्थ शक्ति उरली नाहीं काय!

'आधुनिक बॅबिलॉनमधील कुमारिकांचे बलिदान!' कुमारिकांचें हें कोमार्य—बलिदान जेथें प्रत्यहीं चालतें, तें विसाव्या शतकांतील बॅबिलॉन तुम्हास कोणते वाटतें?लंडन?पॅरिस?न्यूयार्क?नाहीं. मी शतवार सांगतो खास नाहीं. तेथला 'नरपशू' अमेरिकन किंवा युरपियन समाजनीतीच्या दृष्टीनें कितीहि हिणकस असला तरी हमखास जास्त सुधारलेला (माणसांत आलेला) असतो. मी बिनदिक्कत सांगतो कीं, हे आधुनिक बॅबिलॉन जर कोठें असेल तर तें'हिंदु—हिंदुस्थान' च होय! येथेंच दररोज 'धार्मिक विवाहाच्या बुरख्याखालीं कल्पनेलाहि थांग लागणार नाहीं असल्या क्रूर आणि राक्षसी रूढींच्या कुंडात लक्षावधि कुमारिकांचें बळी बिनदिक्कत दिले जातात.

असल्याच एका 'दिव्य कुमारी'चा एक हिंदु बाप माझ्या ओळखीचा होता. त्या बिचारीला जन्मापासूनच कांहीं तरी काळजाचा विकार होता. तिचा बाप चांगला शिकलेला सवरलेला, श्रीमंत, व नांवाजलेला वकील होता. नांवाजलेल्या प्रविण डॉक्टरांनीं त्याला बजावले होते कीं हिच्या लग्नाच्या भानगडींत तुम्ही मुळींच पडूं नका. कारण तसला संबंध (**sexual excitement**)ताबडतोब तिच्या मृत्यूला कारण होईल. पण ऋतुप्राप्तीच्या अगोदर मुलीचें लग्न झालेंच पाहिजे, हें आमचे भिकारडे भिक्षुकीशास्त्र तिच्या नशिबाच्या आड आलें. उघड उघड कोणी तरी पाजीपणानें असले मूर्ख निर्बंध शास्त्रग्रंथांत घुसडून दिलेले दिसत असतांना सुद्धा, ते अनुल्लंघनीय म्हणून शहाणेसुर्ते लोकसुद्धां उराशीं घट्ट आवळून धरतात! शास्त्राज्ञेच्या भीतीनें त्या सुशिक्षित वकीलाच्या आईनें आणि बायकोनें मुलीच्या लग्नाबद्दल इतका हट्ट धरला कीं, शेवटीं त्यानें त्यांच्या म्हणण्यास रुकार दिला आणि मुलीला एकदाची कशीबशी उजवली. मला त्या लग्नाचें आमंत्रण होते, पण मी गेलो नाहीं. ती मुलगी लग्न झाल्यापासून तीन महिन्याच्या आंतच हृदयाच्या विकारानें वारली!

हिंदु कुटुंबांत असली अकाली मृत्यूंची उदाहरणें हजारों सांपडतील. आतां, ही गोष्ट हिंदू कुटुंबांतला जबाबदार माणूस कबूल करील किंवा नाहीं, ही गोष्ट अलाहिदा!

असल्या घातुक गोष्टी एखाद्या रॉयल कमिशननें किंवा कौंसिल मधील एखाद्या ठरावानें नाहींशा होणें शक्य नाहीं. या करितां आईबापांच्या व पुरोहितांच्या मनांत माणुसकीची जाणीव आणि नैतिक धैर्य यांचाच उदय झाला पाहिजे; आणि एकंदर हिंदुसमाजांत मनाची विवेक—जागृति आणि सामाजिक आचार विचारा संबंधानें प्रगल्भ व उदार धोरण उत्पन्न झालें पाहिजे. माझी सगळी यातायात या करितांच आहे.

हा सर्व अमानुष प्रकार पहिला म्हणजे मला वाटतें कीं हे राक्षसी विवाहविधी चालविणारे पुरोहीत आणि वधूवरांचें आईबाप यांना जर कशाची उपमाच द्यायची असेल तर ती जगन्नाथाच्या प्रचंड रथाच्या चाकांचीच. ना त्यांना कसली भावना ना काळजाची तिडीक! जगन्नाथाचा प्रचंड रथ आपल्या चाकांखालीं आमच्या कुमारिकांना बेगुमानपणें चिरडीत एक सारखा फिरतच आहे. पण हा सगळा नाश थांबवील असा धणधाकट मनाचा खंबीर मायेचा पूत आमच्या समाजात एकहि दिसत नाहीं.

मनाचा हा नैतिक कमकुवतपणा आमच्या अधःपाताचें अगदी खास लक्षण आहे. यामुळें सगळ्या जगापुढें आम्हाला लाजेनें खालीं मान घालावी लागत आहे.

आणि जो या तुमच्या 'दिव्य कुमारी' चें पाणिग्रहण करतो, त्याची काय वाट?त्याच्याबद्दल मी दोन शब्द सांगू कां?त्याचेंहि यात बलिदान होत नाहीं काय?बोलून चालून जातीचा तो पुरुष, शिकारी वृत्तीचा. आयुष्यांत थोडा वेळ तरी त्याला शिकार करण्याची मोकळीक द्याल कीं नाहीं?एकोणीस वीस वर्षांच्या आंत त्याचे आईबाप त्याचे लग्न करोत वा न करोत, तरुण स्त्रीची प्रेमयाचना करण्याची त्याची निसर्गजात भावना चुरडली जाणें शक्य नाहीं. तरूण कुमारीच्या प्रेमयाचनेंत काय लज्जत असते, याचा एकदा तरी अनुभव घेतल्याशिवाय त्याची लालसा तृप्त व्हायची नाहीं. जशा लहानपणीं गोंवर कांजण्या एकदां येऊन जायच्याच, त्यांतलाच हा निसर्गजात प्रकार आहे. योग्य दर्जाच्या कुमारिकांशीं बोलण्या चालण्याची त्याला मोकळीक द्या; आणि एकदा तरी १७ ते २१ वर्षांच्या वयाच्या दरम्यान त्याला निष्पापपणें जबरदस्त अशा प्रेमपाशांत खुशाल सापडूं द्या. झालें तर यांत अंतीं त्याचे हितच होईल.

प्रेमयाचनेच्या सगळ्या धडपडी यशस्वी होता क्षणींच तारुण्यानें मुसमुसणाऱ्या त्या तरुणाला भावी जीवनग्रंथीचा इसारा म्हणून मिळणारें प्रेमाचें बक्षिस—त्या निष्पाप कुमारीचें खास पहिलें गोडसें चुंबन! बस्स, त्यापुढें कोणत्या मोलवान् बक्षिसाची आठवण त्याला सर्व आयुष्यभर विशेष सुखदायक होईल?या बक्षिसाची किंमत कोण करणार?आणि याची आठवण कशानें बुजणार?माझी खात्री आहे, कीं तुमच्या त्या 'प्रेमचंद रॉयचंद स्कालरशिपा' किंवा तीं 'टागोर लॉ मेडलें' यांपेक्षां त्याला त्या प्रथम—चुंबनाची किंमत खात्रीनें जास्त वाटेल. सर्वसाधारण व्यवहाराकडे पाहण्याची त्याची दृष्टी, विशेषतः स्त्रीविषयक दृष्टी, जास्त उदार आणि नीतिमान् होईल.खरें पौरुष किंवा वीरत्व कशांत आहे याची त्याला नीट जाणीव होईल. अनादि 'स्त्री' त्वांत गूढ असलेल्या पावित्र्याचें दिव्य तेज कसें लकाकतें हें त्याला नीट कळेल. कारण त्या तेजाची कल्पना त्यानें मिळविलेल्या पहिल्या कुमारी—चुंबनांतच त्याला होणें शक्य असतें.

त्यांची गोड आठवण, त्या प्रसंगाचा विचार, पुढील आयुष्यांत कर्तव्याचे निररिळे झगडे लढतांना त्याला स्फुरण देतील. किती तरी मोहांच्या सापळ्यांपासून आणि संकटांपासून त्याचें संरक्षण करतील. भयंकर निराशेंत सांपडला असतांना त्यामुळें पुष्कळ वेळां त्याला धीर येईल. एक क्षणमात्रच कां होईना, पण पूर्ण विश्वासानें झाडाच्या खांदीवर बसून अगदीं हृदयाच्या हृदयातले खोल बोल गाऊन, पुन्हा स्वतंत्रपणें कोठल्याहि प्रकारें पतित भ्रष्ट न होता स्वतंत्र अमर्याद आकाशांत मोकळेपणानें भराऱ्या मारण्यासाठीं उडून जाणाऱ्या जंगली पक्षाच्या त्या क्षणमात्र आनंदाची तुलना, पिंजऱ्यांत कोंडलेल्या पक्षाला जन्मभर मिळणाऱ्या लडिवाळपणाशीं होणें कधीं तरी शक्य आहे काय?हल्लीं हिंदु तरुणाला आपल्या पौरुषाबद्दल व वीर्याबद्दल जी भावना वाटते त्यापेक्षां किती तरी अधिक स्वाभिमानाची भावना त्याच्या अंतःकरणात उत्पन्न होईल. हल्लीं त्याच्या मनांत एका बाजूला अभिजात शुद्ध निसर्गबुद्धि आणि दुसऱ्या बाजूला त्याच्या डोक्यांत लौकिकी कल्पनांनी'मज्ञाव मज्ञाव' म्हणून उत्पन्न केलेली तिरस्कार बुद्धी यांचा सारखा झगडा चाललेला असतो. पण

अनुक्रमणिका

किती झालें तरी तो स्त्रीच्याच उदरांतून जन्माला आलेला! कितीहि शिकवण दिली तरी त्याची स्त्रीविषयक निसर्गबुद्धी वर उसळी मारल्याशिवाय कशी राहणार?

त्याचा मूळचा शुद्ध स्वभाव लग्नसंबंधाच्या निमित्तानें दूषित होण्यापूर्वीच जर त्याला आयुष्यांतील असला मोकळेपणाचा वाव मिळाला, तरच आजच्या चहूंकडून जखडलेल्या परिस्थितींत जें जीवनरहस्य अनुभवणें त्याला शक्य नाहीं तें सुलभ होईल. त्याचें मनोहारी चित्र तो पहात असतो. हिदुस्थानांतील वैष्णव कवि आणि शाळेच्या अध्ययनक्रमांत परिचित झालेले परदेशीय कवी यांनीं आपल्या काव्यांत त्या जीवनाच्या रहस्यांची खरी गोडी गायलेली तो ऐकत असतो. आत्म्याचें तें पौष्टिक रसदायक अन्न आहे, हें त्याला एरवीं कसें कळावें?चंडीदासासारख्या कविवरांनीं आपल्या दिव्य गीतांत त्या दैवी जोडप्याचें—श्रीकृष्ण राधा यांच्या अकामुक प्रेमाचें—जें अनुपमेय चित्र रंगविलें आहे तितकें नितांतमधुर, साधें, भावनागंभीर आणि भव्य चित्र इतरत्र कोठेंहि आढळणें मुष्कील आहे. त्याचप्रमाणे शेक्सपियर किंवा शेले, बायरन, टेनिसन, ब्राउनिंग यांसारख्या आंग्ल कविवरांच्या काव्यांतून रसरसणाऱ्या जीवनाच्या रहस्याचें खरे मर्म त्याला नीट कळूं लागेल. मानवी समाजाबद्दलचे त्याचे विचार अधिक व्यापक होतील. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे आज घोकंपट्टी करून बऱ्याचशा युनिव्हरसिटी डिग्र्या मिळविल्यानें त्याच्या अंगीं जितकी पात्रता येते, त्याच्या शतपट अधिक खरी पात्रतात्याच्या अंगीं येऊन, हिंदुस्थानचा सुपुत्र या नांवाला तो अक्षरशः पात्र होईल. पण केव्हां?त्याच्या प्रेमशोधनांत व विवाह—स्वातंत्र्यांत आज हमखास येणारे अडथळे बंद पडतील तेव्हां!

एवढ्या मोठ्या अफाट हिंदुस्थानांत तरूण स्त्री पुरुष कधींच एकमेकांच्या प्रेमपाशांत सापडत नाहींत, आणि जर यदाकदाचित प्रेमभावना उदित झालीच तर तिचें पर्यवसान अकालीं व अनिष्ट पितृपद किंवा मातृपद यांतच व्हायचें! या विस्तीर्ण देशांत तरुण पुरुषाला आपल्या आयुष्यांत पहिल्या कुमारीचुंबनाची गोडी अनुभवण्याची कधींच संधी मिळत नाही. त्यामुळें नसानसांतून ज्याची स्मृति सळसळत जाईल आणि त्याला उमदा माणूस बनवील, अशा त्या अनुपम अनुभवाला तो कायमचा मुकतो. ही गोष्ट अत्यंत अप्रयोजक आणि निसर्गाविरुद्ध आहे, असें माझे ठाम मत आहें. त्यामुळें प्रत्येक हिंदु तरुणाला पुढें नाना क्लेश भोगण्याचा प्रसंग येतो. निराशेच्या झटक्यांत तो आरपार खचतो. हृदयाला तर इतकी दुर्बलता प्राप्त होते कीं संसाराच्या उघड्या व्यवहारांत पडल्यावर बाजारच्या एखाद्या हलकट स्त्रीच्या पहिल्याच कटाक्षानें तो पतित होण्याचा जबरदस्त संभव असतो.

स्त्री वा पुरुष दोघांनाही हिंदुस्थानांत तारुण्याचा उमलता बहार काय असतो याची जाणीवच कधीं अनुभवण्यास मिळत नाहीं. लहानपणींच त्यांच्या मानेवर पितृपदाचें किंवा मातृपदाचें जड जूं जबरदस्तीनें लादण्यांत येते. आईबापांच्या असल्या अपरिपक्व दशेंत जन्माला आलेली मुलें शरीरानें दुबळी तर असतातच, पण राष्ट्राची प्रतिष्ठा किंवा वैभव कायम टिकविण्यास किंवा वाढविण्यास त्यांतील स्त्री पुरुषांच्या अंगीं जी ओजस्विता लागते, किंवा पुरुष अथवा स्त्री ह्यांच्या जीवनाची सार्थकता होण्यास ज्या जोमदार गुणांची आवश्यकता लागते, त्यांचाही त्यांचा ठिकाणीं पूर्ण अभाव दृष्टीस पडतो. मग युरपियन लोकांनीं आम्हाला रानटी किंवा पतित म्हणूं नये, तर काय म्हणावें?

राष्ट्र या नात्यानें हिंदूंचा जो ऱ्हास आणि अधःपात झाला आहे त्याची सर्व जबाबदारी ब्राम्हण भिक्षुकशाहीवरच आहे. राजकीय दृष्ट्या, सामाजिक दृष्ट्या, नैतिक दृष्ट्या वा आध्यात्मिक दृष्ट्या सर्व तऱ्हेंनें आम्ही निःसत्व झालो आहोंत. विचार करण्याची, तुलना करण्याची, चिकित्सा करण्याची आमची बुद्धीच ठार मेली आहे. आचार विचार व आमच्या चालीरीती यानीं आमचे रक्त नासून गेलें आहे, दृष्टी आंधळी

झाली आहे आणि म्हणून आम्हाला जगाचें खरें स्वरूप तर दिसत नाहींच, पण इतर राष्ट्रांतील सुधारलेले लोक आमची योग्यता काय समजतात हेंहि आम्हांला नीट समजत नाहीं.

बाहेरच्या जगाचें अवलोकन करणें, इतर देशांत स्थापन झालेल्या निरनिराळ्या संस्थांच्या परिशीलनपूर्वक स्वाध्याय करणें, आपल्या संस्थांशीं त्यांची तुलना करून त्यांतील दोष काढण्याचा प्रयत्न करणें, इत्यादि अनेक मार्गांनी मानवी उन्नतीला पोषक असें खरें शिक्षण मिळविण्याचा आमचा हक्क जन्मसिद्ध आहे. केवळ जातीभेदाच्या निष्ठुर कडकपणामुळें किंवा 'जग हें मिथ्या आहे' असल्या मूर्खपणाच्या मायावादामुळें तो हक्क आम्हीं समूळ गमवावा असें तुमचें म्हणणें आहे काय?

आजच्या हिंदु जगांत ब्राम्हणपंथ, बुद्धपंथ, जैनपंथ, शीख, शैव, शाक्त, वेदान्त, ब्राम्ह, भक्ति, आर्यसमाज, तांत्रिक (हा ब्रम्ह घोटाळा आणि त्यांत दररोज होणारी भरंसाट पैदास जगाच्या अंतापर्यंत तरी संपेल किंवा नाहीं कोण जाणें!) –असल्या शेंकडों पंथांनीं माणसांचा प्राण घेण्याची वेळ आणली आहे.

पण इतके नानाविध पंथ निर्माण झाल्यानें समाजस्थैर्याचें परस्परविरोधी वेडेवाकडे हजारों तुकडेताकडे उडून, त्यांत पुन्हा केव्हांहि एकी अगर एकतानता उत्पन्न होणें मुष्कीलीचें जाईल, याचा आमच्या ब्राम्हणगुरूंनीं चुकून तरी कधीं इषारा दिला होता काय?

भारतवर्षाच्या इतिहासांत या निरनिराळ्या पंथांत आणि धर्मभेदांत एकमेकांवर मात करण्याकरतां झालेल्या भयंकर झगड्यांचें दाखले वाटेल तितके सांपडतील.पण आमचा भिक्षुक गुरूदेव सर्व ठिकाणीं हजर! सर्वांजवळून तो भरभक्कम दक्षिणा–बक्षिस–हबकतोच आहे. "अहो, पूर्वीपेक्षां इतके अधिक रस्ते झाले कीं स्वर्गांत जायला!" नद्या कोठूनहि निघाल्या तरी अखेर समुद्रालाच मिळणार कीं नाहीं?वा, फार उत्तम: खरोखर ईश्वराची करणी अगाध आहे." हें आणखी वर म्हणायला तयारच.

बनारसला मला एकदां एक ब्राम्हण भिक्षुक भेटला होता. विधवा–पुनर्विवाहाच्या मंडणाचीं भाषणें ऐकून तो अगदीं भेदरून गेला होता. तो मला येऊन सांगू लागला कीं 'जर सगळ्या हिंदू विधवा पुनर्विवाह करूं लागल्या तर आम्ही भटांभिक्षुकांनीं आपलीं पोटें तरी कशी भरायची?' मी त्याला काय उत्तर दिलें तें सांगितलें पाहिजे असें नाहीं. मी असाच एका हाऊस एजंटला त्याच्या धंद्याबाबत प्रश्न केला. त्यानें अगदीं मनमोकळेपणानें सांगितलें कीं, प्रत्येकजण जर सारख्या आपल्या राहाण्याच्या जागा बदलीत राहील, तर काय बहार होईल?उठल्यासुटल्या वेळीं अवेळीं लोकांनीं कायदेबाजीसाठीं कोर्टाकडे धांव घ्यावी अशीच वकील लोकांची मनांतील इच्छा असेल. डॉक्टर देखील रोगांच्या साथी एकसारख्या एकामागून एक येत रहाव्या, अशीच मनांतून अपेक्षा करीत असतील. समाजाच्या जिवावर बांडगुळाप्रमाणें जगणाऱ्या या असल्या धंद्यातल्या स्वार्थीपणाचा उल्लेख आपण बहुशः थट्टेनेंच करीत असतो.

परंतु, एक राष्ट्रच्या राष्ट्र शतकानुशतकें एकसारखें ब्राम्हण भिक्षुकशाहीच्या पुरतें कबजांत सांपडलेलें असावें आणि त्याला त्यांनी वाटेल तसें मनमुराद लुटीत रहावें, त्यावर हवें तसें चरावें, ही गोष्ट खास थट्टेवारी नेण्यासारखी नाहीं. या हिंदु–भरतखंडासारख्या भिक्षुकशाहीच्या पचनीं पडलेल्या देशांत सर्वत्र भडकलेल्या सामाजिक अन्यायांचा राक्षसीपणापासून समाजाला वांचवावें, अशी थोडीशी तरी बुद्धी आणि विवेकजागृती असलेले स्त्री पुरूष थोडेहि सांपडूं नयेत काय?या सामाजिक अन्यायांच्या जहरी

अनुक्रमणिका

घातुकपणा धार्मिकपणाच्या साखरेची कितीहि पुटे त्यावर चढविली तरी यत्किंचितहि कमी होणार नाहीं, हें विसरतां कामां नये.

आतां, या गोष्टीचा जाब तुम्ही ब्राम्हण भिक्षुकाला विचारायला जा. तो ताबडतोब मनु, याज्ञवल्क्य, रघूनंदन यांच्या ग्रंथांतील शास्त्रार्थाचे उतारे तुमच्या तोंडावर भराभर फेंकून या बड्या धेंडांवर सगळी जबाबदारी टाकून आपण पार मोकळा होईल. तो स्पष्ट म्हणतो,"मी काय, हिंदुसमाजाचा एक गरीब धर्मसेवक, हिंदुधर्मांत ज्यांना रहावयाचे असेल त्यांनीं या थोर थोर पुराण पवित्र धर्मग्रंथांतील नियमांचें परिपालन केलेंच पाहिजे.त्याशिवाय गत्यंतरच नाहीं. तें तसें होतें किंवा नाहीं हें पहाणारा धर्माचा मी चाकर.यांत माझ्याकडे काय दोष आहे?ज्यांना या नियमांच्या बंधनाची खोडाबेडी नको असेल, त्यांना खुशाल दाही दिशा मोकळ्या आहेत. त्यांनी खुशाल हिंदुधर्माच्या बाहेर चालते व्हावें."

लोकांचे गुरू म्हणून मिरवणाऱ्या भटाभिक्षुकांची ही गुर्मीची प्रवृत्ति जितकी मूर्खपणाची तितकीच खोडसाळ आहे. याचा परिणाम असा झाला आहे कीं यच्चावत् हिंदुमात्रांनीं धर्मग्रथांच्या ठरावीक कैदखान्यांतच सदोदित बंदीवान होऊन पडलें पाहिजे. प्रत्येकानें ब्राम्हण भिक्षुकांचे दास्य बिनशर्त मानलें पाहिजे. या भिकारड्या धर्मग्रंथांमुळेंच भिक्षुकशाहीच्या वर्चस्वाचा टेंभा आजपर्यंत जगलेला आहे. त्याचा कोणी 'बोर्या' उडवूं नये, म्हणून त्या ग्रंथांचा अस्सल–कम–अस्सलपणा संशोधन करण्याची मात्र सर्वांना बंदी!

परंतु, आतां नवीन नवीन विद्या आणि संशोधनाची आधुनिक पद्धाति यांच्या योगानें या ग्रंथांचें सर्व धार्मिकब्रुव चिकित्सक परिक्षण करणें साध्य झालें आहे. त्यांचा मूळ उगम, त्यांचा हेतू, आणि त्यांतील वचनांची योग्यायोग्यता व सत्यासत्यता या सर्व गोष्टी ऐतिहासिक दृष्टीनें समजून घेणें सहजशक्य झालें आहे.ही गोष्ट आतां अगदीं हमखास सिद्ध झाली आहे कीं, आदि मनू ऊर्फ वृद्ध मनू अजिबात नाहींसा होऊन त्याच्या जागीं आजचा भिक्षुकशाही वर्चस्वाचा पुरस्कर्ता नकली मनू आणून उभा केला आहे. आज ज्या स्थितींत तो आपणाला आढळतो तया स्थितीला येईपर्यंत भिक्षुकशाहीच्या हितसंरक्षणाकरतां भिक्षुकांनीं किती तरी वेळां त्याच्यांत हवी तीं वचनें घुसडून दिलीं. पुष्कळ वेळां तो पुनःपुन्हा नवीन लिहून काढण्याच्याहि खटपटी झाल्या. बुद्धोत्तर काळीं ज्या ज्या वेळीं भिक्षुकी आणि भक्षिुकशाही राजसत्ता प्रबळ झाली त्या त्या वेळीं हा सर्व खटाटोप भिक्षुकशाहीच्या वर्चस्वाकरतां करण्यांत आला.

बुद्ध धर्माच्या प्रळ्यानंतर नवीन ब्राम्हणी सृष्टी निर्माण करण्याकरतां भिक्षुकशाहीनें मनूच्या बाबतींतच नव्हे, तर आपल्या सर्व धर्मशास्त्रग्रंथांमध्यें वाटतील तीं वचनें घुसडून देण्याचा खटाटोप केलेला आहे. हा सर्व उपद्व्याप करतांना अर्थातच जुन्या इतिहासाची छाटाछाट करणें प्राप्त झालें. पण हें कामे तरी सफाईत कसचे साधणार?इतिहास बनावट बनला, तरी त्याच्या मजकुरांत औचित्याचा भंग, कालमर्यादेची असंभाव्यता, कालानुक्रमाकडें दुर्लक्ष, आणि भोंवतालच्या समकालीन् खऱ्या परिस्थितीचा ब्रम्हघोटाळा, या गोष्टीं त्यांना टाळतां आल्या नाहींतच.

ह्या नवीन सजावटींची सुरुवात प्रथम टीकांच्या रूपानें सुरू झाली. मनूवरील प्रसिद्ध मेधातिथीची'व्यासमनू' नामक प्रचंड टीका इसवी नवव्या शतकांत रचली गेली. (हिंदुस्थानवर इस्लामियांचा पहिला हल्ला ८ व्या शतकाच्या आरंभीं आला.) पण ही टीकासुद्धां दीघचा राजा मदनपाल याच्या दरबारच्या पंडितांनीं १५ व्या शतकांत पुनः संशोधन करून नवीन स्वरूपांत तयार केली.

अनुक्रमणिका

याच १५ व्या शतकांत बंगालमध्यें दोन प्रसिद्ध व्यक्ती होऊन गेल्या. एक भिक्षुकी स्मृतिलेखक रघुनंदन आणि त्याचाच समकालीन् दुसरा वीर म्हणजे, भिक्षकशाहीच्या वर्चस्वाला पायबंद लाऊन, जातिभेदाच्या मुळावर घाव घालणाऱ्या ब्राम्हणविरोधी वैष्णवपंथाचा दोन शतकेपर्यंत देशांत धुमाकूळ घालणारा सुप्रसिद्ध श्रीचैतन्य हा होय.

१७५७ च्या प्लासीच्या लढाईनें मुसलमानीं सत्तेला ठोकर मारल्यानंतर, लवकरच नडियाचा ब्राम्हण राजा आणि नवद्वीपचे ब्राम्हण पंडित यांच्या एकत्र खटपटीनें रघुनंदनची स्मृति राजेसाहेबांच्या तळघरांतील रद्दींतून वर डोकें काढूं लागली. जो बंगाल एकदां जातीभेदशून्य बुद्धप्रदेश होता आणि जो पुन्हां एकदां जातिभेदयुक्त वैष्णवप्रदेश बनला होता, त्याच वंगभूमींत ही स्मृति आतां सामाजिक व धार्मिक कायदा बनून राहिली आहे.

याज्ञवल्क्य स्मृतीकडे नजर फेकली तरीहि असेंच दिसून येईल कीं, हल्लीं याज्ञवल्क्य स्मृति म्हणून व्यवहारांत वावरणारा ग्रंथ त्या प्राचीन वैदिक ऋषीवर्याचा मुळींच नाहीं. हल्लींची ही स्मृति त्याचा शिष्य म्हणविणाऱ्या कोणातरी शुक्ल यजुर्वेदी शाखेच्या गृहस्थाची कृति असावी. पराशर व मनू यांची गृह्यसूत्रें आणि कात्यायनांचीं श्राद्धसत्रें यांची त्याला अर्थातच माहिती असावी. ह्या स्मृतीलाहि आजचें स्वरूप येईपर्यंत पुष्कळच घुसडाघुसडीचे पलांडे खावे लागले आहेत.

हे शास्त्रग्रंथ अस्सल कीं कमअस्सल, त्यांत फेरबदल घुसडाघुसड किती झाली, कोणी केली, कां केली, कधीं केली, इत्यादि प्रश्नांचा उहापोह घटकाभर बाजूला ठेवला,तरी सुद्धां हिंदुसमाजाने यावच्चंद्रदिवाकरौ या भिक्षुकी ग्रंथांच्या गुलामगिरींत खितपत पडून राहणें सर्वथैव अनिष्ट आणि अशक्य आहे. भटाभिक्षुकांचे गुलाम म्हणून नव्हे तर हिंदु समाजांतलीं स्वतंत्र व्यक्ती म्हणून, आमच्या घरांत अमक्या तमक्या शास्त्र वचनांचा वरपगडा असावा कीं नसावा, हें आमच्या विवेकबुद्धाला आणि सद्विचारांना अनुसरून आमचे आम्ही ठरविण्याची मुभा असणें अगदीं अवश्य आहे. त्याचप्रमाणें अमुक ग्रंथांना मान देणारा तो हिंदु, न मानणारा हिंदूच नव्हे, असले पागल आचारनियमहि आम्हांला साफ अमान्य आहेत.

या जुन्या पुराण्या ग्रंथांच्या पलीकडे एक पाऊलभरहि सरकतां उपयोगी नाहीं, असल्या दुष्ट बंधनामुळें आपण आपल्या स्वतःवर व आपल्या समाजावर कसली भयंकर आपत्ती ओढून आणीत आहोत, याची यत्किंचितहि जाणीव या धर्मगुरूंना दिसत नाहीं. यामुळें प्रतिवर्षी शेकडों लोक एकामागून एक हिंदुसमाजाच्या बाहेर जात आहेत. अर्थात् आर्यवंशाच्या या घोर आत्मघाताची जबाबदारी सर्वस्वी भिक्षुकशाहीच्याच माथ्यावर आहे.

अशा रीतीनें आज वर जे लक्षावधि लोक इस्लामी किंवा क्रिस्ती धर्मांच्या कळपांत गेले व जात आहेत, त्यामुळें हिंदु जगताची केवढी भयंकर हानी झाली आहे याची थोडीशी कल्पना करा. या ब्राम्हण धर्मगुरूंनीं आपल्या पूर्वजांच्या उदार धोरणाचे थोडेसें जरी अनुकरण केलें असते आणि प्राचीन काळीं ज्या व्यापक उदात्त बुद्धीनें त्यांनीं अखिल भारतवर्ष ब्राम्हणधर्माचा अनुयायी बनविला तेंच उदार धोरण त्यांनीं तसेंच सालूं ठेवलें असतें, तर संकुचित व क्षुद्र बनलेल्या हिंदूधर्माविरूद्ध बौद्धधर्मीय बंडच काय, पण पुढें वेळोवेळीं उद्भवलेले निरनिराळें तंटे बखेडे कधींच जन्माला आले नसते.

अनुक्रमणिका

हिंदुसमाज आतां इतका अधोगतीला गेला आहे कीं, यापुढें जर आपला पूर्ण नाश होऊ द्यावयाचा नसेल तर या ब्राम्हणाला हिंदु समाजाच्या गुरुपदावरून एकदम गचांडी मारून खालीं ढकलून दिला पाहिजे. जातीनिर्बंधाचे तट पाडून टाकले पाहिजेत आणि सामाजिक नीतिनिर्बंध आणि विवाह संस्थांचे नियम नवीन जगाला आणि नवीन काळाला पटतील अशा रीतीनें आमूलाग्र बदलेले पाहिजेत. अशा रीतीनें जर आपण आपल्या समाजाची पुनर्घटना केली आणि स्वतःचे घर ठाकठीक केलें तरच आपण अजून जिवंत चालती बोलती माणसाची जात आहोंत, जगाच्या पदार्थसंग्रहालयांत ठेवलेलीं खारवलेली आणि टाळक्यावर जुन्या ग्रंथांचे शिक्के मारलेलीं मढीं नाहींत, हें जगाच्या निदर्शनास येईल.

हे भ्रष्ट झालेले ब्राम्हण आणि त्यांचे पुराण ग्रंथ यांची रजा घेऊन आपण आतां आपल्या महाकाव्यांकडें जरा नजर फेकूं. रामायण आणि महाभारत या ग्रंथांबद्दल आपल्या समाजांत किती विलक्षण आदर आहे, हें कोणास नव्यानें सांगण्याचें कारणचनाहीं. रामायण हें तर रामजन्मापूर्वींच वाल्मिकीनें भविष्य ग्रंथासारखें लिहिलें होतें अशीच त्या ग्रंथाबद्दल बहुतेकांची ठाम समजूत आहे. त्यांच्या समजुतीनें राम हा एक पूर्ण नमुनेदार पुरुष होता; एवढेंच नव्हे तर तो मानवी पुरुष नसून त्रिमूर्तींपैकीं विष्णू परमात्म्याचा अवतार होता, अशी त्यांची भावना आहे. पित्यानें आपल्या सावत्र आईला दिलेलें वचन खरें करण्याकरतां त्यानें सुखानें आणि स्वरखुशीनें १४ वर्षे खडतर वनवास पत्करला. असा तो आत्मत्यागाचा मूर्तिमंत पुतळा होता. अशा तऱ्हेचें त्याचें वर्णन करण्यांत येतें.

आपलीं लहान मुले कर्तव्यशील व्हावी म्हणून हिंदू मातापितरें त्यांच्याजवळून रामायण वाचून घेतात. राम, सीता, लक्ष्मण, यांची माहिती बहुतेकांस लहानपणींच होतें.

रामायण वाचणाऱ्या या मुलांच्या मनांवर, इतर कांहीं गोष्टींचा ठसा उमटो, वा न उमटो, पण त्यांतील एक गोष्ट सर्वांच्या लक्षांत ठळकपणें राहते. ती कोणती?रावणाच्या बंदींतून सीता सोडविलनंतर सर्व सैनिकांसमक्ष सीतेनें अग्निप्रवेश करून आपलें पावित्र्य निष्कलंक असल्याचें सिद्ध करून दाखविल्यानंतरच रामानें तिचा स्वीकार केला होता. पण पुढें अयोध्येस आल्यावर कोणा एका सामान्य मनुष्यानें सीतेच्या शुद्ध शीलाबद्दल किंचित संशय व्यक्त करतांच, रामानें पुढा मागचा कांहींच विचार न करतां, सीता पूर्ण नऊ महिन्यांची गरोदर आहे हेंहि विचारांत न घेतां, तिला ताबडतोब अरण्यांत हाकलून दिली. आणि हें इतकें कां?तर प्रजेची एक छचोर लहर सांभाळण्यासाठीं! दैवी रामरायानें जें हें मोठें शतकृत्य केलें त्याचें अनुकरण तुमचीं कर्तव्यशील हिंदु बाळें करावयास चुकतील अशी कां तुमची समजूत आहे?असेल तर ती साफ चुकीची आहे. किती तरी बालसीता यापूर्वी या हिंदूस्थानांत शोकभारानें मृत्युवश झाल्या आहेत. आणि मी खात्रीलायक सांगतो की, आजहि कित्येक कजाग सासवा व नणंदा यांच्या वृथा संशयाला बळी पडलेल्या शेंकडो बालसीता आपले अभागी आयुष्य रडण्यांत कंठीत आहेत. आजच्या आधुनिक कर्तव्यपरायण रामांचीं हृदयें कठीण करण्याकरतां अयोध्येच्या कुटाळ प्रजेची भूमिका या आजकालच्या सासवा आणि नणंदा घेत असतात.

असल्या रानटी व राक्षसी चित्राला रामायणांत दैवी रंग चढविल्यामुळें किती तरी हिंदूंच्या संसारांचा हकनाहक नाश झालेला आहे. आणि किती तरी मुग्ध बालिकांच्या जीवनसर्वस्वाचा होम झालेला आहे.

असल्या पवित्र ग्रंथांतील भूमिकेवर हिंदू-भारतवर्षाचे आजचें गृहजीवन उभारलेलें आहे.धार्मिक भावनाशील किंवा आदर्शपूजना करणारे लोक यांचा याच्यांत फारसा दोष नाहीं. त्यांना बालपणापासून जें

अनुक्रमणिका

शिक्षण दिलेलें असतें, त्याचीं त्यांच्या मनःपटलावर जीं चित्रें कोरली जातात, तीच कायम ठशानें जन्मभर तेथेंच टिकून रहातात.

ज्या ब्राम्हण लेखकानें रामाला अशा रानटी स्वरूपांत जनतेपुढे उभा केला आहे त्याकडे वास्तवीक खरा दोष येतो. त्यांतहि पुनः या रामायणाचे सुद्धां प्रसंगाप्रमाणे आणि सोईप्रमाणें कित्येक वेळ शोधन आणि नवीन संपादन झालेलें आहेच.

आज आमच्या हातांत पडणारें रामायण हें खास कांहीं मूळचें वाल्मिकी नाही आणि विद्वानांच्या मतें हल्लीं उत्तररामचरित्र या नांवानें जो भाग प्रसिद्ध आहे तो तर हमखास कुठल्या तरी दूर धोरणानें मागाहून कोणीतरी घुसडून दिलेला असला पाहिजे. हें दूर धोरण काय असावें याची आपण लवकरच मीमांसा करूं.

ज्या शहाण्यानें हें उत्तररामचरित्र निर्माण केलें, त्याला सीतादेवी वरच्या नसत्या संशयाची पुनरावृत्ति टाळतां आलीच नसती काय?अग्निदिव्यानें संशयाची निवृत्ति जनजाहीर झाली असतांहि त्या लेखकानें काढलेले गरीब बिचाऱ्या सीतामाईचे पुढचे धिंडवडे त्याला कां टाळतां आले नाहींत?यांत त्यानें काय साधलें? सीतामाई विषयीच्या संशयाचा पुनश्च पराचा कावळा करून नाचविण्याचा या उत्तररामचरित्रवाल्याचा हेतू, हिंदु स्त्रियांना एक सणसणीत कायमचा दम भरून ठेवण्यांत आढळतो. त्याला स्त्रीजातीला बजावून ठेवावयाचें होते कीं, याद राखा, तुम्ही कितीही शुद्ध आणि सद्‌गुणी असला तरी तुमच्या विरूद्ध लवमात्रहि वेडावांकडा शब्द ऐकूं आला तर, तुम्हाला बिलकूल दयामाया न दाखवितां, तुमची चौकशीसुद्धां न करतां केवढी भयंकर शिक्षा तुमच्या नवऱ्यांकडून फर्माविण्यांत येईल, हें नीट ध्यानांत ठेवा. संशयाच्या नुसत्या चुटपुटत्या कल्पनेचाहि वारा तुमच्या बाबतींत आम्हां पुरुषानां क्षणमात्र खपणार नाहीं.

उपदेश करण्याच्या दिमाखानें चितारलेल्या या खोडसाळ शब्दचित्रानें सीतामाईच्या चारित्र्याला मात्र मुळींच धक्का लागलेला नाहीं. तें कमलपत्राप्रमाणें निष्कलंक आणि अवधूतच राहिलें. स्त्रीजातीच्या सग्दुणांची दिव्य प्रतिमा म्हणून तिचा महिमा युगानुयुगें अधिकाधिक प्रकाशमानच होत आहे. पण—पण त्या तुमच्या आदर्शभूत दैवी रामाच्या पौरुषाचें घाणेरडें चित्र म्हणजे हिंदुस्थानाच्या पौरुषत्वाला नामुष्की आणणारी एक चिरंजीव शरमेची बात होऊन बसलें आहे.

रामाला अनेक इतर ठिकाणीं नीतिमत्तेचा आणि आत्मत्यागाचा केवळ पुतळा असा रंगविलेला आहे. त्या रंगवटीला अनुसरूनच, रामायण—लेखकानें खालच्या सारखें त्याचें चित्र रंगविलें असते, तर किती तरी चांगलें झालें असतें?अयोध्येच्या लोकांनीं सीतेच्या पावित्र्याबद्दल शंका घेतांच, रामानें ताबडतोब एक जंगी दरबार भरऊन लोकांना जाहीर रीतनें सांगायचें होतें कीं “नागरीक जनहो, तुम्हाला माझ्या महाराणीबद्दल कांहीं संशय येत आहे. माझ्या बरोबर सिंहासनीं तिनें बसूं नये, असें तुम्हाला वाटत आहे काय?ठीक आहे. तर मग मला या राज्याचीच पर्वा नाहीं. आत्ताच्या आत्तां सर्व राज्यसूत्रें भरताच्या स्वाधीन करून सीतेसह मीच अरण्यावासाचा रस्ता पत्करतो, तुमचा संशय कांहींहि असला तरी सीतेच्या पावित्र्याबद्दल माझी बालंबाल खात्री झालेली आहे. मला इतरांच्या कुटाळक्यांकडे लक्ष देण्याचें मुळींच कारण नाहीं. प्रजाजनहो नीट विचार करा. सीतादेवी माझी वाग्दत्त विवाहबद्ध पत्नी आहे. ती पूर्ण दिवसाची गर्भवति असून, लवकरच तिला मातृपद प्राप्त होणार आहे. अशा अवस्थेंत केवळ तुमच्या संशयाच्या लहरीचें रंजन करण्यासाठीं मी जर तिचा त्याग करीन तर राक्षसांत आणि माझ्यांत फरक तो काय?मी जसा तुमचा राजा आहे, तसा सीतेचाहि राजा आहे. तुमच्या प्रमाणेंच तिनेंहि जर न्यायाची मागणी केली, तर राजा या

नात्यानें कोणत्या तोंडानें मला ती नाकारतां येईल सांगा. मी जर ही तिचीं न्यायाची मागणीच मान्य केली नाहीं, तर राजपदालाच काय पण माणुसकीलाहि मी नालायक ठरेन."

अशा तऱ्हेनें रामाची भूमिका जर रंगविली असती, तर रामायणांतला राम आमच्या हिंदु राष्ट्राचा एक नमुनेदार पुरुषोत्तम (हीरो) म्हणून खास शोभून दिसला नसता काय?

लक्ष्मणाचीही मोठी स्तुति गाण्यांत येते. कां?तर म्हणे रावणाची बहीण जी शूर्पनखा, तिनें लक्ष्मणाशीं प्रेमाचा लघळपणा केला म्हणून त्यानें तिचे नाक कान छाटले. या गोष्टीचा आमच्या तरुणांच्या मनांवर किती घाणेरडा विकृत परिणाम होत असतो, याची कोणाला कल्पना तरी आहे काय?शूर्पनखेनें स्त्रीस्वभावानुसार कितीहि लघळपणा केला, तरी लक्ष्मणाला त्या स्त्रींशी सौजन्यानें दयाळूपणानें व दिलदारपणानें खास वागतां आलें असतें. वाटेल त्या क्षुद्र कारणावरून बायकांचीं नाकें कापणें, किंवा इतर रीतीनें त्यांना विद्रुप करणें, हा हिंदु पुरुषाचा मर्दपणा एकंदरींत बराच प्राचीन लौकिकाचा आहे.

हेंचसें काय, पण बायकांना पशूप्रमाणें क्रूर रीतीनें वागविण्याच्या हिंदू पुरुषांच्या बऱ्याचशा दुष्ट चालींचा उगम, आदर्श म्हणून डंका पिटलेल्या या राम लक्ष्मणाच्या जोडीच्या चरित्रचित्रांतच सांपडतो. उत्तररामचरित्राच्या शेवटीं लक्ष्मणाबद्दल एक दुःखद गोष्ट वर्णन केलेली आहे. राम कोणातरी एका तिऱ्हाइताशीं एकांतांत बोलत बसला होता. राज्यकारभाराच्या कांहीं महत्त्वाच्या गोष्टीबद्दल लक्ष्मणाला भेट घ्यायची होती. भानगड तर मोठी जरूरीची. क्षणाचाहि विलंब नको होता. म्हणून लक्ष्मण तसाच आंत गेला. झालें. रामरायाचा एकांत बिघडला. लक्ष्मणानें केलेल्या या भयंकर अपराधाबद्दल त्याला शिक्षा ठोठावण्यांत आली कीं 'मरेपर्यंत पुन्हा मला तोंड दाखऊं नकोस.'

रामासाठीं सारा जन्म लक्ष्मणानें जें अकृत्रिम बंधुप्रेम व भक्तीची निस्सीम सेवा केली, ती निमिर्षांधात क्षुल्लक गैरसमजासाठीं चुलींत गेली! या असल्या 'पवित्र' उदाहरणांचा परिणाम हिंदु समाजावर कसा झाला व होत आहे, हें पाह्यचें असेल तर जरा हायकोर्टाच्या आणि स्मॉल कॉजेस कोर्टाच्या खटलेबाजीकडे लक्ष द्या. वडिलार्जित इस्टेटीच्या तुकड्यांसाठी एकमेकांच्या उरावर बसणाऱ्या शेंकडों राम-लक्ष्मणांच्या जोड्या तेथें तुम्हांला भेटतील.

पूर्वी पेक्षां अलीकडे भावांभावांमधील प्रेमाला व आदराला सपशेल ओहटी लागलेली आहे. कोणी आपल्या नाकावर माशी बसून देईल तर हराम! सहिष्णुता आजकाल भरंसाट महाग झाली आहे. क्षुल्लक का कारण असे ना, यांची कुतरभांड कोटापर्यंत गेलीच पाहिजे. भाऊबंदकीच्या खटल्यांत न्याय देण्याचें काम सुद्धां मोठें कठीण होऊन बसलें आहे. पुढें आणलेल्या पुराव्यांवर खोट्याची व खोडसाळपणाची इतकी दाट कवचें असतात कीं सत्यशोधनासाठीं न्यायाधीशाला फार खोल विचार करावा लागतो. सन १८५८ सालीं युनिव्हरसिट्यांची आमच्या देशांत स्थापना होऊन तरूणांना उच्च शिक्षणाची खैरात सुरूं झाली. तेव्हांपासून हा क्रम एकसारखा अव्याहत सुरू आहेच. पण त्या उच्च ज्ञानाचा किंवा त्या लांबलांब पदव्यांचा परिणाम आमचा स्वभाव उमदा दिलदार बनविण्यांत किंवा आमच्या अंतःकरणांत सत्याची चाड पेरण्यांत झाला असेल तर हराम! हिंदु राष्ट्राचा अधःपात झाला आहे, हिंदु लोकांची दानत आरपार बिघडली आहे, हा सर्व बाजूंनी ऐकूं येत असलेला आरोप अक्षरशः खरा आहे.

प्राचीन काळच्या चिनी आणि ग्रीक फिरस्त्यांनी आम्हा हिंदूंना सचोटी प्रामाणिकपणा आणि इमान यांच्या उत्कृष्टपणाबद्दल फार वाखाणणीची सर्टिफिकीटें दिलेली आहेत खरी. पण आज त्यांचें काय? आज या तीनहि बाबतींत आमचें सपशेल दिवाळें वाजलेलें आहे आणि या शोचनीय अधःपाताचें मूळ आमच्या तरूणांना मिळत असलेल्या युनिव्हरसिटीच्या शिक्षणांतच सांपडतें.

न्यायमंदिरात येणाऱ्या खटल्यांत, मग तो दिवाणी असो वा फौजदारी असो, प्रत्येक वेळीं खोटे साक्षीदार पुढें उभे करण्यांत येत असतात. आणि असल्या खोट्या कज्जांची तरफदारी, खोटे दस्तऐवज, खोटे हिशेब यांच्या जोरावर हरहमेश करण्याची प्रवृत्ति आमच्या लोकांत स्वभावतःच दिसून येऊं लागली आहे. एके काळीं सच्चे आणि उदार म्हणून नांवाजलेल्या आम्हां हिंदूंचा हा लाजीरवाणा अधःपात मोठ्या कष्टानें कां होईना, पण कबूल करणें भाग आहे.

तरण्याताठ्या नावडत्या बायकांच्या लुगड्यांवर घासलेट तेल ओतून त्यांना पेटवून जाळण्याचा एक नवीन टापटिपीचा प्रघात हिंदुजनांत अलीकडे सुरू झाला आहे. या मुळें त्या बिचारीच्या लग्नांत तिच्या आंगावर बापाकडून मिळालेले दागदागीनें त्यांच्या आयते पदरांत पडतात. कायद्याचें कचाट टाळण्यासाठीं आणि पोलीसांच्या डोळ्यांत धूळ भरण्यासाठीं आत्महत्त्येची सबब पुढें करून, आपण जरा जोरदार चौपदरी गळा काढला कीं काम भागलें. हा बायका मारण्याचा धंदा एकदां दोनदां तीनदाहि करायला ‘नवरा सासरा सासू कंपू’ ला कसलीच दिक्कत किंवा शरम वाटत नाहीं. उलट, इरसाल दिवाळखोर बनियाप्रमाणें हा नक्राश्रु ढाळणारा हलकट कंपू लग्नसराईंत आपल्या ध्यायला चवथ्यांदा उजवून घ्यायला गळ्यांत हुंड्याची चिठठी बांधून तयारच! प्रत्येक लग्नसराईत यांची तिजोरी गडगंज भरतच असते.

निपुत्रिक विधवा बहिणी आणि निपुत्रिक विधवा मेहुण्या यांच्यापाशीं असेल नसेल तें खरवडून खाण्याचा आणि त्यांच्या हातीं अखेर नरवंटी देण्याच्या संभावीत धंदा करणारे भाऊ व मेव्हणे या हिंदुस्थानांत किती आहेत, हें वकिलीचा धंदा करणाऱ्या बहुतेक सर्व कज्जेदलालांना पूर्ण माहीत असते.

इरसाल बिलंदर डोकेबाजांनीं नेहमींच बावळट श्रीमंत प्राण्यांच्या जीवावर आपली तुंबडी भरावी, असा जगाच्या व्यवहारांत एक ठराविक नियम असावा, असें मला वाटतें. अपवादात्मक कांहीं थोडीं उदाहरणें असतील; नाहीं असें नाहीं. पण तीं जमेला धरण्यांत अर्थ नाहीं.साधरणतः या बिलंद डोकेबाजांच्या वर्गांत आमच्या सुशिक्षित मंडळींचा समावेश होतो, आणि दुसऱ्या बावळट वर्गांत सर्व पडदानशीन बायाबापड्यांचा—किंबहुना अखिल स्त्रीवर्गाचा समावेश होतो. हा दुसरा वर्ग जात्याच अत्यंत त्यागी, दिलदार मनाचा, सुचरित, गोड स्वभावाचा, पण अशिक्षित, विवेकहीन, कर्मठ आणि कमालीचा धर्मभोळा असतो.

आमचा स्त्रीवर्ग त्यागी दिलदार सुचरित आणि गोड स्वभावाचा अझून आहे, म्हणूनच हिंदु-भारताचा कारभार सध्यां कसाबसा टिकाव धरून राहिला आहे.

आमच्या संस्कृतीचा थोडा बहुत अभिमान बाळगण्याला जर कोठें काहीं जागा असेल, तर त्याचें सर्व श्रेय आमच्या स्त्रीवर्गाच्या या साधुवृत्ति सद्‌गुणांनाच दिलें पाहिजे. समाज आणि संस्कृती कसाला लावण्याच्या वेळीं पुरुषांपेक्षां स्त्रियांचेंच महत्व विचारांत घ्यावें लागतें.

अनुक्रमणिका

पण या बदमाश जगांत, स्त्रियांचा आत्यंतिक त्यागीपणा, कमालीची साधुवृत्ती आणि हृदयाची माधुरी इत्यादि सद्गुणांचा हिंदु पुरुषवर्गावर मात्र उलटा विपरित परिणाम घडत असतो. स्त्रियांच्या सर्व स्वर्गतुल्य गुणराशीमुळें आम्ही पुरुष मात्र अट्टल स्वार्थी, पिसपिशीत मनाचे आणि नामर्द वृत्तीचे बनलो आहों.

आमच्यांतील अविभक्त कुटुंब पद्धतीमुळेंच स्त्रियांच्या या सर्व सद्गुणांना वांव मिळून त्यांचा सुंदर परिपोष झालेला आहे. या ठिकाणीं त्यांचाच शब्द सारा संसार-कारभार चालवीत असतो. त्यांच्या विरूद्ध फारसे कोणी जात नाहीं. सर्व कुटुंब एकत्रच असल्यामुळें, निरनिराळ्या व्यक्तींवरच्या त्यांच्या निसर्गजात प्रेमाचा इतका सुंदर विकास झालेला दृष्टीस पडतो कीं, तसलें अकृत्रिम प्रेम जगांतल्या कोठल्याहि देशांत पहावयाला मिळणार नाहीं.

अविभक्त हिंदु कुटुंबातील गृहिणीच्या या नितांत मधुर प्रेमाचें आणि तिच्या सेवाधर्माचें खरें स्वरूप पहावयाचें असेल, तर ती गृहव्यवस्थेच्या नानाविध प्रकारांत मग्न असतांना नजर टाका, म्हणजे झालें. ती अशिक्षित असली, शाळांतील इतिहास भूगोल गणितादि विषयांचा तिला वाराहि लागलेला नसला, तरी ही गृहराज्ञी संसाराच्या खर्चवेचांत, काटकसरींत, हिशोबाठिशोबांत, देण्याघेण्यांत कमाल धोरणी व वाकबगार असते.

तिचें लक्ष सर्वांवर आणि सगळीकडें सबसारखें असतें. स्वयंपाकाचीं व इतर सर्व भांडीकुंडी घासून पुसून स्वच्छ ठेवणें. खोल्या झाडून सारवून स्वच्छ ठेवणें. ओसऱ्या पायऱ्यांवर कणारांगोळ्या काढून त्या सुशोभित करणें. दूधदुभत्याची व्यवस्था ठेऊन, त्याची वाटणी करणें. मुलाबाळांच्या न्याहारीचा लवेदा आटपणें. बाजार येईल त्या प्रमाणें जेवणाचा बातबेत ठरविणें. आचारी किंवा स्वयंपाकीण असेल तर डाळ तांदूळ कणिक भाजीपाला वगैरे जिन्नस साफसूफ करून चिरून निवडून व्यवस्थित प्रमाणांत तिच्या हवालीं करणें. पाकसिद्धीवर वरचेवर लक्ष देणें. मुलाबांळांच्या आंघोळी, त्यांचे कपडेलत्ते, त्यांची जेवणेंखाणें आटपून त्यांची शाळेंत रवानगी करणें. हायस्कूल कॉलेजांत जाणाऱ्या तरुणांचीहि इतकीच बडदास्त ठेवणें. हीं कामें उरकतात न उरकतात तोंच ऑफिसांत जाणाऱ्या मोठ्या मंडळीची गडबड सुरू होतें. यांत मामंजी, पतिराज, दीर, काके मामे दीर, एखादा घरजांवई, पाहुणाराहुणा, माऽऽरे सगळ्यांची एकदम धामधूम उडते.त्या सर्वांची यथासांग भोजन पानसुपारी पर्यंत बोळवण करतां करतां दहाचा टोला पडतो. दहाच्या आंत या सर्व भानगडी तिला आटपाव्याच लागतात.

साडे दहाला शाळा कॉलेज ऑफिसांतली मंडळी जिकडच्या तिकडे निघून गेली कीं बिचारीला क्षणभर हुःश करायला मिळतें न मिळतें, तोंच गडीमाणसांच्या जेवणाची व्यवस्था दत्त म्हणून पुढें उभीच. हें काम आटोपतांच मुलांना व मोठ्या माणसांना शाळा कॉलेज ऑफिसांत पाठविण्याच्या टिफीनची लगबग सुरूं होते. यांतून ती थोडी मोकळी होते तों शाळेंतून परत येणाऱ्या मुलांसाठीं भूकलाडू तहानलाडूची व्यवस्था पहावी लागते. बरें, हे ‘बाळवाटी’ वाले बाबलोक एकत्र एकदम तरी घरीं येतात?कोणी ४ वाजतां, कोणी ४॥ वाजतां आणि कांहीं ५ वाजतां.आला कीं वाढ, खरकटें काढ! असा सारखा धुडगूस चालूं.

नोकरा चाकरांचीं दुपारचीं जेवणें, मुलांच्या टिफिणी यांतच बारा वाजेपर्यंत गृहिणीचा वेळ जातो. लागलीच ती आचारणीशीं रात्रीच्या जेवणाचा बातबेत ठरऊन त्याप्रमाणें सामानासुमानाच्या व्यवस्थेला लागते. त्यांतच नोकरा चाकरांची भांडणें, त्यांच्या घरांकडल्या सुखदुःखाच्या बातम्या, या भानगडींचीं ती

अनुक्रमणिका

निवरानिवर करते. देवघरांत देवास दोन फुलं वाहून, या माऊलीच्या पोटांत दोन घांस जाईपर्यंत दोन वाजतात.

या शिवाय भिकारी भिक्षुक फकीर यांची वर्दळ सारखी असायचीच. कोणाला मूठभर तांदूळ, तर कोणाला पै पैसा ती देतच असते. कोणी विन्मुख परत जाईल हें व्हायचेंच नाहीं. इतक्या नानाविध भानगडींत ती गुंतलेली असली, तरी तिची चाणाक्ष नजर सगळीकडे करड्या कदरीनें फिरत असतेच. आचारीण किंवा एखादा नोकर घोटभर दुध चिमुटभर साखर किंवा कवळाभर सरपण चोरूं म्हणेल, तर तें कधींच शक्य नाहीं.

काय तिला थोडीशी विश्रांति मिळायची तर ती तीन चारच्या दरम्यान.पण या वेळींहि शिवण टिपण हीं कामें तिच्या मागें असतातच.

चाराचा ठोका पडला कीं शाळेंतील व कॉलेजांतील मुलें परत येऊं लागतात. त्यांच्या फराळापासून सुरवात झाली कीं रात्रीची जेवणें आटपेपर्यंत तिच्या कामाचा रगाडा चाललेला असतोच. रात्रीं १० वाजेपर्यंत सर्वांची जेवणें आटोपल्यावर ती आपल्या जेवणाची व्यवस्था पहाते. एवढ्या अवकाशांत तिच्या पतिराजाचे जेवण वगैरे होऊन, त्यांच्या निजण्याची, पानसुपारीची सगळी व्यवस्था ती व्यवस्थीत लावते. कांहीं कमी अधिक असेल त्याची व इतर संसारी बाबींची चर्चा करते.

जेवण्याच्या संबंधांत हिंदूंचे घर म्हणजे शुद्ध उपहारगृह किंवा खाणावळ म्हटलें तरी चालेल. उपहारगृहांत ज्याप्रमाणें दुकान उघडें आहे तोंपर्यंत केव्हांहि यावें आणि खाऊन जावें, त्याप्रमाणें आमच्या घरांत प्रकार चाललेला असतो. जेवण्याची एक निश्चित वेळ आहे आणि वेळेवर बाहेरून येऊन सर्व हजर राहतील, ही गोष्टच नको. मग पुरुषपणा तो कोठें राहिला?केव्हांहि यावें आणि जेवावें असा पंक्तीचा प्रकार तेथें चाललेला असतो.

जी पुरुष मंडळी सकाळच्या जेवणाकरितां नियमितपणाचा अगदीं थैमान घालतात, तीच मंडळी संध्याकाळच्या वेळेबद्दल अगदींच बेफिकीर असतात. कुटुंबांतील सर्वजण एकत्र एकदम जेवतील असा योग दुर्लभच. प्रत्येक जणाची वेळ निराळी आणि त्या वेळेला या राजेश्रींची बरदास्त ही राहिलीच पाहिजे. पण असल्या गोष्टीनीं घरांतल्या बायकांना काय त्रास पडतो याची ते यत्किंचितही जाणीव राखण्याच्या भानगडींत पडत नाहींत.

अविभक्त हिंदु कुटुंबांतलें हें गृहव्यवस्थेचें चित्र जरा विशेष तपशीलानें रंगविण्यांत, मूळ विषयापासून मी थोडा बाजूला गेलो, असें आपणांस वाटत असेल. पण यावरून तुम्हाला स्पष्ट दिसून येईल कीं, असल्या या पद्धतीमुळें बायका म्हणजे कामाची निवळ यंत्रें तर बनतातच, पण कुटुंबांतल्या कुटुंबांत पुरुषांच्या, विशेषतः तरुण मुलांच्या, मनोवृत्ति दिवसेंदिवस बदलत्या काळाबरोबर कशा बदलत आहेत, याचा अदमास घेण्यासहि त्यांना वेळ सांपडत नाहीं.

एक दोन वर्षे शाळेंत जाऊं लागून झालीं कीं, मुलांना ताबडतोब कल्पना येते कीं, आपली आई वगैरे बायकामंडळी अशिक्षित आहेत, आणि त्यांना आपण शिकत असलेले धडेहि समजावून सांगतां येत नाहीं. ही कल्पना एकदां का मुलांच्या मनांत रुजूं लागली कीं, त्यांच्या मनांत या स्त्रीजनांबद्दल एक प्रकारची

अनुक्रमणिका

बौद्दिक तिरस्कारांची भावना उत्पन्न होऊं लागते. आणि आईचा त्यांच्या वरचा दाब हळू हळू नाहींसा होण्याच्या पंथाला लागतो. याचा परिणाम अगदीं उघड आहे. हे मुलगे शरीरानें मारे चांगले दही, दूध, तूप, खाऊन पोसले जातात. पण मनाची खरी जोपासना होण्यास मातांच्या आत्मिक तेजाचें टॉनिक लागते तें त्यांना, त्यांच्या माता वर निर्दिष्ट केलेल्या बहुमोल गुणांनीं विभूषित असतांही, मुळींच मिळत नाहीं.

आपल्या आयांच्या अशिक्षितपणाबद्दल हळू हळू न कळत उत्पन्न होणारा हा तिरस्कारभाव एकंदर स्त्रियांच्या विषयीं मुलांच्या मनाची ठेवणच बिघडवून टाकतो. एकंदर स्त्रीजातीविषयीं लहानपणींच त्यांची कल्पना विकृत होते. ते त्यांना आपल्यापेक्षां प्रत्येक बाबतींत बेअक्कल समजून क्षुद्र लेखू लागतात.

आईला आपल्या अशिक्षितपणाची जाणीव असल्यामुळें ती आपल्या सुशिक्षित बनूं पहाणाऱ्या चिरंजीवांना कोणत्याच बाबतींत बोलत नाहीं. आणि अशा रीतीनें दोघांची बौध्दिक फारकत दिवसेंदिवस जास्तजास्तच होत जाते. बाप काय?—तो रात्रंदिवस आपल्या धंद्यांत आणि कामकाजांत इतका गढून गेलेला असतो कीं, मुलांच्या मनोभूमिकेच्या ठेवणीसारख्या गोष्टीकडे लक्ष पुरविण्यास त्याला फुरसतच सांपडत नाहीं. आणि त्यामुळें बापलेकांमध्यें संघटनहि बेताबाताचेंच राहतें. हळुहळूं मुलगेहि बापाशीं केव्हांहि मनमोकळेपणानें बोलण्यास संकोचतात.

दिवाणखान्यांत जेथें बापाची चार मित्रमंडळी जमून गप्पा वगैरे चालतात, तेथें कोणत्या विषयावर बोलावों आणि बोलूं नये, याचा त्यांना कांहीं घरबंदच नसतो. स्त्रियांच्या विषयीं थट्टास्पद उद्‌गार किंवा वाटेल त्या चवचाल घाणेरड्या गप्पा खुशाल मनमुरादपणें तेथें चालत असतात. हे सर्व गप्पाष्टकांचे अड्डे चालत असतां लहान मुलें तेथेंच वावरत असतात. त्यांच्या कानांवर या गोष्टी पडतात आणि मग लहान वयांतच तीं कळूं नये त्या गोष्टींत तरबेज होऊन, वाटेल त्या अवास्तव फाजील गोष्टी बडबडणारी बनल्यास नवल तें काय?

आपले आईबाप एकत्र बसले आहेत. एखादें चांगलेसें पुस्तक वाचीत आहेत. त्यांतील विषयासंबंधी चर्चा करीत आहेत. असला देखावा मुलांच्या दृष्टीस क्वचितच पडतो. आईबापांची भांडणे आणि धुसपुस ही त्यांच्या नित्य पहण्यांतली गोष्ट.आईविषयीं बापानें काढलेले अनुदार उद्‌गार तिच्या मठ्ठ डोक्याची हेटाळणी, वाटेल त्या शब्दांनीं केलेली तिची निर्भत्सना, हीं नित्यशः दृष्टीस पडावयाची.हा अकाल प्रौढपणा, म्हणजे भलत्या वयांत भलत्याच गोष्टी शिकण्याचा या मुलांचा आणखीहि एक मार्ग असतो. तो म्हणजे घरांत लग्न होऊन आलेल्या समवयी पण प्रौढ बहिणी आणि कॉलेजांत शेफारलेल्या व रेनॉल्डच्या कादंबऱ्यांचा घोट्या मारणाऱ्या त्यांच्या पतिराजांकडून त्यांनीं शिकलेल्या फाजील गोष्टी ऐकण्याचा!

अविभक्त कुटुंब-व्यवस्थेंत मुलांना खरें गृहजीवन किंवा खरें गृहशिक्षण मुळींच मिळत नाहीं. इतकेंच नव्हे तर, गृहजीवन म्हणजे काय, याची त्यांना कांहीं कल्पनाच होत नाहीं. याचा परिणाम त्यांच्या भावी जीवनचर्येवर फार वाईट होतो. हाच महत्त्वाचा मुद्दा या एवढ्या निरूपणानें मला तुमच्या नजरेस आणावयाचा आहे.

खरें पाहिलें तर मुलांना गृहजीवनाचें अमृत आईच देऊं शकते. 'हें घर माझें आहे' ही जाणीव तीच देऊं शकते. गृहसंसाराला लागणारा पैसा बाप कितीहि मिळवो, तें काम त्याचें नव्हं.तें सामर्थ्य आईचेंच.

कोवळ्या वयांत मनोवृत्ति इतकी मृदु असते कीं, तिला वाटेल तो आकार देतां येतो. त्या वयांत जर मुलांच्या मनांवर आईचा दाब नसेल, तर केवढी हानी त्यापासून होईल याची कल्पनाच करणें बरें.

हिंदुचें एखादें घर घ्या, नाहींतर सारा हिंदुसमाज घ्या. आमच्या रोजच्या राहणींत धार्मिक बुरख्याखालीं शेकडों फोलकट आचार विचारांचा सुळसुळाट सारखा चालूं असतो. त्यांतला दांभिकपणा आम्हांला कळो वा न कळो, पण विचाराला पटेल असें त्या धार्मिकब्रुव आचारांत कांहींच नसतें. केवळ मढ्यांची उलथापालथ! या फापटपसाऱ्याच्या बजबजपुरीचा परिणाम आमच्या मनोवृत्तीवर व वर्तनावर फारच विपरीत झालेला आहे. देण्याघेण्याचा किंवा कसलाहि व्यवहार असो,"आपणांशीं इतरांनीं जसें वागावें अशी आपली अपेक्षा असते, तसेंच आपणहि त्यांच्याशीं, सख्या भावाच्या भावनेनें, निदान माणुसकीच्या भावनेनें तरी, वागले पाहिजे "हें वर्तन–नीतींतलें मुख्य तत्व बेगुमानपणें लाथाडण्यांत आम्हांला कांहींच वाटेनासें झालें आहे.

पावड्यानें पैसा ओढणाऱ्या इरसाल डामरट लोकांच्या धंद्याला समाजामध्यें दोन प्रकारच्या लोकांची मदत होत असते. एक हावरा आणि दुसरा गरजू. हे दोनहि प्रकारचे लोक अगदींच अशिक्षित असतात असें नव्हें, चांगले सुशिक्षित असतात. पण, शिक्षणाचा उपयोग कांहीं तरी उच्च उदात्त गोष्टींच्या प्राप्तीसाठीं असतो, ही कल्पनाच त्यांना भासमान होत नाहीं. त्यांना शिक्षण म्हणजे, आपल्याच गरीब बांधवांचे गळे सफाईत कापणारा वस्तराच वाटतो. ही उपमा किंचित् स्पष्ट करून सांगायची तर असें स्वच्छ म्हणतां येईल कीं कायद्याच्या कचाटींत न सांपडतां लोकांना सफाईनें नागविण्याचाच ते धंदा करीत असतात.

गृहजीवन आणि त्याचा मुलांबाळांवर व मोठ्या माणसांवर होणाऱ्या योग्य व सात्विक परिणामाच्या उणीवेमुळें आजच्या हिंदु समाजाची नीतिमता पार नासून गेली आहे; आणि चालला आहे तो प्रकार जर असाच बिनअटकाव चालूं राहील, तर हिंदु समाजाच्या अधःपाताचें स्वरूप आहे त्यापेक्षां खास अधिक भेसूर बनल्याशिवाय राहणार नाहीं. स्त्रियांच्या–मातांच्या–घरगुती कष्टांचे नुसते पोवाडे गाऊन हा अधःपात थांबणार नाहीं. त्यांचा आत्मिक प्रभाव वाढविण्यासाठीं त्यांना शिक्षणाची जोड करून दिली पाहिजे. घर स्वच्छ ठेवणाऱ्या तिच्या हातांतील केरसुणीचें महात्म्य कवीनीं वर्णिलें आहे. वर निर्देशिल्याप्रमाणें तिला खरी माता होऊं द्या. ती घरच काय, पण त्याबरोबर त्यांतील माणसांचीं मनेंहि स्वच्छ ठेवण्यास समर्थ होईल. आणि मग स्त्रीला 'भयचकित तिज नमावें' असलें तिचें खरें दैवी स्वरूप प्राप्त होईल.

सध्यां तर, आमच्या हाडींमासीं खिळलेल्या शेंकडों परस्परविरुद्ध पंथपक्षभेदांच्या ध्येयांनी व कल्पनांनीं आमच्या अपकर्षाचा वेग विशेष वाढत चालला आहे. उदाहरणार्थ, वैष्णवांचा 'अवतार' पंथ पहा. हा पंथ किती अनवश्यक अविवेकी आणि सर्वथैव असमंजसपणाचा आहे, हें स्वामी दयानंद सरस्वतीसारख्या अनेक विद्धान पंडिताग्रणीनीं हडसून खडसून सिद्ध केलेलें आहे.

या 'अवतार' कल्पनेचा पुरस्कार करण्यासाठी वैष्णव लोक कशाकशाचा आधार घेतील आणि कसकसल्या गोष्टींचें समर्थन करतील, याचा कांहीं धरबंधच उरलेला नाहीं. भक्ती अथवा प्रेम यांच्या द्वारें सगुणोपासनेच्या तत्वाची, वेदान्तांतील आध्यात्मिक तत्त्वाशीं सांगड घालतांना वैष्णवांनीं विवेकाच्याहि पार पलीकडे उडी घेण्यास कमी केलेलें नाहीं. त्यांनीं त्रैमूर्तीपैकीं विष्णूला निवडून, युगायुगाच्या ठायीं त्याला अवतार घेण्याला भाग पाडलें आहे.

अनुक्रमणिका

श्रीमद्‌भागवत हा आम्हा हिंदूंचा मोठा पवित्र ग्रंथ, वैष्णवांची ही ‘अवतार’ कल्पना त्यांतील विचारांशीं जुळती मानणें, म्हणजे आम्ही अकलेचे निवळ खंदक आहों, अशी कबुली देण्याइतकेंच मूर्खपणाचें होईल. तथापि, ज्या एक अगर अनेक लेखकांनीं हा महाग्रंथ लोकांच्या फायद्यासाठीं किंवा त्यांना मूर्ख बनविण्यासाठीं एवढ्या परिश्रमानें लिहिला, त्या लेखकाच्या अथवा लेखकांच्या हिंदु समाजाच्या मनोवृत्ती व प्रवृत्ती बद्दल काय काय कल्पना असाव्या, एवढे मात्र फार छान समजतें. या ग्रंथांतील तत्त्वज्ञानांचें सार एखाद्या लहान मुलालाहि समजेल इतकें सोपें आहे. तें हेंच कीं परमेश्वर प्रेमाची खाण आहे.

महाभारतांत पाहिलें तर वैष्णव पंथाचा नायक श्रीकृष्ण म्हणजे एक कट्टा राजकारणी मुत्सद्दी दिसतो. महाभारतीय महायुद्धांतील युद्धमान दोनहि पक्षांचा तो जवळचा नातेवाईक होता. युद्ध हें झालेंच पाहिजे अशी त्याची अगदी मनापासून इच्छा होती. भ्रांतीनें गांगरलेल्या अर्जुनाला त्यानें जो गीतारूपीं उपदेश केला तो हाच कीं, ईश्वराच्या इच्छेचें तूं एक काळसुत्री बाहुलें आहेस; केवळ निमित्त मात्र होऊन तूं याकौरवांचा संहार कर.हाण, बेलाशक हाण; मागेंपुढें मुळींच पाहूं नकोस. या संहाराच्या बाबतींत तुला आवडीनिवडीची किंवा पसंती नापसंतीची मुळीं सवलतच नाहीं. ईश्वरानें तुझ्या शत्रूंना आधींच मृत्युक्षम करून टाकलेले आहे. फक्त लौकिकी दृष्टीनें निमित्तमात्र होऊन तूं यांचा संहार कर. म्हणजे झालें.

अर्जुन ज्या मनोवृत्तींत होता, तिला श्रीकृष्णानें काय उपदेश केला?निष्काम होऊन विहित कर्तव्य कर. निरीच्छ भावनेनें, फळाची आशा न धरतां, आपण केवळ ईश्वरी इच्छेचें कळसुत्री बाहुलें—निमित्तमात्र कारण—आहोंत या बुद्धीनें कर्तव्य कर. यालाच ‘निष्काम धर्म’ असें म्हणतात. भगवद्गीतेंत याच तत्त्वावर विशेष भर आहे. परमेश्वर म्हणजे निष्करुण न्यायदेवता. उत्क्रांतीचक्रांत आपल्या इच्छामात्रें करून दुष्टांचा बिनचुक संहार आणि सुष्टांचा उद्धार करणारी शक्ती. या कामीं मनुष्याच्या युक्त्याप्रयुक्त्या कुचकामी आहेत. मनुष्य कितीहि आणि केवढाहि युक्तीबाज आणि महत्त्वाकांक्षी असला, तरी परमेश्वरी जबरदस्त सूत्रांपुढें तो दर्यामें खसखस होय.

ईश्वरी इच्छेचा एक निमित्तमात्र कारण, यापेक्षां मनुष्याच्या हातीं कसलीहि सत्ता नाहीं, त्याच्या हातून कांहीं होणेंहि नाहीं, ही श्रीमद्भगवत् गीतेंतील निष्काम धर्माची व्याख्या जितकी न्याय निष्ठूर आहे, तितकीच उत्साहवर्धक आणि कोणत्याहि समाजाच्या आत्मिक वृत्तीच्या उत्कर्षाला शोभून दिसणारी आहे. याच्या उलट ‘ईश्वर प्रेममय आहे’ या तत्त्वावर भक्तीपंथाची भरंसाट पुढें चढविलेली भागवतांतील माथेफिरू विचारसरणी पहा.

हिंदु समाजाची मनोवृत्ती आणि तिच्यांत बोकाळलेला भरंसाट बेतालपणा, यांचा आपणास नीट चिकित्सापूर्वक अभ्यास करायाचा असेल, तर गीता आणि भागवत या दोन हिंदु—बायबलांचा आपणांस नीट परिचय करून घेतला पाहिजे. या दोन ग्रंथांतील विचारांचे आमच्या स्वभावावर व शीलावर झालेले परिणाम अभ्यासणें फार महत्त्वाचें असल्यामुळेंच मी हा मुद्दा विचारार्थ मुद्दाम घेतला आहे.

भारतीय महायुद्धाचा बातबेत ठरविण्याच्या कामीं श्रीकृष्णाला पांडवमाता कुंति आणि पांडवपत्नी द्रौपदी यांचें सहाय होतें.

अनुक्रमणिका

या महायुद्धांत बहुतेक सर्व क्षत्रिय राजांचा संहार झाला. त्यामुळें परचक्रांपासून हिंदुस्थानचें संरक्षण करणारी मुख्य शक्तीच पार नाहींशी झाली. त्याचें परिणामहि फार भयंकर झाले. जगाच्या इतिहासांत दुसरी तोड आढळणार नाहीं, अशा ऱ्हासाच्या आणि अधःपाताच्या फेऱ्यांत हा देश सांपडला.

या ऱ्हासाला आणि अधःपाताला थोपविण्याचा कौतुकास्पद परंतु अपयशी प्रयत्न बौद्ध व जैन धर्मपंथांनीं केला. ब्राम्हणी धर्मानें पाशवी धुडगुसाच्या जोरावर आपला बोलबाला वाढविण्याची जी कारवाई केली, त्यांतच हिंदुस्थान ग्लानीनें गठाळला आणि अखेर ठार बुडाला. आजचा हिंदुस्थान म्हणजे थंडगार पडलेले नुसतें मढें बनला आहे आणि या शोचनीय अवस्थेची सर्व जबाबदारी भिक्षुकशाहीच्याच माथ्यावर आहे.

असो. सध्यां थोडा वेळ आपण हिंदु—भारताला अत्यंत प्रिय असलेल्या पुरूषोत्तम श्रीकृष्णाकडे वळूं या. भारतीय महायुद्धाच्या कत्तलीची सुरूवात होण्यापूर्वी सारथी श्रीकृष्णानें अर्जुनाला गीतोपदेश केला, तो भगवद्गीता नांवानें महाभारतांत आढळतो.

निरनिराळ्या योगपद्धतींचा उत्कृष्ट समन्वय आणि निष्काम धर्माचा उपदेश करणारा हा थोर महत्त्वाचा गीता—भाग जर महाभारतापासून निराळा काढला, तर तेवढ्यानें त्याचें किंवा खुद्द महाभारताचें महत्त्व रतिमात्र कमी होण्यासारखें नाहीं. परंतु श्रीकृष्णानें गीतेचा उपदेश केला, एवढ्याच सबबीवर त्याला विष्णूचा अवतार मानण्याचें वास्तवीक कांहीच कारण दिसत नाहीं.

वृंदावनांत गीपींच्या शृंगारविलासांत लोळणारा कृष्ण हाच महाभारतांतला श्रीकृष्ण, तोच अवतारी पुरुष, असें भागवताच्या खास शिकवणीनें सर्व हिंदु समाजास भासवून, वैष्णव लोक देशांतील अज्ञ लोकांच्या भोळसट भावनांवर आजपर्यंत वाटेल तसे चरत आहेत. पण आश्चर्याची गोष्ट हीच कीं खुद्द महाभारतांत कृष्णाच्या वृंदावनी शृंगारीक जीवनाबद्दल एका अक्षराचाहि उल्लेख आढळत नाहीं.

हव्या त्या वेळीं हवा त्याला ईश्वरी अवतार बनविण्याच्या फाजील संवयीचा परिणाम असा होतो कीं माणसांत माणुसकीचा अभाव तर सिद्ध होतोच, पण सारासार विचार आणि वस्तुस्थितीचा विवेकी ताळमेळ याचाहि धरबंध शिल्लक उरत नाहीं.

चालूं आयुष्यांत इहलोकीं आमच्या हातीं असेल नसेल त्याची विल्हेवाट लाऊन, परलोकीच्या (काल्पनीक) सुखदायक गोष्टींचा ध्यास घेणें, म्हणजे हातचें सोडून पळत्याच्या मागें लागण्यासारखें आहे. पण आमच्या भिक्षुकशाहीची शिकवण पाहिली तर 'हातचे सोडा आणि पळत्यासाठीं जीव तोडा' हीच. असल्या शिकवणीमुळें वाटेल त्या राष्ट्राचा अधःपात व नाश झालाच पाहिजे. बुद्धी आरपार सडून, आमच्या पौरुषत्वाचेहि तीनतेरा उडाल्याशिवाय राहावयाचे नाहीत. ही शिकवण म्हणजे एक विलक्षण गुंगी आणणारें जहर आहे. या जहराच्या माऱ्यांत आमचें हिंदुराष्ट्र सांपडले आहे. यांतून सुटकेचा मार्ग काढण्याचा प्रत्येक प्रयत्न्त म्हणजे बुडत्याचा पाय खोलांत, अशी अवस्था झालेली आहे. कारण, त्या जहराचा बाहेरून प्रतिकार करीत असतांनाच आजपर्यंत कळत नकळत आंगीं भिनलेल्या विषाचे घाणेरडे गॅस भसाभस आमच्या अंतरंगातून बाहेर पडत असतात आणि आंतून बाहेरून अशा दुबारी माऱ्यानें आमचा एकसारखा कोंडमारा होत असतो.

अनुक्रमणिका

आंता आपण आपल्या पवित्र काव्येतिहास (Epic)ग्रंथांकडे वळूं. या ग्रंथांनीं आमच्या व विशेषतः स्त्रीवर्गाच्या धर्मभोळेपणाची कमान किती कमाल वांकविली आहे. याविषयीं कांहीं मुद्दांकडे आतां लक्ष देऊं या. स्वतःच्या मनालाच खालील प्रश्न विचारा:—

(१)लंकेचा राजा रावण[रोमन लोकांनीं कार्थेज येथल्या प्राचीन फिनीशियन संस्कृतीचा नाश केला; ग्रीक लोकांनीं ट्रोजन संस्कृती धुळीला मिळविली; तद्वतच वैदिक आर्यांनीं रसातळाला नेलेल्या एका जबरदस्त प्रतिस्पर्धी स्कृतीचा रावण हा नायक प्रतिनिधी होता.—ग्रंथकार.]हा शिवाचा उपासक दाखविण्याची काय आवश्यकता होती?

(२)राम जर एवढा मोठा विष्णूचा अवतार होता, देव होता, तर त्याला हनुमानाच्या मदतीनें, रावणपत्नी मंदोदरीकडून, रावणाच्या आत्मसंरक्षणाची गुप्त अस्त्रें, लुच्चेगिरीनें आणि ठकबाजीनें साध्य करून घेण्याची काय जरूरी होती?

(३) रावणाचा शिलकी पुत्र व सेनानी इंद्रजित हा वैदिक अग्निदेवाचें पूजन करण्यांत मग्न असतां, त्याचा वध करण्याचें लक्ष्मणाला काय प्रयोजन होतें?

(४) आपल्या शस्त्रास्त्रांना विजय मिळावा म्हणून पाण्यांत उभें राहून रामानें दुर्गापूजा ऊर्फ शक्तीपूजा केली, ती काय म्हणून?

या शक्तीपूजनांच्या अनेक संदर्भांवरून, हा रामायण ग्रंथ कोणीतरी एखाद्या शाक्तपंथी संपादकानें, आपल्या पंथाच्या मतप्रसारार्थ आणि पूजाप्रसाराची जाहीरात देण्यासाठींच लिहिल्याचें नाहीं का तुम्हाला वाटत?विष्णूचा अवतार राम; तो शक्तीची पूजा करतो आणि त्यामुळें शैव रावण रसातळाला जातो! यावरून, शिवापेक्षां विष्णू श्रेष्ठ आणि विष्णूपेक्षां शक्ती श्रेष्ठ; त्याचप्रमाणें इतर देवदेवतांच्या पूजकांपेक्षा शक्तीच्या उपासकाचा—शाक्ताचा—अधिकार विशेष श्रेष्ठ व हुकमी फलदायी, एवढेंच त्या रामायण-लेखकाला नव्हते का दाखवावयाचें?आणि हें काम कल्पक व चलाख अशा एखाद्या शाक्तपंथी संपादकाशिवाय इतर कोणाला साधलें असतें?पंथभेदाचा सवतिमत्सर हा असाच असतो!

या असल्याच मत्सरी पंथभेदाचें ‘पॉलिटिक्स[पॉलिटिक्स या इंग्रेजी शब्दाचा अर्थ केवळ ‘राजकारण’ असा होत नाहीं. त्यांत मानवी जीवनचर्येच्या सर्व व्यवहारांचा समावेश होतो. म्हणून तोच शब्द येथें कायम ठेविला आहे.—अनुवादक.]’प्राचीन हिंदुस्थानांत चालूं असें. त्या प्राचीन पॉलिटिक्सचें स्पिरीट [या शद्बालाहि तेज, तडफ वगैरे अनेक मराठी प्रतिशब्द असले, तरी स्पिरिट शब्दांतल्या सर्व भावना त्यांत उतरत नाहींत.सबब याचीहि शुद्धी करून मराठी संघटनांत त्याला घेतलें आहे.—अनुवादक.] आजहि आम्ही परदेशच्या सफरी करून परत आलेल्या आमच्या देशबांधवांवर बहिष्कार टाकण्याच्या कामीं भरपूर गाजऊन घेतअसतो. आमच्या खेड्यापाड्यांतून हा ‘वाळींत टाकण्याचा’ धंदा अगदी तेजी असतो. मात्र एखादा श्रीमंतः शूद्र थोडा ढिल्या हाताचा असेल, तर त्यावर ही वाळीची घोरपड सहसा चढत नाहीं. तथापि आमचे सुप्रसिद्ध जीर्णमतवादी ब्राम्हण आणि वैश्य (क्षत्रिय तर नाहींतच सध्यां!) त्या उदार व श्रीमंत शूद्रांवर बहिष्कार टाकायला केव्हांहि सोडायचे नाहींत. आजपर्यंत आमची धार्मिक सामाजिक जीवनचर्या या असल्याच मत्सरी पंथभेदांवर आणि पक्षभेदांवर चाललेली आहे. आम्ही ‘पार्टी पॉलिटिक्स’ (पक्षभेदाळू राजकारण) खेळवायला नालायक आहोंत, असें म्हणणाऱ्याला आम्ही कोण आहोंत व कसे आहोंत, याची मुळींच दाद नाहीं, असें म्हटलें पाहिजे.

अनुक्रमणिका

वैष्णव पंथाचा प्रादुर्भाव होण्यापूर्वी सर्व हिंदुस्थानांत जिकडे तिकडे ‘इंद्र’ पंथाचा प्रसार झालेला होता. वैष्णव सांप्रदायानें इंद्र सांप्रदायाला माजी टाकलें, ही गोष्ट सर्वश्रुतच आहे.

वेरूळ येथील कोरीव लेणी आपण पाहिलीं ऐकलीं असतीलच.सबंध डोंगराचा कडाच्या कडा पोंखरून, त्यांत मोठमोठे भव्य दिवाणखाने, हिंदु देवदेवतांचीं सुंदर चित्रें कणखर दगडांत कोरलेलीं आहेत. ती इतकी प्रचंड भव्य प्रमाणबद्ध आणि सुंदर आहेत कीं जगांत त्यांना दुसरी तोड नाहीं. इजिप्त येथील कोरीव कामें व पिरामीड हीं सुद्धां त्यांच्यापुढें खिसगणतींत नाहींत, असा अनेक ब्रिटीश चिकित्सकांचा अभिप्राय आहे. एवढें मोठें ग्रीस. पुतळ्यांच्या कोरणींत जगप्रसिद्ध. पण या लेण्यापुढें त्याचीहि ती कला फिकी पडते. या वेरूळ लेण्यांत जो एक प्रचंड दिवाणखाना आहे, त्यांत इंद्र व त्याचे इतर सहकारी यांचेच सर्वत्र पुतळे आहेत. तेथें श्रीकृष्ण किंवा विष्णू यांचें नांवहि नाहीं.

महाभारतांत श्रीकृष्णाला ‘अवतारी’ दाखविला आहे. त्यानें आपलें तोंड उघडून त्यांत अर्जुनाला आपल्या विश्वरूपाचें दर्शन दिलें. हा विश्वरूपदर्शनाचा प्रयोग कृष्णानें जर दुर्योधनावर केला असता, तर त्याच्या अवतारी तेजानें सारे कौरव चारी मुंड्या चीत होऊन त्याच्या पायांशीं लोळण घेते आणि साऱ्या भरत खंडाची धुळधाण उडविणारें महायुद्ध ठिकच्या ठिकालीं थांबतें!

भारताचें (हिंदुस्थानाचें) महाभारत (थोर हिंदुस्थान) बनवावें, अशी श्रीकृष्णाची महत्वाकांक्षा होती, असें म्हणतात. पण आपापसांत झालेल्या सर्वसंहारी महायुद्धांत तो पक्षपाती होता. बरें, हें महायुद्ध तरी कोणत्या मोठ्या उच्च तत्वासाठीं झालें?तर तत्वबित्व कांहींच नाहीं.युधिष्ठिर आणि त्याचे भाऊ या पांडवांसाठीं एक साम्राज्य असावें, त्यांचा कौरवांनी केलेला अपमान भरून यावा, एवढ्यासाठींच महायुद्ध झालें. आणि त्यांत अवघ्या भारताच्या क्षत्रिय कुळांचा संहार झाला. ही काय भारताचें महाभारत बनविण्याची योजना?यावरून इतकें स्पष्ट सिद्ध होतें कीं इतर राजकारणी मानवी मुत्सद्यांप्रमाणें श्रीकृष्ण सुद्धां धोरणी डांवपेचांत भयंकर चुका करणारा एक माणूसच होता. आमच्यांतील थोर थोर विभूतींच्यां चरित्राची अशी चिकित्सा केल्यानें, किंवा त्यांच्याकडे ‘केवळ एक मनुष्य’ या दृष्टीनें पाहिल्यानें, कोणाचें कांहींहि नुकसान होण्याचा संभव नाहीं.

दुर्योधनाच्या दरबारांत राणी द्रौपदीला खेचून आणली आणि तिची बीभत्स विटंबना करण्यांत आली, हा प्रसंग तुमच्या लक्षांत असेलच. वस्त्रहरणाची विटंबना चालली असतांना, ती एकसारखी श्रीकृष्णाचें चिंतन करीत होती. त्याचा परिणाम असा झाला कीं दुर्योधनाचाभाऊ दुःशासन तिची लुगडी फराफर्र फेडतां फेडतां थकला, पण ती कांहीं संपतच ना.

श्रीकृष्णाच्या ज्या दैवी तेजानें हा अलौकिक चमत्कार घडून आला, त्याविषयीं जर दुर्योधनाची खात्री पटलेली असती, तर, तो कितीहि उन्मत्त का असेना, त्यानें पांडवांशीं सख्य जोडण्याच्या अटी नाकारून या परमेश्वरावतारी श्रीकृष्णाचा धिःकार कशाला केला असतां?

महाभारतीय हिंदुस्थानाच्या सम्राटाच्या भर दरबारांत द्रौपदीच्या — एका स्त्रीच्या — बेशरम आणि हलकट बिटंबनेचा जो चिळस आणणारा प्रकार घडून आला, त्याचा कडकडीत तिटकाऱ्याचा सक्रीय निषेध दर्शविण्यासाठीं राजसभेंतील मोठमोठे तपस्वी संतापानें उठून गेले. ही मोठी समाधानाची गोष्ट होय. एका

स्त्रीदेवतेची राजदरबारांत विटंबना केल्यामुळें “या भरत खंडांतील क्षत्रिय राजांच्या हातीं सम्राटपदाचा राजदंड आणि मुकुट अतःपर कधींच राहणार नाहीं” असा त्या तपस्व्यांनीं तळतळून शाप दिलेला आहे.

ज्या ऋषि मुनीनीं हा तळतळाटाचा शाप दिला, त्यांना, हिंदुस्थानांत ऱ्हासाची आणि अधःपाताची शिकस्त झाली आहे आणि भारतीय साम्राज्याची नौका ठार रसातळाला जाणार, याचें भविष्य दिसत असलें पाहिजे खास. पुढें घडलेंहि तसेंच. भारतीय साम्राज्य सत्तेची नौका जी पार बुडून अदृश्य झाली, ती पुढें बौद्धधर्मीय सत्तेच्या युगांत भारतसम्राट चंद्रगुप्त मौर्य या विभूतीच्या रूपानें पुन्हा अवतीर्ण झाली. ही साम्राज्यसत्ता पुढें कांहीं शतकें चंद्रगुप्ताचा नातू सम्राट अशोक व त्याचे वंशज यांनीं टिकवली. परंतु हे मौर्य राजे कांही अस्सल क्षत्रिय नव्हते. त्यांच्या रक्तांत शूद्रत्वाची बरीच भेसळ होती.

कोट्यवधी सैनिकांचा बळी घेतलेल्या महाभारतीय युद्धानंतर युधिष्ठिर राज्य करूं लागला. राज्यकारभारासाठीं त्यानें सामान्य नागरीकांतूनच कामगारांची निवड केली, आणि राजसूययज्ञानें आपलें सम्राटपद जनजाहीर केलें. पण तेवढ्यानें त्याला बिघडलेली घडी ठाकठीक बसवितां आली नाहीं. या राज्यसंघटनेचा आणि राज्यकारभाराचा खर्च भागवितां भागवितां तो मेटाकुटीला आला. अशीहि एक कथा आहे कीं सांपत्तिक संकटांची तोंडमिळवणी करण्यासाठीं, कोणीं एका प्राचीन राजानें पुरून ठेवलेला व त्याला माहीत असलेला खजिना उकरून काढण्यासाठीं युधिष्ठिर हिमालयांतहि गेला होता. देशांत माणसांचा आणि राजकीय खजिन्यांत संपत्तीचा भयंकर खडखडाट उडालेला होता.

युधिष्ठिर राजा आणि त्याचे पांडव बंधू हिमालयांत गेले, ते तिकडेच नष्ट झाले. श्रीकृष्ण, त्याची द्वारका राजधानी आणि जातभाई जाधव यांचीहि विल्हेवाट लागली. अर्जुनाचा पुत्र आणि नातू परिक्षिति आणि जनमेजय हे राज्य करीत असतांनाच अल्पायुषी होऊन वारले. अखेर राज्यावर कोणी खंबीर राजा नाहीं, लष्कराची वाताहात होऊन गेलेली, अशी दुर्दशा उडाली.

साहजीकच सर्व देशांत गोंधळ माजला. कोणाचा पायपोस कोणाच्या पायांत नाहीं. महाभारतीय युद्धांत कौरव किंवा पांडवांच्या बाजूनें लढलेल्या शेंकडों लहान मोठ्या राजांचे निर्वंश झाले. कोठें एखादा वंशज असलाच तर तो आपली राजेशाही सत्ता कशीबशी चालवीत असे. राजवंशाची नकल झालेल्या कित्येक ठिकाणीं लोकांनींच कांहींतरी राज्यव्यवस्था चालविली, परंतु लष्करी सामर्थ्यच सर्वत्र लंगडें पडल्यामुळें, या नामधारी राजेशाही आणि लोकशाही राजसत्ता कमाल निर्बल आणि असून नसून सारख्या होत्या.

मध्यवर्ति राज्यसत्ता समूळ उलथून पडलेली, ठिकठिकाणच्या छोटेखानी राज्यांचा बेसुमार निर्बळपणा, आणि लष्करी शक्तीचा विध्वंस, यामुळें आत्मसंरक्षणाची जबाबदारी उरल्या सुरल्या सामान्य नागरीकांवर अर्थातच येऊन पडली; आणि या वेळीं त्यांनीं संघटनेच्या ज्या चळवळी व उचापति केल्या, त्यांतूनच आमच्या सर्व नागरीकत्वाच्या जीवन-नियंत्रणाच्या संस्था उत्पन्न झाल्या. या संस्थांचे परिणाम आमच्या शीलाची बरी वाईट कमावणी करण्याच्या कामीं किती खोलवर झाले, याचें आपण लवकरच परीक्षण करूं.

या संस्थांचें निरीक्षण करण्यापूर्वी, एक गोष्ट मात्र लक्षांत ठेवण्यासारखी आहे कीं महाभारतीय युद्धांत ब्राम्हणी फलटणी, म्लेंच्छ फलटणी आणि यवन फलटणी सुद्धां एकमेकांच्या खांद्याला खांदा

भिडवून लढल्या. पांडव सैन्यांत या सर्व फलटणींना सर्रास मांसाहाराची रसोयी मिळत असे. त्या काळी 'आठ-ब्राम्हण नऊ चुली'या म्हणीचा जन्म झालेला नव्हता!

आतां पहाल तर खुद्द ब्राम्हणांतच दोन हजार जाती पडल्या आहेत. रायबहादुर लाला बैजनाथ यांचें 'हिंदुइझम—एनशंट ॲन्ड मॉडर्न' हें लहानसे पुस्तक वाचा. म्हणजे त्यांत तुम्हाला आढळून येईल कीं एकट्या पंजाबांत सारस्वत ब्राम्हणांच्या ४६९ पोटजाती, क्षत्रियांच्या ५९०, वैश्य शूद्रांच्या तर हजारों आहेत. बंगालमुंबई मद्रास अथवा संयुक्त प्रांतांतील या तपशीलाचा तलास करण्याची मला फुरसद झाली नाहीं,याबद्दल दिलगिरीचें कांहीं कारण नाहीं. आपण खात्री बाळगा कीं देशांतील या सर्व जाती पोटजातींची गणति केली तर आकाशांतल्या चांदण्यापेक्षां खात्रीनें जास्त भरेल.

महाभारतावरून असेंहि दिसून येतें कीं त्या वेळीं लग्नाच्या बाबतींत जातिभेदाचीं कुंपणें आड येत नसत. वाटेल तो वाटेल तिच्याशीं प्रेमाच्या किंवा आवडीच्या सबबीवर लग्न लावीत असे. शुद्रांशिवाय इतर वर्गांच्या लोकांत, आतांप्रमाणें, जातिभेदाची तीव्रता मुळीं अस्तित्वांतच आलेली नव्हती. गोमांस आणि डुकराचें मांस कोणीहि वर्ज्य मानलेलें नव्हते. सोमरस पिण्याच्या बाबतींत यत्किंचितहि प्रतिबंध नव्हता. भारतकाळीं किंवा तत्पूर्वीच्या रामायण काळीं स्त्रियांना पडद्यांत डांबून ठेवण्याचा प्रघात मुळींच नव्हता.

महाभारतीय युद्धकाळ आणि बौद्ध धर्माचा उदयकाळ यांमधील कित्येक शतकांचा जो अवधि गेला, त्याला कृष्णयुग अथवा अंधाराचा काळ हेंच नांव देणें योग्य होईल. ज्या अनेक संस्थांनीं आमच्या सामाजिक जीवन-नियंत्रणाला भलभलतीं वळणें लावलीं, त्यांचा प्रादुर्भाव या कृष्णयुगांतच झाला. याच युगांत स्त्रिया आणि शूद्र यांच्या हक्कांवर आणि जीवनावर गदा पडली. ब्राम्हणांच्या भिक्षुकी सत्तेचा पारा बेसुमार वाढला, कडक जातीभेद निर्माण झाला, स्त्रीस्वातंत्र्याला प्रतिबंध पडला, आणि शूद्रांना शुद्ध गुलामगिरीचें दास्य मिळालें, तें याच कृष्ण युगांत.

बौद्ध धर्माचा उदय म्हणजे सर्व बाजूंनीं हिंदुस्थानच्या सुवर्णयुगाची मंगल प्रभातच म्हटली पाहिजे. या युगानें स्त्रियांना स्वातंत्र्य दिलें आणि जातीभेदाच्या चक्रांत पिळून निघालेल्या शूद्रांचा सर्वतोपरी उद्धार केला.

बुद्धोत्तर काळीं बौद्ध संस्कृतीचा ऱ्हास झाल्यानंतर, तिच्या राखेंतून हिंदु संस्कृतीचें जें पुनरूज्जीवन झालें, त्या हंगामांत बायकांना पडद्यांत कोंडून ठेवण्याची रूढी सुरू झाली असावी असें माझें मत आहे. त्या वेळीं हिंदु समाजाची स्थिति अत्यंत व्यसनधीन आणि शिष्टाचारांत बरीच निर्लज्ज आणि पागल बनलेली होती. अशा अवस्थेंत स्त्रियांना पुरूषांपासून वेगळ्या ठेवण्याची इतकी आवश्यकता प्रबुद्ध व ज्ञानी लोकांना भासूं लागली, कीं स्त्रियांच्या बाबतींत पुरूष काय वर्तन करील आणि काय नाहीं, याची कोणालाच हमी देतां येत नव्हती. एकाच घराच्या छपराखालीं रहात असले, तरी सुनेनें आपल्या सासऱ्या पुढें किंवा इतर वडीलधाऱ्या पुरूषांपुढें बुरखा घेतल्याशिवाय जातांच कामा नये, असा निर्बंध पडला. फक्त एकट्या नवऱ्यापुढें बुरख्याची अट नसे.[उत्तर हिंदुस्थानांतल्या कांहीं जातींतील स्त्रिया इतरांना खुशाल तोंड दाखवितात: पण नवरोबा येतांच पटकन् बुरख्यांचें घुंगट मारतात. मारवाडणीच्या घुंगटाची रीत तर कांहीं विचारूंच नये. तात्पर्य, बुरख्याचा विनय आणि विनयाचा बुरखा या गोष्टी सध्यां लज्जास्पद व हास्यास्पद स्थितींत आहेत.—अनुवादक.](हें तरी सुदैवच म्हणायचें!)

हिंदु समाजाला या असल्या बेफाम कामातुर आणि बेशरम स्थितींतून जावें लागल्यामुळें, त्याच्या अधःपाताचें एक कारण येथेंच सांपडतें. या नंतर मुसलमानशाही सुरू झाली. त्या वेळीं सुद्धां स्त्रियांच्या

सुरक्षिततेबद्दल लोकांचा विश्वास वाढविण्याचे काम त्यांच्या हातून घडलें नाहीं. अर्थात् पडद्याची चाल चालूंच राहिली आणि अखेर ती सुखवस्तु प्रतिष्ठितांची एक रूढीच होऊन बसली. उलट, मुसलमानांनीं या रूढीच्या टिकावाला जास्तच उत्तेजन दिलें. त्यामुळें, चालूं घटकेला जरी पडदारूढीचीं कारणें अज्ञीबात नाहींशी झालीं आहेत, तरी रूढी म्हणून पडदा आहे तो आहेच.

पडदा-रूढीचा उगम कसा काय झाला, याबद्दल माझा आणि कै. पंडित राजेंद्रचंद्रशास्त्री यांच्यांत बराच मतभेद आहे. त्यांच्या मतें 'अवरोध' ऊर्फ पडदा वैदिक आणि रामायण काळींहि होता. या विधानाच्या पुष्टीसाठीं ते एक रामायणांतलें उदाहरण देतात. रावणवध झाल्यानंतर 'बंदीखान्यांतून जाहीर रीतीनें चालत येऊन मला भेट' असा रामानें सीतेला निरोप पाठविला. परंतु तिनें 'मी पालखींतच बसून येईन' असा आग्रह धरला. यावरून कांहीतरी पडदा आच्छादन किंवा आवरण असल्याशिवाय स्त्रियांनीं चारचौघांत बाहेर पडूं नये, हा नियम सीता विसरली नव्हती. घरांच्या व वाड्यांच्या कोना कोपऱ्यांतून मोठमोठ्या लवाजम्याच्या स्वाऱ्या व मिरवणुकी पहाण्याच्या स्त्रियांच्या प्रघाताचीं कित्येक उदाहरणें संस्कृत वाङ्मयांतून पंडितजीनीं दिलीं आहेत.

पंडितजी बद्दल योग्य तो आदर कायम ठेऊन मी म्हणतों कीं त्यांच्या पुराव्यांवरून हा सिद्धांतच मुळीं सिद्ध होत नाहीं. सीता अशक्त झाली असेल, तिला बंदीखान्यांतून एकदम हजारों लोकांपुढें जाहीर रीतीनें यावयाला संकोच वाटला असेल, किंवा तिचे पायहि दुखत असतील, म्हणून रामाच्या आज्ञेला न जुमानतां तिनें पालखींतून येण्याचा हट्ट धरला असेल. आतां, संस्कृत ग्रंथांतील पुराव्यांविषयीं म्हणाल, तर ते सारे बुद्धऱ्हासोत्तर काळीं लिहिलेले आहेत, हें विसरून चालणार नाहीं. बौद्ध संस्कृतीचा ऱ्हास होऊन हिंदु भिक्षुकी संस्कृतीच्या पुनरूज्जीवनाच्या चळवळीच्या हंगामांतच मनुस्मृति रामायण आणि महाभारत या ग्रंथांच्या पुनर्लेखनाच्या कमींत कमी निदान दोन दोन तरी 'सुधारून वाढविलेल्या' आवृत्त्या बाहेर पडल्या ही गोष्ट सर्वश्रुतच आहे.

आतां आपण आपल्या सामाजिक संस्थांकडे वळूं या. भारतीय महायुद्ध आणि शिकंदराची स्वारी या मधील हजार वर्षांच्या काळाच्या अवधींत या संस्थांची स्थिति काय होती, याचा विचार केला, म्हणजे आपल्या उत्क्रांतीचा इतिहास आपणांस चांगला कळून येईल.

भारतीय महायुद्धांत देशांतील क्षत्रिय राजांचा निःपात झाला आणि लष्करी सामर्थ्य कायमचें लंजूर पडलें. याचा परिणाम असा झाला कीं गांवोगांवच्या आणि खेड्यापाड्यांतल्या लोकांना चोर लुटारूं पासून आपापल्या जीवित वित्ताचे संरक्षण करण्यासाठीं लहान लहान गांवकीचे संघ निर्माण करणें भाग पडले.

गांवपोलीस आणि गांवशिबंदी या दोन परस्पर सहायकारी संघांचा उगम येथेंच झाला. यांचें उदाहरण पाहून व्यापार धंदे शेती वगैरे सर्व लहान मोठ्या उद्योगांचे हितसंरक्षण करणारे अनेक संघ निर्माण झाले. त्या वेळीं दिवस फार वाईट होते. कोणत्याही बाबतींत एकच मनुष्याच्या तंत्रानें वागण्याचा विश्वास कोणांतही नव्हता. परंतु सार्वजनिक हितासाठी एकजुटीनें काम करणाऱ्या संघांवर मात्र सर्वांचा विश्वास असे. तोळा मासा सोन्याचा एखादा दागिना घडवायचा असला, तरी एकट्या दुकट्या कारागिराच्या हातीं कोणी सोनें देत नसें; तर सुवर्णकारांच्या संघाकडे मात्र बिनधोक तें काम देण्यांत येई.

संघटित सहकार्याचें महत्त्व सर्व व्यवहारांत सारखें सुरू झालें. जमिनीची मालकी, मशागत, पेरणी, कापणी इत्यादि सर्व कामें संघटनेनें होत असत. अविभक्त कुटुंब-व्यवस्थेचा उगम याच तत्त्वांतून झाला. सहकार्याच्या व संघटनेच्या या स्पिरीटचा उपयोग हिंदु जनांच्या सामाजिक जीवनावर फारच हितकर असा झाला. परिस्थितीच अशी आली होती कीं हिंदुंना संघटनाची व सहकार्याची कांस धरल्याशिवाय तरणोपायच नव्हता.

एखाद्या प्रांतावर दुर्बळ बेकर्तबगार राजा असो, किंवा मुळींच कोणी नसो, त्याची कोणी फारशी दिक्कत बाळगीत नसे. सर्व प्रकारच्या लोकव्यवहारांत जिकडे पहाल तिकडे संघटित सहकार्याच्या जोरावर कामें चालत आणि त्यांचे परिणाम लोकांच्या घरगुती, सामाजिक, धार्मिक, राजकीय आणि आर्थिक जीवनांत स्पष्ट उमटत असत.

अखिल हिंदु जनांच्या जीवन—नियंत्रणासाठीं निरनिराळ्या संघांच्या संगटनेची ही जी पुनर्घटनेची लाट उसळली, तींत समाजाच्या धर्मविषयक व कायदेविषयक नियंत्रणाची जबाबदारी राखणाऱ्या ब्राम्हण वर्गालाहि इतर सर्वांच्या बरोबर, क्षत्रिय वैश्यांप्रमाणें, सहकार्याचें एक सामाजिक स्थळ पत्करावेंच लागलें.

या भिन्नभिन्न संघांचें नियंत्रण होण्यासाठीं प्रत्येकानें आपापल्यासाठीं निरनिराळें नियम आखून घेतले.हे नियम कांही तरी ठोकळ व ओबडधोबड असत. संघांतील प्रत्येक व्यक्तीचें हित कसें साधलें जाईल, यापेक्षां विशेष विवंचना त्यांत कांहींच नसे. जसजसा काळ लोटला, तसतसे हेच ओबडधोबड नियम त्या त्या संघाच्या रूढ्या व रीतीभाती होऊन बसल्या.

संघटनेच्या या धामधुमींत हिंदु समाजांतील प्रत्येक संघांत एक प्रकारचें नवीन चैतन्य जरी उत्पन्न झालें, तरी प्रत्येकाची संघटना 'वॉटरटाईट कंपार्टमेंट' प्रमाणें कडक कुंपणाची एकलकोंडी बनली. एका संघाचा बाकीच्या सर्वांशी कांहीं संबंधच उरला नाहीं. जो तो आपापल्या कुंपणी कोंडाळ्यांतच काय तो गर्क! कारण एका संघांतला माणूस दुसऱ्या संघांत मिसळणें शक्य नसे.

अर्थात् प्रत्येक संघ आपापल्यापुरतां पहाणारा आणि आपापलीं कामें करून पोट भरणारा सवता सुभाच बनला. हक्क अधिकार फायदे आणि संपत्ति मिळवायची, ती फक्त आपापल्या संघांतल्या व्यक्तीच्या हितासाठीं. त्यांत दुसऱ्या कोणाचे बोटहि शिरकूं द्यावयाचें नाहीं. सामाजिक जीवनाच्या उत्क्रांतींत ही जी कुंपणवाली संघस्थिती उत्पन्न झाली, तींतूनच जन्मप्राप्त किंवा कर्मप्राप्त हक्कांचा जन्म झाला. याच्या पुढची पायरी म्हणजे मिळकतीचा उपभोग मुलांनीं बापाच्या बरोबरीनें घ्यावयाचा अथवा बाप मेल्यावर त्या मिळकतीचे आपापसांत समसमान वाटे करून घ्यावयाचे.

हिंदु समाजाची ही जी संघवार विभागणी झाली तिचा ब्राह्मण वर्गाला फार फायदा झाला. शिक्षण ज्ञान आणि भिक्षुकी या तीन गोष्टींची मिरास यांच्याच हातीं राहिल्यामुळें बुद्धिमत्ता आणि इलमबाजी यांत त्यांचा हात कोणालाच धरतां येईना. त्यांनींहि आपली या बाबतींत इतकी भरभक्कम संघटना केली कीं प्रत्येक गोष्टींत राजा पासून रंकापर्यंत सर्वांनाच त्यांच्या ओंझळीनें पाणी प्यावे लागत असे.

ब्राह्मण म्हणजे आकाशस्थ नक्षत्रांप्रमाणें चमकणारे तेजोगोल बनले, त्यांना 'देवता' पद प्राप्त झाले. त्यांचे मुलगे नातू पणतू खापर-पणतू साऱ्यांनाच 'भूदेव' पणाचा मक्ता देशांतल्या कायद्यांनीं मिळाला.

अनुक्रमणिका

त्यांच्या ‘भूदेव’ पणाला नीट काबूंत ठेवणारी किंवा त्यांच्या फाजीलपणाला आळा घालणारी राजसत्ताच कुमकुवत बनल्यामुळें ब्राम्हणांचा प्रत्येक बाबतींतला शिरजोरपणा भरंसाट वाढत गेला आणि त्यांना एक प्रकारचा ‘पारमेश्वरी अधिकारा’चा पवित्रपणा प्राप्त झाला.

महाभारतांत भटांच्या ‘ब्राह्मणी पावित्र्याचे’ थेर मुळींच दिसून येत नाहींत. ब्राम्हण द्रोणाचार्य कौरव पांडव राजपुत्रांचा लष्करी शिक्षक होता. त्याचा मुलगा पहावा तर तपोबळानें महर्षी व अस्त्रबळानें महान् योद्धा होता.

प्राचीन काळीं जोंपर्यंत ‘तूं श्रेष्ठ का मी श्रेष्ठ’ अशा अहमहमिकेचा प्रादुर्भाव झालेला नव्हता, तोंपर्यंत भिक्षुक ब्राम्हण आणि राज्यकर्ते क्षत्रिय एकमेकांच्या खांद्याला खांदा भिडवून कामकरीत असत. परंतु बौद्धधर्माच्या युगांत या श्रेष्ठकनिष्ठपणाचा अहमहमिकेला तोंड फुटतांच त्या एकीची बेकी झाली.

त्या काळच्या समाजघटनेनें ब्राम्हणांना जें एक अत्युच्च महत्त्वाचें स्थान दिलें, त्याचा त्यांनी स्वजाति-वर्चस्वासाठीं भरपूर फायदा घेतला. ब्राम्हणेतरांकडून हव्या त्या निमित्तानें हवी तीं घबाडें लाटण्यांत त्यांनीं दरोडेखोरांच्याहि वर ताण केली म्हटलें तरी चालेल. ब्राम्हण म्हणजे धर्मज्ञाते! पण त्यांनीं खऱ्या धर्माचें ज्ञान बाजूला ठेऊन, लोकांचीं अंधश्रद्धा ज्या गोष्टीनीं वाढेल, असल्या भोळसट व खुळचट तत्वांचा सर्रास प्रसार करून, आपल्या ‘भूदेव’ पणाची उच्च मानाची टिक्की कायम राखून ठेवली. धर्माच्या बाबतींत बरें वाईट ठरविण्याचा किंवा प्रत्यक्ष आचरणाचा अधिकार क्षत्रिय वैश्यांनाहि होता. पण या भटांनीं त्यांच्या शिक्षणांत आणि ज्ञानप्राप्तीच्या मार्गांतच असा गोंधळ करून ठेवला कीं त्यांना मिळणारे शिक्षण म्हणजे भोळसटपणा वाढविणाऱ्या अंधश्रद्धेच्या धार्मिक दंभाचें आणि त्यांच्या बुद्धिमत्तेची वाढ खुंटऊन, त्यांना नेहमीं भटांच्या दराऱ्यांत आणि गुलामगिरींत डांबून ठेवणारें असेंच करून ठेवलें.

जमिनी, उद्योग धंदे आणि व्यापार या सर्व बाबी व्यक्तीच्या हातीं न राहतां जेव्हां ठरावीक संघांच्या हातीं गेल्या, तेव्हां शूद्रांना कांहीं तरणोपायच उरला नाहीं. अर्थात या वर्गाच्या कुटुंबांना आज हा संघ सांगेल तें काम कर, उद्यां त्याची हमाली कर, परवां तिसऱ्याचें पडेल तें काम उरक, असें कांही तरी करून पोट भरण्याचा प्रसंग आला. अर्थात् त्या बिचाऱ्यांची स्थिति गुलामांपेक्षांहि फार हलाकीची बनली.

ब्राम्हण म्हणजे पक्के डोकेबाज आणि इलमी! आस्ते आस्ते त्यांनी शक्ती संप्रदाय हातीं घेतला. माणसांना हव्या त्या गोष्टींत झटपट सिद्धि व भरभराट मिळविण्याची खास ‘युगत’ म्हणून भटांनीं तंत्रमंत्रांचें पोतडें खुलें केलें. मंत्रोच्चारानें आणि तंत्रोपायानें इकडची दुनिया तिकडे करतां येईल, या कल्पनेचा पुकारा करतांच सारा हिंदु समाज बेभान झाला. विशेषतः स्त्रीवर्गावर या तंत्रमंत्रांची छाप तर बेसुमार बसली. बहकलेल्या नवऱ्याला किंवा रुसलेल्या प्रियकराला ताळ्यावर आणणारीं ‘प्रेमोद्दीपक रसायनें’, वैऱ्याला मातींत झटपट घालणारी ‘जहर जडीबुट्टी’, त्याच प्रमाणें त्यांची उलट सुलट उताऱ्याची ‘दिव्य मंत्र रसायनें’ सर्वत्र बोकाळली. जादूटोणा व कोहडेबाजी यांचा इतका भयंकर सुळसुळाट माजला कीं भटांच्या या मंत्रतंत्रापुढें सारी दुनिया थरकांप टरकूं लागली.

स्वतःच्या जातीचें वर्चस्व एनकेन प्रकारेण टिकविण्यासाठी भटांनीं हा मंत्रतंत्रांचा जो उपव्द्याप सुरू केला, त्यामुळें आर्यकालीन् साध्यसुध्या शुद्ध जीवनाच्या ध्येयापासून ते च्युत झाले. ‘परोपकाराय इदं शरीरम्’ ही जी ब्राम्हण्याची मूळ दिशा व ध्येय त्याची माती झाली आणि त्या ऐवजीं विषयलोलुपता, सत्तेची

हांव आणि बेहरामीची संपत्ति मिळविण्याच्या फंदांत साऱ्या भटांचे ब्राम्हण्य गर्क झालें. अर्थात् सारा ब्राम्हणवर्ग आधाशी, स्वार्थी आणि एक नंबरचा पाजी बनला.

आपल्या स्वतःच्या स्तोमाला झगझगीत राखण्यासाठीं भटांनीं अज्ञान गोरगरीब लोकांना हवे तसे लुटून पिळून काढले. कारण, जात्याच ते अडाणी असल्यामुळें भटांच्या लुच्चेगिरीला ते तेव्हांच बळी पडत असत. विवाह होऊन स्त्रीला ऋतु प्राप्त झाला कीं तिची खास पहिली रात्र ब्राम्हण भिक्षुकाच्या शय्येवरच साजरी झाली पाहिजे असा शिष्ठसंप्रदायच रूढ होऊन बसला. त्यामुळें भट म्हणजे हिंदु समाजाचा सनदशीर गर्भदान्याच बनला. या घाणेरड्या व हलकट भटी महात्म्याविरूद्ध समाजांत जो त्वेष धुमसत होता, त्यांतूनच अखेर हिंदुस्थानांत नवमतवादी बुद्धधर्माचा उदय आणि उत्कर्ष झाला. परंतु भटी आणि भटाळलेल्या धर्ममार्तंड भिक्षुकं इतिहासकार कंपूच्या पाजी कारवाईमुळें, आमच्या राष्ट्रीय जीवनांत चैतन्य उत्पन्न करणारा हा बौद्धधर्मीय महत्वाचा इतिहास आज लोकांच्या दृष्टीला दिसणार नाहीं, इतक्या सफाईनें उलटापालटा फिरवून टाकलेला आहे.

काव्येतिहासाचा (Epic)काळ बराच मागें टाकून आपण आतां बौद्ध-भारताच्या ऐतिहासिक काळांत प्रवेश करीत आहों. या दोन काळांतील कांही इतिहाससिद्ध तत्वें नीट विचारांत घेणें अगत्याचें आहे.

कुरूक्षेत्रावरील भारतीय महायुद्ध आणि नंद महापद्माचें राज्यारोहण यांत अजमासें एक हजार वर्षांचें अंतर असावें, असा संशोधकांचा अभिप्राय आहे. 'अर्थशास्त्र' नामक जगप्रसिद्ध ग्रंथाचा कर्ता अचाट राजकारणी कौटिल्य उर्फ चाणक्य नामक ब्राम्हणानें नंदाला मगधाधिपति केले. क्रिस्ती शकपूर्व ३२६ सालीं हिंदुस्थानवर शिकंदराची स्वारी होण्यापूर्वीच थोडीं वर्षे नंदाचा राज्याभिषेक झाला होता.

शिकंदरानें आपलें ग्रीक सैन्य घेऊन अटक नजिक सिंधूनदीला ओलांडलें, त्या वेळीं हा देश पादाक्रांत करण्याच्या कामीं त्याला एका देशद्रोही हिंदु राजानेंच मदत केली, ही गोष्ट विशेष लक्षात ठेवण्यासारखी आहे. राष्ट्राच्या पडत्या काळांत देशद्रोह फार संवंग पिकतो. हिंदु समाजाची सामाजिक मनोवृत्ति आरपार सडली म्हणूनच त्यांच्या ऱ्हासाची असल्या देशद्रोहानें तयारी केली, असा बायॉलजिष्टांचा अभिप्राय आहे. निस्पृह नीतिमत्तावादी म्हणतात कीं, वैदिक आर्यांनीं रावण आणि द्राविडी नागांचा जो भयंकर विश्वासघात व नाश केला, त्याचाच सूड काळचक्रानें शिकंदरापासूनच्या परचक्रांनीं हिंदु लोकांवर पुरापूर उगवून घेतला.

दुसरी एक गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे. शिकंदर आणि त्याचे ग्रीक सैन्य हिंदुस्थानला लुटून माघारे परतले असतील नसतील, तोंच इकडे चाणक्यानें नंदराजाला नालायकीच्या सबबीवर पदच्युत करून, त्याच्या जागीं चंद्रगुप्त मौर्याची मगध देशाच्या सिंहासनावर स्थापना केली. याला आपण पहिला चंद्रगुप्त असें म्हणूं.

नंदाचा राज्याभिषेक जर इ.स. पूर्व ३२४ त झाला, तर भारतीय महायुद्धइ.स. पूर्व १३२४ त झालें, असें गृहीत धरायला कांहीं हरकत नाहीं. कांहीं विद्वानांच्या मतें हा काळ इ.स. पूर्व २००० किंवा २५०० वर्षे ठरतो. कांहींहि असो, प्रस्तुत निबंधासाठीं मी इ. स. पूर्व १३२४ हाच काळ गृहीत धरून चालतों. या एक हजार वर्षांच्या अवधींत, वर वर्णन केलेल्या निरनिराळ्या सामाजीक संघांची घटना बनत गेली होती.

अनुक्रमणिका

कौरव पांडवांच्या इंद्रप्रस्थाची आणि हस्तिनापुराची धूळधाण उडाल्या नंतरच्या या हजार वर्षांच्या कृष्णयुगांत मगध राष्ट्राची राजधानी जी पुष्पपूर अथवा पाटणा ही तत्कालीन् भारताच्या राजकारणाचें एक पराक्रमी केंद्र होऊन बसली होती.

या मुद्यावर सुप्रसिद्ध संशोधक ऑन. मि. के. पी. जयस्वाल, एम. ए. बार अॅट लॉ, (पाटणा) यांनी बराच प्रकाश पाडला आहे. ते म्हणतात, मगध येथील बृहद्रथ राजवंशाच्या कालगणनेचा चिकित्सापूर्वक तपास केला तर असें आढळून येतें कीं भारतीय महायुद्धापूर्वी या वंशांत पंधरा राजे झाले. त्यापैकीं सहदेव हा महायुद्धांत लढून मेला. हें राजघराणें एकूण हजार वर्षे राज्य करीत होते. महायुद्धा नंतर २७ राजे झाले. त्यांची कारकीर्द इ. स. पूर्व ७२७ पर्यंत ६९७ वर्षांची झाली. या वर्षी शैष्णुक (शिशुनाग?) घराण्यानें मगधाचे राज्य बळकाऊन त्यांना पदच्युत केले. [या मुद्याची विशेष माहिती 'जर्नल ऑफ धी बिहार अॅन्ड ओरीसा रिसर्च सोसायटी' मार्च १९१९ पृष्ट २ मध्यें मिळेल.—ग्रंथकार]

या काळांत राजघराण्यांच्या उलटापालटी वारंवार होत असत.शैष्णुक घराणे आणि राजा अजातशत्रू यांच्या मधल्या काळांत तर अनेक क्षुद्र राजघराणीहि उदयास येऊन अस्ताला गेलेली आढळतात. अजातशत्रू राज्य करीत असतां, शिकंदरच्या स्वारीपूर्वी २३७ वर्षें, म्हणजे इ.स.पूर्व ५६३ सालीं महात्मा बुद्धाचा जन्म झाला.

विश्वासू सेनापतीनें किंवा प्रधानानें आपल्या धन्याच्या विरूद्ध बंड करून त्याला पदच्युत करावें, राज्य बळकाऊन आपलें राजघराणें चालूं करावें, प्रत्यक्ष राजपुत्रांनीं आपल्या राज्यकर्त्या बापाचा खून पाडून सिंहासन बळकवावें, या गोष्टी म्हणजे त्या काळीं जवळ जवळ 'फॅशन' प्रमाणेंच सर्रास चालूं असत.

अजातशत्रू राजाचा खून त्याचा पुत्र बिंबसार यानें करून सिंहासन पटकाविलें. या बिंबसाराच्या अंमदानींतच, तत्कालीन् आचारविचारभ्रष्ट भिक्षुकशाही (अ) धर्माविरूद्ध महात्मा बुद्धानें आपल्या नवमतवादाचा हल्ला चढविला.

राजा बिंबसाराच्या निमंत्रणावरून बुद्ध आणि महावीर (जैनधर्म प्रवर्तक) या दोघांनीं अजमासें १२ वर्षे मगध राज्यांत ठाणें देऊन, तेथूनच आपापल्या धर्माचीं सत्य तत्वें प्रसार करण्याचा उद्योग केला. त्यांचीं प्रवचनें पाली भाषेंत असत. कारण त्या वेळींपाली हीच लोकांची रूढ भाषा होती. संस्कृत म्हणजे भिक्षुकशाही भटांची व त्यांच्या तंत्रमंत्राची भाषा असल्यामुळें, तिला या दोघांहि नवमतवाद्यांनीं वाळींत टाकून लोकमान्य पाली भाषेचा पुरस्कार केला.

वैष्णवपंथी ब्राम्हणांना महावीराच्या तत्वांपेक्षां बुद्धाचीं तत्वें विशेष पाखंडीपणाची म्हणून झोंबली. "या पाखंडामुळें वेदप्रणित स्फूर्तीचा दिव्य प्रकाश लोपला आणि हिंदुस्थानांत सब गोलंकाराचा अधर्म मातला" अशी त्यांनी हाकाटी केली. "हा अधर्म कलियुगाच्या अंतापर्यंत थांबणार नाहीं. या युगाच्या अंतीं भगवान विष्णू कल्की अवतार धारण करून येईल आणि मग या अधर्मी पाखंडाचा नायनाट होईल" असें ते म्हणूं लागले.

येथेंहि पुन्हा वैष्णवांच्या हाडींमासीं खिळलेलें अवतार कल्पनेचें गारूड आणि भविष्यकथनाची हिकमत दृष्टीस पडते. त्यांच्याच मतांप्रमाणें चालूं कलीयुगाचा शेवट व्हायला आणखी चार लाख वर्षांचा

अवधि आहे. अर्थात् वैष्णवांच्या कल्की अवताराचें भविष्य खरें होतें का खोटें ठरतें, हें पाहण्याचें भाग्य आमच्या आयुष्याच्या नशिबीं लिहिलेलें दिसत नाहीं!

बौद्ध धर्मानें हिंदुस्थानाला अधर्माच्या कुमार्गावर ढकलून दिलें, या वैष्णवांच्या खोडसाळ आरोपांत काडीइतकेंहि सत्य नाहीं. हिंदुस्थानच्या अंधःपाताच्या दोषाचें खापरच जर कोणाच्या टाळक्यांत फोडायचें असेल, तर तें वास्तवीक न्यायानें भिक्षु ब्राम्हणांच्याच होय. आपलें पाप दुसऱ्याच्या पदरीं बांधण्याची भटांची फार जुनीच खोड आहे. शिवाय, बौद्धधर्मावर भटांनीं केलेले आरोप एकतर्फी आणि बौद्धधर्म हिंदुस्थान सोडून परागंदा झाल्यानंतर अनेक शतकांनीं केलेले असल्यामुळें, त्यांना कवढीचीहि किंमत नाहीं.

उदारमनस्क बौद्ध धर्माची, त्याच्या जन्मभूमींतच, जी वाताहात व हद्दपारी झाली, तिचा हिंदु जनांच्या ऱ्हासाशीं आणि अधःपाताशीं बराच कार्यकारण भावाचा संबंध आहे, यांत मुळींच संशय नाहीं.माझें तर असें स्पष्ट मत आहे कीं हिंदुस्थानांतून बौद्ध धर्माची हद्दपारी झाल्यामुळेंच हिंदु समाजाचा सर्वतोपरी अंधःपात झाला. कारण, भटांभिक्षुकांच्या धार्मिक झब्बूशाहीच्या पचनीं पडल्यामुळें, हिंदु समाजाला एकराष्ट्रीयत्वाची घटना करतां आली नाहीं. एकराष्ट्रीयत्वाची त्यांची भावनाच ठार मेली, आणि परचक्रांपासून देशाचें संरक्षण करण्यासाठीं ऐक्य भावनेची जी पोलादी तटबंदी लागते, ती भावनाच मुळीं त्यांना पारखी होऊन बसली. कसाहि आणि कितीहि विचार करा, एक गोष्ट स्पष्ट सिद्ध होते कीं या हिंदु राष्ट्राची मान जर कोणी कापली असेल तर ती भटांब्राम्हणांच्या भिक्षुकशाहीनेंच होय. या शाहीचें जसजसें पृथःकरण करावें,तसतसें प्रत्ययानें हेंच म्हणावें लागतें कीं राष्ट्राचा घात करण्यापेक्षां अधिक कसलाहि गुण या भिक्षुकशाहींत नाहीं; आणि जोंपर्यंत तिचा धिंगाणा चालूं आहे, तोंपर्यंत हिंदूंच्या पदरीं राष्ट्रघातापेक्षां निराळें कांहींच फळ पडणें शक्य नाहीं.

बुद्धोदय कालीन् हिंदुस्थान भटांब्राम्हणांच्या जुलमी घाशीरामी खालीं विव्हळ होऊन पडला होता, ही गोष्ट नाकबूल करतांच यायची नाहीं. त्यांची ती वेदोक्त यज्ञयागांतली घाणेरडी पशुहत्त्या, तीं त्यांची तंत्र मंत्रादि क्रियाकर्में, आणि इतर सटर फटर घटपटादि खटपटी यांचा इतका भयंकर सुळसुळाट उडाला कीं लहान मोठ्या, बऱ्या वाईट समाज–जीवनाचा कोना कोपराहि डागळल्या शिवाय शिल्लक उरला नाहीं. या मुळें समाजांतील केवळ खालच्या दर्जाच्या लोकांनाच तिटकारा येऊं लागला असें नव्हे, तर वरच्या दर्जाच्या विचारी लोकांनाहि मनस्वीं चिळस येऊं लागली

भटाभिक्षुकांच्या यज्ञयागांच्या या थोतांडांत कल्पनातील द्रव्यराशींचा चकणाचूर[यज्ञांतील तुपाप्रमाणें किंवा पशूंच्या चरबीप्रमाणें या द्रव्यराशी यज्ञांत जळून खाक न होतां, या भटाभिक्षुकांच्या बटव्यांत सुरक्षित जाऊन पंडत असत, हें स्पष्ट करून सांगायला नकोच. –अनुवादक] तर होतच असे; परंतु, राज्यारोहण समारंभ, किंवा आवडत्या राण्यांचे जन्मदिवस, अशा निमित्तानें हीं यज्ञयागाचीं बण्डें तर सबंध वर्षभर एकसारखी चालूं असत. त्यामुळें प्रजाजन, दरबारी आणि सर्व सरकारी खातीं याच गडबडींत असल्यामुळें, राज्यकारभारकडे दुर्लक्ष होऊन सारा गोंधळ माजत असे. अशा परिस्थितींत ‘अहिंसा परमो धर्मः’ या शुद्ध सात्विक मतांचा पुरस्कार करणाऱ्या महावीर व गौतम बुद्ध यांच्या संप्रदायाच्या नैतिक तेजानें साऱ्या हिंदु समाजाचें मन आकर्षण करून टाकलें भिक्षुकशाही भटांच्या विषयासक्त लोभीपणाच्या गिधाडधाडींतून मुक्त व्हायला हाच तेवढा मार्ग त्यांना आढळून आला.

भिक्षुकी वृत्तीचे ब्राम्हण धर्ममार्तंड मोठ्या गंभीरपणाचा आंव आणून सांगतात कीं हिंदुधर्मपद्धती जेहत्ते सनातन वर्णाश्रम धर्माच्या पायवर उभारलेली आहे या वर्णाश्रम धर्माचा अर्थ काय?तर तुम्ही आपली जात आणि वर्ण (कातडीचा रंग) कोणा कशाचाहि स्पर्श किंवा मिश्रण होऊं न देतां शुद्ध व अकलंकित

अनुक्रमणिका

राखावा.ज्ञानार्जनासाठीं एखाद्या भटगुरूच्या घरीं बरीच वर्षे काढावी. मग विवाह करून गृहस्थाश्रमी व्हावें. नंतर पुढें संन्यास घ्यावा. व्रतें उद्यापनें करावी. अखेर जगाला व लोकव्यवहाराला रामराम ठोकून अरण्यांत चिंतनमग्न तपश्चर्या करीत रहावें आणि मरावें. याला आश्रमधर्म म्हणतात. प्राचीन हिंदुस्थानांत समाजव्यवस्थेच्या जितक्या म्हणून संस्था अस्तित्वांत आल्या, त्यांचें इतिहासदृष्ट्या जर निरीक्षण केलें, तर भटांच्या या आश्रमधर्माच्या आणि वर्णाश्रमाच्या वल्गना म्हणजे शुद्ध बाजार गप्पाच ठरतात.

आतां, भिक्षुकांच्या वर्णशुद्धी रक्तशुद्धी अथवा जातिशुद्धीचा विचार केला तर या शुद्धीच्या घमेंडी वायफळ आहेत. कोणाचेंहि रक्त पूर्वी भेसळल्याशिवाय राहिलेले नाहीं व पुढें राहणार नाहीं. वेदकालीन आर्य वसाहतवाले संख्येनें फार थोडे होते. आत्मसंरक्षणासाठीं त्यांनीं दणधाकट द्राविडीनागांच्या मुलीं बरोबर सर्रास संमिश्र विवाह ठोकलेच कीं नाहीं?हे विवाह किती दांडग्या विस्तृत प्रमाणावर झाले, हे पहावयाचें असेल, तर महाभारत ग्रंथाचीं पानें चाळून पहा, म्हणजे खात्री पटेल.

पुराणकालाच्याहि फार पूर्वीपासून रक्ताची सरमिसळ भरंसाट होत असल्यामुळेंच प्राचीन आणि अर्वाचीन हिंदुस्थानांत असंख्य पोटजातींचा सुळसुळाट दिसून येतो. शुद्ध रक्ताचीआणि शुद्ध वर्णाची नुसती मिजासच मारायची, तर रामाचा रंग सांवळा कां आणि कृष्णाचा काळा कां? हे दोघे तर काव्येतिहासांतले ईश्वरी अवतार ना?

हिंदु समाजाची पुनर्घटना झाल्याचा उल्लेख मागें येऊन गेला. त्या काळीं जे निरनिराळे संघ बनले, त्यांना गण, श्रेणी, जाती अथवा संघ ही नांवें असत. परंतु, स्वार्थी भटांनीं आणि धर्ममार्तंडांनीं जुना रूढार्थ कायम ठेऊन वर्ण ही संक्षेपाची संज्ञा त्यांना दिली. मात्र असें करतांना वैदिक आर्यांच्या गोऱ्या रंगाच्या शुद्धतेची कसलीहि बरी वाईट कल्पना त्यांना आली नाहीं.

अ-सवर्ण विवाह आजहि चालूं आहेत. यावरून माझ्या विधानाचा अर्थ स्पष्ट होतो. मासे मारण्याचा धंदा करणाऱ्या 'अ' वर्णाच्या अंबाजीनें, रानटी पक्षी पकडण्याचा धंदा करणाऱ्या 'ब' वर्णाच्या बंबाजीच्या मुलीचें पाणिग्रहण केलें. या ठिकाणीं 'वर्ण' शब्दाचा अर्थ 'रंग' किंवा विशेष मानववंश (Race)असा खचित होत नाहीं. येथें त्याचा अर्थ विवक्षित धंदा अथवा व्यवसाय करणारा संघ, श्रेणी किंवा जाति असाच घेतला पाहिजे. माझ्या मतें, समरक्त संबंधाचे निषिद्ध मानलेले अपवाद वगळून, एकाच व्यवसायाच्या संघांतील स्त्रीपुरूषाचा होणारा विवाह उत्तम होय. सारांश, 'वर्ण' या शब्दाचा अर्थ केवळ विवक्षित व्यवसाय किंवा धंदा करणाऱ्या स्त्री पुरूषांचा संघ, श्रेणी एवढाच होता. यापेक्षां विशेष अर्थ त्यांत काहींहि निष्पन्न होत नाहीं.

'वर्ण' शब्दाच्या सांवळा गोंधळा बरोबरच, डोकेबाज भिक्षुकशाहीनें 'आश्रमं' शब्दावरही एका विलक्षण कोटीचें पूट चढऊन ठेवले आहे. एकाद्या ऋषीची मठी आहे, तेथे तो काही विद्यार्थ्यांना पाठ देत आहे, सदासर्वदा समाधींत मग्न आहे, असा 'आश्रम' शब्दाचा नेहमींच अर्थ करणें चुकीचें आहे. मनुष्य ज्याचा आश्रय घेतो तो त्याचा आश्रम.झाड पक्ष्यांना आश्रय देतें, तें त्यांचा आश्रम. सारें कुटुंब घरांत राहतें; त्या कुटुंबाचा आश्रम घर. न्यायाधीशाला त्याची न्यायनिर्णयाची नोकरी, हा त्याचा आश्रम. बॅरीस्टराचा आश्रम म्हणजे त्याची बॅरीस्टरकी.तात्पर्य, आत्मसंरक्षणासाठीं, उदरनिर्वाहासाठीं किंवा स्वतःच्या सुरक्षिततेसाठी जो ज्याचा आश्रय घेऊं शकतो, तो त्याचा आश्रम. त्याचप्रमाणे मनुष्य ज्या एका व्यावसायिक संघांत असेल तो संघ त्याचा आश्रम. यापेक्षा 'आश्रम' शब्दांत विशेष गूढ आणि उदात्त अवडंबर कांहींच नाहीं.

'सनातन' म्हणजे काय?ज्यांत कधींच कांहीं बदल झाला नाहीं, होत नाहीं व होणार नाहीं; जें आदीपासून जसेंच्या तसेंच अस्सल, त्याला 'सनातन' असें म्हणतात. 'सनातन–वर्ण–आश्रम–धर्म' याचा संधि होऊन, 'सनातन वर्णाश्रम धर्म' असा शब्द बनतो. त्याचा वास्तवीक अर्थ इतकाच कीं 'प्रत्यकानें आपापलें विहित कर्तव्यकर्म[England expects every man to do his duty या ब्रिटिश राष्ट्रसूत्राप्रमाणेंच India expects every Indian to do his duty इतकाच अर्थ यांत स्पष्ट होतो. विशेष कांहीं नाहीं. –अनुवादक] बजावणें.' यावर, धर्म, धार्मिक विधी, सदाचार, न्यायबुद्धी असे आणखीहि अनेक अर्थ बसविण्यांत आले आहेत; पण त्यांच्याशीं माथेफोड करण्याची कांहीं जरूर नाहीं. प्रत्येक हिंदुमात्रानें आपपल्या व्यावसायिक संघांतलीं आजपर्यंत कधींच न बदललेलीं कर्तव्यकर्मे ईमानें इतबारें बजावण्यांत कसूर करूं नये, अशी, हिंदुत्वाचा पाया जो,'सनातन वर्णाश्रम धर्म' याची शिकवण ठरते. यापेक्षां दुसरी बात त्याच्या जवळ नाहीं. या एका 'जुक्ती' नें भिक्षुकभटांची श्रेष्ठता खाडकन् एकजात भटेतर हिंदुसमाजाच्या थेट माथ्यावर जाऊन बसली. भिक्षुकशाहीचा भट म्हणजे अवघ्या हिदु दुनियेचा म्होरक्या झब्बू! हा झब्बू नाहींसा झाला कीं म्हणे साऱ्या हिंदुत्वाची माती होणार! केवढी ही घमेंड, केवढा हा तोरा आणि आत्मस्तोमाची केवढी ही मिजास! अखिल वर्णांचे धर्मगुरू, पण केवळ स्वार्थासाठीं काय वाटेल तें करायला आणि बरळायला भ्याले नाहींत! हिंदुसमाजाच्या उन्नतीसाठीं या लुच्चा भटांनीं केवढें हो मोठें उदात्त ध्येय आमच्या पुढें ठेवलें! प्रत्येक जातीला ठराविक धंद्याची काटेरी कुंपणें घातल्यामुळें, कोणत्याहि धंद्यांत जातीजातींची चढाओढ कायमची बंद.प्राचीन हिंदुस्थानांत मजुरांचे संप तरी कधीं झाले?व्हायचेच नाहींत. कारण, मजुरी हाच मजूर–संघाचा 'सनातन' वर्णाश्रम धर्म. ब्रम्हमुखोत्पन्न ब्राम्हणांच्या जन्मप्राप्त वर्चस्वाला सुरूंग लाऊन उध्वस्त करणाऱ्या बोलशेविझमचा प्राचीन हिंदुस्थानांत एक शब्द तरी काढण्याची कोणाची माय व्याली होती?सगळा बंदोबस्त कडेकोट कुंपणाचा!

पण खरें म्हटलें तर, बौद्धधर्म म्हणजे प्राचीन हिदु–भारतांत भिक्षुकशाहीच्या वर्चस्वाच्या ठिकऱ्या ठिकऱ्या उडविणारा बोलशेविक बॉम्बगोळाच होता. यामुळेंच भिक्षुकशाही बौद्धधर्मावर वारंवार उखडते. एवढ्यासाठींच सनातन वर्णाश्रम धर्माच्या काटेकोर सोंवळ्या कुंपणाचा बागुलबोवा भटेंभिक्षुकें वारंवार दाखवीत असतात. बौद्धधर्माच्या उदार छत्राखालीं जे निरनिराळे 'आश्रम' व 'संघ' निर्माण झाले, त्यांत लोकांनीं प्रवेश करून, भिक्षुकशाहीचा पांजरपोळ सताड रिकामा टाकू नये, म्हणूनच भटांनीं या इतक्या बंधनांची खबरदारी घेतलेली होती, हे सांगायला नकोच.

महावीर आणि बुद्ध, या दोन प्राचीन भारतीय ऋषींचीं चरित्रें आतां प्रत्येक शाळेंत जाणाऱ्या मुलांनाहि चांगलीं अवगत आहेत. बुद्धाच्या पंथाचीं तत्वें कट्ट्या लोकशाहीचीं परंतु साधी सुटसुटीत असल्यामुळें, त्यांचा सर्व लोकांनी भराभर स्वीकार केला. इतकेंच नव्हे, तर त्यांचा प्रसार, अखिल हिंदुस्थान व्यापून, साऱ्या आशिया खंडांत व त्याच्याहि पलिकडे फोंफावत गेला.

त्या काळीं क्षत्रिय राजे जवळ जवळ नामशेषच उरल्यामुळें, हिंदुस्थानांत ठिंकठिकाणीं अनेक शूद्र राजे उदयास आले. त्यामुळें शूद्रजनांचा उद्धार झाला, अपकृष्ट पतित समाजांच्या आत्मोन्नतीचा मार्ग खुला झाला, जुलूम जबरदस्तीखालीं जेर झालेल्या लोकांचा आणि विशेषतः स्त्रीवर्गाचा कोंडमारा बंद पडला. बुद्धकाळीं आणि त्यानंतरहि कित्येक शतकें मगध देशावर शूद्र नृपतीच राज्य करीत होते.

भिक्षुकशाही आणि बौद्धशाही यांच्यामध्यें सुरवातीपासूनच ध्येय आणि साधनें यांचा परस्पर विरोधाचा झगडा पडला. भिक्षुकशाहीचें वर्म कडकडीत काटेरी कुंपणवजा जातीभेदांत.हा जातीभेद म्हणजे जन्मसिद्ध, सनातन आणि कोंदाटलेला डबक्याच्या थाटाचा. त्यावर साऱ्या सृष्टीचे ब्रम्हदेव अशा भटब्राम्हण

अनुक्रमणिका

जातीची निरकुंश सत्ता.ही सत्ता सुद्धां जन्मप्राप्त. बापाच्या मागें मुलाला वारसा.बाप—ब्रम्हदेव मेला कीं मुलगा—ब्रम्हदेव त्याच्या गादीवर गेला. यामुळें भिक्षुकशाही भटांचें ब्राम्हण्य म्हणजे एका ठरावीक जातीच्या निरकुंश सत्ताबाजीची झब्बूशाहीच बनली. आतां बौद्धशाहीकडे पहा. पहिल्या धडाक्यालाच तिनें जातीभेदाचा मुरदा पाडला. भटाब्राम्हणांच्या ब्रम्हमुखोत्पन्न पावित्र्याचा आणि त्यांच्या देवदत्त श्रेष्ठत्वाचा चेंदामेंदा केला. आणि सर्व मनुष्यांचा दर्जा सारखा, सर्वांनीं एकमेकांशीं बंधुभावानें वागले पाहिजे, कडकडीत नीतीचें आचरण करावें आणि जागृत विवेकबुद्धीनें वागावें. अशा शुद्ध लोकशाही मतांचा पुरस्कार व प्रसार केला. बौद्ध धर्मानें मूर्तिपूजनाचा निषेध केला आणि वैदिक तंत्रमंत्र आणि वैदिक देवदेवतांचें थोतांड दूर झुगारून दिलें.

मानवी स्वरूपांत देव अवतार घेतो, ही कल्पना कोणत्याहि रीतीनें सिद्ध होऊं शकत नाहीं, या कपिलमुनीच्या सिद्धांताचाच बौद्धधर्मानें प्रचंड प्रतिध्वनि काढला. मानवदेहधारी देव असतो का नसतो, या वादावर माथीं फोडण्याची मानवजातीला वास्तवीक कांहीं जरूरच नाहीं, असें बौद्धधर्मानें ठासून जाहीर केलें.ज्यांत आपण राहतों, तें जग कधींच न बदलणाऱ्या न्यायनिष्ठुर नैतिक शिस्तीनें नियंत्रित झालेलें आहे. यालाच ‘कर्मन्याय’ असें म्हणतात; आणि याचा सर्व अर्थ “जसें करावें, तसें भरावें; जसें पेराल तसें उगवेल” यांत येतो. विस्तारलेली ही सर्व सृष्टी सनातन अशा उक्रांति—तत्वाबरहुकूम चाललेली आहे. मानवी दुनियेच्या मागें कष्ट क्लेश दुःखांचीजी परवड हात धुवून लागली आहे, तिची सांखळी जन्ममरणाच्या रहाट गाडग्याला चिकटलेली आहे. या शृंखळेला तोडून मुक्त होणें, यालाच मुक्ती, मोक्ष किंवा निर्वाण असें म्हणतात. ही मुक्ती मिळविण्यासाठीं मनुष्यानें सदाचार—संपन्नतेची तपश्चर्या केली पाहिजे. विचार उच्चार आणि आचार कमालीचे शुद्ध बनविले पाहिजेत. सुरापान व रक्तपात अज्ञीबात वर्ज्य केला पाहिजे. कोणाहि प्राण्याला—एखाद्या कृमिकीटकाला सुद्धां—केव्हांहि कसलेंहि दुःख अथवा पीडा देतां कामां नये.

भटाभिक्षुकांच्या ‘सनातन वर्णाश्रम धर्मी’ झब्बूशाही विरूद्ध बौद्धधर्मानें ‘अहिंसा परमो धर्मः’ चें भव्य निशाण उभारलें. कोणी कोणाचा मत्सर करूं नये, रक्तपात करूं नये व होऊंहि देऊं नये, हेंच प्रत्येक मनुष्याचें कर्तव्यकर्म आहे. हाच बुद्धाच्या अहिंसा धर्माचा सारांश होता.

अर्थात् भिक्षुकशाहीनें बौद्धांविरुद्ध निकराचा हल्ला चढविला. हा हल्ला केवळ तात्विक क्षेत्रांतला नसून, बौद्धांना चिरडण्याच्या कामीं ब्राम्हणांनीं सांपडेल त्या संधीचा फायदा घेतला आणि अखेर शस्त्रांनाहि हात घालून, रक्तपाताची पुण्याई कमावली. दोनहि पक्ष वर्दळीवर आलेले. कोणीहि माघार घेई ना. अशा अवस्थेंत हें ब्राम्हण-बौद्ध युद्ध भयंकर रीतीनें अनेक शतकें एकसारखें चालूं होतें. या उद्विग्न इतिहासाच्या काळांत सारा देश मानवी रक्तांत न्हाऊन निघाला. मनुष्यांची बेसुमार कत्तल झाली. छळ आणि अत्याचारांचा तर कडेलोट झाला. जिकडे पहाल तिकडे मत्सर हेवा निंदा द्वेष खुनशीपणा यांचा सुळसुळाट. जगाच्या इतिहासांत धार्मिक मतमतांतरांचे पुष्कळ रक्तपाती झगडे झाले; नाहीं असें नाहीं. परंतु भिक्षुकशाहीनें बौद्ध धर्माविरुद्ध केलेल्या झगड्यांतले अत्याचार इतक्या राक्षसी वृत्तीचे आणि चिळस आणणारे होते, कीं त्याला जगाच्या अत्यंत घाणेरड्या इतिहासांत सुद्धां दुसरी तोड आढळणार नाही.

भटाभिक्षुकांच्या पुण्याईनें या निर्लज्ज युद्धांत भिक्षुकशाही अखेर विजयी झाली आणि तिनें बौद्धधर्माला हिंदुस्थानच्या हद्दपार करण्याचें श्रेय मिळविलें. परंतु अरेरे! या विजयाचा हिंदुस्थानवर काय घोर परिणाम झाला! हिंदु सामाजाच्या सामाजिक जीवनाच्या आरपार चिंधड्या उडाल्या! या ब्राह्मणबौद्ध युद्धाचा पूर्ण मुद्देसूद इतिहास अझून लिहिला जावयाचा आहे. तसा तो कधिं तयार झाला आणि आमच्या

हिंदुजनांनीं त्याचा मननपूर्वक अभ्यास केला कीं या भिक्षुकी विजयानें सारा हिंदु समाज बदफैली व्यसनांत आकंठ कसा बुडाला; त्याच्या संघटनेचे तीन तेरा कसे वाजले; सर्व बाजूंनीं ऱ्हासाची पोखरण कशी पडली; आणि मुसलमानांचें परचक्र येण्यापूर्वीच कित्येक वर्षे हा समाज किती लुला पांगळा आणि कमकुवत होऊन बसला होता, याचे स्पष्ट खुलासे पटतील.

आतां, बौद्धधर्मानें लोकांच्या जीवनावर, शीलावर आणि त्यांच्या संस्थांवर प्रत्यक्ष परिणाम काय घडविले, याचा विचार केला पाहिजे. बुद्धाच्या उदार व प्रभावशाली संप्रदायाच्या शिकवणीचा परिणाम स्त्रिया व शूद्र यांवर विशेष झाला. भिक्षुकशाही प्रासादीक हिंदु समाजरचनेंत त्या बिचाऱ्यांच्या नशिबीं अगदी शेवटची पायरी लागलेली होती. अर्थात् त्यांना आणि तरूण विद्यार्थी वर्गाला बुद्धाच्या शिकवणीनें मोहून टाकलें तर त्यांत काय नवल?

याचा परिणाम सहाजिकच असा झाला कीं भटाभिक्षुकांनीं संघटनाची धडपड सुरूं केली. आंता त्यांचे अनुयायी बहुतेक बिनबुडाचे अलबते गलबते, विशेषतः कांहीं श्रीमंत व प्रतिष्ठित लोकच होते. भिक्षुकशाही वर्चस्वाच्या बुरूजाखालींच बुद्धानें सुरूंग रोखल्यावर भटाब्राम्हणांची दाणादाण काय विचारावी! त्यांनीं बौद्धमताला पाखंडी ठरवून त्याला शक्य त्या तीव्रतेनें विरोध करण्याचा चंग बाधला. भिक्षुकी वर्चस्वाचा बुरूज म्हणजे भटांचे नाजूक मर्मस्थान. सारा जीव त्याच्यावर. जगायचें त्यासाठीं आणि मरायचेहि त्याच साठीं. त्यांच्या ऐहिक लाभांचा सारा गड्डा या बुरूजांत. या गड्ड्यासाठीं त्यांनीं अनेक शतकें हाडांचीं काडें केलेली. कमाल हावऱ्या वृत्तीनें त्याचें संरक्षण केलेलें. अशा स्थितींत तो बुरूजच हातचा गमावणें, म्हणजे ब्राम्हणजातीचेंच उच्चाटन करून घेण्यासारखें होतें! या बुरूजाचा पाया कसकसल्या हरामखोर पातकांनीं खिळखिळा झाला होता आणि त्यासाठीं काय काय डागडुज्या केल्या पाहिजेत, याची भिक्षुकशाहीला कांहीं पर्वाच नव्हती.पाया खचला तर खचो, पण निदान हा आत्मवर्चस्वाच्या बुरूजाचा डोलारा दिसतो तसा वरच्या वर टिको, म्हणजे मिळवली, एवढीच त्यांची विवंचना होती. कारण, त्या बुरूजांतच भटांचा सारा जीव! बुरूज गेला कीं जीव मेला!

भटी वर्चस्वाचा हा बुरूज केवढा जुलमी आणि किती हरामखोर होता व आजहि आहे, याची कल्पनाच केलेली बरी. वाचकांना नीट कल्पना यावी, म्हणून मी आमच्या हिंदुसमाजाच्या रचनेचें एक शब्दचित्र रेखाटतों. हिंदुसमाज म्हणजे एक मोठा थोरला उंच मनोरा आहे. जिवंत माणसे एकावर एक रचून त्यांच्या ढिगारांनीं हा बनविलेला आहे. प्रत्येक माणसाला पोलादी तारेंत जखडून त्याची खुरमुंडी मोट बांधलेली आहे. अशा लक्षावधि मोटा एकावर एक ठेवीत ठेवीत कळसाला त्यांचे घुमट साधलें आहे.

या मनोऱ्याच्या पायथ्याला अस्पृश्य शूद्रांच्या गठड्या रचलेल्या आहेत. हवा आंत बाहेर येऊं जाऊं न देणारी एक दणदणीत, जाडजूड, लोखंडी शिळा त्यांच्या डोक्यावर ठेवलेली आहे. तिच्यावर स्पृश्य शूद्रांच्या वळकट्या दाबून बसविल्या आहेत. यांच्याही डोक्यांवर लोखंडी जाड शिळा. त्यावर वैश्यांना कोंबून बसवले आहेत. त्यांच्या टाळक्यांवर आणखी एक लोखंडी शिळा. त्यावर क्षत्रिय उभे आहेत. त्यांच्याहि मस्तकांवर लोखंडी शिळा आणि त्या शिळेवर ब्राम्हण उभे आहेत.

हा मनोरा तर खासा तयार झाला आणि त्याच्या उभारणीला लागलेल्या कच्च्या पक्क्या मालाचीहि वर्गवारी व दर्जावारी तुम्हांला समजली. आतां, या मनोऱ्याच्या बाहेरच्या बाजूला, वरपासून खालपर्यंत. व—र्णा—श्र—म—ध—र्म अशीं अक्षरें एकाखालीं एक नीट प्रमाणांत काढा. 'वर्णाश्रम' शब्दांतला 'म' वैश्य ज्या

लोखंडी शिळेवर बसले आहेत तिच्या वर काढा आणि ‘धर्म’ शब्दांतला ‘ध’ तिच्याच किंचित खालीं, म्हणजे स्पृश्यशूद्रांच्या माथ्याजवळ काढा. मनोऱ्याच्या माथ्यावर द्या एक टोलेजंग निशाण फडकावून आणि त्यावर ‘हिंदु समाज’ अशी मोठी ढोबळ अक्षरें काढा. आतां, हिंदूंच्या जातिपद्धतीचें हें चित्र पूर्ण तयार झालें.

थरावर थर देऊन रचलेल्या या जिवंत मानवी मनोऱ्याकडे नीट विचारपूर्वक पहा. वरच्या थरांच्या भारानें खालच्या थरांतील लोकांवर केवढा भयंकर दाब पडून त्यांचा कोंडमारा होत असेल, याची कल्पना करण्याचें काम मी वाचकांवरच सोंपवितों. मनोऱ्याच्या कळसावर हातपाय पसरून बसणाऱ्या जातिसंरक्षक भटाभिक्षुकांनीं, कळस-कुत्र्यांनीं **(top dogs)**,शूद्रांच्या दुःखनिवारणार्थ आजपर्यंत काय केलें आहे?कांहींच नाहीं. त्या शूद्रांना या मनोऱ्यांत डांबून ठेवणाऱ्या जातिभेदाच्या पोलादी शृंखळा तडातड तोडण्याचा बौद्ध धर्मानें उपक्रम सुरू करतांच, एकजात अवघ्या शुद्रजनांनी त्या धर्मांचा पहिल्या सपाट्याला स्वीकार केला, यांत काय आश्चर्य?

आजहि हिंदुसमाजाच्या संख्याबलाचा भयंकर नाश मनोऱ्याच्या बुडाच्या गळणीनेंच एकसारखा चालूं आहे. नामशूद्रादि इतर अवनत आणि अपकृष्ट वर्ग हळुंहळूं हिंदुसमाजला कायमचा रामराम ठोकून परधर्माचा स्वीकार करीत आहेत. पण ब्राम्हणांना त्यांची थोडीच पर्वा आहे?हिदु समाजाचें पुढें काय बरें वाईट होणार, याविषयीं भटब्राम्हण सध्यां बेमुर्वत आणि बेदरकार बनले आहेत. [नवरा मरो नवरी मरो, भटाला दक्षणा मिळाली म्हणजे झालें! या पलीकडे सुहेरसुतकाचें सव्यापसव्य ब्रम्हदेवानें भटांना शिकविलेंच नाहीं. त्यांनीं तरी काय करावें? —अनुवादक]

हिंदुसमाजरूपी गगनचुंबीत मनोऱ्याच्या अत्युच्च शिखराची मिरास राखणारे भटब्राम्हण, बुद्धाच्या काळीं, आपल्या ‘वर्णाश्रमा’ च्या भारानें मनोऱ्याच्या पायथ्याचा ‘धर्म’—स्पृश्यास्पृश्य शूद्र समाज— किती दाबून पिळून निघत आहे, हें न पाहण्याइतके बेमुर्वत आणि बेदरकार बनलेले नव्हते. बेपर्वाई आणि मगरूरी ही त्यांची अलीकडची कमाई आहे.

परंतु हिंदु समाजाच्या बुडाशीं लागलेली गळणी थांबविण्याची भिक्षुकांची छातीच नव्हती. त्यामुळे बुद्ध आणि बौद्धधर्म यांविषयी भटांचा द्वेष आणि त्वेष अधिकाधिक जोरदार आणि भयंकर होत गेला. मनोऱ्याच्या पायथ्याचे शूद्र जर भराभर निसटून गेले, तर सारा मनोराच ठार ढासळून पडणार, या वाजवी भीतीनें भिक्षुकवर्ग गांगरून गेला. शुद्रांचा थर नाहींसा झाला म्हणजे, गुरूत्वाकर्षणाच्या नियमाप्रमाणें, खाडकन वैश्यवर्गाची थप्पी खालीं घसरून शूद्रांच्या रिकाम्या जागेंत कोसळणार.अर्थात् त्यांच्या वरच्या थप्प्यांचीहि तितकीच अधोगति होणार!

भिक्षुकशाहीच्या गुलामगिरींतून मुक्त केल्यामुळें शूद्रांना बौद्ध धर्मात शांति आणि समाधान यांचा लाभ झाला. त्यांनीं बौद्ध संघांत प्रवेश केल्यामुळें, याच वेळीं प्रथम त्यांना शिक्षणाचा संस्कार मिळाला. आजपर्यंत भिक्षुकशाही प्रासादिक हिंदु समाजांत पाणक्ये व लाकूडतोड्ये म्हणून पिढ्यान् पिढ्या घालविलेल्या शूद्र लोकांना जीवनसार्थक्याचें आणि उपयुक्त चळवळींचें एक नविनच जग आतां खुलें झालेलें दिसलें थोड्याच वर्षांत अनेक शूद्र तरूण ज्ञानसंपन्न होऊन श्रमण बनले आणि देशांतल्या तरूण पिढीला बौद्ध तत्वज्ञानाचा परिचय करून देणासाठीं खेड्यापाड्यांतून प्रवास करीत फिरूं लागले. इतकेंच नव्हे तर अविभक्त कुटुंब-पद्धतीला कंटाळलेले, पण राष्ट्राभिमानानें फुरफुरलेले, ब्राम्हण क्षत्रिय वैश्य द्विज वर्गांतील, हजारों सुशिक्षित तरूण आपापल्या घरादारांना रामराम ठोकून बौद्ध संघांत प्रविष्ट झालें. यामुळें बौद्ध श्रमणांची संख्या झपाट्यानें वाढत गेली. यांच्यांत जे अधिक अनुभवी आणि विशेष विद्वान होते, त्यांनीं बौद्ध धर्मोपदेशकांचा (मिशनरी) आणि प्रवचनकारांचा पेशा पत्करला.

अनुक्रमणिका

बौद्ध तत्वज्ञानाचा अज्ञेयवाद (agnosticism)आणि त्या पंथानें चालूं केलेली समाजोद्धाराची सेवा यांनीं अखिल तरूण बुद्धिमंतांचीं मनें आकर्षण करून घेतली आणि बौद्ध संघ भराभर वाढत गेला. या संघाचा जनक महात्मा गौतम बुद्धाचा निरूपमेय स्वार्थत्याग आणि त्याच्या जीवनांतील शुद्धतम पावित्र्य, यांचा त्याच्या हितशत्रूंवरहि फार उत्तम परिणाम होऊन, तेहि त्याचे अनुयायी बनले.इतकेंच नव्हे तर ‘मी महात्मा बुद्धाचा विश्वासू शागीर्द आहे’ असें सांगण्यांत प्रत्येकजण अभिमान बाळगूं लागला.

बौद्धधर्माचा स्त्रीवर्गावर काय परिणाम झाला, हें आतां आपण पाहूं या. बुद्धावतारापूर्वी हिंदु जनांत पुनर्घटनेमुळें जी संघवर समाजरचना झाली होती, तींत अविवाहित स्त्रियांच्या स्वातंत्र्याची मुस्कटदाबी झाल्याचें मी मागें सांगितलेंच आहे, पूर्वी प्रचारांत असलेला त्यांचा स्वयंवराचा—आपला पति आपणच निवडून काढण्याचा-हक्क या वेळींनामशेष होऊन, त्या ऐवजीं स्त्रियांच्या पतिशोधनाचें क्षेत्र, त्यांचे बाप भाऊ चुलते किंवा पालक ज्या विशिष्ट संघांत (जातींत) रहात असतील, त्या संघापुरतेंच आकुंचित बनलें. [सघांची म्हणजे जातींची कोंडाळीं निर्माण होण्याच्या पूर्वी हिंदु समाजांतील हव्या त्या मनपसंत तरूणाला पाणिदान करण्याचा स्त्रियांना अधिकार असे. परंतु संघांचीं कुंपणें पडल्यावर, पतिशोधन तर बुडालेंच, पण पतिपसंतीचाहि मामला बाप भाऊ काका मामाच्या इच्छेवर राहून जातिपुरता आकुंचित बनला. —अनुवादक.]

विवाहेच्छू तरूण तरूणींच्या स्वयंशोधनाला माजी टाकून, केवळ बाप भाऊ काका मामांच्या सोई सवलतीच्या व्यवस्थेवरच जेव्हां लग्नें ठरूं लागली, तेव्हां असल्या जबरीच्या विवाहाविरुद्ध थैमान करणाऱ्या तरूणीहि पुष्कळ निघूं लागल्या. अशा वेळीं दोन्ही पक्षांत भयंकर भांडणें लागत. तंटे बखेडे होत आणि वैमनस्येंहि माजत. तरी पण मुलींची सुटका मात्र खास होत नसे. नावडत्या सासुरवाडीं तिला बळजबरीनें पाठिवण्यांत येतच असे. [कारण ‘दावें बांधून देईन तेथें गेलें पाहिजे’ हा प्रत्येक मुलीच्या बापाचा वेदोक्त अधिकार पडला ना!—अनुवादक.] पुष्कळ वेळां असल्याहि बळजबरींची पर्वा न करतां, कित्येक तरूणी आदळआपट, उघड धिःकार आणि बंडाळीहि करीत. वेळीं घरांतून पळूनहि जात. अर्थात् त्यांना मग सासुरवाडीं परत घेण्यांत येत नसे. सामाजिक रूढी आणि रीतीभाती या वेळीं संक्रमणाच्या अवस्थेंत असल्यामुळें. असले अरीष्टापात नेहमीं पुष्कळ घडून येत असत. याचा परिणाम मात्र असा झाला कीं मुली वयांत येऊन सज्ञान होण्याच्या पूर्वीच त्यांचीं लग्नें उरकून टाकण्याचा खाक्या आईबापांनीं उचलला प्रौढविवाहाच्या नरड्यावर बालविवाह बसला तो असा.

अविभक्त कुटुंबपद्धतीच्या बंधनांमुळें तरूणांनाहि वधूशोधनाच्या संकुचित क्षेत्राचा फार त्रास होऊं लागला. ही कुटुंबपद्धति जसजशी वृद्धिंगत होत गेली. तसतसे प्रणयजन्य वधूवरमीलनाचे विवाह कमी कमी होत गेलें. परस्परांच्या प्रेमपाशांत निगडित होण्याची भारतीय तरूण तरूणींना बंदी झाली. त्यांना तशी संधी व स्वातंत्र्यच मिळानासें झाले. याचा परिणाम संबंध हिंदु समाजाच्या शीलावर किती भयंकर घडला, याचें मागें मी दिग्दर्शन केलेंच आहे.

अविभक्त कुटुंबपद्धति बाहेरुन जरी साजरी गोजरी दिसे, तरी तिच्या चार भिंतीच्या आंत कटु अनुभवाच्या अनेक भानगडी वरचेवर धिंगाणा घालीत असत. विवाहापूर्वी प्रेमाचे दे वाण घे वाण न होतां, केवळ नाखुषीनें व जबरीनें विवाहबद्ध झालेल्या अनेक प्रौढ व सुशिक्षित वधू असत. अविभक्त घराण्यांत सासूबाई म्हणजे मुखत्यार गृहिणी.सर्व कारभार त्यांच्या हातीं. त्या करतील तें कारण आणि बांधतील तें तोरण! त्यांच्या या प्रौढ व सुशिक्षित सुना त्यांना जुमानीत नसत. सासूबाईंच्या कसल्याहि शिकवणुकीचा त्या धिःकार करीत. मग काय?सासूसुनांची एकसारखी घुसफूस आणि तंटे भांडणें सुरू. त्यांतल्या त्यांत मुलांनींच जर आपपल्या बायकांचा पुरस्कार केला, तर मग सासुबाईचा थैमान कळसाला जायचा! अखेर

या कलहाचें अपरिहार्य पर्यवसान घरांतल्या घरांत भांडणें, फाटाफूट, निरनिराळ्या चुली, इस्टेटीच्या वाटण्याइत्यादिकांत व्हायचें.

हा प्रकार टाळण्यासाठीं सासू कंपूनें एक निराळीच 'युगत' काढली. घराणें अविभक्त असलें म्हणजे त्यांत सर्वांची सोय उत्तम लागून, गुण्यागोविंद राहणीचीं शांतताहि लाभते. पण सुना प्रौढ आणि शिकलेल्या आल्या कीं त्या सासूबाईंची मुखत्यारी धुडकाऊन लावतात. याला उपाय काय?तर आपल्या मुलांची लग्नें करायचीच तर ती अप्रौढ व अशिक्षित (अक्षरशत्रू असल्या तरी परवडल्या) अशाच मुलींशीं करायची. चुकून सुद्धां प्रौढ वयाची सून पत्करायची नाहीं. फार काय, पण ऋतु प्राप्त न झालेली वधूच मुद्दाम निवडायची.असा दण्डक सुरू झाला. हिन्दु जनांच्या ऱ्हासाची आणि अधःपाताची ही सुरवात होती. 'कोवळा कळक चटकन वांकें,' 'कोवळे शिंगरूं लवकर शिके' असल्या म्हणी प्रचारांत आल्या आणि अज्ञान दशेंतच मुलींचे बालविवाह भराभर उरकून घेण्याची रूढी सर्रास सर्वत्र चालूं झाली.['अष्टवर्षा भवेत् कन्या' असलीं पागलपणाचीं सुत्रें भटी टाळक्यांतून याच वेळीं निपजलीं. असल्या सूत्रांच्या प्रसववेदना ब्रम्हदेवाला खास भोगाव्या लागल्या नसाव्या. –अनुवादक]

व्यक्ती म्हटली कीं त्या स्त्री किंवा पुरूषाला आचार विचाराचें आवडी निवडीचें, पूर्ण स्वातंत्र्य लागतें.सडेसोट असतो तो तें स्वातंत्र्य अनुभवतो.पण हिंदूंच्या अविभक्त कुटुंब–व्यवस्थेची घटनाच अशी होती कीं तींत व्यक्तीला कांहीं महत्व अगर स्वातंत्र्यच नसे. कोणाहि स्त्री पुरूष व्यक्तीची प्रकृति, आवड निवड, रूची अरूची काय वाटेल ती असो, कुटुंबाच्या सामजिक हितासाठीं त्या त्यांना पार दाबून टाकाव्या लागत असत. व्यक्तीचे अस्तित्व सर्वांसाठी एरवीं व्यक्तीची किंमत पूज्य. हिंदूंच्या संघव्यवस्थेच्या योजनेचाच हा परिणाम, हे सांगणें नकोच.

शहरांत किंवा खेड्यांत राहणारीं एकाच संघाची (जातीचीं) अनेक अविभक्त कुटुंबें प्रत्येक सामजिक बाबतींत एकमतानें व एकजुटीनें पुढाकार घेत असत.

दोघा भावांचे एक अविभक्त कुटुंब आहे, असें उदाहरण घ्या. दोघां मिळून चार मुली आहेत. सर्वांत थोरलीचें लग्न झालें. बाकीच्या तीनहि बहिणीनीं निश्चय केला कीं बस् आपल्याला लग्न बिग्न कांहीं करावयाचें नाहीं. सर्व विद्या संपादन करून कुमारी विदुषी म्हणून राहावयाचें. तर या त्यांच्या निश्चयाविरूद्ध एकदम जातीच्या जमातींत कावकाव सुरूं व्हायची आणि या मुलींच्या घराण्याची हवी ती नालीस्ती केली जायची. बहुशः मुलींच्या या निश्चयाला अखेर माघारच घेणें भाग पडे.

एकाच जातिसंघांतल्या लोकांना एकमेकांशीं परस्पर सहकार्यानें राहणेंच भाग असे. प्रत्येकाला परस्परांचा शब्द मानावा लागत असें. वरील उदाहरणांतील लग्न झालेली मुलगी ज्या अविभक्त कुटुंबांत दिली, त्यांतल्या पुरूषांना सुद्धां तिच्या तिघी बहिणींना तशाच तऱ्हेचीं स्थळें मिळऊन देण्याची विवंचना व अधिकार असे.

भिक्षुकशाही ब्राम्हणांच्या कदरीखाली वागणाऱ्या या निरनिराळ्या जातिसंघांत लवकरच एक अलिखित कायदा सुरू झाला कीं अविभक्त कुटुंबांतल्या प्रत्येक मुलीचें लग्न ती अगदीं बाल असतांनाच झालें पाहिजे. कोणी हा रूढ कायदा किंचित् मोडला कीं त्या अविभक्त घराण्यावर सारा जातिसंघ बहिष्कार टाकीत असे. अर्थात् सर्व घराणीं या रूढीला अगदी टरकून असत.

अनुक्रमणिका

बालविवाहाची रूढी अविवेकी, अशास्त्रीय आणि खोडसाळपणाची आहे. हें भटांब्राम्हणांना कळत नव्हतें, अगर ऋतुप्राप्तीपूर्वी विवाह मूर्खपणाचा आहे, हें उमजत नव्हतें, अशांतला भाण नाहीं. परंतु बौद्ध धर्मानें अखिल मानव जातीला दिलेलें सर्व क्षेत्रांतलें पूर्ण स्वातंत्र्य पाहून भटांची धाबीं दणाणली आणि आपल्या वर्चस्वाला धक्का बसूं नये म्हणून त्यांनी मुलींच्या लग्नाच्या वयोमर्यादा ठरविण्याचा हा उपद्व्याप फार धोरणी डोक्यानें केला.

महाभारत काळापासून आमच्यांत ज्या ज्या समाजधारणेच्या संस्था उत्पन्न झाल्या, त्या सर्वांचा जन्म 'स्वतंत्र्याच्या' कल्पनेच्या पोटीं न होतां, 'भीती' च्या पोटींच झालेला दिसून येतो. अर्थात् अनेक रूढी आणि रीतीभातींच्या द्वारें आमच्या शीलाच्या घडणीवर त्यांची प्रतिक्रिया स्पष्ट उमटून, आमच्यांतलें व्यक्तीत्व आणि स्वतंत्र विचार करण्याची बुद्धी यांचें पार तळपट उडालें, तर त्यांत नवल तें काय?

एकजात सर्व हिंदु—मग ते कोणीहि असोत, उजवा काष्टा घालणारे असोत, डावऱ्या काष्ट्याचा अभिमान बाळगिणारे असोत, पोषाखांत हवे तेवढ्या भेदाचे असोत, धोतरे असोत वा पाटलोणे असोत, कपाळावर चंदनाचा टिळा त्रिपुंड्र लावणारे असोत, नाहींतर फटफटीत कपाळाचे असोत,—ते सारे या अविभक्त कुटुंब-पद्धतीच्या प्रचंड घरटांत दळून मळून निघालेले पिठाचे पुंजके आहेत. हा घरटच मुळीं असा जखडबंध आणि ज्याम खटक्याचा आहे कीं यांत सांपडेल त्याचें वस्त्रगाळ पीठ पडलेंच पाहिजे. अशा वस्त्रगाळी घरटांत सामाजिक सुधारणेचे नवीन विचार आणि नवीन चळवळी यांचा शिरकाव व्हायला सुईच्या अग्राएवढी तरी जागा कशानें मिळणार?

या अविभक्त-कुटुंब-घरटाचा आणखी एक विशेष महिमा आहे. यांतल्या प्रत्येक प्राण्यानें—पुरूष स्त्रिया मुलें यांनी—जन्मापासून मरणापर्यंत, नव्हे मेल्यावर सुद्धां, कसें वागावें, कसें रहावें, काय खावें, काय प्यावें, इत्यादि सर्व आचार विचारांच्या नियमांचे ठरावीक तक्ते अगदीं आंखून ठेवलेले. या माणसांनीं दुसरें तिसरें कांहींहि करायचें नाहीं. चाकाबरोबर त्याच्या आऱ्या जशा गरगर गरगर निमूटपणें फिरतात, तसे फक्त 'वडलांचे बाळबंदी वळण' घटवायचें. विचार करण्याची कोणाला कांही जरुर नाहीं. इच्छेला तर तिळमात्र जागा नाहीं आणि तिची गरजही नाहीं. 'हें असें कां?तसें कां नाहीं?' एवढा प्रश्न कोणी काढलाच कीं सारें गाडें बिथरून पार निकाल!

शंका कुशंका किंवा खऱ्या खोट्याची पृच्छा करण्याची मुळीं सोयच नाहीं. या हिंदु समाजव्यवस्थेंत कोणी व्यक्ती आपल्या स्वतंत्र मताचा झेंडा उभारूं म्हणेल, तर तें शक्यच नाहीं.कारण आमची समाजव्यवस्थाच मुळीं इतकी कडवी सोंवळी कीं तिच्या पुढें सर्वांनीं हात टेकलेच पाहिजेत. यामुळें, आमच्या सर्व रूढींत आणि चालीरीतींत भयंकर कृत्रिमपणा आणि जुलमीपणा माजलेला आढळतो. बुद्धिवान्, सुसंस्कृत आणि विवेकी विचाराचे पुष्कळ हिंदुजन आढळतात. या कृत्रिम आणि जुलमी समाजबंधनांविरूद्ध ते मनांतून खूप चरफडतहि असतात. पुष्कळ वेळां ते अंतर्यामीचा आपला निषेध बोलूनहि दाखवितात. पण अखेर वेळ आली कीं त्याच बंधनांपुढें सपशेल मान वांकवून त्यांच्या दण्डकांना बळी पडतात. कारण, हिंदुसमाज—व्यवस्थेचा कचकाच असा आहे कीं ज्या कोणाला स्वतःच्या सदसद्विवेक बुद्धीची विशेष मातबरी वाटत असेल, त्यानें खुशाल या समाजांतून उठून जावें. उठून जावें! पण ही गोष्ट दिसते तितकी सोपी नाहीं. त्यांत अनेक अडचणी, भानगडी, त्रास, हाल अपेष्टा असतात. मग करायचें तरी काय?मार्ग एकच उरला. आणि तो हाच कीं सदसद्विवेक बुद्धी खुंटीला अडकवून, नैतिक षंढत्व पत्करायचें

अनुक्रमणिका

आणि आपल्या आवडत्या ध्येयाला कायमचा रामराम ठोकायचा! हा मार्ग 'कमी प्रतिकाराचा' असल्यामुळें बहुतेक हिदुंना निमूटपणे पत्करावा लागतोच.

ज्या समाजव्यवस्थेंत तुमचें जीवित, सारा आयुष्क्रम, तुमचे आचार विचार आणि तुमच्या शीलाची घडणी अशा ठराविक दाबांतच दाबून निघत असते; ज्या व्यवस्थेंत तुम्हांला तुमच्या आवडीच्या ध्येयाप्रमाणें वागण्याचीच मुळीं सवलत मिळत नाहीं; तेथें तुम्हांला सारा जन्म शुद्ध दांभिक वृत्तीनें कंठण्यापलीकडे दुसरा काय मार्ग आहे?

ज्याच्या ध्येयाचीच वाताहात लागलेली, अशा माणसाकडून स्वतःच्या अगर त्याच्या समाजाच्या कल्याणाची काय कामगिरी होणार?अशा माणसाच्या नशिबीं निराशावाद लागून तो जर आरपार माणूसघाण्या बनला, तर हिंदु त्रिमूर्तीपैकीं कोणता देव त्यालावाचवील?सुविद्य सुसंस्कृत सुधारणेच्छू हिंदु पुष्कळ आहेत. पण ते सारे हिंदूंच्या सामाजीक पद्धतीच्या जुलमी अन्यायांनी मनांतल्या मनांत खचून गेलेले, कट्टे निराशावादी आणि पक्के माणूसघाणेच नाहींत का बनलेले दिसत? हा सामाजीक बंधनांचा जुलमी अन्याय आमच्या त्रिमूर्ती देवांनीं थोडाच निर्माण केलेला आहे! त्याचे आईबाप आमचे आम्हींच. अर्थात्, त्यामुळें प्रत्येक हिंदुमात्र देहाच्या व मनाच्या वाढींत खुंटलेला आणि आत्मविश्वासांत पोकळ खंक बनलेलाच आढळतो.

जेथें पुरूषच आपल्या दैवाला दोष देत रडत बसलेले, तेथेंस्त्रियांचें हसतमुख कशानें दृष्टीस पडणार? पुरूषांच्या आणि स्त्रियांच्या निसर्गदत्त सर्व गुणांची पूर्ण वाढ होण्याच्या मार्गांतच ज्या समाजव्यवस्थेचा आणि कुटुंबपद्धतीचा दांडगा प्रतिबंध, तेथें त्यांच्या पोटीं खुरटलेल्या मनाची खुजीं बुटबैंगण प्रजाच जन्माला यायची. लाथ मारूं तेथें पाणी काढूं, अशा दिग्गज मर्दाची ती खाणच नव्हे. असें कधिं व्हायचेंच नाहीं.

अशाहि अवस्थेंत, नाना प्रकारचे सामाजीक छळ सहन करून, या संकुचित व ताठर समाजरचनेविरूद्ध जोराचा निषेध जाहीर करण्याचें कार्य, उदात्त ध्येयाच्या आणि खऱ्या सरदारी दिलाच्या अनेक प्रबुद्ध हिंदु सुधारकांनी, निधड्या छातीनें केलेलें आहे, ही गोष्ट हिंदूच्या इतिहासांत सुवर्णाक्षरांनी लिहिण्यासारखी आहे. या सुधारकांनीं समाजसुधारणेच्या कामीं आपले बळी देऊन, ज्या भारतीय हिंदु—प्रबोधनाच्या जन्माची आपण आतुरतेनें वाट पहात आहों, त्याचें बीजारोपण केलें.

आणखी थोडें अविभक्त कुटुंब-पद्धतीकडें वळूं या. मुलींवर होणाऱ्या शिक्षणाच्या परिणामाला भिऊनच या कुटुंबपद्धतीच्या धोरणांत बदल होत गेले. अज्ञान हेंच जेथें सुखाचें कारण, तेथें ज्ञानी मूर्खच ठरायचा. नाक्षरतेनें कुटुंबांत जर शांती नांदते, तर साक्षरतेची नसती ब्याद कशाला? हा नियम सर्रास कडक चालूं झाला. याचा परिणाम असा झाला कीं लग्नापूर्वी मुलींच्या शिक्षणाला फार प्राचीन काळापासून कडकडीत आळा बसत गेला.

महाभारतकाळीं आणि त्यानंतर कित्येक शतकेंपर्यंत प्रत्येक मुलीला सुप्रसिद्ध ६४ कलांचें शिक्षण देऊन प्रवीण करण्याचा परिपाठ होता. लिहिणें, वाचणें, संगीत गायन वादन, चित्रकला, कशिदा काढणें, रंगारी काम, पाकसिद्धी, शीळ घालणें, पक्षी माणसाळवून त्यांना शिकविणें, फुलांच्या बागा तयार करणें, पुष्पहार करणें, प्रणयीजनांशीं प्रेमचेष्टा करणें, इत्यादि ६४ कलांचे शिक्षण मुलींना बिनदिक्कत मिळत असे.

वात्सायनाच्या कामशास्त्रांत याविषयीं सर्व माहिती दिलेली आहे. विद्वान संशोधकांच्या मतें बुद्धापूर्वी सुमारें १२५ वर्षे वात्सायन होऊन गेला.

अविभक्त कुटुंब-पद्धतीच्या कडकडीत सोवळ्या सक्तीमुळें तरूण स्त्रियांची बंडाळी एकसारखी चालूंच असे. बुद्धांचा उदय होण्यापूर्वी बरीच वर्षे, या सामाजीक सक्तीविरूद्ध उघड उघड बंड करणाऱ्या स्वतंत्र वृत्तीच्या स्त्रियांचा एक वर्ग अस्तित्वांत आला. त्यांनी आपल्या जीवनचर्येचा एक निराळाच स्वावलंबी मार्ग शोधून काढला. त्यांनीं नृत्य गायन वादनादि कलांत प्राविण्य मिळवून, आपापले सवते स्वतंत्र सुभे स्थापन केले. यांना कलावंतिणी[या शब्दाचा खरा अर्थ व खऱ्या भावना नीट पटण्यासाठीं वाचकांनी चारूदत्ताच्या वसंतसेनेचें चारित्र्य दृष्टींपुढें ठेवावे. कलावंतीण म्हणजे वेश्या (Prostitute) नव्हे. प्राचीनकाळीं हिंदुस्थानांत कलावंतिणीचा दर्जा क्षुद्र मानण्यांत येत नसे. त्या चांगल्या सुविद्य, उदार, रसिक, आणि प्रामाणीक असत.–अनुवादक.] असें नांव पडलें. यांना मोठमोठ्या विद्वान व पुढारी लोकहि चांगला मान देत असत. या चतुर स्त्रियांचा विवाहावर मुळींच विश्वास नसें; परंतु त्या आपल्या ठरावीक यजमानाशीं प्रेमरज्जूनीं बद्ध होऊन इमानानें वागत.विवाहविधींतील भटांच्या चर्पटपंजरी मंत्रापेक्षां शुद्ध प्रेमाचें महत्व त्या विशेष मानीत असत. अर्थात् त्या अविवाहित पत्न्या आणि अविवाहित माता बनल्या. त्यामुळें संभावीत कुटुंब-व्यवस्थेंतल्या प्रतिष्ठित'सौभाग्यवती' ठमाबाई चिमाबाई प्रथम प्रथम त्यांच्याकडे मत्सरानें आणि नंतर कुटाळकीनें पाहूं लागल्या. बोलून चालून 'उठून गेलेल्या' पोरी ना त्या!

या स्वतंत्र वृत्तीच्या तरूण कलावंतिणीनीं भिक्षुकशाहीलाच बहिष्कार-खराटा दाखविल्यामुळें, भटाब्राम्हणांना ठमा चिमा बाईंच्याच धोरणानें वागण्याचा प्रसंग आला. या दिवसापासून हिंदूंच्या सुप्रसिद्ध ६४ कला दोषी ठरल्या, [कारण त्या सर्व या कलावंतिणीनीं उचलल्या!]आणि ठमा चिमाबाईनीं आपला कुळशीळवान घरंदाज प्रतिष्ठितपणा निर्लेप राखण्यासाठीं त्या कलांना 'अप्रतिष्ठित' म्हणून घरोघर बहिष्कार घातला.

भटांब्राम्हणांनीं या सुंदर बंडखोर युवतींना जरी वाळींत टाकले होते, तरी सौभाग्यवती ठमा चिमाबाईंचे पतिराज, भाऊ, मेहुणे आणि जांवई सुद्धां, त्यांची नजर चुकवून या तरूण कलावंतिणींच्या प्रेमाची याचना करायला गुप्तपणानें त्यांचे उंबरठे झिजविण्यास चुकत नसत. काय करणार बिचारे! खऱ्या प्रेमशोधनाची लज्जत त्यांना त्यांच्या समाजव्यवस्थेंत चुकून सुद्धां चाखायला मिळायची नाहीं. या स्वतंत्र मनमोकळ्या वातावरणांत त्यांच्या जिवाला खराखुरा आराम मिळूं लागला. अविभक्त कुटुंब-व्यवस्थेच्या चार भिंतीच्या आंतलें कृत्रिम जीवन म्हणजे त्यांना रखरखित रूक्ष तुरूंगाप्रमाणेंच होते. मग त्यांनीं या प्रेमळ, चतुर, इमानी व खुल्या दिलाच्या नवयौवन सुंदर कलावंतिणीच्या स्नेहासाठीं कां धडधपडूं नये?

या कलावंतिणी चांगल्या सुशिक्षित व चतुर असल्यामुळें, बुद्धाच्या संप्रदायांत त्यांना जीवितसाफल्याचा एक नवीन राजमार्ग सांपडला. त्यांना एक नवीन जग आणि नवा स्वर्ग दिसूं लागला. शूद्रांप्रमाणेंच, मोठ्या उत्साहानें, या कलावंतिणींनीं बौद्ध धर्माचा स्वीकार केला. त्यांतल्या ज्या विशेष देवधर्मी वृत्तीच्या होत्या, त्यांनीं बौद्ध भिक्षुणीचा पेशा पत्करून, स्त्रीशिक्षणाच्या कार्यास वाहून घेतलें. बौद्धकाळच्या भारतांत दवाखान्यांच्या फारच मोठ्या प्रमाणांवर सर्वत्र स्थापना झालेल्या होत्या. स्त्रीशिक्षणाचें कार्य करीत असतांनाच, या भिक्षुणी ठिकठिकाणच्या दवाखान्यांत रोग्यांच्या सुश्रुषेचेंहि काम करीत असत.

भिक्षुकशाही ब्राम्हणधर्माच्या पोटांतून आणि त्याच्याच तत्वज्ञानाची सुधारणा करण्यासाठीं बौद्धधर्माचा जन्मं झाला. ही गोष्ट विसरतां कामा नये. बौद्ध धर्म म्हणजे हिंदु समाजाच्या बाह्यांगाची वरवर डागडुजी व धू पूस करण्या ऐवजीं.थेट अंतरंगाची सुधारणा घडवून आणणारी 'प्रोटेस्टंट' (निषेधक)

अनुक्रमणिका

चळवळ होती. भटांब्राम्हणांच्या गैरशिस्त वर्चस्वाच्या दडपणामुळें सारा हिंदु समाज हाडकांसारखा ताठर, पाषाणासारखा बिनकाळजाचा आणि सर्वतोपरीं मुर्दाड असा बनलेला होता. बौद्धधर्माच्या चळवळीनें त्यांत प्रेम, उदारपणा माणुसकी आणि सदाचार या उत्तम गुणांच्या ताज्या गरम रक्ताचा पुरवठा सोडण्याचा स्तुत्य प्रयत्न केला. तिखट बुद्धिमत्तेच्या तरूण विद्यार्थी वर्गांची मनें बौद्धधर्मानें आपल्याकडे कशी वेधून घेतली आणि ते या नव्या विवेकशाली चळवळीच्या झेंड्याखालीं भराभर कसे जमा झाले, हें मीं मागें आपणांस दाखविलेंच आहे.

बौद्धधर्मानें आसेतुहिमाचल भरतखंडांत अननुभूत अशा अस्सल विवेकवादाचा प्रचंड दीप प्रज्वलीत केला. त्याच्या प्रकाशानें भिक्षुकशाहीच्या एकजात भटाब्राम्हणांची घाबरगुंडी उडाली आणि ते या नवीन चळवळीची मान मोडण्याची कारस्थानें रचूं लागले. [भिक्षुकशाहीला ब्रम्हदेवानें एवढाच एक गुण शिकविलेला दिसतो. ज्या ज्या चळवळीविरूद्ध भटांब्राम्हणांची आदळ आपट व कारस्थानी डांवपेंच सुरू होतात, तीच चळवळ खरी लोकहितवादी, असें डोळे मिटून सांगावें. – अनुवादक.]

बुद्धानें आपल्या नवमतवादाचा संदेश बहुजन-समाजाच्या थेट खालच्या थरापर्यंत पोहचविण्यासाठीं, सोंवळ्या संस्कृत भाषेच्या ऐवजीं, त्या वेळीं प्रचारांत असलेल्या प्राकृत पाली भाषेचाच उपयोग सर्रास केला. त्याचप्रमाणें, त्याचे जितके म्हणून स्त्री पुरूष उत्साहानें अनुयायी व धर्मप्रचारक बनले, त्या सर्वांनीं कडकडीत ब्रम्हचर्य पाळलेंच पाहिजे, असा कडक दण्डक त्यानें घालून दिला. धर्मप्रसारासाठीं व्रतस्थ अशा ब्रम्हचारी भिक्षु भिक्षुणींची (monks and nuns)मिशनरी संस्थागौतम बुद्धानेंच प्रथम उपयोगांत आणिली. त्यामुळें प्रापंचिक ज्ञानाबरोबरच धार्मिक ज्ञानाच्या शिक्षणाचा संदेश अखिल मानवतेच्या कोनाकोपऱ्यांत नेऊन भिडविणाऱ्या निःसीम स्वार्थत्यागी तरूण श्रमणांचा एक जंगी संघ सहजच निर्माण झाला.

‘अहिंसा परमो धर्मः’ च्या निशाणाखालीं बुद्धानें लोकशाहीच्या प्राणप्रतिष्ठेचा सत्याग्रह चालूं केला. या सत्याग्रहानें भिक्षुकशाहीला चोहोंबाजूंनीं मोर्चे लागले, आणि अधम पाजी खादाड आणि इष्कबाज भटाब्राम्हणांना खडाखड लाथाडून जमीनदोस्त केले. अशा रीतीने हिंदुस्थान आणि आशियाखंडाच्या वैभवाची कीर्ती सनातन चिरंजीव करणाऱ्या या नवीन सुधारक चळवळीचा ओघ गंगानदा प्रमाणें फोंफावत वाढत गेला.

पण आज आमची काय अवस्था आहे?सुकाणू तुटलेल्या जहाजाच्या आच्छादन नसलेल्या फलाटावर आम्ही हिंदुजन कसे बसे उभे आहोंत. परिस्थितीचा दर्या चहूंकडून बेफाम खवळलेला आहे. भौतिक (materialistic)गिधाडी मांसाहारी दारूबाज अशा पाश्चिमात्य संस्कृतीच्या भयंकर तुफानी वाऱ्याचा सोसाटा आम्हाला गदगदा हालवीत आहे. आमचे हातपाय जखडून टाकलेले आहेत. आमच्यां तोंडांना अशा प्रकारचे घाणेरडे रंग फासडण्यांत आलेले आहेत कीं त्यांमुळें आम्ही हिंदुजन बेछूट ‘भ्रष्ट नादान’ स्वरूपांत साऱ्या जगाला दिसत आहोंत. काय ही लज्जास्पद स्थिति! शरमेनें आम्ही आपलीं काळीं तोंडें आतां लपवावी तरी कोठें? मनाला होणाऱ्या लज्जादंशाच्या वेदना शमविण्यासाठीं आम्ही आतां कोणाचा आश्रय घ्यावा?कोणाच्या चरणाला ‘त्राहि माम्’ म्हणून विळखा घालावा? ‘भिऊं नका, ना भी, ना भी’ अशा आश्वासनानें आम्हाला धीर देऊन, आमचा उद्धार करणारा महात्मा या जगांत कोणीच नाहीं कां?

आहे आहे आहे. हिंदु बांधवांनो, आहे. ज्याच्या महात्म्याचें तेज चीन जपान कोरिया सायाम काम्बोदिया ब्रम्हदेश सीलोन तिबेट इत्यादि राष्ट्रांत आजहि मानवजातीच्या उद्धारार्थ खळवळत आहे; त्या

अनुक्रमणिका

तेजाची मायभूमी जी भरतखंड, तेथेंहि अझून ज्याचा अल्पस्वल्प अवशेष धमधमत आहे; त्या दयासागर, प्रेममूर्ती, अध्यात्मनिधान अशा महात्मा गौतम बुद्धाचा हिंदु-भारत जर अझूनहि धांवा करील, तर अखिल मानवतेला हृदयाशीं कवटाळणारा तो 'आशियाचा भास्कर' तुमच्यावर आपल्या दिव्य तेजाचा प्रकाश खास पाडील.

अनात्मवादी पाश्चिमात्य संस्कृतीचा उग्र अंधार आज आमच्या भोंवतीं पसरलेला आहे. या संस्कृतीच्या पचनीं आम्ही जर पडलों तर आम्ही आमच्या राष्ट्रीयत्वाला सफाई मुकून नामशेष सुध्दां उरणार नाहीं. अशा स्थितींत अखिल हिंदुभारत ज्या धार्मिक-सामाजीक आत्मप्रबोधनाची मोठ्या आतुरतेनें, धीरानें आणि विश्वासानें वाटपहात आहे, त्याच्या प्राप्तीसाठीं, देशबांधव हो, तुम्हाला त्या 'आशियाच्या तेजोनिधि भास्करा' कडेच मार्गदर्शक म्हणून पाहिल्याशिवाय आतां गत्यंतर नाहीं.

इसवी सनापूर्वी ५ व्या आणि ६ व्या शतकांतला बुद्धचरित्राचा काळ म्हणजे जगाच्या इतिहासांतला एक मोठा चित्ताकर्षक भाग होय. बुद्धजन्मापूर्वी पुष्कळ वर्षे मेसापोटेमियाच्या मार्गानें ग्रीस आणि हिंदुस्थान यांत व्यापाराचें बरेंच दळणवळण चालूं झालेलें होतें. त्या काळी परदेशगमनांचा प्रतिबंध मुळींच नव्हता.'काळ्यापाण्याची अटक' हे मागाहूनचे भिक्षुकी थेर आहेत.

बुद्धाचा निर्वाणकाल झाल्यावर लवकरच एफीसस येथील हिरॉक्लीटस आणि सामोस येथील पायथागोरास हे दोघे ग्रीक तत्ववेत्ते बौद्ध धर्माचा प्रसार व संघस्थापना करण्यासाठीं श्रमण होऊन सर्वत्र फिरत होते.

'हेलेनिक कल्चर' (ग्रीक संस्कृती) म्हणजे पाश्चिमात्य जगाचें (युरपचें) कलदार शिक्क्याचें नाणें म्हणून गणलें जातें. पण ही संस्कृति मूळ कोठची?आशियामायनरची. आणि आशिया मायनर मधील ग्रीक शहरांनीं ती हिंदुस्थानांतून नेलेली. त्या वेळीं कातडीच्या काळ्या गोऱ्या रंगाचा अथवा संस्कृतीचा कोणताहि भेद पूर्व आणि पश्चिमेंत विषम भाव उत्पन्न करीत नव्हता.

पारशी जनांचा झोरास्टर उर्फ झरतुष्ट्र याच काळांत उदयास आला.परंतु याच्या उपदेशाला पारशांतील जातिभेद मोडण्याच्या कामीं मात्र मुळींच यश आलें नाहीं.

अलेकझांडरनें (शिकंदरनें) इ. स. पूर्व ३२६ सालीं पंजाबवर जी स्वारी केली, तिचा हिंदुस्थानवर कांहींच परिणाम घडला नाहीं. याचें कारण, हिंदु संस्कृती त्या वेळीं चांगली सामर्थ्यवान् आणि उत्पादक प्रवृत्तीची असल्यामुळें, ग्रीक संस्कृतीशीं टक्कर देतांना तिनें आपली छाप तिच्यावर चांगलीच बसविली. एवढें मात्र खरें कीं या स्वारीमुळें जो सांस्कृतिक झगडा झडला, त्यांतून मौर्यांचें अखिल भारतीय साम्राज्य निर्माण झालें. चाणक्यानें नंद महापद्माला पदभ्रष्ट करून चंद्रगुप्त मौर्याला भरतखंडाचा पहिला बादशहा बनविलें. राजकारणपटू चाणक्य हा जातीनें जरी ब्राम्हण होता, तरी तो बौद्ध धर्माचा पक्षपाती होता आणि त्याचा राष्ट्राभिमानहि फार उच्च दर्जाचा होता. माझें असें ठाम मत आहे कीं भारताचें महाभारत (थोर हिंदुस्थान) बनविण्याच्या महत्वाकांक्षेचें श्रेय जर खरोखर कोणाला द्यावयाचेंच असेल तर तें श्रीकृष्णाला न देतां चाणक्यालाच देणें वाजवी होईल. इतिहासहि याच मताला भरपूर पाठबळ देत आहे.

अनुक्रमणिका

अथेन्स अस्तित्वांत येण्यापूर्वीच आमच्या वैदिक आर्यांचें वाङ्मय, काव्य, इतिहास, औपनिषदिक तत्वज्ञान इत्यादि तयार होऊन बसलें होतें. रोमन लोकांचा प्रकार असा नाहीं. रोमन लोकांनीं इजिप्त आणि कार्थेज यांच्याशीं लढलेल्या युद्धांच्या लुटींतूनचग्रीसच्या काव्याचें कलेचें जनन झालेलें आहे. रोमन लोक वास्तवीक या वेळीं पडत्या काळांत होते. त्यांनीं ग्रीस राष्ट्र जिंकून, त्याच्या लहान लहान, इकडे तिकडे विखुरलेल्या व एकलकोंड्या पडलेल्या शहरांपर्यंत आपली सत्ता नेऊन भिडविली. या शहरांचीं लहान लहान संस्थानें बनलीं. हीं संस्थानें रोमन जेत्यांच्या दडपणाखालीं बेजार झाली असतांनाहि, त्यांच्याकडून लाभेल तेवढ्या स्वातंत्र्याचा उपभोग घेत दिवस कंठीत होती. या मुस्कटदाबींतच ग्रीक संस्कृतीचा उदय झाला. ऑक्सफर्ड आणि केंब्रीजच्या महाविद्यालयांत 'ही पहा ती उच्च दर्जाची संस्कृति' (**Unique China of the European Cupobard** )म्हणून मोठ्या दिमाखानें तिची महति सांगण्यांत येते. हिंदुस्थानला या गर्वोक्तीचें काय?एखाद्या 'कुछ पर्वा नही' महंताप्रमाणें तो 'चलना देव' म्हणून हंसतो, झालें!

चंद्रगुप्त मौर्यानें जी राजकीय सामाजिक आणि धार्मिक घटना केली, तीच पुढें त्याचा नातू सम्राट अशोक यानें भरभक्कम पायावर चिरस्थायी केली. इतकेंच नव्हे तर, त्या घटनेच्या प्रसाराचा व्याप त्यानें विस्तृत वाढवून तिच्यावर साम्राज्याचा धर्म म्हणून बौद्धधर्म हा देदिप्यमान कळस चढविला. हिंदुस्थानाच्या इतिहासांतील हा इ.स. पूर्व २७२ ते २३१ चा काळ अत्युच्च राष्ट्रीय वैभवाचा होय.

अशोकाचें साम्राज्य बंगालच्या उपसागरापासून तों थेट काबूल पर्यंत, आणि खालीं दक्षिणेस म्हैसूरच्या पलीकडे पालार नदीपर्यंत पसरलेलें होते. अशोकानें विस्तृत पाटबंधारे बांधून, देशांतल्या शेतकीची पिकावट भरपूर वाढविली. याच कारकीर्दींत प्राथमिक सक्तीचें शिक्षण हिदुस्थानांत प्रथमतः सर्रास सर्वत्र सुरू झाले; आणि नालंद येथील जगप्रसिद्ध विश्वविद्यालय साऱ्या जगाच्या ज्ञानप्राप्तीचें मुख्य केंद्र बनलें.

अशोकाचे सुप्रसिद्ध शिलालेख आणि त्यांत प्रतिबिंबीत झालेली त्याची नीतिप्रसाराची तळमळ, शाळेंत जाणाऱ्या प्रत्येक साक्षर मुलामुलीलाहि आज माहीत आहे. परंतु आमच्या देशांत शेंकडा अवघे ६ लोक साक्षर, बाकीचे ९४ अक्षरशत्रू. जपानी कोरियन आणि फिलीपाईन लोकांप्रमाणें प्राथमिक सक्तीचें शिक्षण अझून आम्हांला मिळावयाचें आहे. अर्थात् शेंकडा ९४ लोकांना अशोक कोण होता, हें कशानें समजणार?

त्या शिलालेखांचा सारांश थोडक्यांत येथें दाखविणें प्राप्त आहे. आपल्या साम्राज्यांतील यच्चावत् सर्व लोकांच्या माहिती करतां सम्राट अशोकानें देशभर ठिकठिकाणीं शिलास्तंभ उभारून, त्यावर सदाचरणाच्या आपल्या आज्ञा खोदून ठेवलेल्या आहेत. सर्वांनी दयाळूपणानें वागावें.सत्य बोलावें.कोणत्याहि प्राण्याची हत्त्या करूं नये. आईबापांची आज्ञा पाळावी. आपल्या मित्रांशीं, ओळखीच्या माणसांशीं, नातेवाईक, ब्राम्हण, संन्याशी यांच्याशीं उदारपणानें विवेकानें आणि परोपकारी वृत्तीनेंवागावें. जहाल किंवा फाजील भाषा वापरूं नये. अशा मासल्याच्या त्या शिलालेखी आज्ञा आहेत.

अशोकानें बौद्धधर्माला असें वळण दिलें कीं त्यांत 'ब्राम्हणांचा आदर' कायम ठेवल्यामुळें, हिंदु भिक्षुकशाही धर्माचा आणि त्याचा कोठे विरोधच उरूं दिला नाहीं. तत्कालीन् हिंदु भिक्षुकशाहीनें हिंदुजनांची जी स्थिति राखलेली होती, तिच्यापेक्षां अधिक उच्च व उदात्त अशा प्रगतीकडे अखिल हिंदुजनांनी आपली आत्मोन्नति करून घ्यावी, या अत्युत्तम प्रेरणेचा अशोकाचा हा प्रयत्न होता.

अनुक्रमणिका

धर्मानें हाक मारतांच, एकजात तरूण तरूणी जनसेवेच्या व धर्मप्रसाराच्या उदात्त ध्येयानें प्रेरीत होऊन, ब्रम्हचर्याची शपथ घेऊन, भराभर भिक्षु आणि भिक्षुणीची दीक्षा घेत असत. अशा स्थितींत बालविवाह आणि पडद्याची रूढी अज्ञीबात बंद पडली. फक्त अविभक्त कुटुंब-व्यवस्थेच्या कोंडाळ्यांत मात्र ती चालूं असे.

अशोकानें सर्व कांही उत्तम केलें, पण एका बाबतींत त्यानें एवढी मोठी घोडचूक केली कीं त्याचे भयंकर परिणाम साऱ्या देशाला पुढें भोगावे लागले. ओरीसा प्रातांत कलिंगांशीं युद्ध करून त्यानें तो प्रदेश आपल्या सत्तेखालीं आणला. या युद्धांतील मानवसंहार व रक्तपात पाहून, सम्राट अशोक मनांत इतका द्रवला कीं ताबडतोब त्यानें आपल्या सर्व सैन्याला रजा देऊन, लष्करी खातेंच बंद करून टाकलें. हिंदुस्थानाला लष्करी सामर्थ्याची आता मुळींच जरूर नाहीं, असा त्याचा (गैर) समज झाला.

या लष्करी-संन्यासांतच बौद्ध-सत्तेच्या ऱ्हासाचें मूळ उत्पन्न झालें. राजकीय सत्ता ही नेहमीं लष्करी मनगटाच्या जोरावरच टिकायची. परंतु अशोकानें धर्मप्रेमाच्या आवेशांत, स्वतःच्या अस्तित्वाला मूळ कारण असणारा तो मनगटाचा जोरच उखडून टाकला. लष्करी शक्तीचें पाठबळ गेल्यामुळें, अशोकानंतर मध्यवर्ति बौद्ध सत्तेला ओहटी लागली. तथापि बौद्ध धर्माचा प्रसार मात्र देशोदेशीं भारी झपाट्यानें होत गेला. अशोकाच्या बौद्धमिशनऱ्यांनीं हें काम पूर्वीं झटून केलेंच होतें. त्यानंतर कनिष्क राजाच्या मिशनऱ्यांनीं तोच क्रम पुढें नेटानें चालविला.

इ.स. पूर्व २०० पासून इ. स. ६०० पर्यंत हिंदुस्थानांत सारा गोंधळ माजला होता. लष्करी शक्तीच नष्ट झाल्यामुळें मध्यवर्ति राजकीय सत्ता कमकुवत आणि लंजुर पडली. साऱ्या हिंदुस्थानभर पसरलेल्या साम्राज्याचा आंवर होणें दुरापास्त होऊन बसलें. त्यामुळें, ठिकठिकाणीं लहान लहान हिंदूराजे वर डोकें काढून आपापलीं स्वतंत्र्य राज्यें स्थापूं लागले. मद्रासकडे तेलगूद्राविडी लोकांनीं आंध्र राजघराणें निर्माण केलें. इ.स. पूर्व १५५ सालीं मिनांडरनें हिंदुस्थानवर स्वारी केली. साराच गोंधळ! कनिष्काप्रमाणें मिनांडरनें बौद्धधर्माचा स्वीकार केला.

इ.स. पूर्व १४७ त आणखी एक महत्त्वाची गोष्ट घडली.या वर्षीं शुंग नांवाचें एक ब्राम्हणी राज्य निर्माण झालें. आधींच बौद्ध धर्माविरूद्ध सर्वत्र धुसफूस आणि बंडें चालूं होतीच.त्यांतच मिनांडरची स्वारी आली, तेव्हां मगधचा राजा बृहद्रथ यानें त्याला तोंड न देतां स्वस्थ बसला. यामुळें लोकमत एकदम खवळलें आणि हें शुंग घराणें निर्माण झालें. आधींच ब्राम्हणांचा बौद्धधर्मावर पहिल्यापासून मोठा दांत. त्यांत हें ब्राम्हणी शुंग घराणें उदयास आलें.मग काय विचारतां?सांपडेल त्या बौद्धाला हाण ठोक, असा सारखा छळ सुरूं झाला[भिक्षुकी खुनशीपणा फार प्राचीन काळापासून प्रसिद्ध आहे. प्रसंग पडेल तसें वळतें वांकतें नमतें घेऊन, पायाला किंचित सत्तेचा तणावा मिळतांच एका दाताचा सूड बत्तिशी पाडून घ्यायला. भटीवृत्ति सर्पाप्रमाणे डोक धरून बसण्यांत कधींहि कमी करणारी नव्हे.—अनुवादक.]आणि जुन्या जीर्णमतवादी भिक्षुकशाहीचें पुनरूज्जीवन झालें.

भिक्षुकशाही पुनरूज्जीवनाचा हा काळ वाङ्मयाच्या बाबतींत भयंकर उलाढालीचा झाला. भिक्षुकी वर्चस्वाची कायमची थप्पी बसविणारे शेंकडों ग्रंथ या हंगामांत रचले गेले. महाभाष्य व मनुकृत मानव धर्मशास्त्र हे ग्रंथ याच काळांत लिहिले गेले. महाभारत आणि रामायण या महत्वाच्या काव्येतिहास ग्रंथांत हवी तशी भटी मतांची घालघुसड करून त्यांच्या ‘सुधारलेल्या’ आवृत्त्या याच गोंधळांत बाहेर पडल्या.

अनुक्रमणिका

या ग्रंथांतून ब्राम्हणांचें जें फाजील स्तोम माजविलेलें दिसतें आणि शूद्रांबद्दल जो सर्रास तिटकारा व द्वेष जागोजाग आढळतो, त्यावरून हाच सिद्धांत स्पष्ट होतो कीं या वेळीं ब्राम्हणी राज्यसत्ता जोरावर होती आणि तिनें शूद्र राजघराण्यांचा निःपात केलेला होता.

इ.स. ३२० त पुन्हां राज्यक्रान्ति झाली आणि गुप्त राजांचें साम्राज्य सुरू झालें. पहिला, चंद्रगुप्त (२ रा), त्याचा पुत्र समुद्रगुप्त, त्याचा पुत्र चंद्रगुप्त (३रा) या सर्वांनीं हिंदुस्थानची बादशाही गाजवून, देशांतल्या सर्व लहानमोठ्या राजांना जिंकून आपले मांडलीक बनविले. हा ३रा चंद्रगुप्त म्हणजे ज्याच्या दरबारांत कविकुलगुरू कालीदास उदयास आला, तो विक्रमराजा असें समजतात.

हे गुप्त सम्राट राजे वेद न मानणारे सुधारक हिंदु होते; पण बौद्धधर्मी नव्हते. यांच्या अमदानींत हिंदु भिक्षुकशाही आणि बौद्धशाही तात्विक दृष्ट्या परस्परांवर कितीहि वरचढ करीत, तरी एकमेकांशेजारीं गुण्यागोविंदानें वागत होत्या.त्या वेळीं बौद्धांतहि तंत्रमंत्रांचें आणि देवदेवतांचे लफडे बरेंच घुसलें होतें. महायान[बौद्ध धर्मात महायान आणि हीनयान असे पुढें दोन पंथ निर्माण झाले होते.–अनुवादक.]पंथाचें केंद्र जी तक्षशिला येथील महापाठशाला, ती याचा पुरस्कार करीत होती. साधनादि आध्यात्मिक तपश्चर्येत यशश्री मिळविण्यासाठीं अनेक देव देवतांना आपल्या देवसंग्रहांत सामील करून घेण्याची बौद्ध तांत्रिकांनी हिंदुजनांवर पुष्कळच छाप बसविली.

ब्राम्हणी धर्माच्या पुनरूज्जीवनाची पुन्हा या वेळीं एक जबरदस्त लाट आली. बौद्ध स्तूप आणि त्यांचे मठ यांच्या तोडीस तोड म्हणून देवळें बांधण्याचा धूम धडाका हिंदूंनीं सुरू केला. भटांनीं नाना प्रकारचीं पुराणें लिहून काढलीं मनुस्मृति महाभारत रामायण यांच्या पुनर्लेखनाच्या नव्या आवृत्या देशकाल वर्तमानानुसार लिहून यावेळीं पुऱ्या करण्यांत आल्या.

इ.स. ४०६ मध्यें सुप्रसिद्ध चिनी फिरस्ता फा हयान हिंदुस्थानांत आला. हिंदु धर्म आणि बौद्ध धर्म शेजारीं शेजारीं नांदत आहेत व लोक अहिंसावादी व मद्याला न शिवणारे आहेत, असें त्याला आढळून आलें. त्या वेळीं गरीबांकरितां ठिकठिकाणीं इस्पितळें होती आणि तेथें रोग्यांना औषधें अन्नपाणी वगैरे मोफत देण्यांत येत असे.

इ.स. ५२८ त गोऱ्या हूण लोकांची हिंदुस्थानावर स्वारी आली. त्या वेळीं मात्र यशोधर्म उर्फ विक्रमादित्य (२ रा) याच्या सेनापतित्वाखालीं सर्व हिंदुराजे एकत्र होऊन, त्यांनीं त्या हुणांना हुसकाऊन लावले. कित्येकांच्या मतें यशोधर्म हाच कालीदासाचा विक्रम असावा.

इ.स. ६०६ ते ६४६ च्या अवधींत हर्ष नांवाचा एक बलाढ्य हिंदुराजा झाला. हा संस्कृत वाङमयाचा रसिक पुरस्कर्ता होता. बौद्धजन आणि बौद्धधर्म यांच्याशीं त्याचें वर्तन सहानुभूतीचें असे. याच्या दरबारांत ब्राम्हणी धर्म आणि बौद्धधर्म या दोनहि प्रतिस्पर्ध्यांचे वादविवाद व चर्चा खुल्या दिलानें चालत असत. या काळापूर्वी अनेक शतकें बौद्धशाहींतील अनेक उत्तम गोष्टींचा आणि तत्वांचा हळुंहळू स्वीकार करून भिक्षुकशाहीनें त्या आत्मसात् केल्या होत्या. हर्ष राजाच्या कारकीर्दीत तर हे दोनहि धर्मपंथ सारखेच तंत्राळलेले होते आणि दोघांच्या आचारविचारांत विशेषसा फरक कांहींच दिसत नव्हता.

अनुक्रमणिका

हर्ष राजानेंच ब्राम्हण आणि बौद्ध यांच्यात एकोपा घडवून आणण्याचा प्रयत्न केला. त्यानें ब्राम्हणांना सांगितलें कीं तुम्ही बौद्ध धर्ममार्तंडांना यज्ञोपवित उर्फ जानवें द्यावें आणि बौद्धांना सांगितलें कीं अत्युच्च सन्मानाचें चिन्ह म्हणून तुम्ही या पवित्र वस्तूचा स्वीकार करावा. ब्राम्हण तर इतके खूष झाले कीं त्यांनीं बुद्धाला हिंदूंच्या दशावताराच्या मालिकेंत सुद्धां गोंवलें.

एवढ्या मोठ्या बलाढ्य, विनयशील, प्रेमळ राजाची इच्छा. ती बौद्धांनीं तरी कशी मोडावीं?ब्राम्हण लोकसुद्धां एकोप्यासाठीं धडपड करीत होतेच. शिवाय दहा हजार विद्यार्थ्यांना शिक्षण देणारी नालंद येथील बौद्धांची महापाठशाला तर सालीना १००'मौझा' च्या [हें नाणें काय असावें?]खास राजकीय देणगीनें उपकृत झालेली. अशा परिस्थितींत पुढारी बौद्ध धर्ममार्तंडांना हर्ष राजाच्या खास आग्रहावरून भटांची जानवीं गळ्यांत अडकवून घेणें भागच पडलें.

एकोप्याच्या तडजोडीची ही योजना निःसंशय बळजबरीची होती. ती तशी असो वा नसो, परंतु बौद्धांनीं भटांच्या जानव्यांत मान अडकवून घेऊन आपला नैतिक पराभव करून घेतला, यांत मुळींच संशय नाहीं. इतकेच नव्हे तर त्यामुळें समान भावना आणि जातीभेदाच्या पकडींतून स्वातंत्र्य, या दोन महत्वाच्या बौद्ध तत्वांना त्यांनी हरताळ फांसला, असेंच म्हणावें लागतें.

बौद्धांचा हा जो नैतिक अधःपात झाला, तो त्यांना या भरत भूमीवर पुनश्च केव्हांहि सांवरतां आला नाहीं.[भटांच्या नुसत्या जानव्याची ब्रम्हगांठ जर एवढी पराक्रमी, तर त्यांच्या प्रत्यक्ष कारस्थानांची खूणगांठ किती?श्रावणीचें शेण खाऊन भटी जानव्यांची दावीं गळ्यांत अडकवून घेणाऱ्या मानवी बैलांनीं सावध असावें. धर्म करतां कर्म पाठीस लागायचे! लागलेंच आहे म्हणा सध्यां— **अनुवादक.**]मोठमोठे बौद्ध मठाधिपतीच भटांच्या जानव्यांत पडले, मग अनुयायांची कथा काय?तेहि मेंढरांप्रमाणें भराभर जानवाळले. ताबडतोब ब्राम्हणी धर्मानें भयंकर उचल खाल्ली आणि या पुनरूज्जीवनाच्या रामरगाड्यापुढें बौद्धशाहीला सपशेल चेपून दडपून जमीनदोस्त करण्याचा मनु उगवला. बौद्धांमध्येंच पुढें पंथभेदांचीं नवनवीं खेंकटीं निपजूं लागली. त्यामुळें त्यांच्यांतहि 'बारा पुरभय्ये तेरा चुली' ची फाटाफूट माजली. आणखी दोन शतकें पुढें बौद्धशाही कशीबशी टिकली, तरी ती अखेर मरणाच्या दारीं धरणें धरून बसली. कारण, यापुढें बुद्धिवान कर्तबगार आणि शीलवान लोकांची या संप्रदायांत आवक अगदींच बंद पडली. सुप्रसिद्ध चिनी प्रवाशी हूनसंग हा याच वेळीं येथें आला होता. त्यानें असें लिहून ठेविलें आहे कीं बौद्धशाही मरणाच्या पंथाला लागली आहे आणि ब्राम्हणशाही मात्र नव्या दमानें आणि ताज्या जोमानें पुनर्जन्म घेत आहे. हिंदुजन प्रामाणिक, सत्यप्रिय आणि कायदा मानणारे असून, ते हत्या करीत नाहींत किंवा मादक दारूहि पीत नाहींत.

हर्षानंतर झालेले मगध देशाचे सेन राजे आणि गौड देशाचे (बंगालचे) शशांक राजे हे सर्वस्वी आपल्या ब्राम्हण मंत्र्यांच्या ओंजळीनें पाणी पिणारे निपजले. अर्थात् ते आपल्या बौद्ध प्रजेला तलवारीच्या धारेवर धरूं लागले. सरकारी देणग्या बंद करण्यांत आल्या, तेव्हांनालंदची जगप्रसिद्ध बौद्ध युनिवर्सिटी रसातळाला गेली. मोठमोठे मठ, भिक्षुणींची वसतीगृहें, संघ मोडून टाकण्यांत आले आणि तेथली सर्व मालमत्ता जप्त करण्यांत आली. बौद्ध जात मानीत नसत, म्हणून त्या 'नि-जात्या' ची सर्वजण टर उडवून छळ करीत. ब्राम्हणी धर्माच्या पुस्तककर्त्यांना तर इतका चेव आला कीं त्यांनीं बौद्ध संस्कृतीच्या सर्व कलांची, वाङ्मयाची, असेल नसेल त्याची राखरांगोळी करण्याचा धूमधडाका चालविला. फार काय, पण बौद्धजनांना पूज्य व वंदनीय असलेल्या पवित्र वस्तू व चिन्हें त्यानीं भ्रष्ट केली; कोठें त्यांची अवहेलना व अपमान केला आणि कांहीं तर नाश करून टाकल्या.

८ व्या व ९ व्या इसवी शतकात साऱ्या हिंदुस्थानभर शेंकडों लहान लहान राज्यें पसरलीं होती. कोणाचा पायपोस कोणाच्या पायांत नाहीं. मध्यवर्ति राजकीय नियंत्रणाची सत्ता अजिबात नष्ट झालेली. अशा अवस्थेंत परकीय सिथियन लोकांच्या टोळ्यांवर टोळ्या येऊन रजपुतान्यावर कोसळल्या आणि तेथल्या आर्य राज्यांना उखडून टाकून, त्यांच्या जागीं कायमच्या वसती करून बसल्या. या परक्या पाहुण्यांशीं मिळतें घेणें भागच होतें. [भिक्षुकशाही परक्यांशीं मिळतें घेण्यांत मनाची फार कोवळी आणि उदार. स्वदेशबांधवांशीं शतकानुशतकें वैराचा वणवा फुलवीत बसेल, पण जबरदस्त परक्यांशी मनधरणी करण्यासाठीं पळाचाहि विलंब तिला सोसवत नाहीं. आजहि हेंच चाललें आहे. –**अनुवादक.**] हे रजपुतानी सिथियन जेते ब्राम्हणी धर्माशीं मित्रत्वाच्या नात्यानें वागत आहेत, असें आढळून येतांच, भटाब्राम्हणांनीं त्यांच्याशीं लगट करून, त्या सर्वांना हिंदु धर्माची दीक्षा दिली आणि त्यांच्या गळ्यांत यज्ञोपवितहि अडकविलें. हे सिथियन लोक जात्या बलाढ्य लढवय्ये असल्यामुळें, प्राचीन क्षत्रियांची [सिथियनांना हिंदु करून चतुर्वर्णापैकीं क्षत्रियांची जागा त्यांना देण्यांत आली. पण त्यांची जात कोणती?जातीशिवाय हिंदु जगेल तरी कसा?मोठी अडचण पडली. अखेर तुम्ही राजपुत्रच आहांत, तेव्हां तीच तुमची जात असें ठरविले. राजपुत्राचे झाले राजपुत आणि राजपुताचे झाले रजपूत. –**अनुवादक.**] जागा भरून काढण्यास हे सर्वतोपरी लायक आहेत, असें भिक्षुकशाहीनें ठरवून टाकलें. हिंदुधर्म हा कधींच मिशनरी धर्म नव्हता, असें म्हणणारे लोक खोटे बोलतात, हें यावरून स्पष्ट सिद्ध होत नाहीं काय?

राजपुतान्यांतले हे सिथियन वसाहतवाले म्हणजे हिंदुस्थानच्या इतिहासांत गाजलेले सुप्रसिद्ध रजपूत होत. इ.स.७१२ त सिंधी मुसलमानांच्या स्वारीला या रजपुतांनीं सामना देऊन पिटाळून लावले. या त्यांच्या हिंदसेवेच्या पहिल्याच यशस्वी धडाडीमुळें रजपुतांचा सर्व देशांत मोठा गौरव झाला आणि तेव्हांपासून त्याना राजसदृश असें उच्च वैभव प्राप्त झालें. दिल्ली आणि कनोज हीं इतिहासप्रसिद्ध शहरेंहि त्यांच्या लवकरच ताब्यांत गेली.

त्या वेळेचे रजपूत राजे व्यक्तीशः जरी रणशूर आणि बलाढ्य असत, तरी आंतून ते सर्व अहंपणानें आणि परस्पर मत्सरानें सडून गेलेले असत. त्यांचीं राज्यें लहान लहान व इतस्ततः पांगलेलीं असत. दळणवळणाचीं साधनें व प्रवासायोग्य सडका यांचा पूर्ण अभाव असल्यामुळें, त्यांना परस्पर सहायकारी अशा संयुक्त सत्तेची घटना करता आली नाहीं. किंवा एखाद्या शत्रूवर संघटनेनें चाल करून जाण्याइतक्या परिणामकारक शिस्तीची लष्करी व्यवस्थाहि त्यांना लावतां आली नाहीं. त्यामुळें त्या वेळीं मुसलमानी स्वाऱ्यांनीं हिंदुस्थानांत पोखरण घालण्याचा जो उपक्रम केला, त्याला सामना देण्याच्या कामीं हे रजपूत पराक्रमी असूनहि निरूपयोगी ठरले.

फाजील स्तुतिपाठ आणि भरंसाट लाळघोटेपणा यांत भिक्षुकशाहीचा ब्राम्हण फार प्राचीन काळापासून प्रसिद्ध आहे. पराक्रमी रजपुतांची मर्जी संपादन करण्यासाठीं भटाब्राम्हणांनीं लवकरच एक नवीन युक्ती शोधून काढली.हिंदुत्व आणि यज्ञोपवित यांचा प्रसाद त्यांना आधींच मिळालेला होता. आतां, रामायण महाभारतादि काव्येतिहास ग्रंथांतल्या आणि पुराणांतल्या खऱ्याखोट्या प्राचीन क्षत्रिय राजघराण्यांशी व देवदेवतांशी या अनेक रजपूत राजांचे संबंध जोडणाऱ्या बनावट वंशावळींचीं भेंडोळीं [हिंदूंची अशी एकहि जात सांपडणार नाहीं कीं जिच्या उत्पत्तीचे मूळ थेट ब्रम्हदेवाच्या पोटांत घुसलेलें नाहीं! मैल मैल लांब वंशावळीच्या अभिमानांत गर्क असणाऱ्या हिंदु जनांच्या जातिवंशांत कसकशी काल्पनिक कलमें लागलेली किंवा लावली गेलेली असावीं, याचा या गोष्टीवरून फार छान खुलासा होतो.–**अनुवादक.**]ब्राम्हणांनीं तयार करून, त्या सर्वांना अगदी खूष करून सोडले. या फाजील प्रतिष्ठेनें रजपूत राजे मनस्वी फुगून गेले. त्यांच्या भोंवतीं पसरलेल्या सर्वसंपन्नतेमुळें ते चैनबाजी व ख्यालीखुशालींत दंग झाले. अशा स्थितींत आपल्या दारिद्र्यग्रस्त प्रजेची हालहवाल काय आहे, हें या खुशालचेंडू राजांना कसें दिसावें?आणि दिसलें तरी त्यांनीं कां पहावें?नाना प्रकारच्या विकार विकल्पांत

अनुक्रमणिका

मग्न असणाऱ्या या रजपूत राजांचीं मनें ब्राम्हणांनीं बौद्धजनांच्या विरूद्ध हवी तशी कलुषित करून खवळून सोडलीं. या चिथावणीखोर ब्राम्हणांत, रजपुतांना अत्यंत पूज्य असलेल्या, आद्यशंकराचार्यासारख्या जाडी प्रस्थानेंच पुढाकार घेतल्यावर काय होणार नाहीं?

इ.स. ७५० त दक्षिण हिंदुस्थानांत कुमारील भट्ट नामक ब्राम्हण धर्ममार्तंडानें बौद्धांचा नायनाट करण्याचा पायंडा घालून ठेवलेला होताच. इ.स. ८३० मध्यें श्रीशंकराचार्यानीं त्याच पायंड्यावर पाऊल ठेऊन, रजपूत राजांचीं मनें बौद्धांविरूद्ध खवळून सोडण्याची कामगिरी हातीं घेतांच, काश्मीर नेपाळ पंजाब रजपुताना आणि गंगा यमुना नद्यांमधल्या बिहारादि उत्तर पश्चिम व मध्य हिंदुस्थानच्या सर्व प्रदेशांतून सर्रास बौद्धजनांच्या छळांचा आणि ससेहोलपटीचा भयंकर उपक्रम, रजपूत राजांनीं आणि त्यांच्या ब्राम्हणी-हिंदु सहाय्यकांनीं सुरूं केला.

बिचाऱ्या बौद्धांची स्थिति या वेळीं मेंढपाळ नसलेल्या मेंढरांसारखी होती. त्यांचीं खेडीं उध्वस्त करण्यांत आलीं, घरेंदारें जाळलींलुटलीं गेलीं. बायकांची अब्रू घेण्यांत आलीं. पुरूष आणि मुलांना कोठें हद्दपार केले, तर कोठें त्यांची सर्रास कत्तल करण्यांत आली. अशा या हलकल्होळांतून जे बौद्धजन कसे तरी लपून छपून वांचले, त्यांना समाज व व्यवहार-बहिष्कृत करून, लोकवस्तीपासून पार दूर पिटाळून लावले. अर्थात् त्यांना कमालींतली कमाल नीच अवस्था प्राप्त झाली. उदरनिर्वाहासाठीं सुद्धां त्यांना साध्या माणुसकीला साजेशोभेशा सामान्य शिष्ठतेचीहि बंदी करण्यांत आली. आज आमच्या डोळ्यांपुढें वावरणारे हारी, डोम, मच्छी, चांभार, केवरा, बागडी, नामशूद्र, महार, धेड, मांग इत्यादि अस्पृश्य जनांचे संघ या छळवाद होऊन बहिष्कृत पडलेल्या बौद्धजनांचेच अवशिष्ठ भाग आहेत.

कुमान नेपाळ इकडे हल्लीं ज्या दंतकथा, गोष्टी व इतिहास ऐकण्या वाचण्यांत येतो, त्यांवरून बौद्धांच्या छळांत खुद्द शंकराचार्य आणि त्यांचे अनुयायी यांचा प्रत्यक्ष संबंध किती होता, हें स्पष्ट दिसून येतें. खुद्द शंकराचार्यांच्या आज्ञेवरून कथूरिया राजांनीं गरवाल कुमान आणि नेपाळांतून बौद्धांना पार पिटाळून लावले. त्यांचे मोठमोठे मठ वगैरे होते, ते सारे शंकराचार्यांना दान दिले व त्यांवर त्यांच्या अनुयायांची स्थापना केली. त्यांचे वंशज आजहि त्या मठांचा उपभोग घेत आहेत. शंकराचार्यांनीं बौद्ध भिक्षूंना मुद्दाम पशुयज्ञ करावयाला लावले आणि ब्रम्हचर्य व्रताच्या संकल्पानें राहणाऱ्या भिक्षु, भिक्षुणीवर विवाहाची बळजबरी केली.

महात्मा गौतम बुद्ध हा महान् योगी पुरुषोत्तम होता, हें सर्वश्रुतच आहे. तो निर्वाणपदाला. गेल्या नंतर अनेक शतकांनीं, त्याच्या अनुयायांना त्या दिव्य महात्म्याचे कांहीं सद्गुण आणि त्याच्या मूर्तीची प्रतिमा चिंतनासाठीं, योगधारणेसाठीं किंवा एखाद्या साधनासाठीं, दृष्टीपुढें ठेवणें, सोयीचें व अगत्याचें वाटूं लागले. तक्षशिळा येथील बौद्ध महापाठशाळा म्हणजे त्यावेळीं महायान पंथाचें आंद्यपीठ समजली जात असे. त्या पाठशाळेनें महात्मा बुद्धाच्या मूर्तीच्या प्रतिमेशिवाय आणखी कमळ व सहा योगचक्रें चिंतनांत आणण्याची शिफारस केली. तक्षशिळा महापाठशाळेचा मुख्य अध्यापक सुप्रसिद्ध तत्ववेत्ता **नागार्जून,**त्याच प्रमाणें इतर प्रोफेसर, शिक्षक, ग्रॅज्युएट, अंडर ग्रॅज्युएट वगैरे मंडळी ज्या या चिन्हांच्या केवळ कल्पनाचित्रांवर चिंतन करीत, त्याच चिन्हांची प्रत्यक्ष दगड माती व धातूंचीं चित्रें चिंतनार्थ उपयोगांत आणण्याचा उपक्रम गांधार येथील महापाठशाळेंत सुरूं झाला. याचा परिणाम असा झाला कीं बुद्धाचे पुतळे आणि योगचिन्हांचीं कोरींव दगडी चित्रें यांचा सर्व बौद्ध मंदीरांत, मठांत आणि संघांत सर्वत्र सपाटून प्रसार झाला. जेथें जेथें म्हणून बौद्धांची वसती असे, अशा सर्व ठिकाणीं बुद्धाचे पुतळे आजहि आपल्याला दिसतात, याचें कारण हेंच.

अनुक्रमणिका

शंकराचार्य हे शंकाराचे कट्टे भक्त. चिंतनमग्न बुद्धाची पांढरी मूर्ती थोड्याशा फेरबदलानें शंकराची मूर्ती बनविणें, हें काम फारसें कठीण नव्हतें. शंकराचार्यांच्या आज्ञेनें जेथें जेथें अशा बुद्धाच्या मूर्ती आढळल्या, त्यांच्या गळ्यांभोवतीं सर्पांचीं वेटाळीं खोदून बसवून, त्यांना शंकराच्या मूर्ती बनविल्या. [कित्येक बौद्ध लेण्यांत तर बुद्धाच्या मूर्ती उखडून टाकून तेथें शंकराच्या पिंड्याहि स्थापन केलेल्या आहेत. पुण्यानजीक भांबुर्ड्याच्या लेण्यांत हाच प्रकार दृष्टीस पडतो.—**अनुवादक.**]

बौद्ध धर्माचें हिंदुस्थानांतून उच्चाटन व हाकालपट्टी करण्याच्या कामीं क्रूरतेचे, राक्षसीपणाचे, देव देवतांच्या लुटालुटीचे आणि प्रतिष्ठाभंगाचे या पेक्षां अधिक काय काय भयंकर अत्याचार घडले असतील, त्यांची आज आपण नुसती कल्पनाच केलेली बरी. त्या काळीं सहिष्णुता फार महाग झाली होती. खुद्द शंकराचार्यांना सुद्धां तिचे महत्व भासलें नाहीं. आपल्या रूद्र दैवताप्रमाणें रुद्रावतार धारण करून त्यांना बौद्धशाहीचीं पाळेंमुळें उखडून काढायची होती. बौद्धधर्माचा सत्यानाश केल्याशिवाय ब्राम्हणी धर्माची पुनर्घटना होणेंच शक्य नाहीं, अशा कल्पनेचें वारें त्यांच्या आंगांत संचरलें होते.

अशा रीतीनें शंकराचार्य आणि भिक्षुकशाही यांचा जयजयकार झाला. अखेर त्यांनीं जिंकली. पण या विजयानें साधलें काय?छोट्यामोठ्या हिंदु राजांच्या असंख्य शिपुर्ड्यांना भाडोत्री मदतीला घेऊन, हिंदुजनतेचा केवळ पाठकणा असणाऱ्या बौद्धांचें निर्मूलन करण्यांत मिळालेल्या यशाचे परिणाम काय झाले, हें'आज तुमच्यावर फिरत असलेल्या परिस्थितीच्या वरवंट्याकडे पहा' असें काळच बोट दाखवून सिद्ध करीत आहे.

कुमारील भट्ट आणि शंकराचार्या सारखे धर्मक्रांतिकारक लोक आपल्या ध्येय-साधनाच्या आवेशाच्या भरांत एक गोष्ट अज्ञीबात विसरले कीं माणसें येथून तेथून सारीं मर्त्य, त्यांनीं हातीं मिळालेल्या सत्तेच्या जोरावर शारिरीक बळजबरीनें आणि जुलूम जबरदस्तीनें कोणाची कितीहि हानी केली, तरी दुधारी तलवारी प्रमाणें ती केव्हांना केव्हां तरी उलट फिरून प्रत्याघाताचा सूड उगविल्याशिवाय राहणारी नव्हे.

परंतु शंकराचार्य हे जसे ऊर्ध्व महात्वाकांक्षी होते, तसेच बुद्धिमत्तेंत ते सवाई बृहस्पति होते. विध्वंसक शंकराप्रमाणे रुद्राचें संहारकार्य करूनच ते थांबले नाहींत, तर त्यानीं ब्रम्हदेवाचीहि भूमिका घेऊन विधायक कार्य केलें. ब्राम्हणी धर्माचें पुनरूज्जीवनकरतांनाच, त्यानीं अभिनव भारत (New India)निर्माण करण्याचा प्रयत्न केला. त्यानीं हिंदुत्वाला नवजीवन दिलें, असें म्हणतात. वेदान्ताची फोड करून त्यानीं हिंदुधर्माला नितांत रमणीय अशा एकतान तत्वज्ञानाचें स्वरूप दिलें. परंतु हें तत्वज्ञान अतिसूक्ष्म व दुर्बोध असल्यामुळें, सामान्य जनतेच्या मनावर त्याची कांहींच छाप बसली नाहीं. विशेषतः जनतेच्याच हाडारक्तामासाचे जे बौद्धजन त्यांच्या शंकराचार्यानीं ज्या कत्तली करविल्या व अखेर त्यांचा नायनाट केला, तें शल्य जनतेच्या हृदयांत इतक्या तीव्रतेनें सलत होतें कीं शंकराचार्याच्या कोणत्याहि चळवळींत लोकांनीं कसलाहि भाग घेतला नाहीं. ते सर्व उदासीनच राहिले.

तक्षशिला येथील महापीठानें जाहीर केलेल्या अभिवन बौद्धधर्माच्या तत्वांचा हिंदु जनतेच्या मनांवर इतका परिणाम झालेला होता कीं, शंकराचार्यांचा वेदान्त सर्वत्र गर्जत असतांहि, लोकांत मूर्तीपूजनाचा जुना प्रघात धूमधडाक्यानें चालूंच राहिला. इतकेंच नव्हें तर तंत्रमंत्रांचे सर्व भेसूर प्रकार ते पाळीत होते. या वरून हें स्पष्टच होतें कीं अभिनव भारत निर्माण करण्याची शंकराचार्यांची जी महत्वाकांक्षा होती ती सपशेल फसली. आचार्य समाधिस्त झाल्यानंतर त्यांच्या अनुयायांत जी अधःपाताची कीड पडली, ती पुढें दिवसेंदिवस भयंकर प्रमाणांत वाढत गेली. विशेषतः आचार्यानीं मायावादाची जी कल्पना प्रवचित केली,

तिचा हिंदु समाजावर इतका घाणेरडा परिणाम झाला कीं जिकडे तिकडे आढ्याला तंगड्या टेकणारे ऐदी आणि नशीबाला हात लावणारे निराशावादी यांचा सुळसुळाट उडाला. [आजहि हा मायावाद हिंदूंच्या संसारांत निराशेची भरपूर फोडणी देतच आहे.—**अनुवादक.**]

राष्ट्रांतले लोकच जर दारिद्र्यानें आणि बेबंदशाहीनें चिरडलेले असतील; हव्या त्या जबरदस्ताच्या लुटारूपणाला बळी पडण्याइतके हतबल बनले असतील; शिक्षणाच्या अभावामुळें त्यांच्या बुद्धीची वाढ खुंटलेली असेल; आणि अन्नाच्या दुष्काळामुळें त्यांचा शारिरीक जोम व सोशीकपणा नष्ट झाला असेल; तर कोणी कितीहि मोठा बुद्धीवान् व पराक्रमी पुरूष असला, तरी तो असल्या राष्ट्राला कसा आणि किती वांचवणार?

हवी तशी उधळपट्टी, आधाशीपणा, बेफाम विषयासक्ती आणि मनसोक्त सुरापान या व्यसनांनीं जर वाटेल त्या मनुष्याचा अधःपात होतो, तर ज्या राष्ट्रांत अशीं व्यसनाधीन माणसें बोकाळतात त्या राष्ट्रांचा कां होणार नाहीं?

१० व्या व १२ व्या शतकांच्या दरम्यान रजपूत राजांमध्यें अगम्यगमनाचे व्यसन व आपापसांतील द्वेष भयंकर भडकलेले होते. पुरूषांना स्त्रीजातीचा आदर मुळींच राहिलेला नव्हता. त्यांची कामासक्ती इतकी विलक्षण बेफाम झाली होती कीं स्त्रियांम्हणजे कामशांतीचीं यंत्रें, यापलीकडे ते कांहीं अधिक समजतच नसत. या पाशवी विषयलोलुपतेच्या अतिरेका बरोबरच, संपत्तीची हांव आणि स्वतःसाठीं एखाद्या लहानशा राज्याचा स्वतंत्र प्रदेश मिळविण्यासाठीं प्रत्येक रजपुत तरूण राजपुत्रांची सारखी धडपड सुरू असे.

या तरूण राजपुत्रांच्या बापांच्या—रजपुत राजांच्या—जनानखान्यांत राण्या आणि रखेल्या यांच्या टोळ्याच टोळ्या ठेवलेल्या असत. त्यामुळें कोणतीहि एखादी राणी अथवा रखेली आपल्या त्या दण्डधारी पतिराजाची फारशी कसलीहि किंमत बाळगीत नसे.

हिंदुस्थानांतल्या हिंदु राजांच्या दरवारांत (राजवाड्यांत) मोठमोठ्या सरदारांच्या आणि प्रतिष्ठित नागरीकांच्या बायका मुलींना आमंत्रणें येत असत.हुजूर स्वारींची जिच्यावर नजर जाईल, तिची राजशय्यामंदिरांत रवानगी झालीच पाहिजे. त्यासाठीं हव्या त्या खटपटी लटपटी करण्यांत येत असत. प्रसंगीं, त्या स्त्रीची मनधरणी करण्यासाठीं खुद्द पट्टराणीलाहि, कसल्या तरी शिक्षेच्या अथवा मृत्यूच्या भयानें, कुंटणपणा पत्करावा लागे. स्त्रीजातीची इतकी बेइज्झत व अवहेलना होऊं लागल्यावर त्यांनीं बंडाचा थैमान का करू नये?

खुद्द हुजूर स्वारीच प्रेमपात्रांच्या शिकारींत सदैव बहकलेली, तर जनानखान्यांतील राण्यांनींच पातिव्रत्याची एकनिष्ट जोपासना काय म्हणून करावी?त्यांचीहि प्रेमपात्रें (लव्हर्स) असत. राजवाडेच जेव्हां या महापातकांनीं आरपार सडून गेले तेव्हां साहजीकच त्यांचा घाणेरडा सांसर्ग थेट सरदार दरकदार नागरीकांच्या घरांपर्यंत पचरत गेला. सरदार व दरकदारादि लोकांना राजाकडून जसें वागविण्यांत येई, तसेच हे लोक आपल्या हाताखालच्या लोकांना व मित्रांना वागवीत. [म्हणजे राजानें जर सरदाराची बायको मुलगी अथवा सून पळवून नेली, तर तो सरदार आपल्या समान दर्जाच्या, किंवा हाताखालच्या लोकांवर अथवा मित्रांवर तोच प्रयोग करीत असे. —अनुवादक.] इतकेंच नव्हे, तर राजाच्या कुकर्माचा यथातथ्य सूड उगविण्यासाठीं हे सरदार लोक आपल्या कारस्थानांची सूत्रें थेट राणीवशांत आणि जनानखान्यांतल्या वाटेल त्या राजपत्नी किंवा रखेलीपर्यंत नेऊन भिडवीत असत.

अनुक्रमणिका

छिनाल कंपूंत एक म्हणच सुरूं झाली होती—आणि त्या काळीं छिनाल नव्हता कोण? —कीं हवी ती विवाहित अथवा अविवाहित तरूणी, तोंडानें नुसती शीळ घालतांच गळ्यांत येऊन पडते.

आणि आमचे ब्राम्हण भटजी?समाजाच्या या भ्रष्ट अधःपतनाला त्यांनी कांहींच का हातभार लावला नसेल?कदाचित् ही वस्तुस्थिति सुधारण्याच्या अथवा तिला आळा घालण्याच्या कामीं ते मतिमंद तर नव्हते बनले?

अखेर मजल येथवर आली. तरूण राजपुत्रांना स्वतंत्र प्रदेश आणि स्वतंत्र राज्यें यांच्या प्राप्तीची एवढी भयंकर लालसा उत्पन्न झाली कीं त्यासाठीं आपला राज्यकर्ता बाप शयनमंदिराकडे जात असतां, किंवा अनेकांपैकीं आपल्या एखाद्या आईसह निद्रावश असतां, त्याचा खून करण्यालाहि ते मागें पुढें पहात नसत. विशेष लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट म्हणजे या घाणेरड्या दुष्कृत्यांत या आयांचें खुनशी राजपुत्रांना सहाय मिळत असे. शेकडों राण्या. आपल्या प्रौढ मुलाला राजपद मिळावें, अशी प्रत्येकीची इच्छा. पातिव्रत्य पातळ झालेलें.निष्ठेचें शून्य.नीतिमत्ता तर कोणाच्या गांवीं नाहींच. त्यांत राजकीय सत्तेची आसुरी लालसा! मग काय होणार नाहीं?अखेर राजपुत्रानें राजाचा खून करावा, राजपद बळकवावें, सावत्र आया व सावत्र भावांना ठार मारून टाकावे. ही सर्व राज्यांत एक राजमान्य रूढीच होऊन बसली. खुनशी राणीच्या दृष्टीनें या रूढींत वावगें कांहींच नसे. राजवधाचा प्रयोग पहिल्या प्रथम आपल्या पुत्रानेंच करावा, अशी तिची महत्वाकांक्षा असे. कारण, आपला पुत्र राजपदाधिकारी झाला कीं राजमातेचें थोर पद आयतेंच आपल्या पायांशीं चालून येतें.

बिनबोभाट खून पाडण्याचा आणखी एक प्रकार असे. आपल्या राजपतीची कामतृष्णा शांत करण्यासाठीं राजपत्न्या कुंटिणीचें काम तर करीतच असत. पण आपल्या नवऱ्याचा बिनबोभाट खून करण्याच्या वेळीं, चांगल्या निरोगी स्त्रिया शयनमंदिरांत पाठविण्याऐवजीं, ब्राम्हण भिक्षुकांच्या आणि जडीबुट्टीवाल्यांच्या सहाय्यानें एखादी गांवभवानी वेश्या हुडकून काढीत. हे सहाय्यक त्या वेश्येच्या शरीरांत जालीम विषाची योजना करून ठेवीत. त्यामुळें संभोगस्पर्श होतांच राजा चटकन मरत असे, किंवा हातपात झाडून राम म्हणत असे.

वाचकहो! मुसलमानांच्या स्वाऱ्या बिनधोक या देशावर कां झाल्या, आणि हिंदुस्थानच्या काळजाला त्यांना सफाईंत हात कां घालतां आला, याचीं आणखी कारण-मिमांसा आपणांपुढें केलीच पाहिजे काय?मुसलमानांच्या स्वाऱ्या होण्यापूर्वींच अनेक वर्षे हिंदुसमाजपद्धति सपशेल सडकी कुझकी होऊन बसली होती. प्रतिकार करण्याची कांहींहि शक्ती तिच्यांत उरलेली नव्हती. आंगावर शत्रू चालून आला असतां, त्याला संघटित तोंड देण्यासाठीं चटकन् एकवटण्याची आमची शक्ती आणि बुद्धीच ठार मेलेली होती. अर्थात् असल्या निर्जीव सांगाड्याला जमीनदोस्त व्हायला काय पाहिजे?एक धक्का बसतांच पत्त्याच्या किल्ल्याप्रमाणें धडाड सारा बाजार कोसळला!

महाभारताच्या काळापासून आमच्या ब्राम्हणी संस्कृतीचा प्रवाह प्रगतीच्या मार्गानें एकसारखा वहात होता, त्यामुळें सारीं जनता दुधामधाच्या समृद्धींत सुखसंपन्न होती, पण अवचित हे म्लेंच्छ मुसलमान आले आणि त्यांनीं आमच्या हिंदुराष्ट्राची धूळधाण केली; असा एक मूर्खपणाचा आणि चुकीचा समज अझून आमच्या लोकांत आहे. त्या बिचाऱ्यांना वाटतें कीं रामाचा आणि युधिष्ठिराचा काळ संपतांच एकदम मुसलमानी टोळधाड या देशावर कोसळली आणि त्यांच्या रियासतीला सुरवात झाली. मुसलमानांच्या या

अनुक्रमणिका

देशांत प्रवेश होण्यापूर्वीशेंकडों शतकांचा काळ गेला, हें त्यांच्या लक्षांत येतच नाहीं. परंतु मुसलमान येथें येण्यापूर्वी बराच काळ सारा हिंदु समाज भयंकर चिळसवाण्या स्थितींत भ्रष्ट होऊन नासला सडला होता, म्हणूनच मुसलमानांना हा देश काबीज करून येथें राज्यकर्ते म्हणून वसति करतां आली.

वाचक मित्र! हिंदु जनांचा ऱ्हास आणि अधःपात कसकसा होत गेला हें मी आतांपर्यंतच दाखविलें. यासाठीं हिंदुस्थानच्या प्राचीन इतिहासाची रूपरेषा मला जशी दिसली तशी ती आपल्या पुढें मांडली आहे. विषय पडला मोठा आणि माझा निबंध पडला छोटा, तेव्हां गतेतिहासाचें हें सिंहावलोकन मला धांवत्या दृष्टीनें करावें लागलें आहे, याची मला जाणीव आहे.

गेल्या अनेक शतकांच्या कटु अनुभवानें शहाणे होऊन, आपल्या समाजाची विशेष सौख्यकारक सुधारणा करण्याची आज तरी हिदुजन कांहीं खटपट करीत आहेत काय?प्रगतीसाठीं उत्क्रांतीचे त्यांचे कांहीं प्रयत्न सुरू आहेत काय?मला तर कोठें कांहीं दिसत नाहीं. आपलें घर ठाकठीक व्यवस्थेंत बसविणारी एकहि समाजोद्धारक चळवळ सध्यां हिंदु समाजांत चालूं असल्याचें मला दिसत नाहीं आणि माझ्या ऐकीवांतहि नाहीं.

राष्ट्र दृष्टीनें हिदुस्थानाचा पूर्वी जो अधःपात झाला, आणि आजहि जो चालूंच आहे, त्यावर या निबंधासाठीं मी आणखी विचार करण्यांत मग्न असतां, मला गाढ झोप लागली. भारतमाता माझ्या समोर उभी आहे आणि ती मला एक निर्वाणीचा संदेश देत आहे, असें मला स्वप्न पडलें. हा

## भारतमातेचा संदेश

येथें नमूद करून, मी आपल्या निबंधाचें भारतवाक्य करतों.

"ज्या गोष्टी तुझ्या मनाला आज त्रस्त करीत आहेत, त्याच हिंदस्थानच्या दुर्दैवाला मूळ कारण आहेत. पण त्यांचा निरास करण्याचें आजपर्यंत कोणाला सुचलें नाहीं व साधलेंहि नाहीं. तुमच्या समाजाच्या एका भागानें दुसऱ्या भागावर हवा तो जुलूम हवा तो अन्याय करावा, आणि त्या अन्यायपीडित संघानें तोंडांतून प्रतिकाराचा एक ब्रसुद्धां काढूं नये, मिटल्या तोंडीं सर्व आघात सहन करावे, या शेळपटपणांतच तुमच्या राष्ट्रीय दुर्दैवाची खरी मख्खी आहे, हें तुला अझूनहि उमगूं नये ना?जुलूम जबरदस्तीखालीं जेर झालेल्या कष्टी लोकांनींच टरारलेल्या मनगटाचा ठोसा ठणकाऊन आपल्या कष्टांचें परिमार्जन कां करून घेऊं नये?

"तुमची ती काशी आणि इतर यात्रा करण्याची क्षेत्रें नीट पहा. अनन्वित पापाचरणांचीं घाणेरडीं गटारें, मोऱ्या, नरककुंडें होऊन बसलीं आहेत! असल्या या भिकार स्थळांच्या महात्म्याची कुंटणगिरी करणें, हेंच का तुम्हां हिंदुजनांचें आजचें ध्येय?एकमेकांविषयीं तुसडेपणा, आणि कोणाची कोणाला कधि कळ यायची नाहीं असला बेदर्दीपणा तुमच्यांत बेफाम बोकाळल्यामुळें, आज असा कोणता सद्गुण आहे, कोणतें पुण्यकर्म आहे, कीं ज्याचा या हिंदुस्थानांत हरघडीं चेंदामेंदा होत नाहीं?लोकांत मुळीं जिव्हाळ्याची कळकळच उरली नाहीं. न्याय अन्याय, खरें खोटें, योग्य अयोग्य पारखण्याची तुमच्या आत्म्याची मुळीं संवेदनाच मेलेली. मग बाबांनों, सत्याकरितां आणि न्यायाकरितां प्राणार्पण करण्याची गोष्ट कशाला? 'माझा

अनुक्रमणिका

मी मुखत्यार. तुला कायकरायचें?’ ही ज्याची त्याची मगरूरी. या व्यसनापुढे सदभिरूची, तडजोडीची उदार वृत्ति आणि परमतसहिष्णुतेचा दिलदारपणा यांची पार माती होऊन गेली आहे.

“तुमच्या स्वतःच्याच दुष्कर्मानें निर्माण केलेल्या पापाचरणांच्या उकीरड्यांच्या राशी प्रथम या देशांतून निपटून काढा. हें काम तुमचेंच आहे. तें तुम्हांलाच केलें पाहिजे. धर्म, कला, वाङ्मय, राजकारण, व्यापार, धंदा, व्यवसाय, बाजार, इत्यादि सर्व क्षेत्रांत, फार काय पण लोकव्यवहाराच्या प्रत्येक बारीक सारीक बाबींत, जेवढे म्हणून लफंगे लुच्चे भोंदू दांभिक टगे आढळतील, त्यांना ठिकच्या ठिकाणी ठेंचल्याशिवाय सोडूं नका.

“बुद्धिमान, संपत्तिमान, वजनदार, प्रतिष्ठित आणि लोकनेतृत्वाला लायक असे लोक हे प्रत्येक देशाचे जिम्मेदार (ट्रस्टी) होत. देशाचा त्यांच्यावरच सारा भार व भरंवसा असतो. तुमच्या हिंदुस्थान देशांत असले लोक कांही स्वतःच पक्के लाळघोट्ये आहेत, तर कांही लोकांच्या लाळघोटेपणाच्या पचनीं पडणारे आहेत. सत्य तत्त्वां एवजीं असल्या झब्बूंचे देव्हारे या देशांत पुजले जात आहेत. पूजा करणारे आणि पूजा करून घेणारे, दोघेहि वाममार्गी. ज्यांच्यापाशीं कांही तरी आहे त्यांनी ज्यांच्यापाशीं काहींच नाहीं त्यांच्यासाठीं आपल्या सर्वस्वाचा होम केला पाहिजे. बाबारे, आज या भारतमातेला स्वार्थत्यागी लोकांची गरज आहे. आत्मयज्ञ करणारे वीर मला पाहिजेत. लोकशिक्षणाचें आणि लोकनेतृत्वाचें काम ज्यांनी हातीं घेतलें आहे, त्यांनींच आत्मयज्ञाची शिकस्त केली पाहिजे.

“तुमचे धार्मिक विधी, आचार विचार आणि तुमच्या जातिविषयक रीतीभाती आज अगदीं हलकट बनलेल्या आहेत. कारण त्यांत सत्याचा लवलेशहि उरलेला नाहीं. अरे, ब्राम्हणधर्माचें खरें स्वरूप म्हणजे काय समजतां?निर्भेळ सत्याचा आणि स्वार्थत्यागाचा अर्क पाहिजे अर्क. तरच त्याला सनातन धर्म हें नांव शोभेल. असलाच धर्म तुमचीं भटें भिक्षुकें तुम्हांला शिकवितात काय?मुळींच नाहीं. त्रिवार नाहीं. जेथें धर्म कशाशीं खातात हेंच त्यांना माहीत नाहीं, तेथें ते शिकवणार तरी काय आणि अध्यात्माची त्यांना दृष्टी आल्याशिवाय ‘वर्णाश्रम धर्मा’ चा खरा अर्थ त्यांना उमजणार तरी काय!

“शक्तीपूजा म्हणजे काळ्या फत्तराच्या एका अक्राळ विक्राळ देवीची, भरंसाट भेसूर प्रकारानें आज तुम्ही करीत असलेली पूजा नव्हे, तुमच्या सामाजीक घाशीरामीखालीं दडपून पडलेल्या देशांतील स्त्रीजातीच्या पवित्र हृदयांत तुमच्या राष्ट्राची शक्ती धमधमत आहे. जुन्या चित्रकारानें शक्तीचें—काली देवीचें—जें चित्र रंगविलेलें आहे, त्यांतील तपशिलाच्या चिन्हांच्या वास्तविक अर्थ कोणालाच समजत नाही. प्राचीन चित्रकार आपल्या गूढ भावनांना चिन्हांच्या द्वारें व्यक्त करीत असत. कालीचें चित्र कसें आहे?एक नग्न उग्र स्त्री. हातांत नागवी तलवार.गर्द निळा रंग. गळ्यांत माणसांच्या मुंडक्यांच्या माळा. बेफाम थैमान घालीत आहे. ही तुमच्या कालीदेवीची मूर्ती. तिच्या पायाशीं तुडवून लाथाडून पडला आहे तो कोण?हें चिन्ह काय दर्शवितें?कालीदेवीनें लाथाडून लोळविलेला तो भिक्षुकशाहीचा दांभिक व लुच्चा भट आहे. सत्याची नागवी तलवार परजीत, आपल्या वाजवी हक्कांसाठीं, कालीदेवीला या भटाला चिरडून जमीनदोस्त करणेंच प्राप्त आहे.विचार करा. सावध व्हा. नाहींतर, आज तुमच्या गुलामगिरीखालीं दाबून गेलेली स्त्रीजात— हिंदुस्थानची शक्ती—कालीदेवी संतापानें भडकून जाऊन, भरतभूमीवरून या दांभिक लबाड भिक्षुकशाहीचें तळपट उडविण्यासाठीं खरोखरच नागवी तलवार प्रत्यक्ष परजीत, भयंकर थैमान घालायला सोडणार नाहीं. असा दिवस उगवूं देणें वा न देणें तुमच्या हातीं आहें.

अनुक्रमणिका

“स्त्रिया माणसें आहेत, त्यांना कांही हक्क आहेत. याची जाणीव करून घ्या. लबाड भिक्षुकशाहीच्या घाणेरड्या भिकार शिकवणीच्या पचनीं पडल्यामुळें, तुमचा एकजात स्त्रीवर्ग भटाभिक्षुकांचा गुलाम बनला. त्यामुळेंच तुम्हां हिंदुजनांचा सत्यानाश झाला, तुमचा मर्दानीपणा छाटला गेला आणि बरें वाईट निवडण्याची तुमची विवेकशक्ती ठार मेली. एखादी योग्य गोष्ट करण्याचा तुम्हाला उमाळा येतो; पण तुमच्या सामाजिक (जातिविषयक) बंधनांचा बागुलबोवा पाहतांच, तुमचा तो उमाळा, विद्युल्लतेच्या क्षणिक चमकीप्रमाणें, ठिकच्या ठिकाणीं पार विरघळून जातो. उमाळ्याच्या या क्षणिक चमकीमुळें तरी तुम्ही किती गडद अंधःकारांत पडलेले आहांत, किती नैतिक नामर्द बनला आहांत आणि तुमची आत्मिक अधोगति किती झाली आहे, हें स्पष्ट दिसून येतें.

“तुमचे पौरूष पराक्रमी होण्यासाठीं स्त्रियांच्या आत्मतेजाची शक्ती तुमच्या पाठिंब्याला धाऊन आली पाहिजे. स्त्रियांची शक्ती जागृत आणि तेजस्वी बनण्यासाठी त्यांचे कौमार्य बलशाली राखलें पाहिजे. कुमारिकांचें कौमार्य म्हणजे प्रत्येक मानववंशाच्या उपवनांतील सुंदर सात्विक पवित्र पुष्पच होय. परंतु, अरेरे! तुमच्या हिंदुसमाजांत कामातुर धटिंगांच्या उतावळ्या स्पर्शानें या पुष्पांना हिसडा मारून अकालीं खुडण्यांत येते, त्यांचा अपमानकारक भंग करण्यांत येतो. त्या पवित्र कौमार्य-पुष्पाचा तुम्ही हवा तसा चोळामोळा करून टाकता!

“तुमच्या मुलींना लख्ख सूर्यप्रकाशांत वाढूं द्या. त्यांच्या भोंवतीं कसल्याहि खोट्या नकली कृत्रिम किंवा दांभिक परिस्थितीचें आवरण आणि भिक्षुकशाहीच्या लुच्चा दांभिक भटांची सावली सुद्धां पडूं देऊं नका, मग पहा, त्या खऱ्याखुऱ्या मर्दांना जन्म देणाच्या लायकीच्या प्रभावशाली युवति बनतील. त्यांच्या शक्तीच्या प्रभावानें तुम्हाला सुद्धां त्या मर्द बनवतील. सध्यां तुमच्या पोटीं माणसें जन्मत नसून, होते आहे ही कृमिकीटकांची पैदास आहे. याचें कारण हेंच आहे कीं ज्या कुमारिकांना प्रेमशून्य कामवासनेनें कोणी स्पर्शहि करतां कामां नये, त्या कुमारिकांचे कौमार्य बळजबरीनें भ्रष्ट करण्यास तुमच्या भटभिक्षुक गुरूंची शिकवणी आजवर उत्तेजन देत आलेली आहे.

“विवाहविधीच्या गोंडस सबबीखालीं माणुसकीला लाज आणणारे असले अत्याचार करण्यापेक्षां, तुम्ही विवाहाचा पोंकळ प्रतिष्ठितपणा कायमचा बंद पाडाल तर फार बरें होईल! या तुमच्या भ्रष्ट विवाह-पद्धतीनें, अर्ध्याकच्च्या कमकुवत पोराबाळांची पैदास करून, तुम्ही आपल्या हिंदुजातीची आत्महत्या मात्र करीत आहांत.

“या तुमच्या कर्मांमुळे अखिल मानवतेपुढें तुमची जाती किती तिरस्करणीय अवस्थेंत उभी आहे, हें न दिसण्याइतके तुम्ही कितीहि आंधळे झाला असला, तरी देवाला हें सर्व दिसत आहे. हिंदु म्हणजे देवाचे असे कोण, मोठे लाडके लेक लागून गेले आहेत कीं, त्यांनीं जननकार्याच्या त्याच्या पवित्र आणि गुप्त नियमांचा हवा तो उच्छेद करावा, हवी तशी पायमल्ली करावी, आणि त्याबद्दल निसर्गप्राप्त कोणत्याहि शिक्षेचा फटका त्यांना कधिं बसूं नये?

“तुमच्या अस्तित्वाला दडपीत चिरडीत नेणाऱ्या न्यायनिष्ठुर कर्मन्यायाची याद राखा. कर्मन्यायाचा कचकाच असा आहे कीं त्याला व्यक्तीची पर्वा नाहीं कीं जातीची किंमत नाहीं. आडवा आला कीं काप, एवढेंच त्याला माहीत. या पुराणप्राचीन जगतांत आजपर्यंत शेंकडों मानववंश नामशेष झाले. सफाई अस्तित्वांतून उठले. कालीदेवीच्या गळ्यांत जी नररूंडमाळा घातलेली आहे, ती विचारपूर्वक पहा. प्रत्येक

मुंडकें म्हणजे पृथ्वीतलावरून कर्मन्यायानें नष्ट झालेल्या एकेका मानव वंशाची निशाणी आहे. कालीदेवीचें हें अर्थपूर्ण चित्र काढणाऱ्या प्राचीन चित्रकाराला निसर्गन्यायाची बरीच माहिती होती, असें नाहीं का तुम्हाला वाटत?पण तुमच्या भिक्षुकशाही गुरुवर्यांना?

"कर्मन्यायाचा असा कडक शिस्तीचा दण्डक आहे कीं हिंदुस्थानांत न्याय समता आणि योग्य तत्वें यांचा अंमल सुरू होऊन, त्याबरहुकूम प्रगतिचक्राची गति पुढें गेलीच पाहिजे. या चक्राला विरोध करणाऱ्यांच्या अर्थात् चिंधड्याच उडणार! ज्या धार्मिक-सामाजिक पातकांनी लोखंडी शृखळांपेक्षाहि तुमचे हात पाय अधिक बळकट जखडून आवळून टाकले आहेत, त्या पातकांना जितक्या लवकर नष्ट कराल, तितक्या लवकर तुमची प्रगति होईल.

"जे अधिक बलवान व पुढारलेले असतील त्यांनी खालीं पडलेल्या लाथाडलेल्या हतबलांना हात देऊन वर घेतले पाहिजे. ज्या घाणेरड्या धार्मिक सामाजिक नियमांमुळें वर चढलेले वरवरच तरंगत आहेत आणि खालीं पडलेले खोलखोल बुडत आहेत, त्या सर्व नियमांचा चेदामेंदा केला पाहिजे. याचा परिणाम कांहींहि होवो, त्यापायीं वाटेल तें नुकसान होवो, व्यक्तींना दुःख भोगावे लागो वा समाजाला लागो, असल्या अन्यायी नियमांची राखरांगोळी केलीच पाहिजे.

"कोणा एखाद्या विवक्षित राष्ट्राकरितां अगर जातीकरिता नव्हें तर अखिल मानवतेचा उद्धार करणारे एक साधन म्हणून, निसर्गाच्या मुशींत हिंदुस्थानची पुनर्घटना होत आहे. राष्ट्रीयत्वाच्या संकुचित कल्पनेचा यापुढें अंत होऊन, अखिल मानवतेच्या हितवादाची महत्वाकांक्षा बळावून ती विजयी झाली पाहिजे. आम्ही सर्व हिंदुस्थानवासी जन भाऊ भाऊ आहोंत, या उच्च मनोवृत्तीच्या भावनेची प्रभात होण्यापूर्वी कल्पनातीत क्लेशांच्या दिव्यांतून गेले पाहिजे, वर्णभेद जातिभेद मतभेद कांहींहि असले, तरी आम्ही सर्व हिंदवासी भाऊभाऊ आहोंत, या भावनेच्या आणि माणुसकीच्या प्रकाशानें आपापली घरें प्रकाशित करा."

॥ वंदे मातरम् ॥

अनुक्रमणिका

# प्रबोधनकार ठाकरे
# समग्र वाङ्मय

## खंड चौथा

देवळांचा धर्म
आणि
धर्माची देवळें

अनुक्रमणिका

**प्रबोधन ठाकरेकृत**
**नवमतवादी माला**

# देवळांचा धर्म आणि धर्माचीं देवळें

—⋄○⋄—

**पुष्प १ लें**

**किंमत एक आणा.**

मुद्रक व प्रकाशक :— नारायण प्रभाकर वैद्य,
श्रीदत्तात्रय छापखाना, ९९ रविवार पेठ,
पुणें शहर.

प्रती] [१,०००

अनुक्रमणिका

## देवळांचा धर्म आणि धर्माचीं देवळें-

**को**णतीहि वस्तु स्थिति अथवा कल्पना प्रथमतः कितीहि चांगल्या हेतूच्या पोटी जन्माला आलेली असली, तरीकाळ हा असला इलमी जादूगार आहे की आपल्या धांवत्या गतीबरोबर त्या हेतूचे रंग आरपार बदलून, त्या वस्तूला स्थितीला आणि कल्पनेला सुद्धां उलटी पालटी करून टाकतो. पूर्वी स्तुत्य वाटणारी गोष्ट आज सर्वथैव निंद्य कशी ठरते, याचेंच पुष्कळांना मोठें कोडें पडतें. पण तें उलगडणें फारसें कठीण नाही. काळ हा अखंड प्रगमनशील आहे. निसर्गाकडे पाहिलें तरी तोच प्रकार.कालचें मूल सदा सर्वकाळ मूलच रहात नाहीं. निसर्ग धर्मानुसार कालगतीबरोबरच त्याचेंहि अंतर्बाह्य एकसारखें वाढतच जातें आणि अवघ्या १८ वर्षांच्या अवधींत तेंच गोजिरवाणें मूल पिळदार ताठ जवानाच्या अवस्थेंत स्थित्यंतर व रूपांतर झालेलें आपणांस दिसतें. काळाच्या प्रगतीच्या तीव्र वेगामुळें झपाझप मागें पडणारी प्रत्येक वस्तुस्थिती आणि कल्पना, ती जर दगडा धोंड्याप्रमाणें अचेतन अवस्थेंत असेल तर, प्रगमनशील डोळ्यांना ती विचित्र आणि निरूपयोगी दिसल्यास त्यांत काहींच चुकीचे नाही. जेथें खुद्द निसर्गच हरघडी नवनव्या थारेपालटाचा कट्टा अभिमानी, तेथें मनुष्याचा जीर्णाभिमान फोलच ठरायचा. जुनें तें सोनें ही म्हण भाषालंकारापुरती कितीहि सोनेमोल असली तरी जुन्या काळच्या सर्वच गोष्टी सोन्याच्या भावाने आणि ठरलेल्या कसाने नव्या काळाच्या बाजारांत विकल्या जाणे कधींच शक्य नाहीं. उत्क्रांतीच्या प्रवाहांत वहाणीस लागलेल्या मानवांनी काळाच्या आणि निसर्गाच्या बदलत्या थाटाबरोबर आपल्या आचार विचारांचा थाट जर शिस्तवार बदलला नाहीं, तर कालगतीच्या चक्रांत त्यांच्या चिंधड्या चिंधड्या उडाल्याशिवाय राहावयाच्या नाहींत. निसर्गाचा न्याय आंधळा असला तरी कांटेकोर असतो. काळाची थप्पड दिसत नाही. पण त्याच्या भरधांव गतीपुढें कोणी आडवा येतांच छाटायला मात्र ती विसरत नाहीं. प्रवीण वैद्याची हेमगर्भ मात्रा वेळीं एखाद्या रोग्याला मृत्युमुखांतून ओढून काढील. पण निसर्गाचा अपराधी ब्रह्मदेव आडवा पडला तरी शिक्षेवांचून सुटायचा नाहीं. पूर्वी कोणेकाळीं मोठ्या पुण्यप्रद वाटणाऱ्या किंवा असणाऱ्या गोष्टी आज जर पापाच्या खाणी बनलेल्या असतील, तर केवळ जुनें म्हणून सोनें एवढ्याच सबबीवर त्या पापाच्या खाणींचे देव्हारे माजविणें, म्हणजे जाणून बुजून काळाची कुचाळी करण्यासारखें आहे. अर्थात् असल्या कुचाळीचा परिणाम काय होणार, हें सांगणें नकोच.

काळाच्या कुचाळ्या करण्यांत हिंदु जनांनीं दाखविलेला पराक्रम आज त्यांच्या सर्वांगीण अधःपातांत स्पष्ट उमटलेला आहे. आजचा हिंदु समाज ‘समाज’ या नांवाला कुपात्र ठरलेला आहे. हिंदुधर्म हे एक भलें मोठें भटी गौडबंगाल आणि हिंदु संस्कृति म्हणजे एक.

### बिन बुडाचें पिचकें गाडगें

या पेक्षां त्यांत विशेष असें काहींच नाहीं. उभ्या हिंदुस्थानांत दुर्गादेवी दुष्काळ बोकाळला तरी भटांच्या पोटापाण्याच्या प्रश्नाला भटेतरांच्या फाजील उदारपणामुळें कसलाच चिमटा बसत नाहीं. यामुळें धर्म संस्कृति संघटण इत्यादि प्रश्नांवर पुराणें प्रवचनांची तोंडझोड उठविण्याइतकी त्यांची फुप्फुसें अझून बरींच दणकट राहिलीं आहेत. म्हणून पुष्कळ बावळटांना अझून वाटतें कीं हिंदु समाज अझून जिवंत आहे. एकूण एक व्यक्तीं द्वैतानें सडून गेलेली स्वच्छ दिसते, तरी ‘द्वैतांतच अद्वैत आहे’ म्हणून शंख करणारे तत्वज्ञानीही काहीं कमी आढळत नाहींत. परंतु वास्तविक स्थिति विचारवंतांना पूर्ण कळलेली आहे. ‘द्वैतांतच अद्वैत’ अजमवण्याची भटी योगधारणा आमच्या सारख्या सुधारकांना जरी साधलेली नाहीं, तरी कालचक्राशीं हुज्जत खेळणाऱ्या हिंदु समाजाचें भवितव्य अजमवण्यासाठीं ज्योतिषीबुबांचे पायच कांहीं आम्हाला धरायला नको.

अनुक्रमणिका

सभोंवार परिस्थितीचा जो नंगा नाच चालूं आहे, आत्मस्तोमांच्या टिकावासाठीं भिक्षुकशाहीचीं जीं कारस्थानें गुप्तपणानें सुरू आहेत, आणि दिव्यावरच्या पतंगाप्रमाणें भटेतर लोक या कारस्थानांत जे फटाफट चिरडले जात आहेत, त्यावरून हिंदु समाजाचें भविष्य फारसें उज्वल नाहीं, असें स्पष्ट नमूद करायला या लेखणींस फार कष्ट होत आहेत. निराशाजनक अशाहि अवस्थेंत हिंदुसमाज जगविण्याचे कांहीं राजमार्ग आमच्या धर्मबांधवांना सुचविणें हेंच वास्तविक प्रबोधनाचें आद्य कर्तव्य आहे. राजमार्गाच्या आमच्या सूचना इतर डळमळीत सुधारकांप्रमाणें

## मोहरी एवढी गोळी आणि बालदीभर पाणी

अशा नाजूक होमिओपॅथिक मासल्याच्या केव्हांही नसणार. प्रबोधनाच्या सूचना म्हणजे थेट सर्जरीच्या (शस्त्रक्रियेच्या). पत्करल्या तर प्रयोग करून पहा. तात्काळ दुःखमुक्त व्हाल. नाहींतर होमिओपॅथिक गुळण्या, भटांचे संघटणीं काढे निकाढे, पुराणप्रवचनांच्या, लेक्चरबाजीच्या मलमपट्या आणि पक्षोपपक्षांची वातविध्वंसक नारायण तेलें आहेतच. बसा चोपडीत जन्मभर!

आमचा आजचा धर्म हा मुळीं धर्मच नव्हे. प्रचलित भिक्षुकशाही धर्म म्हणजे बुळ्या बावळ्या खुळ्यांना झुलवून भटांची तुंबडी भरणारें एक पाजी थोतांड आहे. या थोतांडाच्या भाराखाली अफाट भटेतर दुनिया माणूस असून पशूपेक्षांही पशू बनली आहे. त्यामुळें आमच्या सर्वांगीण हलाकीचें मूळ भटांच्या पोटांत आहे. त्याच्या गोडबोल्या ओठांत नव्हें; हे शेंकडा दहा लोकांना पटतां पटतांच एक शतक काळाच्या उदरांत गडप झालें.

भटेतरांच्या धार्मिक गुलामगिरीच्या थोतांडांत देवळांचा नंबर पहिला लागतो. देवळांची उत्पत्ति ब्रह्मदेवाच्या बारशाला खास झालेली नाहीं. हिंदुधर्माची ही अगदी अलिकडची कमाई आहे. देऊळ हा देवालय या शब्दाचा अपभ्रंश आहे. देवाचें जे आलय-वसतिस्थान-ते देवालय. आमचें तत्वज्ञान पहावें तों देव 'चराचर व्यापुनि' आणखी वर 'दशांगुळें उरला' अशा सर्वव्यापी देवाला चार भिंतींच्या आणि कळसबाजघुमटाच्या घरांत येऊन राहण्याची जरूरच काय पडली होती! बोरीबंदरवर उतरलेल्या नवख्या प्रवाशाला सभागृहांत किंवा ताजमहालांत जाण्याचा जसा प्रसंग येतो, तसा 'चराचर व्यापूनी दशांगुळें उरलेल्या' देवाला सारें जग ओसाड टाकून हिंदूंच्या देवळांतच येऊन ठाणें देण्याचा असा कोणता प्रसंग ओढावला होता नकळे. बौद्ध धर्म हिंदुस्थानांतून परागंदा होईपर्यंत (म्हणजे इसवी सनाचा उदय होईपर्यंत) तरी भारतीय इतिहासांत देवळांचा कोठेंच कांही सुगावा लागत नाहीं. मग तोंपर्यंत आमचे हे हिंदु देव थंडीवाऱ्यांत कुडकुडत आणि उन्हातान्हांत धडपडत पडले तरी कोठें होते?विद्वान संशोधकांच्या मतें आर्यांच्या ऋग्वेदकाळाची गणना जास्तींत जास्त इसवी सनापूर्वी ७००० वर्षे धरलीं, तर इतकीं वर्षे हे आमचे मोक्षदाते देव देवळाशिवाय जगले तरी कसे आणि कोठें?आजचा त्यांचा देवळांतला थाट पाहिला, तर जिवंत माणसाला एक वेळच्या कोरड्या भाकरीची पंचाईत, पण या देवांना सकाळची न्याहरी, दुपारीं पंचपक्वान्नाचें भरगच्च ताट, पुन्हां तीन प्रहरी टिफीन आणि रात्री जेवण! याशिवाय दिवस सुना जायचा नाहीं. याशिवाय काकडआरत्या, माकड आरत्या, धुपार्त्या, शेजार्त्या आहेतच. कोट्यवधि गोरगरीब हिंदूंना, विशेषतः धर्मश्रद्धाळु हतभागी अस्पृश्यांना थंडीच्या भयंकर कडाक्यांत गोणपटाचें ठिगळहि मिळण्याची पंचाईत; पण आमच्या देवाना छपरीपलंग, मच्छरदाणी गाद्यागिरद्यांशिवाय भागायाचेंच नाहीं. खुशालचेंडू श्रीमंताप्रमाणे असल्या अखंड ऐश्वर्यात लोळणाऱ्या देवांची स्थिति देवळें निर्माण होण्यापूर्वी कशी असावी, याची प्रत्यक्ष प्रदर्शने म्हणून तर भिक्षुकशाहीच्या आद्य शंकराचार्यानी महारवाडे, मांगवाडे, धेडवाडे व

भंगीवाडे निर्माण करून ठेवले असावेत काय?आमची खात्री आहे कीं, देवळें नव्हतीं तेव्हां आमच्या देवांच्या नशिबी महारा मांगाप्रमाणेंच.

**मसणवटीची कर्मप्राप्त राहणी**

लागलेली असावी. या राहणींतून आपला उद्धार व्हावा आणि काकड-माकड आरत्यांचे आणि घंटानगाऱ्याचें ऐश्वर्य आपणांस लाभावें, म्हणून आमच्या देवळ्या देवांनी भटांची खूप पायचाटी केली; तेव्हा भटांच्या वेदोक्त मेहरबानीनें त्यांना तुरुंग वजा देवळांतली भटमान्य राजविलासी राहणी लाभली.

देवळें आणि देव यांची आज कशीं विल्हेवाट लावावी याचा विचार करण्यापूर्वी, या दोन संस्था मूळ अस्तित्वांत कशा आल्या, याची रूपरेषा वाचकांपुढे ठेवणें जरूर आहे. यासाठी आर्यसंस्कृतीच्या जोडीनेंच इजिप्त आणि मेसापोटेमियाकडे परिणत होत असलेल्या सेमेटिक लोकांच्या संस्कृतीचा प्राचीन इतिहास आपण संक्षेपानें समालोचन केला पाहिजे. आर्यांप्रमाणेंच सेमेटिक लोक गुरेंढोरें पाळून, आज या ठिकाणीं तर उद्या त्या ठिकाणीं वसाहत करणारे धाडशी भटके होते. आर्यांनीं ऋग्वेद रचनेपर्यंत, म्हणजे निसर्गपूजनापर्यंत आपल्या धर्मविषयक कल्पनेची कांही तरी ठळक रूपरेषा आखली होती. पण सेमेटिक लोक धर्मविषयक कल्पनेंत इतके व्यवस्थित बनलेले नव्हते. आस्ते आस्ते ते निश्चित धर्मकल्पना बनविण्याच्या घटनेत होते. तथापि आर्य झाले काय किंवा सेमेटिक झाले काय, 'धर्म' शब्द उच्चारतांच आज आपल्या ज्या कांही भावना होतात,त्या भावनांचा त्यावेळी दोघांनाही काही थांग लागलेला नव्हता. आर्यांनी पंजाब सर केल्यावर आणि त्यानंतर अनेक शतकें त्यांच्या धर्मकल्पनेंत देवळे घुसली नव्हतीं, त्यांच्या संघ-व्यवस्थेंत राजन्यांच्या (क्षत्रियाच्या) पाठोपाठ उपाध्यायांचा भिक्षुक भटांचा, वर्ग जरी निर्माण झाला होता, तरी देवळांची कल्पना कोणालाच स्फुरण पावलेली नव्हती. या बाबतींत इजिप्तकडच्या सेमेटिक व सुमेरियन संघांनीच प्रथमतःपुढाकार घेतल्याचे इतिहासावरून दिसते. इजिप्त आणि मेसापोटेमियांत शहरांची प्रथम वस्ती होऊ लागली. त्याचवेळीं प्रत्येक शहरांत एक किंवा अनेक देवळांचा उगम प्रथम झालेला आढळतो. हीं देवळे सामान्यतः राजवाड्यांनजीकच असत. मात्र देवळाचा घुमट राजवाड्याच्या घुमटापेक्षां विशेष उंच बांधण्यांत येत असे. देवळांचा हा प्रघांत फिनीशियन, ग्रीक व रोमन शहरांतहि पुढें पसरत गेला. इजिप्त आणि सुमेरप्रमाणेंच आफ्रिका युरप आणि आशियाच्या पश्चिम भागांकडे जेथे जेथे प्राचीन संस्कृतीचें पाऊल पडत गेलें, तेथें तेथें देवळांची उत्पती प्रथमतःच ठळकपणे इतिहासांत दृष्टीस पडते. अखिल मानवांच्या उत्क्रांतीच्या व संस्कृतीच्या इतिहासांत देवळांची कल्पना ही अशी प्रथमच जन्माला आलेली आहे.

या सर्व देवळांत आंतल्या बाजूस एक देवघर किंवा गाभारा असे, त्यांत अर्ध पशू व अर्धमानव अशा स्वरुपाची एक आक्राळ विक्राळ अगडबंब मूर्ती बसविलेली असे. त्याच्या पुढें एक यज्ञकुंड असून देवाला द्यावयाच्या बळीचीं त्यावर कंदुरी होत असे. ही मूर्ती म्हणजे देव किंवा देवाचें प्रतिक म्हणून व देऊळ म्हणजे या देवाचे वसतिस्थान म्हणून मानण्यांत येत असे. देऊळ नव्हतें तोंपर्यंत देव नव्हता, अर्थांत त्याच्या सेवेकऱ्यांचीहि गरज नव्हती व उत्पतीहि नव्हती. पण देवळांत देव येऊन बसल्यावर त्याच्या पूजाअर्चेसाठी शेकडो भट आणि भटणी, तेलबत्तीवाले, झाडूवाले, कंदुरीवाले, धुपार्ती, शेजार्तीवाले, असे अनेक लोक निर्माण झाले. प्रत्येक जणाचा पेहेराव निराळा. लोकांतले शिष्ट लोकमान्य काय ते हे. आर्यांप्रमाणें, जो क्षत्रिय तोच ब्राम्हण, तोच गृहपती यजमान, वेळ पडेल तसें काम करणारा, ही पद्धत या लोकांत नव्हती, यांनी आपापला एक निराळाच ठराविक व्यवसायाचा संघ बनविला. भट म्हणजे भट, मग तो कंदुरी

करायचा नाहीं, कंदुरीवाला निराळा. सारांश, प्रत्येकाने आपापली एक ठराविक धंद्याची जातच बनविली; आणि बहुजन समाजांतले पुष्कळ हुषार लोक देवळाच्या या बैठ्या परंतु किफायतशीर धंद्यात घुसले.

भटाचें काम दगड्या देवाची पूजा आणि यज्ञांतल्या कंदुऱ्या यथासांग करावयाच्या. हे यज्ञयाग दररोज न होता कांहीं ठराविक दिवशींच व्हावयाचें लोकांची भटकी वसाहत-प्रवृत्ती आता बरीच शिथिल होऊन, त्यांना शहरवासाची चटक लागत चालली होती. सहा दिवस काबाडकष्ट केल्यावर सातवा दिवस विश्रांतीचा असावा, त्याचप्रमाणें वर्षातले कांहीं दिवस सण मानावे, अशी प्रवृत्ती होत गेली; आणि हे विश्रांतीचे किंवा सणाचे दिवस कोणते हें ठरविण्याचा मामला देवळांतल्या भटोबाकडे असे. तीथवार, सण, खडाष्टक, फडाष्टक इत्यादि भानगडी देवळांमधूनच लोकांना कळत असल्यामुळें, देऊळ म्हणजे त्या काळाचें चालतें बोलतें कॅलेंडर उर्फ पंचांगच म्हटलें तरी चालेल.

पण आणखीहि बऱ्याच गोष्टी या प्राचीन देवळांत घडत असत. लिहिण्याची कला याचवेळीं अस्तित्वांत आली होती. त्यामुळें शहरांतली व खेड्यापाड्यांतली हरएक गोष्ट समारंभ किंवा बरा वाईट प्रसंग देवळांतच टिपून ठेवण्यांत येत असे. देऊळ म्हणजे सार्वजनिक रिकार्ड हापीस. ज्ञानभांडारहि येथेंच.सणवारींच लोकांच्या टोळ्यांच्या टोळ्या देवळांत जात असत असे नव्हे, तर वाटेल त्या दिवशीं वाटेल ती व्यक्ती कामासाठी तेथें एकेकटीही जात असे. त्या काळचे भटजी वैद्यकी आणि छांछुंहि करीत असत. त्याची प्रवृत्तीहि परोपकारी असे.त्यामुळें सर्वांना देऊळ म्हणजे एक मायघरच वाटे, काटा रुतला जा देवळात.

**नवरा रुसला. जा देवळांत.**

बायको पळाली जा देवळांत, दुखण्यातून उठला, जा नवस घेऊन देवळांत, अशा रीतीनें देवळांत हजारो भानगडी चालत असत. बऱ्यासाठीं देऊळ आणि वाईटासाठींहि देऊळच असा प्रकार होता. राजाच्या राज्याभिषेकापासून तों नाठाळ नवतींच्या नाऱ्याचें नाळ्यावर नकळत नापत्ता करण्यापर्यंत सगळ्या भानगडी देवळांतच होऊं लागल्या. आर्य संस्कृतीचा पगडा बसलेल्या हिंदुस्थानांत, इसवी सनाचा उदय होईपर्यंत, धार्मिक क्षेत्रांत नवजीर्ण मतांचे अनेक झगडे झाले व विचारक्रांतीची वादळें अखंड चालू होतीं. आपमतलबी भिक्षुकशाहीनें नवमतवादाच्या प्रत्येक लहान मोठ्या चळवळीला ठार मारण्याचा प्रयत्न एकसारखा सुरूच ठेविला होता. (ब्राह्मणांची भिक्षुकशाही एवढ्याचसाठीं भूतलावर अवतरलेली आहे.) सांपडेल त्या पशूचा यज्ञ, सोमरस प्राशन, गोमांस भक्षण येथपासून ऋग्वेदी आर्यांच्या आचार विचारांत क्रांति होत होत, बुद्धोतर काळी बहुतेक हिंदु समाज 'अहिंसा परमो धर्म' वाला निवृत्तमांस बनला होता. धर्म आणि ईश्वर विषयक कल्पनाहि पार उलट्या झालेल्या होत्या. परंतु स्थूल मानानें इसवी सनाच्या २ ऱ्या ३ ऱ्या शतकांपर्यंत हिंदु जनांत व हिंदुस्थानांत देवळे घुसलेली नव्हती. जीर्णमताभिमानी व आत्मवर्चस्वाभिमानी भटांच्या भिक्षुकशाहीनें नवमतवादी बौद्ध धर्माचा पाडाव करून, भटी वर्चस्व स्थापनेसाठी इसवी सनाच्या २ ऱ्या ३ ऱ्या शतकांत महाभारत रामायणाच्या जुन्या आवृत्या मनसोक्त घालघुसडीच्या फोडणीनें फुगविल्या आणि मनुस्मृतीला जन्म दिला. पण त्या कालच्या कोणत्याही वाङ्मयांत देव आणि देवळें आढळून येत नाहींत. नाहीं म्हणायला, बौद्धधर्मी अशोक सम्राटाच्या अमदानीपासून बौद्ध भिक्षूंच्या योगक्षेमासाठीं आणि स्वाध्यायासाठीं ठिकठिकाणीं मोठमोठे विहार, लेणी, गुहा, संघ, मंदिरें हीं अस्तित्वांत आलेलीं होतीं. पुढें पुढें या संघ मंदिरांत महात्मा बुद्धाच्या मूर्ती स्थापन करून त्यांच्या पूजा अर्चा बौद्धांच्या हीनयान पंथाने सुरूं केल्या. हिंदुस्थानांत देव देवळांचा उगम शोधीतच गेले, तर तो या बौद्ध विहारातच बिनचुक सापडतो. नंतर

इसवी सनाच्या ७-८ व्या शतकांत भिक्षुकशाहीचे उद्धारक आद्य शंकराचार्य यांचा अवतार झाला. त्यांनी शुद्धी करून संघटनांत सामील करून घेतलेल्या सिथियनांच्या उर्फ रजपूतांच्या पाठबळानें बौद्धांच्या भयंकर कत्तली करविल्या. त्यांच्या विहारांची नासधूस केली. उरल्या सुरल्या बौद्धांना देशधडीला लावले. लक्षावधि लोकांना मसणवटींत पार धुडकावले. या दुर्दैवी लोकाच्या नशिबाची माणुसकीहि हिराऊन घेण्यांत आली. अशा रीतीनें हिंदुस्थानांत हिंदु समाजांत अगदी पहिल्यानेंच.

## आद्य शंकराचार्यानें अस्पृश्यता निर्माण केली.

ठिकठिकाणच्या बौद्ध विहारांतल्या पवित्र वस्तूंचा आणि बौद्ध-मूर्तीचा उच्छेद केला, आणि तेथें शंकराच्या पिंड्या थापल्या.कित्येक ठिकाणी तर बुद्धाच्या मूर्तीनाच थोडाबहुत फरक करून त्यांना शंकरमूर्तीचा बाप्तिस्मा दिला. अशारीतीनें बौद्ध विहारांचे रूपांतर शंकराच्या देवळांत झाले.

जोपर्यंत चिलीमच नव्हती. तोपर्यंत गांजाची जरूर कोणालाच नव्हती.देवळांच्या चिलमी निघाल्यावर निरनिराळ्या देवांचा गांजा पिकवायला हिंदूंच्या तरळ कलपनेला कसला आयास? शंकराची देवळें निघतातन निघतात, तोंच गणपति सोंड हालवीत मारूती गदा झेलीत, बन्सीधर कृष्ण मुरली मिरवीत एकामागून एक हजर समाजबहिष्कृत पडल्यामुळें अस्पृश्य ठरलेल्या लक्षावधि लोकांनीहि आपल्या जिवाच्या समाधानार्थ म्हसोबा खैसोबा, चेंडोबा असे अनेक ओबा देव साध्या दगडाना शेंदूर फांसडून निर्माण केले. आद्यशंकरार्यानी रक्तपाताच्या अत्याचारी पुण्याईवर पुनरुज्जीवित केलेली भिक्षुकशाही जसजशी थरारुं लागली. तसतशी जातिभेदाची आणि देवळांची पैदास डुकरिणीच्या अवलादीला बरें म्हणूं लागली. हिंदूंच्या देवळांची उत्पत्ति ही अशी झालेली आहे.

शंकराचार्यानीं ब्राह्मणी धर्मांच्या पुरस्कारासाठी बौद्ध धर्माचा नायनाट केला. त्यांतला सुडाची नांगी इतकी भयंकर जहरी व खुनशी होती कीं, चालू घटकेपर्यंत बौद्धधर्माचा दिवसाढवळ्या अपमान व उपहास करीत आहे. हिंदुजनांच्या मनांत बौद्धद्वेषाचें पेरलेलें भिक्षुकशाही विष आज कसें थैमान घालीत असतें, हें वाटेल त्या बौद्ध लेण्यांत पाहून घ्यावें. वास्तविक या विहारांत किंवा लेण्यांत महात्मा बुद्धाचे बौद्ध भिक्षु 'अहिंसा परमोधर्म' चें तत्वचिंतन आणि भूतदया क्षमा, शांति या सात्विक गुणांचा परिपोष व प्रसार करीत असत. शंकराचार्याचा भिक्षुकी हात या विहारांवरून फिरतांच त्यांची खाडकन स्मशानें बनली. ते गरीब जनसेवक बौद्ध भिक्षु रसातळाला गेले. त्यांचा अहिंसावाद हवेंत वितळला. ताबडतोब प्रत्येक लेण्यांत एकेका उग्र देवाची अगर देवीची देवळें उगवली आणि त्यांना कोंबड्या बकऱ्यांच्या कंदुऱ्यांनी संतुष्ट करणाऱ्या भक्तजनांच्या टोळ्या लाखांनी मोजण्याइतक्या फुगल्या. यावेळी अठरा पुराणांचीहि भटी-पैदास झालेली असल्यामुळें, हिंदु समाजातल्या व्यक्तीमात्राची नातीगोतीं जरी जातिभेदाच्या घरटांत वस्त्रगाळ भरडली गेली होती. तरी देवांच्या आणि देवींच्या गोतावळ्याची जाळीं सताड मोकाट सुटलेली होती. माणसांप्रमाणें.

## देवांच्याहि मागें बायकामुलांचीं लचांडें

निर्माण झाल्यामुळें, पार्वती ही जरी जगन्माता-साऱ्या विश्वाची आई—असली, तरी ब्राम्हण कवीच्या कल्पनेच्या मुर्वतीसाठी तिचे गंजड शंकराशीं लग्न लागून, कधीस्मशानांत तर कधीं हिमालयांत, भैरव पिशाच्चादि सेवक गणांच्या संगतीत तिला संसार करणें भागच पडलें. सृष्टिविधात्या ब्रह्मदेवाला, सृष्टि उत्पन्न

झाल्यावर, विष्णूच्या बेंबटांतून खेंचून काढणाऱ्या भिक्षुकशाहीनें असली देव देवींचीं गोतावळ्यांची लफडीं इतकीं निर्माण केलेली आहेत की, त्याच्या वंशवेलांत सद्धर्माचाहि थांग आज लागणें मुष्किलीचें होऊन बसलें आहे. फार दूर नको. लोणावळ्याजवळची कार्ला लेणी पहा. ही वास्तविक बौद्धांची, तेथल्या त्या ओऱ्या, ते दिवाणखाने, ते स्तूप, साऱ्या बौद्धांच्या स्वाध्यायाश्रमाच्या जागा. तेथें बाहेर एक देवी प्रगट झाली. तिचे नांव एकवीरा. हिला वेहेरची देवी असेहि म्हणतात. ही म्हणे पांडवाची बहीण. हिच्यासाठीं भीमानें एका रात्रींत हीं लेणीं कोरून काढली. हिचा दुसरा इतिहास काय, तर ही रेणुका, परशुरामाची आई. स्वतः परशुरामच जेथे अमानुष क्रौर्याचा पुतळा, व पुरस्कर्ता तेथे त्याची ही एकवीरा मातोश्री बोकडाच्या कंदुरीशिवाय भक्ताला कशी प्रसन्न होणार?चैत्री पौर्णिमेची कार्ल्याची जत्रा मोठी दांडगी. हजारो मराठे, कोळी, बरेचसे कायस्थ प्रभू वगैरे भटेतर लोक यावेळी तेथे नवस फेडायला जातात. नवसापायीं शेळ्यामेंढ्यांचे कळपच्या कळप फडशा पाडून हीं कार्ला लेणी रक्तांत न्हाऊन निघतात. जो प्रकार कार्ला येथें, तोच इतर सर्व लेण्यांत. जेथे असले बोकडखाऊ देवदेवींचे देऊळ नाहीं, तेथे प्लेझर पार्टीसाठी जाणारे लोक सुद्धां कंदुरी केल्याशिवाय परत येत नाहीत. अहिंसावादी बौद्ध लेण्यांत अखंड सुरू असलेले हे ‘देवळी’ प्रकार म्हणजे बौद्ध द्वेषाची परमावधीच नव्हे काय?सारांश, भिक्षुकशाहीचा प्रतिस्पर्धी विषयीचा द्वेष पिढ्यानपिढ्या टिकणारा असतो, हे विसरता कामा नये.

मनुस्मृति पुराणें आणि देवळें असा तीन पेडी फांस हिंदुसमाजावर लटकावून भिक्षुकशाही ब्राम्हणांनी आपल्या जातीच्या सवत्या सुभ्याचें सोंवळें वर्चस्व आजवर टिकवून धरलेले आहे. या मर्मावर कोणी घाव घालतांच एक जात सुधारक दुर्धारक भटें सापांसारखीं कां फुसफुसतात, याचें अझून बऱ्याच बावळट शहाण्यांना आणि भोळसट भटेतरांना मोठें आश्चर्य वाटतें. मनुस्मृति, पुराणें आणि देवळें या तीनच गोष्टींवर आज प्रत्येक भट जगत असतो. पण या तीनच गोष्टी म्हणजे अखिल भटेतर दुनियेच्या उरावर तीन प्राणघातक धोंडी आहेत. या तीन गोष्टी नष्ट करा. जाळून पोळून खाक करा कीं भिक्षुकशाही रसातळाला गेलीच! प्रदर्शनासाठीं तिचा वाळवून ठेवलेला नमुनाहि हातीं लागणार नाहीं. पण हा सोन्याचा दिवस उगविण्यापूर्वी ब्राम्हणांनीं या तीन महापातकांबद्दल भटेतरांच्या मनावर डागलेली धार्मिक पापपुण्याची मोहिनी नाहीशी करणें फार कठीण काम आहे.

देवळांचा उपयोग पूर्वी प्राचीन काळीं कदाचित् चांगला होत असेल. धर्मप्रसाराचें व धर्म रक्षणाचें कार्य या देवळांनीं किंवा त्यांतल्या धोंड्यादगड्या देवदेवींनीं आजपर्यंत काय केलें, तें इतिहासावरून दिसतच आहे. गिझनीच्या महंमदाचा सोट्याचा तडाका सोमनाथाच्या टाळक्यावर पडेपर्यंत हिंदूंचे देव म्हणजे इंपिरियल बँकेचे बाप असावे, अशी पुसटसुद्धा कल्पना कधीं इतिहासाला आलेली नव्हती. त्या वेळेपर्यंत लघुरुद्रमहारुद्राची रात्रंदिवस अखंड बोंबाबोब करणारे हिंदु आणि त्यांचे पराक्रमी राजे सोमनाथाच्या पिंडी खालच्या भुयारांत संपत्ति सांठविण्याच्या ‘धर्मवान्’ धंदा करीत असतील, हें महंमद गिझनीला जसें बिनचूक कळलें, तसें फुटक्या कपाळाच्या सोमनाथालाहि कळलें नसावें असें वाटतें. म्हणूनच महंमदाच्या बजरंगी सोट्यांचे थाड थाड थाड एका मागून दोन तीन तडाके खाईपर्यंत त्याला आपल्यावरील प्रसंगाची कल्पना आली नाहीं.

**कल्पनेचें मंदिर टाळकें.**

तेंच कडाड फुटल्यावर कल्पना तेथे राहणार कशी?आणि प्रामाणिक वेश्येप्रमाणें राहिलीच तर ती सोमनाथाला कळणार कशी?महंमद गिझनीच्या वेळेपर्यंत हिंदूंची देवळें म्हणजे अनंत भल्याबुऱ्या

अनुक्रमणिका

त्रांगड्यांची पेवें बनलेली होती. हा वेळ पावेतों मुसलमाने स्वारीवाल्यांना देव किंवा देवळें फोडण्याची कल्पना खुमखुम किंवा वेड मुळींच माहीत नव्हतें. देव आणि देवळें फोडण्याची चटक मुसलमानांना सोमनाथानें लावलेली आहे. सोट्यांच्या तीन दणक्यांत पिंडीखालीं जर अपरंपार द्रव्य आणि सगळ्या राजकारणी गुह्याचे कागदपत्र मिळाले, तर असल्या घसघशीत बोहाणीच्या जोरावर देवळें फोडण्याचा धंदा सर्रास चालू न करायला ते धाडशी मुसलमान मूर्ख किंवा हिंदु थोडेच होते?चालूं घडीचा मुसलमानांचा देवळें फोडण्याचा व देव बाटविण्याचा प्रघात 'पीछेसे आयी और आगे बढी' असल्या वृत्तीचा केवळ 'बं भोलानाथ' आहे. या पेक्षा त्यांत विशेष कांहीं नाहीं.

भिक्षुकशाहीचा भट म्हणजे धर्माचा संरक्षक, त्याचा पालनकर्ता, भट जिवंत तर धर्म जिवंत, भट ओंकारेश्वरावर गेला कीं धर्म तेव्हांच जाणार सोनापुरांत. 'ब्राम्हण वर्गानेंच आजपर्यंत धर्म जगविला' ही भिक्षुकशाहीच्या प्रत्येक जहाल मवाळ गबाळ टवाळ भटांची आरोळी. देवळें म्हणजे धर्मांचीं आगरें. धर्माची गंगा येथेच उगम पावते. त्या उगमावरच भटांचें आसन. देवळांत तर प्रत्यक्ष देव. साऱ्या विश्वाचा स्वामी, 'चराचर व्यापुनी' आणखी वर जो 'दशांगुळें उरला' तो हिंदूंच्या देवळांत जाऊन भरला. असल्या देवांचे कोण काय करणार?देव मनांत आणील अगर त्याचा कट्टा भक्त—देव मानवांतला जन्मसिद्ध सनदपट्याचा दलाल भट-त्याला मनांत आणायला लावील, तर डोळ्याची पापणी लवते न लवते तोंच साऱ्या विश्वाची होळी होईल, असा ज्या देवाचा पराक्रम. युद्धक्षेत्राच्या आणि संसाराच्या लढाया लढण्यापूर्वी प्रत्येक वीर या देवापुढें कापराची पोती जाळून त्याचा व त्याच्या ० (पूज्य) दलालाचा आशिर्वाद घेत असे. अशा त्या जगच्चालक सर्वपराक्रमी कर्तुमकर्तु अन्यथा कर्तुम सोमनाथावर ज्यावेळी महंमदानें सोटा उगारला, त्यावेळीं रजपूत राजांच्या धिसाड दक्षिणांवर टोणग्यांप्रमाणें चरणारे हे देवधर्म-संरक्षक भट होते कोठें? ते सारे पंचा सावरून आधींच सूं बाल्या पळाले होते. सोमनाथ म्हणे मोठें जागृत कडकडीत दैवत. पण या दैवताचा कडकडीतपणा आणि जागृतपणासुद्धा ऐन प्रसंगी वायबार ठरला. जेथें देवच स्वताचें संरक्षण करू शकला नाहीं, तेथें भटांनी तरी का हकनाहक प्राण द्यावे आणि भट दलालांच्या मार्फत राजकरणापासून तो जनानखान्यापर्यंतची दलाली देवाशीं-किंवा देवाच्या नांवावर-करण्यास सवकलेल्या हिंदु राजांनी देवासाठी व देवळासाठी काय म्हणून शस्त्र उचलावें?सगळीच जेथें बडवेगिरी, तेथें धर्माच्या पोकळ नांवासाठी आणि पापपुण्याच्या पाचकळ कल्पनेसाठीं कोण कशाला आपला जीव धोक्यांत घालतो?जोंपर्यंत प्रसंग आला नाहीं. लघुरूद्र महारूद्र चालूं आहेच.

## गचगचीत तूप पोळीचे ढीग

पानांवर आयते येऊन पडत आहेत, आणि दक्षिणेच्या मोहरा पुतळ्यांनी कडोसरी तट्ट फुगत आहे. तोंपर्यंत देवांचा आणि देवळांचा धार्मिक दरारा आणि भट दलालांच्या धर्म प्रवचनाचा खरारा! पण प्राणावर बेतली तर देवाला कोण पुसतो आणि देवळांसाठी कोण लेक रडतो! मानला तर देव नाहींतर धोंडा आणि मानलें तर देऊळ नाहींतर कुंटनखाना! देवाच्या मूर्तीसाठी आणि देवळांच्या कीर्तीसाठीं प्राणार्पण करणारा एक तरी भट दलाल इतिहासांत कोण, दाखवून देईल, त्याला वर्षभर आमची माला फुकट देण्यात येईल. म्हणे ब्राम्हणांनीं धर्म जगविला!

आता या आमच्या धर्मांच्या देवळात कसला धर्म वावरत असतो, हे पाहिलें पाहिजे. मूर्तिपूजा अथवा प्रातिक पूजा 'अनादिमध्यांतमनंतवीर्यम्' अशा परमेश्वर चिंतनार्थ उपयोगी पडणारें एक सुटसुटीत साधन म्हणून कांहीं काळ क्षम्य ठरेल व आजपर्यंत ठरलेंहि. परंतु देवळांतली ही मूर्ती म्हणजे देव नव्हे, केवळ

धोंडा, भातुकलीच्या खेळांतल्या बाहुलीसारखी क्षुद्र वस्तु. ही वस्तुस्थिति पुजारी भटदलालापासून तों तिच्यापुढें कपाळें घांसणाऱ्या भक्तिणीपर्यंत सर्वांना स्वच्छ माहीत असते. असल्या धोंड्यांची पूजा प्रार्थना करून आत्मोन्नति होणें शक्य नाही आणि प्राणावर बेतली तर हा श्रृंगारलेला दगड स्वतःचें किंवा भक्तांचें मुळींच संरक्षण अगर तारण करूं शकत नाहीं, हें प्रत्येक हिंदुमात्राला कळत असूनहि देवळांतल्या घंटा बडवायला सांज सकाळ कोट्यवधि हिंदु काय म्हणून देवळांत जातात?बाप, आजे, पणजे गेले म्हणून जातात, का त्यांना एखादी गुप्त जादू अथवा मधुमुख विषघट असें कारस्थान त्याना तेथें ओढून नेतें?हिंदु लोकांची देवळ्या देवांविषयी भावना जर अस्सल आणि आत्यंतिक प्रेमाची असती, तर हिंदुस्थानांत मुसलमानी बडग्याला एकहि देऊळ व एकहि देव खास बळी पडला नसता. अर्थात् नाटकें, सिनेमा, तमाशांची थिएटरें हीं जशीं क्षणभर विरंगुळ्याची ठिकाणें, करमणूकच्या करमणूक आणि पटला कांहीं उपदेश तर पटला, नाहीं तर जागच्याजागीं निसटला, यापेक्षा देवळांची विशेष किंमत हिंदु लोकांनी मुळीच बाळगलेली दिसत नाहीं. तरीहि देव देवळांविषयीं शाब्दिक प्रेमाचा हिंदु जिव्हेचा धबधबा पहावा तों त्याच्या धडधडाटापुढें गिरसप्पा नायगाराच्या कानठळ्या बसतात! हें काय भटबंगाल आहे?

हें भटबंगाल हिंदुस्थानच्या नकाशांत सांपडणारें नसून, ते थेट भटाच्या पोटांत आहे. देवळांचा धर्म म्हणजे भटांच्या पोटापाण्याचें गुप्त मर्म आहे. या मर्माचें वर्म अफाट भटेतरांना कधीच उमगू नये, म्हणून भटांनीं अठरा पुराणांची पैदास करून ठेवलेलीआहे. गीता व उपनिषदादि आचारविचार-क्रांतिकारक आणि सत्यशोधक ग्रंथ कितीहि असेल तरी देवळांवर देह जगविणाऱ्या या भूदेवांचा विशेष मारा या पुराणांवरच असतो. पुराणांचा पाचकळपणा प्रगट करण्याचें येथें प्रयोजन नाहीं. पुराणांच्या पचनीं पडलेला प्रत्येक प्राणी ईश्वर विषयक कल्पनेंत इतका पागल बनतो कीं, दगड्या देवाच्या पायाऐवजीं भटाच्याच पायावर टाळकीं घासतो आणि त्याचे पाय धुतलेलें पाणी ‘पवित्र तीर्थ’ म्हणून घटाघटा पितो. देवळांत कथा, कीर्तनें, पुराणें प्रवचनें होतात. पण

**सर्वांची झांप छिनाल भागवतावर**

आणि पाचकळ पुराणांवर, या पुराणांच्या श्रवण मनन निदिध्यासाने हिंदु स्त्रीपुरूषांच्या मनांवर कसकसले घाणेरडे व विकृत परिणाम आजपर्यंत झाले. आज होत आहेत यापुढें होतील, याची नीटशी कल्पना राजकर्त्या इंग्रेजांना आणि अम्मलबजावणी व न्याय चौकशी खात्यांवरच्या त्यांच्या ऐ.सी.एम. गोऱ्या बृहस्पतींना होणेच शक्य नाही. म्हणूनच भटी पुराणांतून केलेल्या भटेतरांच्या बीभत्स नालिस्तीच्या दंशांच्या वेदना त्यांना भासत नाहीत. आणि एकाद्या जागृत सुधारक भटेतराने त्या वेदना व्यक्त करण्यासाठी उघड उघड जोडे पैजार करून भिक्षुकशाहीची शेंडी गदगदा हलविली, तर त्याचें खरें रहस्य अजमावण्याची या परक्या गोऱ्या न्यायाधिशांना कांही भावनाच नसते. अर्थात् त्यांच्या न्यायाचा काटा, धोब्यांच्या आडव्या उभ्या घावाप्रमाणे, पुराण-मंडणावर, म्हणजेच भिक्षुक भटाच्या जानव्यांत बऱ्याच वेळां अडकून पडतो. देवळांचे माहात्म्य पुराणांनीं वाढविले. ‘पुराणें म्हणजे शिमगा’ असे पुष्कळ विचारवंतांचे म्हणणें आहे. पुराणे म्हणजे शौचकूप, असे आमचे मत आहे. पुराणांत कांहीं गोष्टी चांगल्या आहेंत, असें कांहीं भेदरट सुधारकहि म्हणतात. असतील शौचकूपांत पडलेल्या मोहरा, पुतळ्या ज्याना उचलायच्या असतील त्यांनी खुशाल उचलाव्या. आम्ही त्यांचा हात धरूं इच्छित नाहीं. पुराणें म्हणजे शौचकूप ठरल्यावर त्यांच्या जिवावर जगणाऱ्या देवळांत काय काय पातकांच्या गिरण्या सुरुं असतात. याची कल्पनाच केलेली बरी.

देवळें म्हणजे भिक्षुकशाहीच्या जन्मसिद्ध वतनी जहागिऱ्या. देवळाशिवाय भट नाहीं आणि भटाशिवाय देऊळ नाहीं.असा एक सनातनी नियमच ठरून गेला. ह्यामुळें पुराणप्रसव्या भटांनीं देवळांचीं संख्या भरंसाट वाढविण्यासाठीं देवांचीहि देवसंख्या वाढवीत वाढवीत ३३ कोटींवर नेऊन भिडविली. त्यांत पुन्हा देवांमध्येंहि श्रेष्ठ कनिष्ठपणाच्या जाती उत्पन्न केल्या. विष्णुपुराणांत विष्णु श्रेष्ठ, बाकी देव लुच्चे. गणेशपुराणांत गणोबा श्रेष्ठ, बाकी देव कुचकामी, देवीपुराणांत देवी श्रेष्ठ, बाकी पुल्लिंगी देव सारे बदमाश, अशी देवतादेवतांतच लठ्ठालठ्ठी लावून दिली आणि प्रत्येक देवाच्या संप्रदायाचे निरनिराळे भक्तसंघ हिंदु समाजांत चिथाऊन दिले. त्यामुळे प्रत्येक देवाचें देऊळ, या अहमहमिकेनें साऱ्या हिंदुस्थानभर देवळांचा मुसळधार वर्षाव सुरू झाला. निरनिराळे देव आणि भक्त याच्या संप्रदायांत जरी आडवा उभा विस्तव जाई ना, तरी सर्व देवळांत भट मात्र अभेदभावानें देव मानवांतला दलाल म्हणून हजरच.बाप भट जरी रामाचा पुजारी असला तरी लेक-भेट रावणाच्या पूजेला तयारच. शिवाय एकाच गावात एकाच देवीची अनेक देवळें निर्माण करण्याचाहि एक शिष्टसंप्रदाय पडला. शंकराची पिंडी जरी एकाच रंगाढंगाची असली, तरी सोमवार-पेठेंत देऊळ म्हणून सोमेश्वर.भसाड्या तळ्यावर देऊळ म्हणून भसाडेश्वर, बाळोबा पगडबंदानें बांधलें म्हणून बाळेश्वर, फाशीच्या वडाजवळ पिंडी सापडली म्हणून फांसेश्वर, असे शेकडों ईश्वर भटांनी निर्माण करून देवळापायीं आपल्या पोटापाण्याचा प्रश्न चबचबीत वंगणावर सफाईत सोडवून घेतला. काकतालीय न्यायानें पुजारी बनविलेल्या भटांची घराणीच्या घराणी त्या त्या देवळाचे वंशपरंपरागत वतनदार बनले. पुराणांच्या गुलामगिरीने पागल बनलेल्या हजारों भोळसट हिंदूंनीं देवाला गांवें, जमिनी, दागदागिने आंदण द्यावी. ती आयतीच पुजारी भटांच्या पदरी पडत. नांव देवाचें आणि गांव भटाचें. एका भटी संस्थानांतल्या देवस्थानाला सालिना २०—२५ हजार रुपयांचे वर्षासन आहे. त्यांतले जेमतेम ७—७॥ हजार देवाच्या नांवानें कसे तरी कोठे तरी खर्ची पडतात. बाकीची रक्कम संस्थानाधिपतींच्या ढेकरांत गडप. देवस्थानाचे दागदागिने वार्षिक उत्सवाला मात्र देवळांत दिसतात. तेवढा दिवस पार पडला कीं, मग साऱ्या वर्षभर ते पट्टराण्या घट्टराण्यांच्या अंगावर पॉलिश होत असतात. कित्येक देवळांचा तर असा लौकिक आहे की, देवाला भक्तानें वाहिलेला मोगऱ्यांचा हार तासाच्या आंत गमनाजी जमनाजीच्या बुचड्यांत गजऱ्याच्या रूपानें अवतरतो.

## मारूतीच्या बेंबटात टिळकांची मूर्ती

दिसण्या इतका किंवा दत्ताला बेफाम घाम सुटण्या इतकाच हा लोकोत्तर चमत्कार, यांत काय संशय?कित्येक देवळांल्या देवांचे जमिन जुमल्याचें उत्पन्न कोट्यवधि रुपयांचे असून, वार्षिक यात्रेचा खुरदा लाखाच्या खाली जात नाही. या मालिद्यावर किती लक्ष भटांनी ऐदी पोटें रांजणासारखी फुगत असतात आणि त्यांच्या आपापसांतील यादवींमुळे कज्जेदलालीचा धुडगूस चालत असतो. याची कमिशन द्वारा चौकशी केली, तर भयंकर विलक्षण प्रकार उघडकीस येतील. फौजदारी गुन्ह्यांची गेली ५० वर्षांची रिकार्डे तपासली तर लक्षावधि सामाजिक व नैतिक अत्याचारांच्या जन्मभूमीचा व कर्मभूमीचा मान आमच्या हिंदूच्या देवळांच्याच माथी मारावा लागेल. सारांश धर्माची देवळे धर्माची देवळे म्हणून हिंदु कितीहि नाचत असले. तरी आजच्या देवळांचा धर्म असा चमत्कारीक व शिसारी येण्याइतका गलिच्छ बनला आहे कीं त्या पुढें शंकराच्या पिंडीच्या उत्पतीची ‘पवित्र पुराणोक्त’ पुष्कळच सभ्य ठरेल. या मुद्यावर विशेष स्पष्टोक्तीने लिहिण्या बोलण्याचा प्रसंग एकाद्या तापट माथ्याच्या भटेतरांवर न येता माबाप इंग्रेज सरकारच्या एकाद्या कमिशनवरच येईल. तरच पवित्र भिक्षुकशाहीला सोनारानेंच कान टोचल्याचें सौभाग्य भोगायला मिळेल!

अनुक्रमणिका

देवळांमुळे आणि त्यांतल्या देवामुळें हिंदु समाजाची आत्मिक उन्नति किती झाली. हें भटभिक्षुकांच्या लठ्ठ दुलदुलीत पोटांवरूनच ठरवायचें असेल. तर आजचा हिंदु समाज आध्यात्मिक मोक्षाला पोचल्याची थेट पावती द्यायला कांहीं हरकत नाही. असल्या जीवनमुक्त समाजाला या स्वराज्याच्या आणि सहकार-असहकाराच्या दलामली हव्या तरी कशाला?दहा वर्षांपूर्वीपर्यंत राजकारणी त्रांगड्यांच्या जोरावर हिंदूंचे सर्वांगीण पुनरुज्जीवन आणि एकजिनसी संघटन करण्याची मिजास मारणारीं भटें सुद्धां आज सामाजिक सुधारणेच्या तुणतुण्यावर आपल्या भिक्षुकी अकलेच्या छकड्या गाऊं लागली आहेत व देवळांनीं थेट परमहंस स्थितीला नेऊन भिडविलेल्या हिंदु जनांना हे राजकारणी आणि समाजकारणी नसते उपद्व्याप हवेत कशाला?पण ज्या अर्थी हे उपद्याप चालूं आहेत, त्या अर्थी नीति न्याय आणि सामाजिक संघटणाच्या कामी हिंदूंचीं देवळें आणि त्यांतले देव म्हणून पूजलेले दगड धोंडे अखेर मातीमोल ठरल्याचेंच सिद्ध होत आहे. सोमनाथाच्या टाळक्यावर महंमद गिझनीचा लत्ताप्रहार पडल्यापासूनचा हिंदु देवळांचा इतिहास पाहिला तर गंजड गोसावडे, ऐदी भिकारी, उनाडटप्पू गुंड आणि पोटभरू भट यांची चंगळ उडविण्यापलीकडे या देवळांनी हिंदुधर्म हिंदुसमाज आणि न्यायनीति यांच्या प्रगतीला सपशेल कुंठविण्याच्या कुंटणपणापेक्षां विशेष कांहींहि केलेले नाही, हेंच दिसून येते.

हिंदुस्थान दरिद्री झाला, मातीतून अन्न काढणारा शेतकरीवर्ग भिकेला लागला, देशी धंदे ठार मेले, मध्यम वर्ग नामशेष झाला, सुशिक्षीत पदवीधरांची उपासमार बोकाळली इत्यादि इत्यादिवगैरे वगैरे आरडाओरड करण्यांतच राजकारणी अकलेच्या कवायती करणाऱ्या ब्रह्मांड पंडितांनी हिंदुस्थानांतील देवळांत केवढी अपार संपत्ति निष्कारण अडकून पडली आहे आणि तिचा उपयोग देशोद्धाराच्या कामी न होतां, लुच्चा लफंग्या चोर जार ऐदी हलकटांच्या चैनीसाठीं कसा होत आहे, इकडे आतां कसोशीनें लक्ष देण्याची वेळ आली आहे. दुष्काळानें कोट्यावधि लोक देशांत अन्नान करून मेले, तरी देवळांतल्या दगडधोंड्यांना शिरा केशरीभातचा त्रिकाळ नैवेद्य अखंड चालूच आहे. हजारो उमेदवार ग्राज्युएट तरुण उदरंभरणासाठीं भया भया करीत फिरत असले, तरी अब्जावधि रुपयांचें जडजवाहीर व दागदागिन्यांनी देवळांतल्या दगड धोंड्यांचा शृंगारथाट बिनतक्रार दररोज चालूच आहे. देशांतला शेतकरी कळण्याकोंड्याला आणि घोंगडीच्या ठिगळाला महाग होऊन देशोधडीला लागला, तरी देवळांतल्या भटसेनेच्या पोटाच्या चढत्या कमानीला तिला एवढाही खळगा आजपर्यंत कधी पडला नाही. विद्येची चार अक्षरें शिकवा हो शिकवा, म्हणून शेकडा ९६ जीवांचा सारखा कंठशोष चालू असतांही, देवळांच्या घुमटाखाली लाखो महामूर्ख भट गोसावडे गंजड आणि टगे गंधभस्म रुद्राक्षांच्या पुण्याईवर पोट फुटून वांति होईपर्यंत परार्धावरी पल्ले धान्याचा बिनबोभाट फडशा पाडीत असतात.

## देवळांच्या छपराखालीं ब्रह्मचाऱ्यांचे वंश

किती वाढतात, पति नसताहि किती प्रतिव्रता पुत्रवति होतात, किती गोसावडे सावकारी करतात, किती गुरुमहाराजांचे मठ गोकुळकाल्यांत कटिबंध बुडतात, आणि किती पळपुट्या छंगी भंगी टग्यांचे थर तेथें खुशाल चेंडू प्रमाणें जमतात या गोष्टीची न्यायनिष्ठुरतेनें जर कस्सून तपासणी होईल, तर मुसलमानांनी देवळांवर घाव घालण्यापूर्वी, किंवा बोल्शेविझम्‌वजा विचारांची वावटळ उठण्यापूर्वी अभिनव विचारक्रांतीचा तरुण हिंदु संघ निराशेच्या झटक्यांत या देवळांची राखरांगोळी करायला अस्तन्या वर सारून पुढें कधिं काळीं सरसावलाच, तर त्यांत आश्चर्य वाटायला नको. धर्मासाठी उभारलेल्या देवळांचा धर्म आज इतका सैतानी बनलेला आहे की, त्याचें उच्चाटण केल्याशिवाय हिंदु जनांचें अस्तित्व यापुढें बिनधोक टिकणें बरेंच मुष्किलीचें आहे. देवळें जर हिंदुधमांची मंदिरें, तर तेथें अखिल हिंदु मात्रांचा प्रवेश अगत्य झालाच पाहिजे.

अनुक्रमणिका

परंतु, सामाजिक बाह्य प्रदेशांत भटांनी माजविलेला जातिभेद व जातिद्वेष या धर्ममंदिरांतूनच उगम पावल्यामुळें, देवळें म्हणजे हिंदुच्या जातिद्वेताचें नरककुंडेंच म्हटलीं तरी चालतील. स्वजातिवर्चस्वासाठींच जेथें भिक्षुकांनी देवदेवळांचे पर्वतप्राय दगडधोंडे आपल्या अचाट कल्पनेंतूनच प्रसविले, तेथें देवळे 'हिंदुंची' म्हणून जरीमनांत मिरविलीं, तरी ती 'भटांची खास मिरास' या भावनेनेंच आजपर्यंत चालू आहेत. धर्माची गंगा देवळांत, देवळांचा गंगाराम भट, आणि भट म्हणजे सर्व हिंदु समाजाचा जन्मसिद्ध पिता, गुरु न्यायाधीश, मोक्षदाता आणि भूदेव. अखिल हिंदु जनांनीं आपलें सर्वस्व फुंकून देवळांच्या आणि देवांच्या पायावर ओतलें, तरी देऊळ आणि देव यांचा खरा मालक भटच.त्यांच्याशिवाय देव कोणाचीच पूजा घेत नाहीं. कोणी आडदांड भटेतर बळेंच करूं म्हणेल तर देव ती मान्य करीत नाही. लागलाच तो भंगतो. त्याला दरदरून घाम फुटतो. त्याला इन्फ्लुएंझा होतो. मग तो नवसाला फळत नाहीं शेजारतीला निजत नाही. काकडाआरतीला उठत नाहीं. नैवद्याचें ताट चाटीत नाहीं. पालखीत बसत नाही. देवाला एकादी देवी असली तर तिच्याहि रंगमहालात जात नाही, विडा खात नाही, खाल्ला तर गिळत नाही आणि थुंकतहीं नाही, असा मोठा हाहाकार उडतो. पोटापाण्याची काळजी नसलेल्या भट-दलालांच्याहि तोंडचे पाणी पळतें! कित्येक वेळां तुरुंगातून निसटलेल्या बिलंदर कैद्याप्रमाणे देवळांतून देव पटकन नाहिंसा होतो आणि पूनवडीचा पोटेश्वर एकदम पैठणच्या पटांगणात फडेश्वर म्हणून उपस्थित होतो, असल्या माथेफिरू देवदेवींना ताळ्यावर आणण्याचें सामर्थ्य अवघ्या विश्वांत फक्त एकट्या भट भूदेवांच्याच हातीं असल्यामुळें, भटेतर हिंदुजनांचा देव आणि देवळांशी राहणारा संबंध किती जवळ आणि किती लांब असावा हें ठरविण्याची मुखत्यारी देवळांच्या उत्पत्ति काळापासून सर्वस्वी 'भटार्पण' च राहिली, यांत कांही नवल नसलें, तरी त्यात भटेतर हिंदुंच्या गुलामी मनोवृत्तीचा इतिहास स्पष्ट चित्रित झालेला आहे.

## गोळीला तुम्ही आणि पोळीला आम्ही

हा भटांचा 'सनातन धर्म' त्यांनी आजर्यंत पोटापाड मेहनत करून टिकविला आहे. समाज क्षेत्रांत भिक्षुकशाहीला जगद्गुरुंनी हिंदु हिंदुतच स्पृश्य आणि अस्पृश्य अशी 'सनातनी' द्वैताची पोखरण घातल्यावर त्यांच्या दंडधारकांनी आणि 'पवित्र' बडव्यांनी स्पृश्य भागांतहि भट भटेतर भेदाची रामरक्षा रांगोळी ओढून ठेवण्याचा जोरकस यत्न करण्यांत, या हिंदुब्रव देवळांचाच प्रामुख्याने उपयोग करून घेतला आहे. भट भटेतर वादाची नरक नदी देवळांतूनच उगम पावलेली आहे. आणि ज्यांना हा वाद अज्ञीबात समूळ नष्ट व्हावा असें मनापासून वाटत असेल, त्या सर्व विवेकवादी स्पृश्याऽस्पृश्य हिंदुजनांनीं आपल्या कडव्या निषेधाचा पहिला घाव या देवळांवरच घातला पाहिजे. देवळांचे महात्म सफाई नष्ट झाल्याशिवाय हिंदू समाजाच्या गुलामगिरीला कारण झालेल्या व होणाऱ्या द्वैत भावनेचा या हिंदूस्थानांतून बीमोड होणार नाही.

मूर्तिपूजा बरी की वाईट, खरी का खोटी, तारक का मारक इत्यादि मुद्दे जरी बाजूला ठेवले तरी, देवळांतल्या देवांत कांहीं तरी विशेष देवपणा असणें आणि तसा तो अकिल्मिष भासणे अगत्याचें आहे. देवाचिये द्वारी । उभा क्षणभरी ॥ तेणें मुक्ती चारी, साधियेल्या ॥ अशा भावनेचे अभंग कवनांत कितीहि गोड वाटले, तरी ते हिंदु देवळांच्या व देवांच्या बाबतींत शब्दशः भंगतात. शिवाय 'द्वारी' 'क्षणभरी उभा' राहणारा व राहण्याची शिफारस करणारा कवि मनाने भटी महात्म्याचा गुलामच असल्यामुळे देवळांच्या आंत देवांचे काय काय रंग ढंग चालू असावे याची त्या बावळटाला काय कल्पना असणार आणि कोणी करून दिलीच तर ती त्याला काय पटणार?देवळांत गेलें कीं मग क्षणभर तापांतून मुक्त व्हावें, शांत व्हावें, घटकाभर जगाला विसरावें आणि देवाच्या चरणावर मस्तक ठेऊन परमेश्वरी सृष्टीच्या अनंतत्वात विलीन व्हावें, असा अनुभव येण्याइतकें या देवांच्या मूर्तीत काय असतें?जो माणसांचा थाट तोच देवांचा थाट. ज्या माणसांच्या

अनुक्रमणिका

चैनीच्या गोष्टी त्याच देवांच्या, माणसांच्या भावना त्याच देवांच्या भावना. माणसांना थंडी वाजते, देवांना वाजते. गावात उन्हाळा कडकला की देवाला पंखा सुरू झालाच.

**शंकराच्या पिंडीवर गळणीचें गाडगे**

लटकलेंच. माणसांचा जनानखाना, देवांचा जनानखाना. भोजनोत्तर माणसांची वामकुक्षी, देवांनाहि तीच संवय, माणसें रात्रीं निजतात, देव सुद्धा शेजारती होतांच पलंगी पहुडतात. मग सकाळच्या काकड आरतीपर्यंत देव जागे व्हायचे नाहींत. सारांश, माणसांच्या सर्व भल्याबुऱ्या विचार विकारांचा आरोप या दगड्या देवांवर होत असल्यामुळें, देव आणि माणूस यांतल्या भेदाची रेष युक्लीडच्या रेषेप्रमाणें 'रुंदीशिवाय लांबी' अशा 'समजून चाला' (Take it for granted) धर्तीचीच झाली आहे. 'जसा भक्त तसा देव' हें सूत्र वाचाबोलायला छान सुटसुटीत खरें, पण त्यामुळें ईश्वरविषयक भावना, धर्मविषयक आदर आणि नीतिविषयक चाड यांत माणसांची मनोवृत्ति खिळखिळी होऊन बसली आहे, याकडे दुर्लक्ष करून भागणार नाही.

अशाहि खिळखिळ्या भावनांच्या अवस्थेंत, देव म्हणजे हिंदुजनांचें देव आणि देवळें म्हणजे हिंदुजनांचीं देवळें. त्यांत नहिंदुंचा संबंध नाहीं हा सिद्धांत गृहीत धरला, तर 'हिंदु' म्हणविणाऱ्या प्रत्येक स्त्रीं पुरुषाला, मग ती ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र असो, महार, मांग, धेड, अस्पृश्य असो नाहीतर शुद्धीच्या मार्गानें परावर्तित झालेली असो, त्या प्रत्येकाला हिंदु देवळांत जाऊन तेथल्या हिंदु देवांची यथाभाव यथासाहित्य स्वतः पूजा करण्याचा, निदान त्या मूर्तीच्या चरणांवर मस्तक टेकण्याचा धर्मसिद्ध अधिकार असलाच पाहिजे. हा अधिकार जेथेंजेथें नसेल, लौकिकी व्यवहारांतले जातिभेद, मतभेद, आचार-विचारभेद जर देवळांतहि धुडगूस घालीत असतील, आणि 'अनाथाचा नाथ होसी तूं दयाळा' अशा देवापुढेंहि जर आमचा माणूसघाणेपणाचा उकिरडा सदैव पसरलेला रहात असेल तर कोणाच्याहि मनोभावनांची पर्वा न करतां, कडवे सुधारक (radical reformer) या नात्यानें लोकशाहीची शपथ घेऊन, आम्ही स्पष्ट म्हणतों कीं, ही देवळें नसून सैतानखाने आहेत. हिंदूसंघांतल्या माणसामाणसांतच असली दुस्मानी सुलतानी गाजविणाऱ्या देवळांच्या पुरस्कर्त्यांच्या शुद्धिसंघटणाच्या वल्गना किती दांभिकपणाच्या आणि लुच्चेगिरीच्या आहेत याचा वाचकांनींच विचार करावा.

सध्या लोकशाहीचें वारें वाहात आहे. व्यक्तिमात्राच्या स्वातंत्र्याला विरोध करण्याची आज कोणाचीहि प्राज्ञा नाहीं. अशा वेळी हिंदु देवळांतही लोकशाहीची वावटळ घुसणें अगत्याचें आहे. राजकीय स्वातंत्र्याच्या वल्गना करणारांनीं इतर सर्व क्षेत्रांतल्या गुलामगिरीची आणि गुलामगिरीप्रवर्तक सर्व संस्थांची राखरांगोळी केली पाहिजे. हिंदुसमाजांत माणुसघाण पसरविणाऱ्या देवळांची विल्हेवाट लावण्याचे तीन मार्ग आम्ही हिंदुजनांना सुचवीत आहों.

पहिला मार्ग बहिष्काराचा. हा लिबरली बिरबलगिरीचा 'मवाळी' मार्ग आहे. हिंदूच्या देवळांत भटांशिवाय हिन्दूच्या प्रवेशाच्या व पूजनाचा धर्मदत्त अधिकार जर लाथाडला जात असेल, तर ती देवळें 'हिंदूचीं' नव्हत, ती सैतानाचीं स्मशानमंदिरे समजून त्यावर बहिष्कार टाकावा. त्यांन आजपर्यंत फाजील दानधर्मावर जगविल्याच्या मूर्खपणाबद्दल एक सणसणीत तोंडात मारून घ्यावी आणि यापुढें त्यांना जगविण्याचा किंवा नवीन देवळांच्या पैदाशीचा प्रत्यक्षाप्रत्यक्ष प्रयत्न न करण्याविषयीं 'आईचा शपथ' घ्यावी. हा उपाय खरा.पण त्यातहि एक उपाय आहे. या उपायानें देवळांचे पापी डोल्हारे जमिनदोस्त होण्यास

अनुक्रमणिका

कालावधि लागेल, आणि तोंपर्यंत हिंदुच्या जिवनांत अधिकाधिक किडे पडण्याचा क्रम मात्र मुळींच बंद पडणार नाहीं. दूरदृष्टी भटांनी प्रत्येक देवस्थानाची गंगाजळी इतकी तुडुंब ठेचून भरलेली आहे कीं, सार्‍या भटेतर दुनियेने देवळांवर जरी बहिष्कार घातला, तरी देवळांचा 'वर्णाश्रनी' सनातन सवता सुभा भटजात बिनबोभाट आणखी दहा शतकें चालवील. अखिल ब्राह्मणेतर दुनिया जरी निसर्ग धर्मानुसार आपल्या मातेच्याच उदरी जन्मत असली, तरी एकटी ब्राह्मण जातच फक्त ब्राह्मदेवांच्या तोंडातून जन्मलेली असल्यामुळे, त्या चार तोंड्या सृष्टी विधान्याची सारी इलमबाजी ब्राम्हण जातींत बिनतोड धगधगत असते. अशा इलमी जातीच्या सवाई ब्राम्हणदेवांना असा नाहींतर तसा पेंच घालण्याच्या कामीं कोण मानवाचा का विरोध करूं शकेल?जुने देव आणि जुनी देवळें किफायतशीर होणार नाहींत, या दूर धोरणाने, त्यांनी अतांपासूनच नव्या धर्तीच्या देवळाचा उपक्रम सुरू केला आहे. आज जे पुतळे दिसत आहेत, नवीन नवीन बनत आहेत. आणि त्यापायीं जनतेचे लक्षावधि रुपये कायदे ठाकठीक चापातून बिनबोभाट दडपले जात आहेत, त्याकडे किंचित विचारपूर्वक पहा, म्हणजे आमच्या शंकेची मुख्खी समजून येईल, आज मुंबईच्या बॅकबेवर दिसणारे साखळ दंडाचे चार खांब थोड्याच वर्षांत टोलेजंग देवळांत रूपांतर पावतील, आणि बाबूलनाथी घुमटाच्या उंचीशी स्पर्धा करणार्‍या त्या देवळांतला टिळकेश्वर भक्तांच्या नवसाला २४ तासांतून ४८ वेळ भसाभस प्रसन्न होऊ लागेल. तात्पर्य, बहिष्काराचा हा मार्ग दिसतो तितका खटकेबाज उपायाचा नव्हे.

दुसरा मार्ग वहिवाटीला धाब्यावर बसवून, किंबहुना वहिवाटीचा चेंदामेंदा करून हिंदुत्वाच्या ठळक सबबीवर अखिल हिंदु जनांनी देऊळप्रवेशाचा आणि देवपूजेचा अधिकार धिटाईने बजावावा. वहिवाट ही रूढींचीच सख्खी बहीण, तिची पर्वा षंढ, गुलाम आणि मूर्ख यांनीच करावी 'आम्ही हिंदू आहोत. आम्हांला देवळात शिरून देवदर्शन घेण्याची परवानगी देता कां हो.म्हणून लेखी तोंडी आर्जव वेंगाडणी करणार्‍या उमरावतीच्या हिंदूत आणि' आम्ही स्वराज्याला पात्र आहोंत, आम्हाला देता का हो स्वराज्य : म्हणून काँग्रेसी वेंगाडणी करणार्‍या हिंदी लोकात काय फरक! स्वराज्याचा प्रश्न माशांने गिळलेल्या माणकाचा, तर देवळाचा प्रश्न भटाने गिळलेल्या धर्माचा. धर्मात सरकार हात घालीत नाहीं, अशी एक गैर समजूत रूढ आहे. धिटाईने देवळांत प्रवेश करण्याच्या अगर देवपूजेच्या बाबतींत जर भटांच्या बाजूने सरकारी कायदा आडवा येत असेल, तर भटेतर अखिल हिंदुजनांच्या हिंदुत्वाचा तो अपमानच होय. असा अपमान सहन करण्यापेक्षां सत्याग्रह करून मेलेले काय वाईट? मात्र, हा निर्वाणीचा प्रश्न दगड्या देवदेवींची पूजा करण्यास हापापलेल्या अंधश्रद्धाळू हिंदुचाच आहे. नवमतवादी सुधारकांना देवदेवळांची गुलामगिरी यापुढें साफ नको आहे.

कोणत्याही गोष्टींचें प्राचीनत्व मानवी प्रेमाशीं घट्ट चिकटून बसते. ती गोष्ट त्याज्य असली तरी मग तिचा त्याग करणे माणसाच्या जिवावर येते, पण त्यागाशिवाय कोणत्याही बाबतींत प्रगति होणें शक्य नाहीं. हा सनातन निसर्ग धर्म आहे. अर्थात हिंदु समाजाला हिंदु समाज 'म्हणून इतर मानव वंशाच्या चढाओढींत मर्दाप्रमाणे टिकाव धरावयाचा असेल, तर सामाजिक संघटनेंत द्वताचें व द्वेषाचे विष कालवणार्‍या देवळांचा प्रेमा दूर झुगारून देणेंच अगत्याचें आहे. देवळे आपल्या मूळ धर्मापासून कां चेवली?तर तो भटाभिक्षुकांच्या एकमुखी सत्तेखाली गेली म्हणून देवळांत भट का घुसला आणि शिरजोर झाला?तर देवळांत एक कोणी तरी दगड्या देव बसला म्हणून.देवामुळे भट आणि भटामुळें देवळें अर्थता देवाचीच उचलबांगडी केली, तर भटाला व त्याच्या एकमुखी सत्तेला कायमची गति मिळून देवळांच्या इमारती व त्यांची उत्पन्ने हव्या त्या देशकार्यासाठी आज मोकळी होतील. हिंदुस्थानांतल्या सगळ्या मूर्ती व पिंड्या जमा करून एखादा मोठ्या मध्यवर्ती शहरांत त्याचे एक कायम प्रदर्शन करावें. म्हणजे भावी हिंदु पिड्यांना आणि इतिहास संशोधकांना

अनुक्रमणिका

या प्रदर्शनांमुळें हिंदुजनांच्या धार्मिक उत्क्रांतीचा इतिहास चांगला अभ्यासता येईल. रिकामी पडलेली देवळें आणि त्याची कोट्यवधि रुपयांची उत्पन्नें यांचा हिंदुसमाजाच्या सुधारणेसाठीं व प्रगतिसाठीं कसकसा उपयोग करावयाचा, हें ठरविण्यासाठीं एक अखिल भारतीय हिंदु मंडळ नेमावें. अशी काही योजना झाल्यास पंथ मत पक्ष भेदांचा निरास होऊन देवळांचा अनेक सतकार्यांकडे उपयोग होईल. सार्वजनिक वाचनालयें, संशोधन शाळा, वेधशाळा, शास्त्रीय प्रयोगशाळा, दवाखानें, अनाथाश्रम, सोशल क्लब, व्याख्यानमंदिरें, तालीमखाने, सहभोजनशाळा इत्यादि नाना प्रकारच्या, देशोद्धारक गोष्टींकडे देवळाचा सदुपयोग अभेद भावानें करता येणें शक्य आहे. शुद्धी संघटनाचें कामहि तेथे उत्तम होईल. सारांश, हिंदु समाजांत माणूसघाण पसरविणाऱ्या देवळातल्या बागूलबोवा किंवा बागुलबाईच एकदां उचकून मध्यवर्ती प्रदर्शनांत जाऊन बसली की हिंदुसंघटणाचा मार्ग पुष्कळच मोकळा होईल. या कामी त्यागाची इतकीहि धडाडी हिंदु जनांना दाखविता येत नसेल तर स्वराज्यालाच काय, पण जगायलाहि ते कुपात्र ठरतील, यांत मुळींच संदेह नाहीं.

तो सच्चिदानंद परमेश्वर अखिल हिंदु भगिनीबांधवांना देव-देवळाची धार्मिक गुलामगिरी रसातळाला नेण्याची प्रेरणा देवो, एवढी अनन्य भावानें प्रार्थना करून. हा बराच वाढलेला विचार आचारक्रांतीसाठी वाचकांच्या चरणी रूजू करतो.

अनुक्रमणिका

आगामी

# कोदंडाचा टणत्कार

इत्यादी

खंड पाचवा

अनुक्रमणिका